[विद्याविनोद मासिकपुस्तकांतून प्रसिद्ध झालेलें]

महाकवि कालिदासकृत मेघदूताचे आधारें रचिलेलें

यक्ष-प्रमाद

अथवा

मुक्त वेणीदाम-बंधन.

नामक

सप्तांकी संगीत नाटक.

लेखक—"किरात."

पुणें येथें
रावजी श्रीधर गोंधळेकर यांचे " जगद्धितेच्छु "
छापखान्यांत छापून प्रसिद्ध केलें.

सन १९०४.

किंमत १ रुपाया.

[खालील ज्ञानेश्वरांच्या उक्तीप्रमाणें प्रस्तुतचा प्रयत्न आहे.]

× × विश्वप्रगटितिया गभस्ती । काय हातिवेन न कीजे आरती ॥
कां चुळोदकें अपांपती । अर्घ्य न दिजे ॥
बाळक बापाचिये ताटीं रिगे । आणि बापातेंच जेवऊं लागे ॥

ज्ञानेश्वर.

अर्पण.

महाकवि कालिदास

याच्या

अभंग, अमर व कालातीत

अशा

चिदंशस्वरूपी

आत्म्यास

ही

त्यांच्याच

मेघदूतकाव्याचे आधारें रचलेली

अल्पशी कृति

सप्रेम

अर्पण केली आहे.

लेखक—किरात.

नाटकांतील पात्रें.

रमणक—नायक कुबेराच्या हाताखालील एक प्रमुख अधिकारी.
मधुकर—एक यक्ष, ,, एक दुय्यम अधिकारी.
मदनसुंदर—अलकेंत आलेला. रामगिरीवरील एक मनुष्य.
नरवाहन—कुबेर, यक्षाधिपति.
इंदिरा—नायिका, रमणकाची स्त्री.
चंपा—, चतुरिका. } इंदिरेच्या दासी.
मालती—मधुकराची स्त्री.
मदनिका— (मेघवर्ण) } मदनसुंदराची स्त्री.

जीमूत सेवक वगैरे.

सूचना.

नाटकाच्या शेवटीं शुद्धिपत्र जोडलें आहे त्याप्रमाणें दुरुस्त्या करून नाटक वाचावें.

३५/३/१९६९

भूमिका.

हें यक्षप्रमाद अथवा मुक्तवेणीदाम-बंधन नाटक कविकुल-मुकुटमणी कालिदास यांच्या मेघदूत नामक काव्याच्या आधारें रचिलें आहे. वरील काव्याच्या आधारें नाटकविरचनाची मूळ कल्पना श्रीमंत शिवाजीमहाराज होळकर यांची आहे. अर्थात् त्यांच्याच रसिकतेंत व कल्पकतेंत प्रस्तुत नाटकाचें जनन होत आहे, ही मोठ्या आनंदाची गोष्ट आहे. कारण यापूर्वी श्रीमंताकडून बाणकृत कादंबरीचीही नाटकाकरितां अशीच निवड झाली होती; व शापसंभ्रम हें त्याच निवडीचें फल होय. नाट्यविषयक दृष्टीनें पाहतां कादंबरीच्या योजनेपेक्षां मेघदूताची योजना जास्त प्रशस्त व विचारपूर्वक झालेली दिसते. नाटकाकरितां कादंबरीची योजना योग्य होती किंवा अयोग्य होती हा प्रश्न बाजूस ठेवून विचार करितां कादंबरींत नाटकास अवश्य लागणारें संविधानक, त्याची गुंफागुफ, त्यांत येणारे निरनिराळे प्रसंग, नायक आणि नायिका यांच्यापासून तों बारीकसारीक परिजनांच्यापर्यंत लागणारी पात्रांची योजना, व त्यांचे स्वभावविकास हीं जशीं मुळांतच रेखाटलीं गेलीं आहेत तसा प्रकार मेघदूतासंबंधानें नाहीं. मेघदूतामध्यें नाटकास अवश्य लागणारें असें संविधानक कांहींच नाहीं; इतकेंच नव्हे, पण नायक व नायिका यांचा नुसता नामनिर्देशही कवीनें कोठें केलेला नाहीं. मग इतर पात्रांची योजना अथवा त्यांचा नामनिर्देश त्यांत स्पष्टपणें केलेला कोठून असणार! नाटकास लागणाऱ्या सामुग्रीसंबंधानें विचार करितां कादंबरी व मेघदूत या दोहींमध्यें सकृद्दर्शनींच इतकें महदंतर दिसून येतें. एकांत नाटकविरचनास लागणाऱ्या सर्व साहित्याची यथास्थित जुळवाजुळव व सिद्धता करून ठेवलेली व दुसऱ्यांत वरील सर्वच गोष्टींचा आभाव. अशा तऱ्हेची वस्तुस्थिति असल्यामुळें एकांत नाटककाराच्या ठिकाणीं आवश्यक असणाऱ्या सर्व गुण-समुच्चयाच्या प्रकटनास लागणाऱ्या खुल्या प्रदेशाचा मागमूसही नाहीं; तोच दुसऱ्यांत नाटक-

काराच्या ठिकाणीं नाटकास योग्य असें कथासूत्र ठाम करण्यास लागणारें तारतम्य, संविधानकचातुर्य, कल्पकता, नाटकांतील पात्रांच्या स्वभावविकासास लागणारें मानवी स्वभावांचें निरीक्षण व ज्ञान, मूळ कवीच्या कल्पनामहोदधींत गाढ निमज्जन करून त्याच्या मनोवृत्तीशीं तादात्म्य व्हावयास आवश्यक लागणारी अशी सहृदयता आणि जाज्वल्य मनोवृत्ती, इत्यादि गुणांचें प्रकाशन करण्यास मनमुराद अवकाश आहे.

वर निर्दिष्ट केलेल्या गोष्टींची बरोबर कल्पना होण्यास मूळ कादंबरी व मेघदूत यांतील विषयांचीही वाचकांस थोडी कल्पना पाहिजे. कादंबरी संबंधानें तशी कल्पना करून देण्याचें प्रयोजन नाहीं. कारण तिचीं प्राकृत भाषांतरें होऊन तिच्या आधारें नाटकें लिहिलीं जाऊन त्यांचे प्रयोगही होत आहेत. मेघदूताची सर्वांशीं वरीलप्रमाणें वस्तुस्थिति नसल्यामुळें व प्रकृत नाटकाला मूळ आधार त्याच काव्याचा असल्यामुळें त्याची वाचकांस प्रथमतः थोडी कल्पना करून देणें इष्ट आहे. व एवढ्याचकरितां त्या दिशेनें येथें अल्पसा प्रयत्न करितों.

मेघदूत काव्याचें थोडक्यांत संविधानक सांगावयाचें ह्मटलें ह्मणजे तें असें आहे प्रकृत काव्यांतील नायक कुबेर—सेवक एक यक्ष कल्पिला आहे. तो अत्यंत दयितानुरक्त होता व ह्या त्याच्या अनुरागातिरेकामुळेंच एकदां त्याचेकडून स्वामिकार्याकडे अनवधान झालें. व त्या योगानें अर्थातच त्याजकडून मोठा प्रमाद घडला. ह्यामुळें यक्षाधिप—कुबेर अत्यंत कोपायमान होऊन त्यानें त्या यक्षासः—

॥ अगा, जयेशीं लंपट होउन मत्त असा झालास ॥
॥ त्या दयितेचा वडो विरह तुज पूर्ण द्वादश मास ॥

असा शाप दिला. शापाचे दिवस कसे बसे तरी कंठण्याकरितां तो यक्ष रामगिरीवर जाऊन राहिला. येथेंच त्यानें प्रियस्त्रीविरहाचे कित्येक महिने मोठ्या दुःखानें कंठले. पुढें वर्षाकाल येऊन आषाढ महिना आला. शापग्रस्त व विरहदग्ध यक्ष एक दिवस रामगिरीवरील जंगलांत इकडे तिकडे भटकत असतां, आकाश ढगांनीं भरून येऊन मधून मधून मेघांचा गडगडाट व विजांचा कडकडाट होऊं लागला. अशा प्रसंगीं साहजिकपणेंच त्याला त्याच्या स्त्रीची

स्मृति होऊन त्याच्या चित्तवृत्ती अगदीं उचंबळून गेल्या. व या प्रेमभरांत दयिताविरहानें वेडावून गेल्यामुळें गिरिशिखरांना स्पर्श करून उत्तरेकडे जाणाऱ्या अचेतन अशा एका सुंदर नीलवर्ण मेघास सजीवच आहे असें समजून त्यालाच तो आपल्या दयितेकडे आपला निरोप घेऊन जाण्याविषयीं विनवूं लागला. व त्यानें त्या मेघास अलकावतीस जाण्याचा मार्ग सांगून मग त्याजजवळ त्यानें आपल्या स्त्रीस सांगण्याकरितां ह्मणून निरोप सांगितला. आणि "माझ्या दयितेस माझा एवढा निरोप पोहोंचवून मग तूं तुला इष्ट वाटेल त्या प्रदेशीं विहार कर; मात्र तुझा आणि तुझी प्रिया जी विद्युत् तिचा कधींही वियोग न होवो." असें नायकाच्या तोंडून वदवून कवीनें आपल्या काव्याची परिसमाप्ति केली आहे.

पण यापुढेंही कोणी अन्य कवीनें कांहीं जास्त श्लोक घालून त्यांत तो मेघ अलकावतीस त्याचा निरोप घेऊन जात आहे व पुढें त्या विरही यक्षाची व त्याच्या स्त्रीची भेट होत आहे असें दर्शवून प्रस्तुत काव्य आनंदपर्यवसायी केलें आहे. अशा प्रकारचें ह्या काव्याचें कथानक आहे.

वर दिलेल्या मेघदूत काव्याच्या अल्पशा स्वरूपावरून त्याच्या आधारें नाटकरचना करण्यास त्यांत कितपत सामुग्री असेल याची मेघदूतकाव्याशीं अगदींच अपरिचित असणाऱ्या वाचकांस अंधुकशी तरी कल्पना सहज करितां येईल. ज्यांनीं संस्कृतांतून मूळ काव्य वाचलें असेल त्यांस, अथवा कै. कृष्णशास्त्री चिपळूणकर यांचें प्राकृतांत उतरलेलें लोकप्रसिद्ध भाषांतर ज्यांच्या नजरेखालून गेलें असेल त्यांस, नाटकाला आवश्यक अशी सामुग्री सदर्हू काव्यांत किती सांपडेल याची बरोबर कल्पना करितां येईल.

'पूर्व मेघांत' नायक मेघास रामगिरीहून अलकावतीस जाण्याचा मार्ग सांगत आहे. व वाटेंत त्यास कोणकोणते पर्वत, नद्या, शहरें, देवस्थानें व इतर प्रेक्षणीय अशीं स्थानें लागतील, व काय काय चमत्कार पहावयास सांपडतील तें सविस्तरपणें कथन करीत आहे. 'उत्तर मेघांत' नायक अलकावतीचें, आपल्या मंदिराचें व आपल्या विरहिणी स्त्रीच्या–त्याच्या कल्पनेनें अजमासलेल्या–दुःखमय व कष्टद स्थितीचें वर्णन करून आपल्या दयितेस सांगण्याकरितां त्या मेघाजवळ तो निरोप सांगत आहे. पूर्वमेघांतील वर्णन के-

बहु स्थलवर्णनात्मक असल्यामुळें त्यांतून नाटकाला योग्य असें साहित्य फारच क्वचित् मिळतें. उत्तरमेघांत नायकाच्या उत्कट मनोवृत्तीचें बहारीदार चित्रपट रंगवून जागजागीं त्याच्या दयिताविषयक उत्कट प्रेमाचे उद्गार प्रकटित केले असल्यामुळें नायकाच्या स्वभावाची बरोबर कल्पना करण्यास यांत बरेंच साहित्य मिळतें. प्रकृत लेखकानें याच साहित्यावर आपली सर्व मदार ठेविली आहे. व कोणाही नाटककारास अशा प्रसंगीं ह्या मार्गाचें अवलंबन केल्याशिवाय गत्यंतरच नाहीं.

आतां प्रस्तुत नाटकांत मेघदूत काव्यांत मिळणाऱ्या साहित्याचा लेखकानें कसकसा उपयोग केला आहे व त्यास केवळ कल्पनासृष्टिवरच किती भिस्त ठेवावी लागत आहे, याचें या स्थलीं थोडेंसें दिग्दर्शन करणें आवश्यक आहे. पण हें करण्यापूर्वी कवि व नाटककार यांमधील जें निसर्गतः असणारें अंतर व त्याच्या भरारीचे प्रदेश यांचें थोडेंसें ज्ञान असणें जरूर आहे.

कवि आणि नाटककार यांत भेद आहे तो हा:—कवीला आपल्या कल्पना-विहंगावर बसून हव्या तशा व हव्या तितक्या उंच भराऱ्या मारितां येतात. त्यास हव्या त्यावेळीं हवा तेथें प्रवेश करितां येतो. त्याचा " प्रतिभाविहंग उच्च उड्डाण करून अव्याहत गतीनें आकाशपंथीं हव्या तेवढ्या भराऱ्या मारूं लागला ह्मणजे त्याच्या खालून राष्ट्रांच्या राष्ट्रें आणि खंडेंच्या खंडें निघून जातात " इतकेंच नव्हे, पण अग्नि, आप, तेज, वायु आदिकरून पंचतत्वांतून सूर्यलोकच्या असह्य तेजोमय प्रदेशांत, तर क्षणांत चंद्रलोकच्या शीतळ कौमुदीप्रकाशांत, क्षणांत मंगळाच्या लालभडक कक्षेवर तर क्षणांत शनीच्या उपग्रहांच्या सान्निध्यांत, क्षणांत खांडव-वनदाही अग्नीच्या दिव्य लोळांत तर क्षणांत अगणित सृष्टीच्या गगनांत जाऊन भिडणाऱ्या चक्राकार वातचक्रांच्या गिरक्यांच्या अग्रभागीं, क्षणांत अलकानंदेच्या तीरीं तर क्षणांत आकाश-गंगेच्या लांबलचक दिसणाऱ्या दिव्य प्रकाशाच्या अद्भुत कांतिमय पातळीवर· केव्हां धवलगिरीहून उच्च अशा गिरिशिखरांच्या अग्रांवर तर केव्हां पाताळांतील नागलोकच्या अमृतपूर्ण कूपासन्निध, एकंदरींत कवीच्या कल्पनाविहंगास हव्या त्यावेळीं हवा तेथें प्रवेश करितां येतो, त्याला असंभवनीय गोष्टीही संभवनीयशा दाखवितां येतात. त्याला वाचाशक्ति नाहीं अशा सजीव व नि-

जींव सृष्टीलाही बोलवितां येते. दृष्टिशून्य पदार्थांच्या ठिकाणीं त्याला दिव्यदृ-ष्टी ठेवितां येतें. अशा एक कीं दोन गोष्टी ह्मणून सांगाव्या ! एवंच त्यास केव्हांही अगम्य व अगाध असें कांहीं एक नाहीं. अलंकार–रत्न–भांडाराची किल्ली सर्वस्वीं त्याच्या हातांत असते. वाटेल तेव्हां वाटेल तो अलंकार परिधान करण्याची अथवा त्यांहीं दुसऱ्यास भूषित करण्याची त्यास सर्वस्वीं मुभा असते. अस्वाभाविक गोष्टींच्या ठिकाणीं देखील तो स्वाभाविकता आणूं शकतो. मग स्वभावसिद्ध गोष्टीवर त्याचा ताबा किती असतो हें सांगावयासच नको ! तशी गोष्ट नाटककारांची नाहीं. त्याला मर्यादित क्षेत्रा–पलीकडे जातां येत नाहीं. जणूं काय भारलेल्या काठीनें जी काय हद्द त्याला ठरवून दिली असेल, तिच्या पलीकडे त्याला चुकून सुद्धां पाऊल टाकतां यावयाचें नाहीं. त्याच्या कल्पना–विहंगाची उंच भरारी ह्मणजे फार झालें तर मुंबईतील राजाबाई टॉवरच्या अथवा इजिप्त देशांतील एखाद्या अति उच्च अशा मनोऱ्याच्या पॅगोडाच्या उंची इतकी ! फार झालें तर धवलगिरीच्या शिखरावर आपल्या एखाद्या पात्रास नेऊन तेथून त्याचा तो कडेलोट करवील. अथवा एखाद्या विमानांतून उंच आकाशांत आपलें पात्र घेऊन जाऊन त्यास तेथून तो पृथ्वीवर अथवा समुद्राच्या पृष्ठभागावर पाडवून त्यास इतक्याही संकटांतून निभावून आणून तो आपलें नाटक आनंदपर्यवसायी करूं शकेल. पण यापलीकडे भरारी मारतां येणें–निदान शास्त्रीयपद्धतीनें जोंपर्यंत असंभाव्य गोष्टी संभवनीय झाल्या नाहींत तोंपर्यंत तरी–शक्य नाहीं. त्याचा ताबा म्हटला म्हणजे शक्य व संभाव्य तेवढ्या गोष्टींवरच ! अशक्य, अतर्क्य व असंभाव्य गोष्टींवर त्याचा बिलकूल ताबा नाहीं. एखाद्या स्थलीं प्रवेश करणें झालें तर त्यास उचित काल व प्रसंग पाहूनच करावा लागतो. अलंकाररत्नभांडागाराच्या किल्लीचा जुडगा जरी त्याचे हातीं असतो तरी त्याला पात्र, प्रसंग व समय हीं पाहूनच त्यांतील अलंकारांचा उपयोग करावा लागतो. स्थल, काल व कार्य या त्रयीच्या पाशांनीं तो बद्ध झालेला आहे. कवीची स्थिति तशी नाहीं. ती याहून फारच भिन्न आहे. कवीच्या ठिकाणीं निरंकुशता हवी तशी खपली जाते. नाटककारांच्या ठिकाणीं तसें कधींच खपलें जावयाचें नाहीं. कवि व नाटककार यांच्यांत असें निसर्गतःच विलक्षण अंतर आहे.

कवि व नाटककार यांच्यातील अंतर व त्यांच्या उड्डाणाच्या मर्यादेचे प्रदेश कळल्यावर प्रकृत प्रसंगीं मूळ काव्यांतून नाटकास योग्य असें कोणचें साहित्य कसकसें घेतां आलें व त्यांतील कोणचे भाग वर्ज्य करावे लागले याची कल्पना आणून देणें फारसें कठीण नाहीं.

मूळ मेघदूत काव्यांतील प्रधानरस विप्रलंभ शृंगार हा आहे. या विप्रलंभ शृंगाराची बरोबर उठावणी करण्याकरितां आह्मांस संभोग शृंगाराचाहि अवलंब करावा लागून, प्रकृत नाटकाचे बहुतेक पहिले दोन अंक तर त्याचेकडे द्यावे लागले आहेत. मेघदूताचा आरंभच नायकाला शाप होऊन तो रामगिरीवर जात आहे असें सांगून केला आहे व आह्मांला तर नाटकांत शापापर्यंत मजल आणून पोंचवायास दुसऱ्या अंकाचा शेवट पहावा लागला आहे.

नांदीनंतर जो प्रस्ताव केला आहे त्यांत नायकाच्या उत्कट दयितानुरागाचें प्रतिबिंब दाखविलें आहे. नटीच्या तोंडीं प्रथमतःच हेमंतऋतूस अनुलक्षून जें थंडीचें वर्णन घातलें आहे तें उत्तरमेघांतील "शापान्ते मे भुजगशयनादुत्थिते शाङ्र्गपाणौ०" यावरून होय. एक वर्षाचा विरह होण्याचा शाप जर कार्तिकांत संपतो तर अर्थात् त्याचा आरंभही कार्तिकांतच झाला पाहिजे हें उघड आहे; आणि हें लक्षांत ठेवून व तसेंच अकलेची स्थलविषयक परिस्थिति लक्षांत आणून वरील ७ व्या पृष्ठावरील "दयितासंग हृदंगम सकलां" हें पद्य, व त्यापुढील नायकाच्या तोंडचें पद्य हीं घातलीं आहेत. विदूषक एका बोकयाचे पाठींत सोटा मारतो असें दाखविलें आहे; याचा कटाक्ष कोणीकडे आहे हे चाणाक्ष वाचकांचे लक्षांत येईलच. रमणकाचे मंदिराचें बाहेर सज्जावर कमलाक्ष नामक शुक व कमला नामक सारिका (मैना) ह्यांना पंजरस्थ दाखविलें आहे. त्याचप्रमाणें मुचकुंद नामक नीलकंठाला (मयुराला) स्फटि-

१. पृच्छन्तीनां मधुरवचनां सारिकां पञ्जरस्थां ॥

(उ. मेघ २२ श्लो.)

२. तन्मध्येच स्फटिकफलका कांचनी वासयष्टिः ॥
तालैः सिञ्जद्वलय सुभगैर्नर्तितः कांतया मे ॥
या मध्यास्थे दिवसविगमे नीलकण्ठः सुहृद्वः ॥

(उ. मे. १६ श्लो.)

क फलिका अशा कांचनाच्या वासयष्टीवरून उचलून येथें सज्जावर आणून ठेविलें आहे व इंदिरेकडून त्याला नृत्य करण्यास लाविलें आहे.

मयूराचा व सारिकेचा उल्लेख मेघदूतांत आहे. पण शुकाचा नाहीं. त्याची योजना नवीन आहे. कमलाक्ष व कमला यांच्या वियोगानें नायक व नायिका यांचा भावी वियोग ध्वनित केला आहे. शुकाची योजना करण्यांत दुसराही एक हेतु आहे. शुक हा मदनाचें वाहन आहे. व रमणकास त्याच्या विलासी व प्रणयी स्वभावावरून मदनाचा मित्र कल्पिला आहे. व मदनानें त्याला हा शुक भेट म्हणून दिला आहे अशी कल्पना करून त्याची योजना केली आहे.

मधुकर नामक एक यक्ष व मदनसुंदर नांवाचा एक मनुष्य, अशीं दोन कल्पित पात्रें आणलीं आहेत. हे दोघेही रमणक राजसभेंतून एकदम उठून कां गेला याचा छडा काढण्याकरितां त्याच्या मागोमाग येत आहेत. पण हे दोघेही नायिकेचें सौंदर्य पाहून तिजवर मोहित होऊन जाऊन तिच्या प्राप्तीची दुष्ट वासना धरीत आहेत व तदनुसारच त्यांचा वर्तनक्रम दाखविला आहे. व यांच्याचकडून पुढें रमणक मेल्याची दुष्ट वार्ता पसरविली आहे. ह्या पात्रांची कल्पना उत्तरमेघांतील ४९ व्या श्लोकाच्या दुसऱ्या चरणावरून केली. त्यांत विरही यक्ष आपल्या स्त्रीस:--

" मा कौलीनात् चकितनयने मय्यविश्वासिनी भूः " ॥

[लोकप्रवादात् मयि विषये मरणशंकिनी मा भव]

असें सांगत आहे. यावरून कालिदासाच्या मेघदूतांतील नायक आपल्या मृत्यूसंबंधानें दुष्ट व खोडसाळ कंडी कोणी पिकवील व त्यायोगें आपली विरहविव्हल प्रिय दयिता प्राणहत्येसारख्या घोर साहसासही कदाचित् प्रवृत्त होईल, अथवा तिला एकदम धक्का बसून तिचे प्राण आपोआप निघून जातील, अशाबद्दल शंकित होऊन तसें न होण्याबद्दल आपल्या कुशल वृत्ताचा निरोप पाठवून योग्य ती खबरदारी घेत आहे. कालिदासानें आपल्या विरही नायकाच्या ठिकाणीं जी शंका दाखविली आहे व तिच्या निरसनार्थ जी ही तडजोड योजिली आहे ती अत्यंत हृदयंगम आणि फार बहारीची आहे. ह्या एकाच कल्प-

नेवरून देखील त्या महाकवीच्या ठिकाणीं मनुष्यस्वभावाचें व त्याच्या मनोवृत्तीचें किती विलक्षण मार्मिक ज्ञान होतें याची कल्पना करितां येईल.

वर दिलेल्या चरणांतील "कौलीन" शब्दावरून नायकाच्या मृत्यूबद्दल खोडसाळ कंड्या पिकवणाऱ्या दुष्ट पात्राची योजना करण्याची कल्पना अधिकच दृढ झाली. अर्थात् **मदनसुंदर** व **मधुकर** या पात्रांचें जननही ह्या कल्पनेंतूनच झालें आहे. व त्यांचे स्वभावही तदनुसारच रेखाटले आहेत. मदनसुंदर हा रामगिरीकडील एक मनुष्य होता असें दाखवून त्याच्या ठिकाणीं मनुष्याच्या ठिकाणीं साहजिकपणेंच असणारी कुटिल व नीच वृत्ती दाखविली आहे. **मधुकर** हा यक्ष कल्पिला असून तो भोळसर असल्यानें मदनसुंदराच्या अनुमतानें वागत आहे असें दाखविलें आहे. हीं दोन पात्रेंच कुबेराचा गैरसमज करवून त्याजकडून रमणकास शाप देववून त्याची व त्याच्या स्त्रीची ताटातूट करीत आहेत. त्यांची अशी ताटातूट केल्यावर इंदिरेच्या प्राप्त्यर्थ त्यांच्या खटपटी दाखविल्या आहेत. पण त्या सर्व खटपटी व्यर्थ होऊन उलट त्यांच्यावरच बाजू येऊन ते उपहासास पात्र होत असल्याचें दाखविलें आहे.

मूळ काव्यांत विरहग्रस्त नायक अचेतन मेघास दूत कल्पून त्यालाच आपल्या दयितेस निरोप घेऊन जाण्यास सांगत आहे, तसाच प्रकार प्रकृत नाटकांत ठेवला आहे. नायकाच्या ठिकाणीं असलेली इतकी प्रेमळ, उत्कट व उच्च मनोवृत्ती जशीच्या तशीच ठेवण्यांत विशेष सौंदर्य आणि स्वारस्य आहे हें प्रत्येक सहृदय व मार्मिक वाचकाचे लक्षांत आल्याशिवाय राहणार नाहीं. मेघदूत काव्यासंबंधानें कालिदासाचें सर्व ऐंद्रजालिक अथवा गारुड याच कल्पनेवर आहे आणि याच अत्यंत मनोहर आणि हृदयंगम अशा कल्पनेच्या अपूर्व मोहिनीनें तो आपला काव्यप्रदेश भारून टाकीत आहे! कल्पना-विहंगाच्या अशा उच्च भरारीबरोबर तो जी अज्जब आणि विलक्षण जादू पसरीत आहे तिचा प्रभाव कांहीं विलक्षण आहे. तिच्या बंधनांतून सुटणें फार मुष्किलीचें आहे. प्रकृत नाटकांतही तीच जादू, तीच मोहनी व तेंच ऐंद्रजालिक आम्हीं यत्किंचित्‌ही न दुखवतां जसेंच्या तसेंच ठेवण्याचा प्रयत्न केला आहे. त्याचा भंग न होऊं देण्याविषयीं शक्य तेवढी दक्षता ठेविली आहे. मात्र रमणकाचा निरोप अचेतन मेघानें इंदिरेकडे नेणें ही गोष्ट वस्तुतःच शक्य नसल्या-

मुळें मदनसुंदराची स्त्री मदनिका हिच्याकडून रमणकाचा सर्व निरोप आइून ऐकवून तिच्याकडून संदेशहरणाचें दूत कार्य करविलें आहे.

चंपा व चतुरिका ह्या इंदिरेच्या दासी दाखविल्या आहेत. मालती ही मधुकराची स्त्री कल्पिली आहे. धनपती कुबेर हे 'नरवाहन या नांवानें दाखविले आहेत. हें पात्र मूळ काव्यांत सुचविलेलेंच आहे. नरवाहनाच्या स्त्रीचें पात्र एका प्रसंगीं आणावें लागलें आहे. नाटकाच्या जुळणीकरितां ह्या पात्रांची जागजागीं जशी योजना करावी लागली तशी केली आहे.

नायकाचा स्वभाव कालिदासानें रेखाटलेल्या त्याच्या अत्यंत प्रेमळ व उत्कट मनोवृत्तींना आणि त्याच्या ठिकाणीं असलेल्या गाढ दयितानुरागाला अनुरूप असाच ठेविला आहे. त्याच्या विलासप्रियतेचें व गाढ प्रणयाचें बरोबर दर्शक होईल असेंच रमणक हें नांव त्यांस दिलें आहे. इंदिरा ही नायिका कल्पून, कालिदासानें आपल्या नायकाकडून वर्णिलेल्या स्थितीस सदृश असेंच तिच्या विरहावस्थेचें चित्र काढण्याचा प्रयत्न केला आहे. कालिदासानें मूळ काव्यांत जें रंगाचें त्रोटक साहित्य ठेविलें आहे तें घेऊनच हें नायिकेचें पात्र रंगविलें आहे.

वर निर्दिष्ट केलेल्या गोष्टींवरून प्रकृत नाटकांत लेखकानें मूळ काव्यांत असलेल्या साहित्याचा कसकसा उपयोग केला आहे, भिन्न भिन्न पात्रांची योजना कशी केली आहे, त्यांच्या स्वभावांचे ओघ कसकसे वाहत नेले आहेत, व एकंदर संविधानकाची जुळणी कोणच्या थाटावर नेली आहे, याची वाचकांस बरीचशी कल्पना करितां येईल; व ही कल्पना करितां आली म्हणजे भूमिकेच्या आरंभीं 'नाटकाकरितां कादंबरीपेक्षां मेघदूताची निवडच उत्तम झाली' असें जें आम्ही विधान केलें आहे त्याचें याथार्थ्यही वाचकांचे लक्षांत येईल. कादंबरींत असणारें इतर सर्व साहित्य जरी उत्कृष्ट असलें तरी नाटकांतील मुख्य पात्रें जीं नायक आणि नायिका यांच्या ताटातुटीचे व पुनर्संगमाचे-नाटकाच्या केंद्रस्थानीं असणारे-जे प्रसंग घडून येत आहेत ते त्यांतील नायकाच्या मृत्यूनें व त्यांस जन्मजन्मांतरीं होणाऱ्या पूर्व जन्मींच्या स्मृतीनें जमून येत असल्यामुळें अर्थातच नाटकासारख्या दृश्य काव्यास तर ते अत्यंत प्रतिकूल व निःसंशय रसविघातक आहेत. काल, स्थल, व कार्य या त्रयीचें ऐक्य वरील

रसविघातक व प्रतिकूल द्रव्याच्या योगानें अत्यंत विस्कळित होऊन संधिपंचकाचाही विग्रह अथवा विप्रलंभ होतो. कादंबरींत असणारें हें असलें रसविघातक द्रव्य मेघदूतांत नसल्यामुळेंच त्याची निवड कादंबरीपेक्षां उत्तम झाली आहे असें सप्रमाण विधान करितां येतें.

आतां मेघदूतांतील साहित्याचा आपल्या नाटकाकरितां प्रकृत लेखकानें कितपत आणि कोणच्या प्रकारें उपयोग करून घेतला आहे याचें निरीक्षण करण्याचें काम सहृदय व मार्मिक अशा अधिकारी वाचकवृंदाचें आहे. वर या संबंधानें आह्मीं जे दोन शब्द लिहिले आहेत ते केवळ—कादंबरीपेक्षां मेघदूताची निवड उत्तम झाली असें जें आह्मीं विधान केलें आहे तें कोणच्या आधारावर केलें आहे याची वाचकांस त्रोटकशी तरी कल्पना यावी व लेखकाची सामान्यतः कोणच्या प्रकारची दिशा आहे तें कळावें एवढ्याच हेतूनें होय. अस्तु.

मेघदूतांतील नायक कुबेराच्या देवडीवरील एखादा द्वारपाल अथवा उद्यानसंरक्षक एखादा मालाकार असावा, अशा प्रकारचे तर्क वितर्क कांहीं आंग्ल व आर्य पंडितांनीं व टीकाकारांनीं प्रकट केले आहेत. पण त्यांच्याकडून स्वमतपुष्ट्यर्थ जो पुरावा आला आहे तो विशेषसा विचारार्ह नसल्यामुळें उत्तरमेघांत कालिदासानें जें त्याच्या मंदिराचें वर्णन केलें आहे त्याकडे नजर पोहोंचवून व नायकाच्या विलासी, प्रणयी, रंगेल व कांतानुरक्त स्वभावाचें कालिदासानें जें मनोहर चित्र रेखाटलें आहे तें निःसंशय अशा क्षुद्र देवडीवाल्याचें अथवा माळीदासाचें असणें शक्यच नाहीं, अशा ठाम समजुतीवर आह्मीं आमच्या नायकास कुबेराच्या हाताखालील एक मोठा अधिकारी कल्पिलें आहे. कविकुलमुकुटमणी कालिदासाच्या डोळ्यापुढें देखील वर निर्दिष्ट केलेल्या पंडितांच्या तर्कानें रेखाटलेला नायक खचित नसावा. कारण तसें असतें तर कालिदासाला नायकाच्या दर्ज्याकडे लक्ष देऊन त्यानें वर्णिलेल्या शृंगारांत बीभत्सरसाची योजना करावी लागली असती. पण तसा प्रकार मेघदूतांत कोठेंही आढळत नाहीं. यावरून टीकाकारांच्या अनुमानित नायकाप्रमाणें तो कोणी तरी एखादा यःकश्चित् यक्ष नव्हता असें ठाम अनुमान करितां येतें.

आतां दुसऱ्या एका गोष्टीसंबंधानें विचार करून ही भूमिका आटोपती

घेऊं. यक्षांच्या ठिकाणीं अलौकिक चमत्कार करण्याचें सामर्थ्य असल्याच्या गोष्टी आपण ऐकतों व वाचतों; परंतु तशा गोष्टींचा अनुवाद प्रकृत नाटकांत करणें प्रकृत लेखकास योग्य वाटलें नाहीं. कारण एक तर असले अद्भुत व असंभवनीय प्रकार दृश्य काव्यांत—अर्थात नाटकांत—ग्रथित करणें हें रसहानीस कारण होतें व दुसरें असें कीं खुद्द कालिदासानेंही अशा अद्भुत प्रकारांचें वर्णन आपल्या नायकासंबंधानें मूळ काव्यांत कोठें केलेलें आढळत नाहीं. शिवाय कुबेरादि यक्ष मनुष्यधर्मविशिष्ट होते असें मानण्यास बरीच जागा आहे. "मनुष्यधर्मा धनदो" ही अमरसिंहाची उक्ति आमच्या ह्मणण्यास अंशतः आधार देत आहे. आणि या सर्व गोष्टींचा विचार करूनच आह्मीं प्रकृत नाटकांत अद्भुत, असंभाव्य व अतर्क्य गोष्टींस यत्किंचित् देखील थारा दिलेला नाहीं. आतां याच्या युक्तायुक्ततेसंबंधाचा निर्णय करण्याचें काम मार्मिक वाचकांवरच सोंपविणें प्रशस्त होय. याशिवाय दुसऱ्या एका प्रधान गोष्टीसंबंधानें आह्मी येथें उल्लेख करणार होतों, परंतु मार्मिक टीकाकारांच्या दृक्पथांतून ती गोष्ट निसटून जाणें केवळ अशक्य असल्यामुळें व त्यांजकडूनच त्या गोष्टीचा उल्लेख होणें इष्ट असल्यामुळें त्यासंबंधानें प्रकृतस्थळीं मूकवृत्तीचा आदर करणेंच प्रशस्त होय.

आतां मूळ काव्यांतील ज्या कित्येक कल्पना आह्मीं अज्जीबात गाळून टाकल्या आहेत त्या नाटकांत ग्रथित करितां आल्या नसत्या असें नाहीं, परंतु त्यायोगें झाला आहे यापेक्षां अधिक विस्तार करांवा लागून फार ओढाताणही करावी लागली असती; व त्यामुळें नाटकांत नीरस वाटणारा असा भागही पुष्कळ आणावा लागता. पूर्वमेघांत वर्णनात्मक असे जे भाग आहेत ते मदनिकेच्या तोंडीं घालतां आले असते. पण मनोवृत्तीशीं त्यांचा तितका विशेषसा निकट संबंध नसल्यामुळें त्या मार्गाचा आह्मीं मुद्दामच अवलंब केला नाहीं.

मूळकाव्यांतील कल्पनांचा प्रकृत नाटकाकरितां भिन्न भिन्न तऱ्हेनें उपयोग करून घेतला आहे. कोठें त्या कल्पना पात्रांच्या तोंडीं जशाच्या तशाच ठेविल्या आहेत तर कोठें त्यापासून विशिष्ट प्रवेश व विशिष्ट नेपथ्यरचना यांची योजना केली आहे. एका कल्पनेंत तर नाटकाकरितां लागणाऱ्या नवीन पात्रांचें जनन होत आहे. कांहीं कल्पनांतून नाटकांतील पात्रांच्या स्वभाववि-

कामास लागणारें साहित्यच घेतलें आहे. पण यासंबंधानें येथें इतकेंच पुरे. एकंदरींत मूळ काव्यांतील कल्पनांचा कसा उपयोग करून घेतला आहे ह्याचा योग्य छडा लावण्याचें काम टीकाकारांचें आहे. तेव्हां तें त्यांच्याचकडे सोंपवून ही अमर्याद होत चाललेली भूमिका येथेंच मर्यादित करितों.

चैत्र शु० १० मी
शके १८२६

"किरात."

(कालिदासकृत मेघदूताचे आधारें लिहिलेलें)

यक्षप्रमाद

अथवा

मुक्त-वेणीदाम-बंधन.

अंक १ ला.

नान्दी.

पद [चाल—श्रीहरि सेवक सुमती दईने. गुजराथी]

श्रीहरि माधवचरण नमूनी ॥ कविकुल-मुकुटा वंदन करुनी ॥ सेविन रसिकां अंतरिं रंगुनि ॥ ध्रु० ॥ इंदुरनगरी इन्द्रपुरी खरि ॥ काव्य-मरंदें नृपमणि मंदिरिं ॥ कविकुल-केसरि आनंदित करि ॥ रति मति हरिनुतिं । वसो ठसो असो नसो ॥ धरी हरिददा सदा ध्याउं गाउं त्या शिबास ॥ ऑ ऑ ऑ ऑ ऑ ॥ श्रीहरि० ॥१॥ शिवमणि मल्हारिस मानी ॥ अलोकसुंदर गुणखाणी ॥ कविजन यद्यश गाई कवनीं ॥ शूरवीर तो सुधीर । अरी उरीं धरी सुरी ॥ कुंत-धरी, दंड करी । वीरमणी, धीर रणीं ॥ क्षमा

करी नतावरी । स्मरा धनुर्धरा तया ॥ ऑ ऑ ऑ ऑ ऑ ऑ ॥ श्रीहरि० ॥२॥

[पारिपार्श्वक जातात.]

सुत्रधार– पद (चाल अवन करो तूमचें)

रसिक जना सुखवो ॥ कृति ही, जन मनरंजनिं विजयी होवो ॥ध्रु०॥ वंदुनि आधीं कवि-सिंहातें ॥ नमितों मग मी भवभूतीतें ॥ दण्डी, बाण कवीचें ॥ कवि-मंडल मज मंगल देवो ॥१॥ रसि० ॥ नाट्यप्रिय हा वृंद कवींचा ॥ उद्गम जेथुनि आनंदाचा ॥ कृति ही अवलोकाया ॥ मृत परि उठुनी धांवुनि येवो ॥ २ ॥ रसि० ॥

साकी.

रसिक जनां या वंदुनि विनयें प्रेमें कुसुमाञ्जलि ही ॥
अर्पितसे कवि, इजसह पसरो कविता-परिमल कांहीं ॥
वश जरि वाग्देवी । मंद कवीसहि करि सुकवी ॥ १ ॥

केलिवनांतून आम्ही दोघंही केव्हांच परत आलों. प्रियेनं " तुम्ही पुढें व्हा, ही मी आलेंच "ह्मणून सांगितलंन असं असून अजून कां बरं येत नाहीं ही ? (कांहीं ऐकल्यासारखं करून) नाहीं पण–हा प्रियेच्या नूपुरांचाच आवाज !

साकी.

कर्णमनोहर छुम छुम छुम छुम नूपुररव हा सखिचा ॥
हर्षनिर्भरें हृदयीं प्रकटवि उत्सव आनंदाचा ॥
धांवुनियां वेगें । सखये, आलिंगन देगे ॥ १ ॥

विदूषक–(पडद्याचे एका बाजूस येऊन आपल्याशीं) किती, किती तरी हा स्त्रीलंपट! इतका वेळ तर हा त्या केलिवनांत आपल्या प्रियेबरोबर मजा मारीत होता. ती कुठें नुकतीच शिवदर्शनासाठीं ह्मणून त्या कैलासमंदिराकडे गेली ; तोंच 'प्रिये प्रिये' ह्मणून हा तिला एकसारखा हांका मारीत सुटला आहे! तर ह्याची एकदां चांगली फजितीच उडवली पाहिजे! त्याशिवाय नाहीं ही स्वारी ताळ्यावर यायची! (खुंटीवरील शेला पाहून) हां ठीक आहे. (चुटकी वाजवून) हींच युक्ति! (शेला हातांत घेऊन) हा याच्या प्रियेचा शेला. (शेला पांघरावयास लागतो) हा पांघरून पुन्हां यानं प्रिये ह्मणून हांक मारलीन् कीं मी याच्यापुढें जाऊन उभा रहातों.

सूत्रधार–(पडद्याचे डावे बाजूस जाऊन) इकडून, इकडून आला नाहीं प्रियेच्या तोरड्यांचा आवाज! (पुन्हां पूर्वोक्त साकीचा प्रथम चरण म्हणतो.)

विदू०–(आपल्याशीं) याला फसवायला हीच संधि बरी आहे. (आपले पायांतील घुंगूर पाहून हंसून) हं काय पण कर्ण-मनोहर आहे या तोरड्यांचा आवाज! (तोंडावरून शेला पांघरून पुढें जातो.)

सूत्र०–(नटी समजून) प्रिये, किती, किती तरी उशीर हा?

[विदूषक जवळ जाऊन खालीं वांकून नमस्कार करतो व विनयानें खालीं मान घालून उभा रहातो.]

सूत्र०–(एक हात विदूषकाचे गळ्यांत टाकून त्याचेसह पुढें येऊन प्रिये हें इकडे पाहिलेंस कां!

साकी.

कवि-कुल-गुरुच्या काव्य-मरंदा, चाखाया हे येती ॥
मरंद लोलुप मधुकर गुंगत रसिक-वृंद बहु प्रीती ॥

[इतक्यांत पडद्याचे एका बाजूनें नटी येते.]

पाहि प्रिये, वरती लज्जा सोडुनि सर्व हि ती ॥ १ ॥

नटी–(पडद्याचे बाजूस पण किंचित पुढें येऊन) काय बघतें आहे तरी काय मी इथं हें!

सूत्र०–(विदूषकास आपली प्रिया समजून) प्रिये, आज तूं अशी मुग्ध कां? तूं तर माझा प्रत्यक्ष प्राण आहेस!

नटी–(एकीकडे) अगबाई, काय मी ऐकतें आहे हें! भलत्या स्त्रीला आणि बेधडक प्रिये ह्मणून ह्मणायचं! हो असं तर नसेल, नाहीं तर–(कांहीं ऐकल्यासारखें करून) बरं पण अगोदर स्वारी काय म्हणते आहे हिला तें तरी ऐकूं.

सूत्र०–प्रिये, इथं परकं कोणी नाहीं, मग कां उगीच असे आढे वेढे? अशानं रंग नाहीं यायचा–

नटी–(संतापून जाऊन पाय आपटीत पुढें येऊन) खरंच इथं परकं कोणी नाहीं! चालूं द्या, चालूं द्या आपला रंग. (विदूषकास) अग, तुझ्याकडे काय अन्याय आहे? तूं कां उगीच असे आढेवेढे घेतेस? (विदूषकाचे अंगावर आपला शेला पाहून आपल्याशीं) काय? ह्या कवटाळणीला माझा शेलाहि पण पांघरायला दिला? (रागानें गळ्यांतील रत्नमाला काढून सूत्रधारास देऊं लागते) एवढी ही रत्नमाला नसल्यामुळें ही अगदीं ओकी दिसते, तर (विदूषकाकडे बोट दाखवून) या आपल्या प्राणावर घ्यावा एकदां हा लटकून!

सूत्र०–(चकित होऊन) म्हणजे! इतका वेळ प्रिये प्रिये म्हणून मी म्हणत होतों तें कोणाला तर?

नटी–हंः ही बतावणी बरीक फार सुरेख चालली आहे म्हणायची! माझ्याशीं आणि हें असं वागायचं होईल हें माझ्या स्वप्नीं देखील आलं

नाहीं आजपर्यंत. असं आहे म्हणून जर मला कोणीं सांगितलं असतं तर मीं तें कध्धीं खरं देखील मानलं नसतं! पण हें जर मी प्रत्यक्ष आपल्या डोळ्यांनीं बघतें आहें तर मग हें खोटं असं ह्मणूं तरी कसं? (एकीकडे, पण त्यांना ऐकूं येई असें) यांच्या रंगाच्या आड येण्यापेक्षां आपणच इथून निघून गेलेलं पुरवलं!

[जाऊं लागते.

सूत्र०–प्रिये, माझ्या या चुकीबद्दल मला क्षमा कर. खरोखर यांत माझा कांहीं अपराध नाहीं. या स्त्रीचं अजुनी मीं पुरतंसं तोंड दिखिल पाह्यलं नाहीं. ही तुझा हा शेला पांघरून आली, त्यामुळें मी हा असा फसला गेलों. मला वाटलं कीं, तूंच आहेस. (जीभ चावून) छेः काय, केवढा झाला हा प्रमाद माझ्या हातून? अगोदर तूं या स्त्रीला विचार कीं, 'तूं कोण, कुठली' म्हणून. तिची मला अगोदर क्षमा मागितली पाहिजे.

नटी–(विदूषकास) अहो बाई, तुम्ही कोण, कुठल्या आणि इथं कां? आणि हा शेला कुठून आणलात?

विदू०–कांहो बाई, तुम्ही कुठून आलात इतका हा सवतीमत्सर करायला? (खोः खोः करून मोठ्यानें हंसून शेला काढून टाकतो.) मित्रा, काय? माझं तोंड दिखील पाहिलं नाहीं म्हणतोस? किती तरी खोटं बोलतो आहेसरे पण तूं हें? (नटीस) कां वहिनी, तुम्ही सुद्धां फसलात एकून? (सर्व हंसत असतां सूत्रधाराची पाठ थोपटून) अरे भल्या माणसा, माणसाच्या सोलीव कांद्या? माझ्यासारख्या बुड्ढ्या जवानाच्या खांद्यावर प्रिये प्रिये म्हणून जो तूं बेलाशक हात टाकतोस त्या तुला काय म्हणावं तरी काय? छेः हा इतका स्त्रीलंपटपणा नाहीं बोआ उपयोगी. अशानं एखाद दिवशीं तूं चुकून–

सूत्र०–(त्याचे अंगावरील शेला काढून नटीचे अंगावर टाकतो.) हं: आतां पहा हा कसा शोभतो तो? नाहींतर मघाशीं?

विदू०–पण मघाशीं यानंच फसविलंन् कीं नाहीं आपल्याला?

सूत्र०–खरंच मला एवढीशी देखील कशी ती शंका नाहीं आली. वा: एकूण आपण आमची आज चांगलीच फजिती केलीत म्हणायची! (नटीस) प्रिये, चल. आपल्याला याच्या नादीं लागून उपयोगी नाहीं. (विदूषकास) अरे वेड्या, ही मोठमोठी रसिक आणि विद्वान मंडळी तुझी थट्टा न् मस्करी पहायला नाहीं जमली इथं. तर–

साकी.

घनारूढ कवि-सिंह भराऱ्या उंच उंच बहु मारी ॥
काव्यान्तरिं उत्तुंग कल्पना सुधा-स्यंदवी भारी ॥
मेघदूत नामक त्या काव्या नाटकिं नटवायाची ॥
आज्ञा होई शिवरायाची; रत्नां पारखि गुणिची ॥
तेंचि बघायातें ॥ जमले रसिक-वृंद येथें ॥

तर प्रिये, " किरात " कवीनें, त्या अत्यंत सुरस अशा खंड काव्याच्या आधारानें जें नुकतेंच ' यक्ष-प्रमाद ' अथवा ' मुक्त-वेणीदाम-बंधन ' नामक नाटक रचिलें आहे त्याचा प्रयोग दाखवून या उत्कंठित सभाजनांचें आपण्याला मनरंजन केलें पाहिजे.

नटी–होय, मग माझ्याकडून कुठं ना आहे? पण हें पहा मला किनई बाई हा एक मोठा चमत्कार वाटतो कीं, हें आपल्याला रसिक आणि सहृदय म्हणविणारे लोक, ही अशी कडक थंडी पडली असतां देखील आपापलीं उबदार शय्यामंदिरें सोडून बाहेर पडतात तरी कसे?

सूत्र०–पण प्रिये? हें पहा—

नटी-(त्यास पुढें बोलूं न देतां) तुम्ही कांहीं म्हणा, पण मला तर हे पुरुष अगदीं अरसिक आणि निर्दय दिसतात. नाहींतर-

पद. चालः-(सुटला पितृदिशेचा वारा, या चा०).

दयितासंगहृदंगम सकलां ॥ तोही टाकुनि हा जन आ-
ला ॥ निर्दयत्व बांधिती खरें ना हे पदराला ॥ ही निंद्य-
रीति अनुचित काय सकलाला ॥ कांता सांडुनिया या
काळीं जाती अधम तेच यावेळीं बहु शीत थंडिही कडके
कोणिना वाली ॥ हुडहुडी बहु भरली ॥ दांतखिळी बसली ॥

(रमणक दुसरे बाजूनें येतो)

रमणक- पद. चालः-(भूरिवसू तनया०)

कंठु कशी विरहें रात्र ही ॥ हिममय रजनी भिववित पा-
ही ॥ ध्रु० ॥ विसंबितों जरि क्षणभरि सखिला ॥ हुरहुर
वाटे किती हृदयाला ॥ सुंदरिची मग स्थिति कशी० ॥१॥
कारस्थाने धनदाचीं हीं राजनीतिपर रुचति न तिळही ॥
कांताविरहें सुचत न कांहीं ॥कंठु कशी० ॥

नटी-(सूत्रधारास) पाहिलातना कोण आहे हा थंडीचा कडाखा ?

विदू०-अ ग ग ग ग ग ग! काय हा थंडीचा कचका ? सुः सुः सुः सुः सुः हु डु डु डु वहिनी ? आपण नाहीं बुवा आतां इथं राहत.

नटी०-(विदूषकास) नकाच राहूं आपण इथं उभे ? आपली घरीं त्या ताटकाबाई वाट पाहत असतील ! (सूत्रधारास) हा रमणक सुद्धां या थंडीनं कांकडून जाऊन इन्दिरेकडे जायला निघाला आहे. तर चला, आपणहि जाऊं बाई आपल्या विलासमंदिरीं ? [दोघे जातात.

विदू०-मी इथं उभा राहिलों तर सगळ्यांची थंडी माझ्याच अंगांत

घुसायची. तर आपणहि आपल्या सुंदरीकडे जावं—(इतक्यांत एक बोका जातो त्यास पाहून) परवांचीच परवांचीच स्वारी ही! अहो बोकोपंत तुम्हाला दुधावरची साय पाहिजे नाहीं साय? खा, साय! खा साय! (बोक्याचे पाठींत सोटा मारतो व बोका ओरडत जातो) तुझ्यासारख्या नीचाची अशीच कणीक तिंबविली पाहिजे! (जातो.

(पडद्यांतून इंदिरा पद म्हणते.)

पद. चाल—(शिरीं गंगा०)

गडे धांवा गडे धांवा। कशी आली कठिण वेळा॥ शुकावरती कसा घाली। अदय यम तो असा घाला!॥ किती कमलाक्ष घाबरला। पंजाराही त्यजुनि गेला॥ अजुनि कैसा कुणी याना। गेऽला-कुठेऽग॥ झणी धांवा, झणी धांवा। करूं गत काय कर्माला॥ १॥

रमणक—अरे,

पद (अक्षमाला माझि०) धमार.

शब्द माझ्या हे प्रियेचे। ऐकुं येती मजसि साचे॥ कोण दे तिजताप त्याचें। पाप भरलें कीं॥ १॥ दंडितों मी त्या खलातें। पात्र तो नच मुळिं दयेतें॥ गांजितो जो सुंदरीतें। बघुनि कुणि नाहीं॥ २॥

(लगबगीनें आंत जातो.)

[मदनसुंदर व मधुकर रमणक दरबारांतून लौकर उठून कां गेला तें पहावें म्हणूनें त्याच्या मागोमाग छपून येतात, रमणक आपल्या मंदिराच्या सज्जावर जातो, मदनसुंदर व मधुकर सज्जाच्या भोंवतालच्या बागेंत आड उभे रहातात,]

मदनसुंदर—(डोक्यावरून खोळ घेतो.) मधुकरजी, अगदीं हळू,

मधुकर—सुंदर, सुंदर, पण हें पहा—

मदन—शुः चुप, पण एवढी मात्र खबरदारी ठेव कीं, आपली चाहूल म्हणून कशी ती इथें बिलकुल नाहीं होऊं द्यायची नाहीं. तर आपली सगळी मसलत इथल्या इथंच सध्यां फसेल आणि आपल्यावर आतांच भयंकर प्रसंग गुजरेल. असा बाजूला ये. (त्यास बाजूला ओढतो.) आपण इथं जरा असे आड उभे राहूं.

[रमणक पडद्यांत जातो तोंच पडदा वर जातो. इंदिरा कमलाक्ष नांवाच्या पोपटाच्या पिंजऱ्याजवळ उभी आहे. त्याच पिंजऱ्याच्या नजीक कमला नामक मैनेचा पिंजरा आहे, व जवळच मुचकुंद नामक मोर आहे.]

इंदिरा—(सांवरून उभी राहून) अग बाई, येणंच झालं!

मधु०—(बाहेरून सर्व पहात असलेला) ओहो, काय लाज! काय मुरका!

मदन०—शुः, (दटावून) अरे ऐक, ऐक तर खरं अगोदर ती काय ह्मणते तें सगळं.

रमणक—(जवळ जाऊन) प्रिये, काय झालं काय ? कमलाक्षाच्या पिंजऱ्याचा दरवाजा कोणीं मोकळा टाकला म्हटलंस?

इंदिरा—हे पहा किनई, मी जो अजूनी कां येणं झालं नाहीं म्हणून इथं सज्जाशीं येतें तों कमलाक्षावर त्या त्या काळ्या काळ्या कभिन्न बोक्यानं—गेलाच-गेला पण तो तिकडून निसटून—तिकडून तसा गेला—त्या मेल्यानं एकदम येऊन कमलाक्षावर आपला पंजा मारलान्!

धु ०—(मदनसुंदरास) हा कमलाक्ष कोण बुवा?

मद०—तुला काय करायचं आहे त्याच्याशीं? आहे, तो एक पोपट आहे त्याचा.

रम०—अन् मग?

इंदिरा—मग काय? त्याबरोबर कमलाक्षाचा अंतच व्हायचा? थो-

डक्यांत चुकलं, दरवाजा उघडा बघितल्याबरोबर कमलाक्ष पंख फडफडून दरवाज्यांतून कसा बसा निसटून भुर्रकन् उडून गेला, आणि ही आपली मैना कमला आपल्या प्रियाकरितां एकसारखी आक्रोश करते आहे.

रमण०—पण बाहेर ही इतकी थंडी पडली असतां ह्या पिंजऱ्यावर बुरखे कसे नाहीं कुणी टाकले? तुझी ती चतुरिका अन् ती चंपा दोघीजणी काय करीत तरी काय होत्या?

मद०—(एकीकडे) वेडा माणूस नाहीं तर, अरे त्या तिथं नव्हत्या अशीच वेळ त्या बोक्यानं साधलीन्!

इंदिरा.—इतकी अपरात्र झाली, अजून कां येणं होत नाहीं ह्मणून मींच त्यांना राजभुवनाकडे जाऊन यायला सांगितलं होतं, पण (किंचित् ओंठ चावून) इतक्यांतल्या इतक्यांत हे गडे मी विसरलें होतें. तें असूं दे, पण हा कमलाक्ष गेला, आतां कसं करायचं?

पद. चाल—(तेथेंच उभी कीं आहे.)

कमलाक्षिं रमत ही कमला ॥ तोही तिजसह किति रमला ॥ ॥ अनुदिनीं ॥ आनंद मानुनी चित्तीं ॥ मंजुळ निःस्वन काढीती ॥ या इथें ॥ किति वंद्य विहग हे असती ॥ मधुसुधा मंदिरीं भरिती ॥ विहग हे ॥ चाल ॥ रमणिय वाटे हें स्थल भारी ॥ प्रियसंगें ही हर्षितां ॥ ही विरहिणि परि कीं दिसली ॥ जातांचि कांत बहु भ्याली ॥ मग अंतरिं अति घाबरली ॥ चाल ॥ किति कंप पहा इस सुटला ॥ करि जो आशी व्याकुळ इजला ॥ १ ॥

मधु०—(वरील पद ह्मणत असतां) हॅं; खाशी, गोड, छत पण छत दिलंय पसरून वा: (आपल्याच पाठीवर थाप मारून घेतो.)

मद०—(कावऱ्या बावऱ्या मुद्रेनें एकदम त्याचा हात धरून) मधुकर, हें काय?

मधु०—चुकून-चुकून झालं बुवा हें आपल्या हातून-पण हें पहा—

मद०—(नाकावर बोट ठेवून) चुप! या वेळीं अगदीं एक चकार शब्द देखील बोलूं नकोस, अथवा हे असले (त्याच्या पाठीवर थाप देतों) कांहीं चाळेही करूं नकोस.

रम०—प्रिये, ह्या मुचकुंद मयूराला रोजच्याप्रमाणें तूं जरा एक घटकाभर नृत्य करायला शिकीव ह्मणजे तो नादलुब्ध कमलाक्ष याच्या पायांतील ह्या नूपुरांच्या आवाजासरशीं आपसुकच येईल धांवून.

मधु०—(बाजूस चुटकी वाजवून) हं असं कांहीं पाहिजे.

मद०—(कपाळास आंठ्या घालून) त्सुः, शर्थ झाली बुवा तुझी अगदीं.

इंदिरा.—खरंच गडे, इतका नादलुब्ध आहे खरा हा! तर असंच करतें. (नीट पदर सांवरून धरून हातानें ताल धरते.)

पद. चाल (एक पाय नाचिवरे गोविंदा)

नाच नाचरे मुचकुंदा ॥ मनमोहनानंदा ॥ थय थय सुख कंदा ॥ खुळ खुळ पायिं वाळे ॥ वाजिवरे मुचकुंदा ॥ किति शिकवूंरे मतिमंदा ॥ शिक्षक जो तूं खगवृंदा ॥ दयिताधर, अरविंदा ॥ लाविलेंस आपुल्या छंदा ॥ किति तरि आपुल्या छंदा ॥ कायरे हाच मज धंदा ॥ १ ॥

मधु०—खाशी, कां असंच कीं नाहीं सुंदर? हिला जर एखादा लहानसा छबकडा असता तर हिनं त्याचे किती किती अन् काय काय ह्मणून चोजले केले असते? त्याला नाचायला-त्याला खेळायला-त्याला हंसायला—

मद० त्सुः किती कितीदां सांगावं बुवा तुला? (आपल्याशीं) ही सुंदरी आपल्या हातानं ताल धरून या मोराला नाचायला शिकविते आहे आणि हा रमणकही मोठ्या रंगांत येऊन एकसारख्या अशान् अशा माना तुकावतो आहे.

मधु०–(आपल्या तोंडावर हात धरून) आणि आतां आपण हें हळू हळू पुटपुटतां हें हो ?

मद०–त्सुः पुनः आपलंच ? (मधुकर उगीच रहातो.)

रम०–प्रत्यक्ष तूं होऊनच जर त्याला नाचायला शिकविलंस तरच तो नाचेल, एरवीं नाहीं तो नाचायचा.

इंदि०–इश्श मेलं हें काय बाई, भलतंच आपलं कांहीं तरी बोलायचं झालं.

रम०–'भलतंच आणि कांहीं तरीच!' अन् मी ह्मणतों हें खरं ठरलं तर?

इंदि०–आणि मी ह्मणतें खोटं ठरलं तर ?

रम०–खोटं ? असं बरीक ह्मणूं नकोस.

मद०–खरंच हा ह्मणतो तेंच खरं आहे; कारण ही मयूरी नाचूं लागली ह्मणजे अर्थातच हा मोरही पण थय थय करून उड्या मारूं लागणार! कां असंच कीं नाहीं मधुकर ?

मधु०–(मान हलवून) आपण नाहीं बोआ बोलत. हें पहा (तोंडावर हात धरून उगीच उभा राहतो.) आपण तोंडाला कुलूप घातलं.

इन्दि०-तें कां ?

रम०–कारण असं पहा :—

पद. चाल–(अंजनपर्वा न करी.)

मंजुल नूपुर नादा ह्याची परिसुनि सखये केलिवनीं ॥ हर्षित होउनि मोर मयूरी स्वयेंचि येती धांवोनी ॥ हरिण समुहही संमोहुनियां चंचलनयनें पाहतसे ॥ विहगवृंद तो इतर सकलही मुदित अंतरीं होत असे ॥ त्वदीय नूपुरा । श्रुतिमनोहरा । परिसतांचि हो । हर्ष तरुवरां । ताल धरुनि ती सकल तरुतती । विरहिता मती

कंपिता गमे । रंगली किती । उलट कृति तरी । आज सुं-दरी । होइ हें करें । ये त्वदंतरीं । चरण हपटुनी । टाक मो-डुनी । येइ शुक तरी । सहज गुंगुनी । मृदु-चरणीं । प्रिय क-रिणी ॥ १ ॥

आणखी हातच्या कांकणाला कांहीं आरसा नको. मग उशीर कां तर? हं शिकीव पाहूं ह्याला नाचायला.

इन्दि०—तर मग ह्या नूपुरांचा एवढासा देखील आवाज न काढतां जेव्हां याला मी नाचायला लावीन तेव्हांच सोडीन. (मुचकुंदास) कायरे, लबाडा मुचकुंदा, आज इतकं ओढूनसं आणलं आहेस? (पूर्वोक्त पदाचा कांहीं भाग पुनः ह्मणते.)

नाच नाच रे मुचकुंदा ॥ पायिं वाळे वाजिव रे मुचकुंदा ॥

नाच नाच. (तो नाचत नाहींसें पाहून) बघ बघ, पुन्हां नाहीं बरं मी शिकवायची नाहींतर—

देते पहा सोडुनि तव छंदा ॥ उगा लाविलेंस मज निज छंदा ॥ फुका लाविलेंस मज निज छंदा ॥

(तो मोर बिलकुल हालचाल करीत नाहींसें पाहून) मेल्या, नाहींच तर मग तुला आजपासून शिकवायची. (रागानें पाय हापटते त्याबरोबर तिच्या पायांतील नूपुर वाजतात व त्याबरोबर तो मोर पाय हालवितो व त्याचे पायांतील घुंगुर वाजतात.

रम०—(हंसून) प्रिये, सहज याच्यावर रागावून जाऊन तूं आपले पाय हापटल्यानं काय गंमत उडाली पहा.)

मदन०—हं! हा मोर तरी काय लबाड पहा. आपल्याला हिनंच नाचून दाखवावं असाच कां बरं यानं हट्ट धरलान्? या पक्ष्यांना सुद्धां मनुष्यासारखे मनोविकार असतात काय?

इन्दि०—(स्मित करून) कायरे लबाडा, मीच पायानं ताल धरून

तुला नाचायला शिकवावं असं जर तुझ्या मनांत होतं तर पहिल्यांदाच कां नाहीं मला तूं तसं सांगितलंस? ह्मणजे—

रमण०—ह्मणजे काय?

इन्दिरा—ह्मणजे मी याच्या इच्छेप्रमाणेंच वागलें असतें.

रमण०—जसं कांहीं त्याला बोलायलाच येतं आहे सारं, तें त्यानं तुला सांगावं आधीं.

इन्दिरा—हो गडे, हें पण मी अगदींच विसरलें होतें.

मदन०—अहाहा! काय, काय पण चालला आहे यांचा हा विनोद.

रमण०—अन् तुला मीं ह्मटलं कीं, प्रत्यक्ष तूं नाचून दाखविल्याशिवाय तो नाचायचा नाहीं ह्मणून, तें मघांशीं तुला खोटं अन् 'कांहीं तरीच' वाटलं नाहीं? पण आतां—–

पद

अजि कोण खरें ठरलें ॥ सखये, अजि कोण खरें ठरलें?
॥ध्रु०॥ सुदती अ० ॥ (किंचित् पाय हापटून) रोषभरें पद
हापटलें ॥ परि तें हर्षदचि झालें ॥

---

१. **रमण०**— पद. (कधिं तिला बघिन नयनीं)
वद खरें कोण ठरलें? ॥ सखेय, रोषें पद त्वां हापटलें ॥ तेंऽही
किति झालें हर्षदची शशिकांते ॥ध्रु०॥
इंदिरा—नरास नर हा मिळत असे । सकल जगीं अशी रीती ।
तीऽहा सोडुनि काय । करि अन्याय? ॥ प्रिय नाथा, हिणवुं नका । मीच असे पुरि हरलें ॥ १ ॥
रमण०—वद खरें कोण हरलें? ॥
इंदिरा—मुचकुंदें या फसवियलें । विहग असा । फसविलसा आला
नाहिं विचार । तो अनुदार ॥ प्रिय नाथा हिणवुं नका ।
मीच अजी पुरि हरलें ॥ २ ॥

मधु०—(पाय हापटून) असंच असंच, अगदीं असंच! कां सुंदर, खरं आहे कीं नाहीं हा ह्मणतो तें?

मद०—त्सुः शर्थ झाली बोआ तुझी आतां! अशानं आपण नाहीं इथं उभे रहात. (जाऊं लागतो.)

मधु०—(त्याला अडवून धरून व आपलेंच तोंड आपल्या तळहातानें दाबून धरून) या पुढं आतां आपण नाहीं, एक चकार शब्द देखील काढणार नाहीं, मग तर झालं?

मद०—हं, मग नाहीं कांहीं हरकत.

रमण०— (पद पुढें चालू—किंचित् बदलून)

सहजचि पद त्वां हापटले ॥ परि तैं हर्षदाचि झालें ॥ सखये० ॥ सखेग ॥ अजि० ॥

इन्दि०— (चाल सदर.)

आजि मीच पुरी हरलें ॥ जें मुखिं आलें तें वदलें ॥ ध्रु० ॥
प्रिय नाथा ॥ मुचकुंदें मज फसवियलें ॥
रम०—नूपुरनादें परि मन हरलें ॥
इन्दि०—हेंच खरें ठरलें ॥ प्रियनाथा ॥ हेंच खरें ठरलें ॥
आजि मी० ॥ प्रिय० ॥ १ ॥

तें सगळं खरं; पण अजून तो कमलाक्ष कां बरं येत नाहीं?

रम०— पद. चालः—(वधू ही वल्ली०)

खरी जरि प्रीति ॥ प्रिय पहा धांवुनी येती ॥ ध्रु० ॥ सर्वचि विषय विषापरि धरिती ॥ संकटभार तृणासम गणती ॥ कांता ध्यात सदोदित चित्तीं ॥ रमाया कांतीं ॥ अंतरीं उतावीळ होती ॥ १ ॥

आणि प्रिये, ह्मणूनच सगळीं राजकारणं आणि सगळ्या गुप्त मसलती टाकून होतां होईल तितकं लौकर मी निसटून आलों. (आलिंगन देऊं पाहतो)

इन्दिरा–(सलज्ज) छेः बाई, हें काय?

मद०–तरी ह्मटलं, या स्वारीनीं नरवाहन महाराजांकडून इतका लौकर कां पाय काढला! जुळलं, आतां जुळलं हें सारं.

खरी जर प्रीती ॥ प्रिय पहा धांवुनि येती ॥ प्रि० ॥

हं असं कां? ह्मणूनच आलांत वाटतं आपण तिथून इतक्या लगबगीनं?

मधु०–(आपल्या तोंडावरील हात काढून) अहो राजे, मला सांगतां अन् आपण काय करता हें?

मदन०–स्सुः अरे, ऐक तर खरं ती सुंदरी काय ह्मणते तें अगोदर.

इन्दिरा–असं जर ह्मणायचं, तर मग हा कमलाक्ष अजून कां बरं येत नाहीं? (निराशेनें) छेः तो कसचा येतो बाई आतां? या वेळीं या कमलेची स्थिति अगदीं माझ्या नेहमींच्या स्थितीसारखी झाली आहे! पण इकडं कशानं कळणार हें? माझं कितीदां असं होतं—

पद. चाल–(तेथेंच उभी कीं आलें)

खचिताचि कां येणें होतें ॥ आनंदभरें जों उठते ॥ व्यर्थची ॥
थोडेंच कुठें खुजबुजतें ॥ इष्ट तेंच मानासि येतें ॥ व्यर्थची ॥
वातेंच दार खडबडतें ॥ ह्मणुनी तेथवरी जातें ॥ व्यर्थची ॥
चाल ॥ अंतरीं प्रियातें धरी दासि किति तरी ॥ वाट उगि
बघेत ॥ कितिकदां सांगुं अशी फसतें ॥ संभ्रमें ॥

इकडं यायला कुठं थोडासा उशीर लागला तरी सुद्धां माझी अशी स्थिति होते! अन् या कमलेला तर या कमलाक्षाचा काय ह्मणूं पूर्णच विरह झालाय ह्मणायचा, तर मग ही विचारी हें दुःख कसं बरं सहन करील? छेः नाहीं, नाहींच हिच्या हातून हें दुःख सहन करवणार!

रमण०–प्रिये, खरंच, तुझ्याइतकी कोमल अंतःकरणाची तूंच.

इन्दिरा–हें काय बाई, (मोराकडे पाहून) पण हें पहा किनई याच्या नाचण्यांत कांहीं रामच नाहीं उरला .(मोरास) मुचकुंदा, तुला

तरी आणखी व्यर्थ नाचायला लावण्यांत काय अर्थ? तुझ्या घुंगुरांत आतां कांहीं तें पहिल्यासारखं माधुर्यच शिल्लक राहिलं नाहीं हेंच खरं.

पद. चाल–(हें काय बरें त्वां केलें ग)

हा नाच पुरे मुचकुंदा ॥ध्रु०॥ कमलाक्षाच्या कर्णिं न जाती ॥
ताल तरी हे व्यर्थचि होती ॥ टाकुनि दे ही घुंगुरपंक्ती ॥
त्यजि छंद, अगा मतिमंदा ॥ १ ॥

मधु०–खरंच, तूं जर आपल्या नूपुरांच्या झणझणाटानं आमच्यासारख्यांना नाचवायला तयार आहेस, तर या मोराच्या नाचांत काय अर्थ आहे?

मद०–अरे, कमाल आहे बुवा तुझी? अरे, चप्प रहा, चप्प रहा ह्मणून तुला सांगावं तरी कितीदां माणसानं.

रम०–प्रिये, असं कां सांगते आहेस तूं याला? कदाचित् कांहीं वेळानं तो या घुंगुरांचा नाद ऐकूनच येईल. चल तर, आतां रात्रही बरीच झाली आहे. तर इथं थंडींत उभं रहाण्यापेक्षां आंत जाऊन आपण घटकाभर विश्रांति घेऊं.

मधु०–सुंदर, सुंदर, हे आंत चालले कीं! हें एवढं मात्र नाहीं बोवा ठीक!

मद०–(त्याचे तोंडाकडे बोट करून) आणि हें एवढं नाहीं ठीक!

मधु०–(कोणी आल्याची चाहूल ऐकून घाबऱ्या घाबऱ्या) सुंदर, अरे सुंदर, इकडून अशा अपरात्रीं अन् कोण बरं येतं आहे?

मद०–(मधुकरास आपल्याकडे ओढून तिथून जवळच्या बकुलतरूच्या आड होतो.) चप्प असा मुकाट्यानं इकडे ये.

[दोघे तेथें जाऊन उभे रहातात.

इन्दि०–अन् हा कमलाक्षाच्या पिंजऱ्याचा दरवाजा?

रम०–राहूं दे-तो तसाच मोकळा.

इन्दि०—तर मग पिंजऱ्यांत एक दोन जांब तरी ठेवायला सांगतें. अग ए चतुरिके, चंपे, अजून नाहीं कांग आलांत तुह्मी कोणी ? (इतक्यांत चतुरिका मोठ्यानें किंकाळी ठोकते. चंपाच्या गळ्याला घट्ट मिठी मारून थरथर कांपते व घामाघुम होते.) कोण तें ? चतुरिका ? कायग झालं तुला असं ओरडायला ?

पद. चाल–(निर्लज्जा कर कृष्णवदन)

चतु०—॥भु-भु-भु भूत असत । इथं भूत असत ॥ ध्रु० ॥
चंपा–मज नाहिं दिसत । चल सोड पदर । मज झटूं नको
मज झटूं नको ॥ मम कंठिं पडशि । तरि जात सद्दशि ।
कां भूत पळून । चल सोड मिठी ॥
चतु०–चाल । निष्ठुरता । किति करिशी । अग भूत असे ।
(चंपेस मिठी मारते) भु-भु-भू-
चंपा–मज नाहिं दिसत । चल सोड मिठी ॥ १ ॥

अग वेडे, आपल्या बागेंत इथं कुठून येणार भूत अन् बीत ? वेडी नाहीं तर.

इन्दि०–काय मेली आचरट आहे पण! मीं ह्मटलं झालं तरी काय हिला एवढ्या मोठ्यानं एकदम ओरडायला ?

रम०–चतुरिके, अग चतुरिके? (इंदिरेस व चंपेस) तुह्मी तिला अशा गांगरून नका सोडूं! (चतुरिकेस) चतुरिके, तूं मला सांग पाहूं कुठं कुठंसं दिसलं तुला तें भूत? (इकडे तिकडे पहातो) छे इथं तर कांहीं दिसत नाहीं. खचित तूं वेडी आहेस.

चतु०–नाहीं हो—

रम०–छे, तुला हा निव्वळ भ्रम झाला आहे! ही पाहिलीस कां ही वेल अशी वर जाऊन पुनः आडवी पडली आहे. त्यामुळंच तुला

कांहीं भेसुर आकृति दिसली असावी. अन् त्यामुळंच तूं ही इतकी भ्यालीस. दुसरं तिसरं इथं बिलकुल नाहीं कारण भ्यायला?

चतु०-खरंच, असंय असेल कदाचित्.

रम०-अग, ‘ कदाचित् ’ कशाला? असंच, असंच अगदीं. ह्याचमुळं तूं भ्यालीस. (वेल बाजूस करितो) पाहिलंस हें आतां—

चतु०-पण मी अन् चंपा वाड्याकडून जों आलों तों त्या तिथून येतांना त्या खिडकीकडून कोणससं हळूच गेल्याची चाहूल झाली एवढी मात्र खचित.

रम०-वेडी नाहीं तर! हा निव्वळ तुला भास झाला आहे भास! हें पहा तूं आल्याबरोबर जर तें भूत पळून गेलं तर तें भूत अतिशय भित्रंच असलं पाहिजे! (आपल्याशीं) हिची भीति काढून टाकायला हीच युक्ति बरी आहे. (उघड) चतुरिके, तुला तसं तिकडे कुणी गेल्याचा भास झालाना? मग बरोबर आहे. कमलाक्षाच्या पिंजऱ्यांतला शिळा पेरू काढून मीं त्या बाजूला जोरानं टाकून दिल्यामुळंच तुला हा असा भास झाला.

चतु०-हं हें मात्र जुळतं खरं.

चंपा-(आपल्याशीं) जुळायचंच तें, खुळसटनाहीं तर.

इन्दि०-कमलाक्षाच्या पिंजऱ्यांत एखाद दुसरा ताजा पेरू ठेवायला तुला सांगावं ह्मणून तुला हांक मारतें तों तुला समंदानं पछाडलंन. राजभुवनाकड जाऊन यायला सांगितलं तर त्याला इतका वेळ नाहीं? जा त्या कमलाक्षाच्या पिंजऱ्यांत एक दोन पेरू ठेवा, अन् जा निजा जाऊन दोघीजणी. तुझ्या भूताचा समाचार उद्यां उजाडल्यावर घेऊं आं, समजलं? जा, जा तर. निजा जाऊन आतां. (कमलानामक मैनेकडे पाहून) बये कमले, आतां कां उगीच तडफडते आहेस तूं? तुला झोंपेनं घेरलंय; पण—

पद. चाल–(किति तरि गरीब ह्या अहि अबला)
जगभर अशीच कां ही प्रीती? ॥ ध्रु० ॥ निज वनितांना अवचित त्यजुनी। कांत जई जाती। अयुक्तचि रीती ॥१॥ जगभर० ॥ दयितांवर जरि लेशहि असलें । प्रेम जरी हृदयीं । न होतिल अदयीं ॥ २ ॥ जग० ॥ धांवुनि येतिल कोठुनियां ही । प्रेम असें असतें । अमोघाचि जगिं तें ॥ २ ॥ जग० ॥ अनुरक्त जरी प्रिय कांतावरती । दूरहि मग जरि तें । अदूरचि त्यांतें ॥ ४ ॥ जग० ॥ वरकांती जे प्रीती करिती । कंठ असा चिरुनी । न येतिल फिरुनी ॥ ९ ॥ जगभर० ॥ कमले तव पति जात असे गे । कंठ तुझा चिरुनी । न येइल फिरुनी ॥ ६ ॥ जग० ॥ सखये तरि कां शोक करिशि उगी । व्यर्थ अशी रडुनी । नको बसुं झुरुनी ॥ ७ ॥ जगभर० ॥

तर नीज आतां तूं, तुला झोंपेनं घेरल्यासारखं दिसतंय.

मद०–त्या कमलेला नाहीं; पण सध्यां याच कमलेला झोंपेनं घेरल्यासारखं दिसत आहे.

रम०–(आपल्याशीं) प्रियेला झोंपेनं अगदीं घेरलंय असं दिसतं! आणि ह्मणूनच ही अशी डोळे चोळीत एकसारखी इथं उभी आहे. (उघड) प्रिये, झोंपेनं तुला घेरलं असतां तिनं या कमलेला घेरलं असं कां उगीच ह्मणतेस? तुला झोंपेनं घेरलं आहे, असंच मलाही पण तिनं घेरलं होतं; पण माझा शत्रु जो मदन त्यानं तिला पळवून लावल्यामुळं तोही—

पद. चाल–(मजवरि तरुकुसुम रेणु०)
प्रियकर, जरि कुसुमबाण हृदयिं मारितो ॥ अदयपणें मदन ठार करुनि टाकतो ॥ध्रु०॥ निद्रेतें पळवुनियां लावि

मदन हा ॥ सुरत-कंद अर्पित जो खचित अरि न हा ॥
संगर जरि तुमुल करी शत्रु काय हा॥सुंदरि, ही अधर-
सुधा तोचि पाजितो॥ १॥

(असें ह्मणून चुंबन घेऊं लागतो) आणि ह्मणूनच या मन्मथानं जरी माझी झोंप मोडली आहे, तरी देखील मी त्याचे उपकारच मानतों.

इन्दि०—(मनगटानं डोळे चोळीत) ही पहा बाई माझी दिखील सारी झोंप कशी उडून गेली ती !

रम०—छेः हें तूं कांहीं तरीच बोलतेस! झोंपेनं हे तुझे डोळे धुंद होऊन वर आणखी हे तारवटून गेल्याचंही मला अगदीं स्पष्ट दिसत आहे! (बाहू पसरून) तरः—

पद. चाल—(दे निरोप मज संतोषानें . व. च. ३७)

रमणक—मम वक्षस्थलिं करि शयन प्रिये ॥
मत्तनुसम हितकर। अतितर मृदुतर । शय्या सुंदर ।
सुचिरचि सुखकर॥ ही युक्त तुला शशिकांते । धरि
कर चल ये ॥ १॥ मम वक्षस्थलिं० ॥

इन्दि०—मम निद्रा सकलहि गेलि प्रिया ॥ कर स्पर्शभरें ।
अति अलसलुलित । तव नयन दिसत । कमल-
सम मिटत ।

इन्दि०—स्पर्शुनि यापरि नाथा । ती नेलि लया ॥ २ ॥
मम निद्रा सक० ॥

रम०—तर-मम वक्षस्थलिं करि शयन प्रिये ।

इन्दि०—हिममया किती ही रजनि प्रिया ॥ मज तृषार्त
करि अति ।

रम०—तव अधरामृत । मम अधर-स्थित । सरस रसा-
न्वित । प्राशुनियां निज तृष्णा । चल ने विलया ॥३॥

इन्दि०–(अंग शिरशिरलें असें दाखवून) काय पण बाई थंड हवा सुटली आहे.

रम०–(हांसून) इतका वेळ झोंप येत होती, आतां थंडी वाजूं लागली नाहीं कां? एकंदरींत तुझ्या मनांतून शय्यामंदिरीं जावं असं आहे? मी तरी तेंच म्हणतों! हा थंडीचा कडाखा कोण? आणि अशा वेळीं इथं बाहेर किती वेळ उभं राहायचं? चल तर आंत जाऊं.

इन्दि०–पण बाई तो कमलाक्ष—

रम०–अगं तो इथंच कुठे तरी असेल. आपल्या देखत इथं यायला कदाचित् तो संकोच करीत असेल, तर चल, आपण आंत जाऊं म्हणजे तोही कुठे लपून छपून बसला असेल तर मुकाट्यानं इथं येईल आणि त्यालाही कमलेशीं अंमळ एकांत करायला मिळेल.

इन्दि०–हो गडे असंच होईल.

रम०–आणखी पुनः एकदां आपण हळूच येऊन पाहून जाऊं पाहिजे तर.

इन्दि०–हो तसंच तसंच.

रम०–चल तर जाऊंच आपण मंदिरांत. कारण या वेळीं—

पद. चाल–(जलधरसंघें नभ भरलें हें राग मालकंस.)

कांता संगम सुखदचि सकलां ॥ स्मरविन्मुख जन होई विकला ॥ध्रु०॥ निद्रावश जन दयितासंगें ॥ कोणी सुंदरि-सहहि रंगे ॥ मदनरतीसम मंदिरिं पिंगे ॥ घालुनि करिती सुखशयनाला ॥ १ ॥

(मंदिरांत जातात.)

प्रवेश २ रा.

स्थळ--रमणकाच्या बागेची एक बाजू.

प्रवेश-(मदनसुंदर व मधुकर हलक्या आवाजानें बोलत आहेत.)

मधु०-अन् तो आपण उभे होतों तिथपर्यंत आला असता तर-

मद०-(उपहासपूर्वक) आणि आपण उभे होतों तिथं सगळा उजेड असता तर—

मधु०-(आश्चर्यानें) उजेड! या अशा काळोख्या रात्रीं अन् उजेड कुठून येणार तिथं ?

मद०-नाहीं यायचाना ? मग अहो शहाणे गृहस्थ, रमणकासारखा स्त्रीलंपट पुरुष-अन् अशा अपरात्रीं-आणि थंडीच्या वेळीं-आपल्या मंदिरांत चांगल्या उबेंत जायचं सोडून इथवर येईल असें तुम्हांला वाटलं तरी कसं !

मधु०-तें असो म्हणा. पण हें पहा अगोदर. आतां पुढं कसं काय करायचं! पांखरूं तर मारू आहे ? दहांत. पन्नासांत-शंभरांत,—छेः दोनशेंत-पांचशेंत-पांचशेतच कां ? हजार-दोन हजार पांखरांत पां-खरूं आहे ? पण—

मद०-पण काय ?

मधु०-पण दुसऱ्याच्या पिंजऱ्यांतून काढून त्याला आपल्या पिंज-ऱ्यांत कसं आडकवून टाकायचं !

मद०-आपल्या पिंजऱ्यांत ?

मधु०-हो आपल्या पिंजऱ्यांत.

मद०-आहे, त्यालाही आहे एक तोड! पण थोडं-जरा डोकं खर्च केलं पाहिजे त्याला.

मधु०-काय डोकं खर्च केलं पाहिजे म्हणतोस! पण ती तोड तोड म्हणालास ती कोणची ?

मद०–अहो असं पहा कीं दुसऱ्याच्या पिंजऱ्यांतून काढून आपल्या पिंजऱ्यांत अडकाविण्यापेक्षां तो पिंजराच तिथून अचानक उडविला तर–

मधु०–आहे, तुला डोकं आहे. शक्कल पण शक्कल काढलीस. पऽऽण अ !

मद०–(वेडावून) पऽऽण काय ?

मधु०–(सचिंत मुद्रेनें) शक्कल काढलीस खरी ! पण बुवा तिच्यांतून पार पडणं फार कठीण दिसतं.

मद०–तें तर खरंच ह्मणा. पण हें पहा आपल्या बंदुकीचा बार-जरा ठासून भरला ह्मणजे झालं. एक दोन बारांत काम. बस्स. एकच गोळी बस्स होईल त्याला ! एकाच गोळीनं त्याच्या चिंधड्या चिंधड्या उडून जातील.

मधु०–(भीति व आश्चर्ययुक्त) ह्मणजे ?

मद०–ह्मणजे काय ? अन् कदाचित् चुकलीच गोळी तर–(समशेरीस हात घालून) आपली समशेर आहेच कीं–तिनं एक घाव कीं दोन तुकडे.

मधु०–(भयचकित होऊन) म्हणजे ? हें असलं भयंकर कृत्य मात्र नाहीं बुवा आपल्या हातून व्हायचं ! त्या रमणकाच्या पोटांत आपली समशेर खुपसून त्याची आंतडी बाहेर काढण्याची ह्मणतोस ? छेः ही नुसती कल्पना–कल्पना सुद्धां भयंकर ! (पुढें लांबवर दृष्टि पोंचवून) मग त्यासंबंधानं विचार करणं अथवा कृती करणं हें तर अत्यंत भयंकर आणि भेसूर. छेः छेः छेः छेः छेः नको नको ती कल्पनां सुद्धां नको !

मद०–(आपल्याशीं) एकून ही स्वारी जातीची दिसते आहे फार भित्री ! तर आतां याची जरा उचल केली पाहिजे.

मधु०—आणि इतकं नीच कृत्य करायला—असं अघोर कृत्य करायला आपण मला सांगाल असं नव्हतं वाटलं मला.

मद०—आणि मलाही पण असं नव्हतं वाटलं कीं आपण इतके मठ्ठ आणि विचारशून्य असालसे! अरे गृहस्था, मीं तुला सांगितलं काय आणि तूं समजलास काय?

मधु०—बंदुकीच्या बारानं त्याच्या चिंधड्या चिंधड्या उडवायच्या अन् चुकलीच गोळी तर त्याचे आपल्या समशेरीनं एक घाव अन् दोन तुकडे करायचे असंच ना आपण म्हणालांत?

मद०—अहो, पण ही बंदूक आणि समशेर कसली तें आहे का आपल्याला कांहीं ठाऊक?

मधु०—ह्मणजे? आपल्या बोलण्याचा नीटसा अर्थ नाहीं आला माझ्या लक्षांत? ह्मणजे आपण कोणच्या—

मद०—ह्मणजे असं पहा—अहो भले गृहस्थ, हा गोळीबार अन् ही समशेर तुह्मी समजलां तशी खून पिणारी नाहीं. या रमणकाला इथून अचानक उडवायला आपण आपल्या कपटप्रयुक्तीचा जो बार भरूं तो जर फुसका निघाला तर आपल्याला विचार-समशेरीचाच उपयोग करावा लागणार?

मधु०—(धीर येऊन व भीति जाऊन किंचित् आनंदानें) हं, असं असेल तर बरीक ठीक आहे. पण या रमणकाला इथून उडवायचा कसा?

मद०—हः तें काम तर अगदीं सोपं आहे.

मधु०—(उत्सुकतेनें) तें कसं?

मद०—तें कसं आणि काय? (इकडे तिकडे पाहून) नाहीं, पण इथं कोणी नाहींना? नको पण काय म्हणतातना त्यांतली गत. या झाडांना अन् या थंड वाऱ्याच्या झुळकेला सुद्धां कान फुटायचे! हें

पहा, (कांहीं वेळ त्याचे कानाशीं तोंड नेऊन त्यास कांहीं सांगतो.)

मधु०–(मान डुलवीत) हं! अस्सं!

मद०–अन् नरवाहन महाराजांचे असे चांगले कान भरून एकदां कां एवढी किल्ली फिरवून दिली, ह्मणजे झालं. मग सगळीं चक्रं कशीं आपोआप चालूं झालीं ह्मणून समज. मग या स्वारीची इथून उचलबांगडी करायला किती उशीर ? मात्र मीं सांगितलेल्या या खटपटीला आपल्याला या घटकेपासून लागलं पाहिजे.

मधु०–हा पहा मी याच पावलीं जातों त्याच्याकडे अन्–

मद०–हां याच पावलीं महाराजांकडे जातां ? मग मात्र कळली ह्मणायची आपली सारी–अन् दुसरं काय ?

मधु०–ह्मणजे आपण असं समजलां कीं काय ? कीं मी आत्तांच्या आत्तां–याच पावलीं–अन् अशा या अपरातींचं–महाराजांकडे जाऊन त्यांना गांठून–एकदम हा बार ठासून उडवायच्या तयारीला लागेन ? असं जर आपण समजत असाल तर–

मद०–तसं नाहीं समजलों मी. पण आपलं विचारलं–इतकंच.

मधु०–असं असेल तर मग हरकत नाहीं. (मिशांवर ताव देत मोठ्या ऐटीनं) तर मग आतां हा मधुकर गुंगत घरीं जाणार. आणि एक दोन चार तास झोंप काढून मोठ्या पहाटेस उठून कैलासमंदिरांत जाऊन महाराजांना गांठणार.

मद०–हं मग हरकत नाहीं. हाच पेंच. जा तुह्मीहि घरीं जा अन् मीही आपल्या मकाणावर जातों. या तर–

मधु०–(जातो पण पुन्हां परत येऊन) पण–हे पहा मदनसुंदर–

मद०–पण काय ? पण नको अन् बीण नको. पण अन् बीण आतां सारं उद्यांच.

मधु०–ठीक आहे तर, येतों मी आतां (आपल्याशीं) मधुकरा, आतां तुझी चैन आहेः —

पद चाल–(जबके कहांदर बन् बन्.)

मन्मथ-मंजिरि, अभिनव मधुकरि, सुंदरि तव करिं आलीरे ॥ भंगुनि पंजर, उडवुनि रमणक, मंदिरिं ने मग मैना रे ॥ उगी उशीर कां करशीरे, झाली सुंदरि तूझी सोड ॥ शंका सोडुनि सारी, प्रिया नवी जोड ॥ मदन सुंदर प्यारा तूझा, खाशी योजी तोड ॥ १ ॥

(असें म्हणत म्हणत गुंगत जातो)

मद०–(पडद्याबाहेर येऊन कोणी नाहींसं पाहून आपल्याशीं) हं ठीक आहे. हीच, हीच तोड उत्तम आपलं कार्य साधायला ! ह्या तोडीशिवाय दुसरी तोड नाहीं ! ह्या मधुकरासारखं देवमाणूस हातीं सांपडल्यावर आणखी काय पाहिजे आपल्याला ! रामगिरीहून या अलकापुरीला आल्यानंतर, ह्या सुंदरीला रमणकाबरोबर जलक्रीडा करितांना पाहिल्या दिवसापासून हिची प्राप्ति आपल्याला कशी होईल ह्मणून मी मोठ्या विचारांत होतों. तों हें पात्र हातीं आलं ! आतां काय ? आतां स्वप्नांत देखील निराश व्हायला नको ! या रमणकासंबंधानं, या देवमाणसाकडून नरवाहन महाराजांना काय वाटेल तें सांगून एकदां त्यांचे कान भरविले कीं झाली आपल्या कपटनाटकाला छान छान सुरवात ! आपण मात्र आपलं काम चोख रीतीनं बजावलं ह्मणजे झालं. (कांहीं आठवून हंसतो) हं त्या सुंदरीच्या दासींना वाटलं कीं आपल्या बागेंतून भुतं फिरताहेत ह्मणून (आंगावरील कृष्णवर्ण वस्त्राची खोळ डोक्यावर चढवून व कांहीं वेळ विचार करून) बस्स, बस्स ! भूत, भूतच ?

पद. चाल—(करम कर मरे)
भुताची असे कल्पना ठीक ही । समंधाचि ती त्याहुनि गोड ही ॥ ध्रु० ॥ इंदिरेचें असे झाड हें मोहनी । समंधा कसें जावबे सोडुनी ॥ हरित पर्णें असा वृक्ष जो डंवरिला । जाहला पाहिजे सर्वथा आपुला ॥ झाड मी धरिन हें खविस ही होउनी । प्राप्त जरि सुंदरी भाग्य नच याहुनी ॥ १ ॥

(पडदा पडतो.)

[विलासनामक प्रथमांक समाप्त.]

शापनामक

अंक २ रा.

प्रवेश १ ला.

(नरवाहन महाराज व मधुकर कांहीं बोलत आहेत असे व मदनसुंदर त्यांचें बोलणें ऐकत आड उभा आहे असा.)

नरवाहन—छेः, तुह्मी कांहीं तरीच सांगतां. रमणकासारखा स्वच्छ मनाचा पुरुष अन् असं नीच कृत्य करायला उद्युक्त होईल ? छेः, यांत खचित तुमचा कोणी तरी गैरसमज केला असला पाहिजे, कारण हा प्रकार याप्रकारें होतो आहे—

पद. चाल-(जय जय मदना)
शीतल कांति टाकुनि शशिनें चंडातप जणुं तें सेवावें ॥
अथवा संजीवनी सुधेनें स्वगुण सोडुनि विषव्रत घ्यावें ॥

मधुप विचुंबी सुनव सुमांनीं सर्पगरलसम परिमल घ्यावें ॥
अथवा वैडूर्यादिमण्यांनीं कांतीनें जग दहन करावें ॥
किंवा मंजुळ मुरलीनादें उल्कापातचि घडुनी घ्यावे ॥
तरिच रमणकें नयपथ सोडुनि नीतिपराङ्मुख अवचित व्हावें ॥ १ ॥

मधु०—महाराज ह्मणतात अशी एक वेळ स्थिति होती खरी, पण सध्यां अगदीं उलट प्रकार होऊन राहिला आहे, आणि याबद्दल मदनसुंदर—(एकीकडे चुकल्यासारखें करून बोट झाडतो.)

मदनसुंदर-(आपल्याशीं) ह्या मूर्खाला इतकं पढवून शेवटीं यानं माझं नांव घेतलंनच. बरं, पण पुढं काय ह्मणतो आहे बरं हा आणखी. (कान देऊन ऐकत उभा राहतो.)

मधु०—(पुढें बोलत आहे व त्यांतल्या त्यांत सांवरून घेण्याचा प्रयत्न करतो) प्रहास, मणिभद्रजी, मणिकंधर, शुक्र, पुष्कर वगैरे सगळेजण पाहिजेत तर आपली हवीतशी खात्री करतील.

मद०-(आनंदानें) तरी बरं, घेतलंन सांवरून. इतकं पढविल्यासारखं झालं—चीज झालं.

मधु०—कारण—

पद (नृपममता रामावरती० या चालीवर)

रमणक तो नच अजि उरला । हा परिपूर्णचि खळ बनला ॥ अधम हा ॥ विसरुनियां उपकाराला । मत्त किती आतां झाला ॥ अधम हा ॥ धनद मात्र नांव तुह्मांला । सर्वस्वी धनदचि झाला ॥ अधम हा ॥ चाल ॥ अपहार ॥ रत्नमणिहार । करुनि संहार । हनन करण्याला । घेईल न मुळिं शंकेला ॥ अधम हा ॥ रमणक० ॥

नरवाहन—

पद (शारदे दास कामदे या चालीवर.)

हे विचार ॥ निंद्य अनुदार । जगातें भार । यास जे ध-
रिती । अंतरिं पहा तुडुंब जहर ते भरती ॥ १ ॥

रमणकासारख्या पिढीजाद इमानी व कुलीन सेवकांवर असे भल-भलते आरोप करून त्याची अशी निंदा करूं नको. कारण—

पद (बंजारा.)

नरवाहन—

दुर्जन गणुनी साधूला । जग करील जरि निंदेला ॥
सकल जगाच्या वदनाला । ये न कधीं मिटवायाला॥
जग करी साधु छलनाला । होइ तें पात्र हास्याला ॥
॥ चाल ॥ निस्पृहा साधुची वृत्ती । हरुनिया कुत्सि-
ता कुमती । जगिं दावि सुपथ, नय नीती ॥ साधुचा
असा अधिकार । सुयश अनिवार । हरुनि कुविचार ।
लावि सुपथाला । मग स्थान कुठे निंदेला ? ॥

मधुकर—जो करि साधुद्रोहाला । कुत्सिता करुनि निंदे-
ला ॥ जोडि तो अधम पापाला । सन्निधाचि करि
नरकाला ॥ चाल ॥ जगतांत बकासम साधू । अस-
तात दुर्मती भोंदू । त्या धर्म, ना नीति, नय बिंदू ॥
साधुच्या धरुनि वेषास ॥ करिति दंशास । —

नरवा०—कुमतिहि खास—धरुनि उगि त्याला । निंदि-
शि व्यर्थ सुजनाला ॥ २ ॥

मधु०—महाराजांना असं वाटतं याला मात्र माझा नाइलाज आहे; पण—

नरवाहन-पण नकोन् बीण नको, उगीचच्या उगीच सत्शील पुरुषावर नसते आरोप घेऊन नको उगीच नरकाची जोड करूं.

मधु०–महाराज, त्याचीं सगळीं कारस्थानं कुठं आहेत आपल्याला ठाऊक ? तुमच्या भोळेपणानं तर :—

पद (रामकरीं जरि नृपपद गेलें० या चाली०)

यक्षाधिपती आजचि झाला ॥ अलकापुरिचा स्वामी ठरला ॥ अंधमोह हा तुह्मां आला ॥ उघडति नच डोळे॥ अजुनी ॥ १ ॥ मधुर बोलुनी हा वरकांती ॥ गांठुनि तुह्मां मग एकांतीं ॥ कंठ चिरिल हा चरचर अंतीं ॥ उघडति मग डोळे ॥ आपुले ॥ २ ॥

मदन०–(आनंदानें) हं ठीक ठीक चाललं आहे हें. मला वाटलं होतं कीं, ही स्वारी कचरेल.

नरवाहन–(तिरस्कारपूर्वक)

पद (चाल–जा जा जा कर कृष्णवदन०) व च इ०

चल जा नच वद पिशुन वचन । झडकरि करि निज, अधमा कृष्णवदन ॥ तूंच असशि रे अधम खरा ॥ करि दुर तरि तव पापी मलिन वदन ॥ १ ॥

मधुक०–

सवाई.

दुर्धर वाक्शर सोडुनि मजवर, कुत्सित, निंदक, कांहिं ह्मणा ॥
सत्य असे तें स्पष्टचि वदतां दुर्जन अथवा पिशुन गणा ॥
बाह्योद्यान स्थित शिव प्रेमा तुह्मांवरचा या अधमा ॥
बघवत नाहीं स्पष्ट दिसे मज काय करूं परि या कर्मा ॥ १ ॥

नरवाहन–नीचा, नको नको असले शब्द उच्चारूं. सांगितलं ना तुला एकदा कीं आपलं तोंड आटप ह्मणून—

मदन०-(गोंधळून) आतां ही स्वारी काय उत्तर देते पाहूं—

मधु०—महाराज असं ह्मणतात त्याला माझा नाइलाज आहे; पण आतां मी इतकं निश्चयपूर्वक सांगतों कीं——

साकी.

कारस्थाना फोडुनि व्यूहहि उकलिन या अधमाचे ॥
अलका-सुंदरि-संगा इच्छी धीट कृत्य मत्ताचें ॥
दाविन हें जव्हां । बघाल उज्वल मुख तेव्हां॥ १ ॥

(असें ह्मणून आपल्या अंगावरील वस्त्रानें तोंड झांकून घेतो) येतों, येतोंच तर मी आतां. मला आतां हें तोंड दाखवायला सुद्धां शरम वाटते. (नमस्कार करून जातो.)

नरवा०—छे:, हा ज्याअर्थी इतकी तोंड न दाखविण्याची प्रतिज्ञा करून जात आहे त्याअर्थी हा जें कांहीं ह्मणत आहे त्याच्या बुडाशीं कांहीं खरं हें असलंच पाहिजे. त्याशिवाय ही स्वारी इतक्या बेतावर नाहीं यायची. हा बेफामपणा, हा कडवेपणा अन् स्पष्टपणामुळें त्याच्या तोंडून येऊं नयेत असे येणारे हे शब्द, याच्या मुळाशीं खचित कांहीं तरी सत्याचाच अंश असला पाहिजे. एरवीं—हा प्रहास, मणिभद्रजी, याच्यासारख्या मंडळींचीं नांवं खचित घेताना. यानं त्या मदनसुंदराचंय नांव घेतलंन, त्यालाय् विचारून पाहूं एकदां. कारण त्याचन् रमणकाचं पहिल्यापासून बरं आहे. तर आतां याला हीच युक्ति. सुंदरालाही विचारावं अन् मधुकरालाही सांगावं कीं, तूं ह्मणतोस हें प्रत्ययाला आणून दाखीव ह्मणून. खरंच—

दिंडी.

वृत्ति केव्हां पालटे कशि कुणाची ॥
विश्वसावें कोणास जगतिं याची ॥
कल्पना ही मुळिं ये न करायातें ॥
कारण—सज्जनांची ही सुमति भ्रष्ट होते ॥

असं नसतं तर रमणकासारख्या सत्त्वशील पुरुषाच्या वृत्तींत एकदम आणि इतका फरक पडावा हं अतिशयच चमत्कारिक. (विचार करून) नाहीं, पण या सर्वांचं मूळ कोठें आहे याचा अगोदर नीट छडा काढला पाहिजे, त्याशिवाय नाहीं आतां मला चैन पडायचं. तर आतां त्या सुंदरालाच बोलावून पाठवून त्याच्याकडूनच यांतलं खरं काय आहे अन् काय खोटं आहे तें काढलं पाहिजे. [वृत्ति केव्हां इ० ह्मणत जातो.)

(मदनसुंदर व मधुकर एकमेकांस भेट देतात.)

मदन०–(पाठ थोपटून) राया बार तर खूप ठासलास.

मधु०–द्या टाळी द्या तर आतां—

मदन०–(टाळी देऊन)

पद. चाल–(हें गुपित सहजाचि०)

दे टाळि गड्या दे टाळी। ह ह हः किति गोड किति गोड किति गोड! ॥ ध्रृ० ॥ राया तुजला जें पढवियलें। धनदापुढती तें कथियेलें। अजि केलि बहार आजि केलि बहार।॥ किति गोड० ॥ १ ॥

मधु०–(हंसत) ही घे टाळि गड्या ही घे टाळी। इत्यादि ह्मणता.) आतां चल करुं तयारि पुढची। त्याविण येइल निद्रा कैची? ॥ अजि केलि बहार। अजि केलि बहार। किति गोड० ॥ २ ॥

राजश्री, शेवटीं माझं नांव आपल्या तोंडांतून आलं होतंच—

मधु०–अगदीं अगदीं चुकून येऊन गेलं तें.

मद०–पण तेव्हां मात्र माझी अगदीं पांचांवर धारण बसली होती.

मधु०–अहो, पण मी कसला वस्ताद? इतका कां चुकेन मी? इतका चुकणारा नव्हे गडी हा.

प्रवेश २ रा.

(नरवाहन महाराज, रमणक व मदनसुंदर.)

रमणक–(नम्रपणें) महाराज, कैलासनाथाचं आपल्यावर इतकं प्रेम असतां आपण आपल्या शरीराला इतके क्लेश कां देतां?

पद. चाल–(प्रियेनें त्या मदिय चित्ता०)

दिव्य कैलासास त्यजुनी, येति हर ते बाह्य उपवनीं ॥ निर्मला अशि प्रीति असुनी, कां समाधि वरिच अनुदिनिं ॥ होतसां अनुरक्त मोहुनी, ये न कांहीं मजशिं कळुनी ॥ मूर्तिमंत हर तोहि टाकुनी, चिंतितां कां त्यास निजमनीं उलट भक्ति ऐशि पाहुनी, जातसे मन्मतिहि भ्रमुनी ॥ अघहरा तद्रमणि गंगा, येत पतीसह ती मृडानी ॥ पुण्यभूमी करिति अलका, भाग्य असुनें ह्मणुनि येउनी ॥

नरवाहन–

पद (वेडें मानस या चालीवर)

वदशि वच हें अज्ञपणानें । मोहानें । समधि अवघी संभृत स्वानंदानें ॥ ध्रु० ॥ अनुभव नसतां । ये न पात्रता । वदति कांहिं तरि । जगतीं जन अनुमानें ॥ १ ॥ नयन एकहा । नसुनी पाही । रविवर्णन तें । जेविं करावें अंधानें ॥ २ ॥

नरवाहन–(आपल्याशीं संशययुक्त) खरं हा कोणच्या अर्थानं बरं बोलत आहे हें. (उघड) रमणका, ह्या अर्थानं तूं अज्ञान आहेस. समाधिसुखाची वास्तविक योग्यता काय आहे ती स्वतः अनुभव घेतल्याशिवाय कोणालाही कळत नसते.

रमण०—पण महाराज, समाधि लावून बसण्याची ही कितवी खेप याची कांहीं आहे का विचार ? आपण समाधि लावून बसलांत ह्मणजे—

पद चाल–(गांजितां मला कां नाथा०)

ही दिसे अनाथा अलका ॥
जैशी, विरही, कांता दिसते । पतिविणें विकीरित अलका ॥ ध्रु० ॥ समाधि लावुनि बसतां नाथा । निजश्वासें विरहिणिसें । ही दिसे अनाथा० ॥ १ ॥ उदासता ती पुरींत पाहुनि । मनिं भासे । झुरतेसें । ही पुरी अनाथा० ॥ २ ॥ गुणवंता तरि जाउं नका तुह्मि । प्रार्थितसें किति ऐसें । ही दिसे ॥ ३ ॥

नरवाहन—

पद (चाल–रमा करी मम मनीं क्रीडा०)

दिसे तुला नच मतिमंदा । उपमा तव या स्मर कार्यपरा, होत जशी तुज स्मरबाधा ॥ ध्रु० ॥ मी अनुरक्तचि हरपदिं अनुदिनिं होउनि । किति ध्यात । प्रशांत । मनांत । स्मरांतक । स्वांत । समाधिसुख तुज अवगत नाहीं । दिसशि परा चित्सुखकंदा ॥

नरवाहन–(आपल्याशीं) शाबास, रमणका शाबास, काय गोड जाळं पसरतो आहेस पण तूं हें ? या तुझ्या बोलण्यावरून आतां मला असं पुरं वाटूं लागलं आहे कीं, मधुकर जें ह्मणत होता तें सगळं खरं असलं पाहिजे. (उघड) रमणका, ज्या अर्थीं तूं माझ्या समाधीच्या आड येऊं पहातोस, त्याअर्थीं एक तुझी बुद्धि तरी भ्रष्ट झाली असली पाहिजे, अथवा कैलासनाथाचं माझ्यावर असलेलं अलोट प्रेम तरी तुझ्यानं बघवत नसलं पाहिजे; आणि ह्मणूनच समाधि न लावण्याविषयीं तूं मला आग्रह करीत आहेस.

रमणक–(विनम्रपणें) महाराजांस असं वाटत असल्यास माझा नाइलाज आहे; पण मला तर अजुनी असं वाटतं कीं, प्रत्यक्ष शंकराचं दर्शन घडत असतां मग पुन्हां ही समाधि लावण्यांत काय अर्थ आहे?

नरवा०–अरे, समाधि लावण्यानं मी शिवदर्शन पराङ्मुख होतों असं का तूं समजतोस? असं जर तूं समजत असशील तर हा तुझा समज अगदीं चुकीचा आहे. त्या स्थितींत तर सारं शिवमय असतं, पण हें तुझ्यासारख्याला कसं कळणार?

रम०–मग–मी ह्मणतों—

नरवाहन–कांहीं नाहीं. या गोष्टींत मी कुणाचंही ऐकणार नाहीं. मी समाधि लावून बसणार, हें तर अगदीं ठाम ठरलंच. उद्यांच्या सोमवारपासून अकरा दिवसपर्यंत मी समाधि लावून बसणार. तर माझ्या मागं तुला इथली सारी व्यवस्था नीट ठेवली पाहिजे. तपःशैलावरील साऱ्या ज्योतिर्लिंगांवर रुद्राभिषेकाला ब्राह्मण बसणार आहेत त्यांचा योग्य समाचार घेऊन त्यांच्या अभिषेकाला कोणच्याही तऱ्हेनं व्यत्यय येणार नाहीं इतकी तुला खबरदारी ठेवली पाहिजे.

रमणक–महाराजांच्या आज्ञेप्रमाणं करतों. पण माझ्या मनांतून चार दिवस पुष्पपुरीला जाऊन यायचं आहे.

नरवाहन–पुष्पपुरीला जाऊन यायचं आहे? तें कशाला? त्या राजा मन्मथाकडून आमंत्रण आलंय वाटतं?

रम०–नाहीं, त्याच्याकडून नाहीं.

नरवा०–असं कसं होईल? त्याचान् आपला तर अत्यंत ऋणानुबंध.

र०–(किंचित् विरमल्यासारखा होऊन) तसं कांहीं नाहीं. कार्तिकी पौर्णिमेला तिथं मोठा उत्सव आहे, ह्मणून इंद्रसेन महाराजांकडून—

नरवा०–ह्मणजे! हे आपले श्वशुर वाटतं?

रम०–होय. श्वशुरच. त्यांच्याचकडून ' सर्वत्रांनीं निघून यावं, ' ह्मणून आमंत्रण आलं आहे अन् ह्मणूनच—

नरवाहन–(रागानें) हं: अन् एवढ्याचकरितां समाधि न लावण्याविषयीं मला आपला आग्रह चालला होता तर? धिःकार धिःकार असो या तुझ्या इच्छेला. (आपल्याशीं पण रमणकास ऐकूं जाईल असें)

पद (चाल–मधुमुख० तारा)

अधिपति रत जन कचितचि जगांत ॥ निजहितनिरत-
चि सकल असतात ॥ ध्रु० ॥ अंगिकारि जग सेवावृत्ती।
निर्वाहाची पडतां भ्रांती। स्वामिभक्ति मग कोठुनि येती।
अनुचरगणांत ॥ १ ॥ अधिपति० ॥

(रमणकास) हें पहा, असं जर आहे तर अलका सोडून तुला साफ जातां येत नाहीं. इथं राहून तुला स्वतः अभिषेकाला बसलेल्या सर्व ब्रह्मवृंदाची योग्य वास्तपुस्त करून सगळी व्यवस्था ठेवली पाहिजे. यांत जर एक रेसभर अंतर पडलं तर पहा आपला विचार.

रमण०–महाराज,—

नरवा०–बस्स बस्स, ऐकलं तेवढं पुरे झालं. यापुढें तुझ्या तोंडांतून एक देखील अक्षर ऐकण्याची माझी इच्छा नाहीं. मीं सांगितल्याप्रमाणं झालं पाहिजे. मूर्खा—

साकी.

सकल सुखाची जननि जी कां पूर्ण समाधी साची ॥
लावुनि बसतां कधीं न पडते वाण निजानंदाची ॥
आड तिच्या येशी ॥ अधमा दुर्मति मनिं धरिशी ॥

या तुझ्या दुर्मतीबद्दल पुढं मागं तुला योग्य प्रायश्चित्त भोगावं लागेल. जा, जा तर, नको, नको, नको उभा राहूं इथं एक क्षणभर दिखील.

मदन०–(नम्रपणें) महाराजांना रमणकासंबंधानं असं वाटावं ह्मणजे हें सगळं विपरीतच ह्मणायचं!

नरवाहन–सुंदर, यासंबंधानं तुला एक चकारशब्द देखील काढण्याचं कारण नाहीं. तुह्मी दोघेही चला इथून आतां.

पद (चाल–हा मदन मला रे जाळी०)

भडकवूं नको मम कोपाग्नी । सकल सुमति हरि । नयन-
रहित करि । हृदयिं जहर भरि । प्रखर समरकरि । जग
जाळितसे तो क्रोधाग्नी ॥

रमण०–(स्फुंदत स्फुंदत महाराजांस नमस्कार करून) येतों तर!

नरवा०–'येतों तर' हे शब्द उच्चारायला शरम नाहीं वाटत? काय मानभावीपणा अन् काय डावपेंच हे! (स्वगत) मधुकर सांगत होता तें एकून एक खरं असलं पाहिजे असं वाटूं लागलं आहे मला आतां. ह्या स्त्रीलंपटाला आपल्या सासऱ्याच्या इथं जायचं होतं, एवढ्याकरितां हा माझ्या समाधीच्या आड येऊं पहात होता; पण ह्मणावं, मूर्खा, अशा या निंद्य आचरणामुळं तुलाच एखादे वेळेस तोंडघशीं पडावं लागेल छे, क्षुल्लक गोष्टीवरून कशा पण मनोवृत्ति खवळून जातात एकदम।

पद. (चाल–मन्नेत्र गुंतले०)

किति हृदय क्षोभतें । स्थैर्य ढळतें । केविं हें तरी ॥ किति
कोप उद्भवे । शांतवावें, वाटतें तरी ॥ शिवपदिं जरि
लक्ष्य राही । शांत हो तरि क्षुब्धता ही ॥ १ ॥

तर कैलासनाथाचं दर्शन घेऊन पांच सात घटका विश्रांति घ्यावी. असं असंच करायचं तर. (जातो.)

(रमणक व मदनसुंदर येतात.)

रमणक—छः, मला ही सेवावृत्ति नकोन् कांहींच नको. कारण—

पद (चाल—जबके कलंदर०)

ही परवशता निपजवि चित्ता अतिशय चिंता करि भ्रांता ॥ सेवावृत्ती दुस्तरतर अति, सद्गुण, सुमति, ने अंता ॥ माझा अपराध असे काय सांग मज तरी ।

मदन०—निष्कारण दासावरी स्वामी कोप करी ।

रमण०—सेवावृत्ती खचिताचि तिखट सुरी ॥ ही परवशता ॥ १ ॥

मदन०—मिथ्या ग्रह जरि होइ तयातें ॥ काय करिल ती परवशता ? ॥ घडुं दे जसें होइल तें तें सन्मर्गानें आचरता ॥

रमणक—नाथ जातां कांता, तशी विरहिणीपरी। समाधीस नाथ जातां उदास अलका भारी । मिथ्या वच यांत काय सांग मज तरी ? ॥ २ ॥ ही पर० ॥

मदन०—मिथ्या ग्रह जरि (इत्यादि ह्मणतो.)

हें पहा, आपण आपल्याकडून सरळ मार्गानें वागावें ह्मणजे झालें.

रमणक—हें तर खरेंच. अन् या प्रसंगीं मीं तर आपल्या मनाशीं पक्की गांठ घातली आहे कीं, काय होईल तें होवो, महाराजांनीं ज्या-अर्थीं इतकें बजावून सांगितलें आहे त्या अर्थीं या आवर्तनाला बसणाऱ्या ब्रह्मवृंदांची व्यवस्था होईल तितकी उत्तम ठेवून महाराजांचा झालेला गैरसमज अजिबात नाहींसा करून टाकणार.

मदन०—(एकीकडे) आणि मी तर तो जास्त करणार!

रमण०—हें पहा—

पद. (चाल—कवण असशि० शुभांगने)

प्रकुपित धनपति दिसताचि मज अति सुखविन त्यांप्रति

करि सहाय्य । मज करि सहाय्य ॥ कष्टहि अतितर पडतिल मज जर न गणिन लवभर । करि सहाय्य । मज करी सहाय्य ॥ चाल ॥ करिशि काय विचार । काथ रे मज सुविचार ॥ १ ॥

मदन०—कथिशिल मज जें, करिन सख्या मी, अंतर नच मुळिं पडे सख्या मुळिं पडे० ॥ (एकीकडे) दाखवुनि धनद प्रकपित करितों, (मोठ्यानें) अंतर नच मुळिं० ॥ धीर व्यर्थ तूं सोडुं नको रे, अंतर नच मुळिं पडे सख्या। मुळिं० ॥

रमण०—धीर असे स्वांता । मित्र असा असतां ॥ २ ॥

मदन०—हें पहा, सोमवारपासून रात्रंदिवस मी आपल्याकडे पडलों आहें ह्मणून समजा. मग तर झालं कीं नाहीं ?

रम०—इतकं आश्वासन मिळाल्यावर आणखी काय पाहिजे मला. (जांभई देतो.)

मदन०—महाराज, तुह्मांला आतां झोंप येऊं लागली आहे: जा, जा तर तुह्मी, आपल्या मंदिराकडे जाऊन निजा जा. किती रात्र झाली आहे बाहेर ?

रमण०—खरंच तूंही पण जा. आतां जाऊन नीज जा.

मदन०—(नम्रपणें) बरं, येतों तर मी. (पडद्याचे एका बाजस जाऊन आपल्याशीं) मधुकराकडून बार भरविला तो इतक्या पल्याला येऊन पोहोंचला. आतां तर ही स्वारी खुद्द माझ्या तावडींत अगदीं पूर्णपणें सांपडली आहे., हंः हा ह्मणे नरवाहन महाराजांना सुप्रसन्न करणार. मी तर ह्मणावं त्यांना खवळून सोडणार. पाहूं आतां कोणकोण आपला कार्यभाग शितार्फीनं पार पाडतो तें.　　[जातो.

रमण०-यानं आपल्याला मदत करायचं वचन दिलं आहेन्, तर आतां एकाला दोघं असल्यावर नको कांहीं भीति बाळगायला. (इन्दिरेची स्मृति होऊन) तरी बरं आज मला उशीर होईल ह्मणून हें पत्र (पत्र बाहेर काढतो) एका दूताबरोबर माझ्या प्रियेकडे पाठिवणार होतों. पण आतां नाहीं त्याचं कारण दिसत, तरी पण असं करूं का कीं हें पत्र आपण स्वतःच जाऊन तिच्या हातांत द्यावं पण कि ओळख तर देऊं नये. तर असंच करतों आतां.

पद. (चाल-निजरूप इला मी दाऊं का०)
लपुनि छपुनियां जावोनी ॥ हळु ॥ सेवकवेषें मंदिरिं शिरुनी टाकुं सखिस कां फसवोनी ॥ हळु ॥ लपुनि छपुनियां० ॥

(जातो.)

प्रवेश ३ रा.

स्थल—इंदिरेच्या महालाकडे जात असतां वाटेंतच.

(प्रवेश—रमणक मंदिरीं जात आहे, दूताचा वेष घेतला आहे.)

रमणक-अहाहा ! काय हें गोड चांदणं पडलं आहे ! अलकेंतल्या सगळ्या प्रासादांचीं शिखरं चंद्रकिरणांनीं कशीं चकाकत आहेत. असं जरी आहे तरी पण :—

पद. (चाल-ठाउक मजला असे ऋषींचे)
सुंदर-वदना रद-कांतीनें चंद्रप्रभा हरिती ॥ प्रिय कांताच्या मानस हर्म्यां धवलित त्या करिती ॥ चाप धरी स्मर परि हर बघतां हृदयिं धरी भीती ॥ नेत्रकटाक्षें परि त्या अबला लाज स्मरा अणिती ॥ सकल जगावर राज्य क-

राया योग्य प्रिया असती ॥ प्रियाच जीवन, प्रियाच पीयूष, हेंच खरें अंतीं ॥ १ ॥

ओं. पण हा मी कुठवर येऊन पोहोंचलों? वः (अगदीं मंदिराशींच आलां कीं. खरंच या वेळीं—

पद(चाल—परम सुवासिक पुष्पें)

मधुर सुधायुत अधर सखीचा सेवाया किति सुखकारी॥ त्यांतुनि सुंदरि निद्रित असतां हर्षे प्रिय मन परोपरी ॥ एकाएकीं दचकुनि उठुनी सलज्ज राहति उभ्या जरी ॥ प्रिय कांतांनीं अर्जवितां त्या सहजचि सोडिति रोष तरी ॥ उचलुनि लगबग तांबूलातें देती कांता कांत करीं॥ निजतां मंचकिं स्रस्त होति हें छपविति सुंदरि, फसत परी ॥ सुंदरि ऐशी निद्रित असतां कितिदां फसली आजवरी ॥ जागृतींत परि या वेषानें चुंबुनि फसविन आज खरी ॥ १ ॥

अथवा असं तर नाहींना होणार?

पद. (चाल—सांग सखे तूं.)

अवचित मागुनि येउनि सुंदरि ॥ कुचभल्ली मज टोंचिल का ॥ ध्रु० ॥ कनककंकणा प्रकोष्ठभागीं ॥ रुतवुनि सखि हळु येइल का ॥ १ ॥ कुंदकळ्यापरि दंत रोवुनी ॥ मृदु कर कंठीं टाकिल का ॥ २ ॥ अथवा दुरुनी बघुनि मृगाक्षी ॥ कुसुमशरें मज वेंधिल का ॥ ३ ॥ मंद मंदशीं पदें टाकुनी हळूच गजगति येइल का ॥ ४ ॥ वसनबंधनें नूपुररव सखि ॥ शमवुनि हटकुनि फसविल का ॥ ५ ॥ फसवुनि ऐसें कपटी ह्मणुनी ॥ मज मग शठ सखि ठरविल का ॥ ६ ॥

कांहीं होवो, पण सुंदरीला आज अशी कांहीं फशिवतों कीं, ज्याचं नांव तें! अन् हें करायला आजचा हा पोषाखही मला फार अनुकूल आहे. तर जावंच आतां आंत. [जातो.

पडदा उघडतो.

(इंदिरा चंपेस शेजारीं घेऊन बसली आहे.)

इन्दिरा–अगं,

पद. (माडिवरी चलग सखे. या चालीवर)

अजुनि कांत कां नच ये बोल झडकरी ॥ त्याविण मज
सुचत नसे कांहिं अंतरीं ॥ प्रेमभार दुर्निवार करित घा-
बरी ॥ विव्हल बहु हृदय होय गति नसे बरी ॥ १ ॥

तर गडे चंपे, तूं तरी तिथवर जाऊन पाहून ये बाई अजून कां येणं होत नाहीं तें. (उठून आरशाकडे जाऊन उभी रहाते.)

चंपा–होय चाललेंच तर मग मी ही. ही आलेंच इतक्यांत. [जाते.

(चंपा बाहेर येते तों तिला रमणक दूताचे वेषांत भेटतो.)

चंपा–कोण रे तूं? अन् कुणाकडून आलास?

रमणक–चंपे, मी तो!

चंपा–अगबाई! अन् हें काय आज असलासा पोषाख? (हसते)

रमणक–तुला काय करायचं त्याच्याशीं? तूं जा कशी खालीं. जा, नीज जा मुकाट्यानं जाऊन.

(चंपा परत इन्दिरेकडे जाऊं लागते.)

रमणक–कुठं, चाललीस कुठं तूं? तुला सांगितलंना एकदां कीं खालीं जाऊन नीज जा मुकाट्यानं ह्मणून?

चंपा–पण बाईसाहेबांनीं मला महाराजांची स्वारी अजून कां आली नाहीं तें पाहून यायला सांगितलं होतं, तर तेवढं जाऊन सांगून येते मी त्यांना.

रमणक–तें सगळं मीच सांगतों आतां. मूर्ख नाहीं तर. जा खालीं जाऊन नीज जा मुकाट्यानं.

चंपा–(जात जात आपल्याशीं) आजय आणखी परवांसारखं फसवायचंय वाटतं बाईसाहेबांना ? रोज एकेक नवीनच तऱ्हा फसवणुकीची. एकंदरींत या दोघांचं प्रेम कांहीं अपूर्व आहे. [जाते.

(रमणक आंत जातो.)

इन्दिरा–(ओंठ तडतडल्याच्या मिषानें आरशावरील रुमाल बाजूस करून पाहून आपल्याशीं) अग बाई, काय पण थंडी ही ? तरी म्हटलं हे ओंठ कशानं लागले आहेत इतके तडतडायला ? (हातानें खालचा ओंठ आरशाजवळ करून नीट निरखून पहाते.)

रमण०–(आपल्याशीं) सुंदरी, कां नाहीं तडतडणार हे ? त्यांनीं तरी ही अशी थंडी किती वेळ सोसावी ? नाहीं, आतां हिला फार वेळ वाट पहात बसविण्यांत अर्थ नाहीं. (हळूच मागें परतून पुन्हां परत येऊन आपली चाहूल समजावतो.) पाहूं पाहूं आतां कशी काय मजा उडते ती.

इन्दिरा–(कोणी येत आहेसें पाहून चपापून) अग बाई, झालं वाटतं येणं. (सांवरून उभी रहाते व चटकन आरशावर रुमाल टाकते.)

रमण०–(मुजरा करून पत्र देऊन स्वर बदलून) महाराजांनीं हें पत्र माझ्या हातीं देऊन खुद्द आपल्या हातांत द्यायला सांगितलं आहे हें मला.

इन्दिरा–(उत्सुकतेनें तो कोण आहे तें नीटसें न पहातां) असं का? आण आण पाहूं तर तें कुठं आहे तें. (पत्र घेऊन उघडून वाचूं लागते)

पद. (शशिकुलभूषण सदया. या चालीवर)

प्रिय दयिते गुणखाणी ॥ अपराधा मनिं नाणी ॥ विनवी हा तुज रमणी ॥ जोडुनि पाणी ॥ १ ॥ कार्यवशें म-

त्स्वामी ॥ योजितसे मज कामीं ॥ या रात्रीं तरि धामीं ॥ ये न सखे मी ॥ २ ॥ निशि सारी रतिरंगीं ॥ कठिन हें मजलागीं ॥ परि आतां हतभागी ॥ ठार अनंगीं ॥३॥ गुंतुनियां अनुरागीं ॥ प्रार्थितसे तुजलागीं ॥ राहुं नको मुळिं जागी ॥ मीच अभागी ॥ ४ ॥

तरी पण मी—

अधर सुधारस प्याया ॥ उत्सुक मी होउनियां ॥ भ्रमत असें या ठाया ॥ मान्य खरें या ॥ ५ ॥

(हंसून पत्राकडे पाहून) वरच्या लिहिण्याला हें किती तरी जुळून आहे पण!

रमणक-(एकीकडे स्वगत) हो. तूं ह्मणतेस तसं तें नसेल जुळून मग—

इन्दिरा—एकदां ह्मणायचं कीं :—

कार्यवशें मत्स्वामी ॥ योजितसे मज कामीं ॥ या रात्रीं परि धामीं ॥ ये न सखे मी ॥

आणखी पुन्हां लगेच ह्मणायचं कीं :—

भ्रमत असे या ठायां ॥ मान्य खरें या ॥

असं जर आहे तर अजुनी कां बरं नाहीं यायचं तर? त्या दिवशीं मी निजलें असतांना हळूच येऊन जसं मला जागं करायचं झालं तसं करायचंय वाटतं मनांतून? अन् ह्मणूनच (पत्राकडे पाहून) " राहुं नको मुळिं जागी ॥ " असं लिहायचं! एकंदरींत—

पद. (चाल-योग्य न वणिज.)

रजनीस गमन प्रियासी ॥ युक्त नसे प्रिय कांता ज्यासी ॥ ध्रु० ॥ मंदिरिं सोडूनि सुंदरवनिता ॥ झुरणिस ला-

त्रिति कांत रतीशीं ॥ येउनि छपुनी अंतर बघती ॥
प्रेषिति पूर्वी पत्रें ऐशीं ॥ १ ॥ रज० ॥

बरं आहे, बघायचंच ह्मणावं तर माझं अंतर कसं काय आहे तें. अजून नाहींना बाई खात्री होत? नाहींच व्हायची ती. मी दिखील आज जरा परीक्षाच पहाणार; यायचं झालं कीं, मी आज गाढ झोंप लागल्याचं सोंग घेणार, घोरणार, बरळणार, अन् स्वप्नांतच कांहीं बडबडते आहे असं दाखविणार, काय पाहिजे तें करणार; अन् तिकडून कांहीं जरी करायचं झालं तरी मी जागी झालें आहे असं येवढंसं दिखील दाखवायची नाहीं. अन् मग पाहूं कशी काय गम्मत होते ती. (कांहीं विचार मनांत येऊन आरशावरील रुमाल काढून अर्धे मुर्धे डोळे झांकून आपलें तोंड पहाते) खरंच अशानं मला खरोखरीच झोंप लागली आहे कीं मीं आपलं हें कांहीं तरी मिष केलं आहे, असा तिकड संशय सुद्धां येणार नाहीं. (आरशाकडून दुसरीकडे तोंड फिरवून पुन्हां आपले डोळे अगदीं घट्ट मिटून) पण असे अगदीं घट्ट डोळे मिटून जर मी निजलें तर काय गम्मत होईल? घट्ट डोळे मिटते, तोंच रमणक हळूच मागून येऊन तिचें चुंबन घेण्यास सरसावतो.)

इन्दिरा–(त्यास पाहून रागानें लाल होऊन दूर उभी राहून) अरे नीचा, निर्लज्जा, पापिष्टा,–या तुझ्या अपराधाबद्दल तुला शापून–

पद. चाल–पांडुनृपति जनक.)

भग्न ओष्ठ होउत हे ॥ दंत चूर्ण तेविंच हे ॥

रमणक–(गळ्याचा पोषाख एकदम काढून टाकून)

होउंत परि अमृत हें ॥ पाज लौकरी ॥ १ ॥

इन्दि०–(ओळखून) अग बाई, तर मग इतका वेळ मला फसवायचंच झालं तर एकून (त्याला मिठी मारूं पहाते.)

रमणक–(दूर होतो व तिला शिवूं देत नाहीं) हं हं, आतां हा उलट प्रकार तुला शोभत नाहीं. तर—

झंपा प्रबंध.

शापि शापी सखे दंडि प.पा ॥ हीच शिक्षा करी पापकूपा ॥ ध्रु० ॥ ओष्ठ हे मग्न हऊात बिंबाधरीं ॥ दंड उद्दंड हा युक्त मजला ॥ दंत चूर्णा करी रोंवुनी गालिं या ॥ उशिर कां सुंदरी शासनाला ॥ १ ॥ शापि शापी० ॥

(ती धांवत जाते व त्यास आलिंगन देते, तो तिच्या अधरोष्ठांकडे हात नेऊन कितपत फुटले आहेत हें पहातो.)

इन्दि०–(लाजून) हें काय बाई?

रमणक–काय ह्मणजे? हें कांहीं खरं नव्हे. तुला अगदीं गाढ झोंप लागली आहे अन् हें सारं तूं झोंपेंतच बघते आहेस. त्सुः काय तरी झोंपेंत बरळते आहेस तूं हें वेड्यासारखं!

इन्दि०–(आपल्याशीं) तर मग माझं बोलणं आडून ऐकलं वाटतं सारं? (उघड) किती तरी पण बाई थट्टा करायची एखाद्या माणसाची मग.

रमण०–(इन्दिरेच्या गळ्यांतील पुष्पमालेकडे नजर जाते व नीवि-ग्रंथीवर पडणाऱ्या पुष्पमालेच्या मधल्या गुलाबाच्या फुलावर आलेल्या नीविग्रंथीच्या दोन्हीही शेवटांस पाहून भ्रमरभ्रांतीनें) प्रिये, हा कुसुमहार तुला फारच शोभा देत आहे. या हाराच्या मधल्या गुलाबाच्या फुलावर काय वरं हालतं आहे हें? छेः, हा तर भ्रमर–भ्रमर बसला आहे इथं. (भ्रमरास उद्देशून)

पद. (चाल–हा उत्सुक तव संगमा०)

किति उद्धत तूं हा असा भ्रमरा होशी?॥ मम दयितेच्या वसनभागिं उगि कां झटशी ॥ सखि कुसुममाल

कंठीं धरी, बसशि तिजवरी ॥ चाल ॥ मकरंदपानिं किति तरि रती । धरुनि कुमती । रमणिस झटशी ॥ १ ॥

पद. (चाल—अरसिक किति हा०)

मधुपा! किति रे अदया । मत्कांता वसना झटशी न दया ॥ध्रु० ॥ कंटधृतां कुसुमां या । तूं लोलुप होउनी, त्यजिशी बिनया ॥ १ ॥ मधुपा० ॥ प्याया मकरंदा या । या मालेवरती गुंजासि अनया ॥ २ ॥ नीवि-ग्रंथिं सखीच्या । कां भ्रमरी वाटे बसली सखया ॥ ३ ॥ मत्ता त्वत्कृति अदया । मी नेतों सकलहि आजी विलया ॥ ४ ॥ तूतें बांधुनि मधुपा । या वसनें सोडिन दूराचि अनया ॥ ५ ॥ मधुपा० ॥

(शेल्याचे पदरानें भ्रमरास धरूं पहातो,)

इन्दि०—

पद. (चाल—हें काय बरें त्वां केलें०)

हें काय प्रिया हें ऐसें ॥ ध्रु० ॥ भ्रमर नसोनी कोणि नसोनी ॥ वारितसां कां उगि स्वकरांनीं ॥ जाय प्रिया कशि मति विभ्रमुनी । मनिं काय असे धरिलेंसे? ॥ १ ॥

(त्याचा आशय ओळखून सलज्जपणें एका हातानें त्याचा हात दूर करूं लागते व रत्नदीपावर केशराचें चूर्ण फेंकून दिवा थोर करूं लागते.)

रमण०—

पद. (चाल सदर.)

हें काय प्रिये हें ऐसें ॥ रत्नदीप हा थोर करिशि कां?॥ फेंकुनि केशरचूर्ण असें कां? ॥ हृदयीं धरिशी कसलि कुशंका ॥

इन्दि०—न कळे मजला कांहिंच नाथा । मज स्वप्नमयी स्थिति भासे ॥ २ ॥

रम०—स्वप्न! बरं स्वप्नच कां होईना. तर मग हे पहा मीं घट्ट डोळे मिटले! (तिला आलिंगन देतो.)

[पडदा पडतो.]

प्रवेश ४ था.

स्थल—रमणकाच्या मंदिराबाहेरील बाजू.

(प्रवेश—रमणक व मदनसुंदर कांहीं बोलत उभे आहेत असा.)

मदनसुंदर-छेः छेः छेः, कोण भयंकर स्वप्न हें!

रमणक—इतकं भयकर स्वप्न पडल्यावर कोण नाहीं घाबरून जाणार ?

मदन०—हो, असं तर खरंच.

रमण०—अन् अशा स्थितींत तूंच सांग, माझ्या हातून मंदिर सोडून कसं बरं बाहेर पडवेल!

मदन०—उघडच आहे, नाहींच पडवायचं. अन् तुह्मीही पडूंच नका पण बाहेर येऊन जाऊन अभिषेकाला बसलेल्या त्या ब्राह्मणांची व्यवस्था ठेवायची कीं नाहीं ? ती सगळी लागली माझ्याकडे. त्याबद्दल तुह्मी अगदीं बेफिकीर असा.

रमणक—नाहीं, पण वेळ कशी चमत्कारिक आली आहे तें पहा. कावळा बसायलान् फांदी मोडायला एक गांठ ह्मणतात ती हीच. इकडं महाराजानीं इतकं बजावून जायला आणि इकडं असलं भयंकर स्वप्न पडायला एक गांठ पडावी हा कोण चमत्कारिक योगायोग !

मदन०-हो, हा योगायोग चमत्कारिक तर खराच, पण आतां

त्याला काय करायचं? त्याबद्दल तुह्मी काडीभर देखील नका काळजी करूं आतां. ती सगळी व्यवस्था मी बघतों, मग तर झालं कीं नाहीं?

रमणक—तर मग यासंबंधानं मी अगदीं निश्चित असूं?

मदन०—अगदीं, अगदीं निश्चित. आपण त्या ब्रह्मवृंदांच्या व्यवस्थेबद्दल अगदीं बेफिकीर आणि निर्धास्त असा. तिकडं लक्ष सुद्धां देऊं नका तुह्मी आपलं.

रमणक—हें बघ (दुश्चिन्हें होतातशीं पाहून)—

पद. (चाल—जरी नाहिं कमळ तें करीं)

मम वाम नयन हा लवे। हृदय कालवे। भयें भरलें। कां
असें। कांहिं ना कळे ॥ १ ॥ हा वाम बाहुही स्फुरे ।
रजनि किरकिरे। घोर किति रे। अशुभ रव मंदिरीं प-
सरे ॥ २ ॥ मम हृदय होत बावरें। भरुनि कांपरें। किति
कचरे। धैर्य तें मुळिं न कीं उरे ॥ ३ ॥

एकंदरींत हा चिन्हं कांहीं चांगलीं नाहींत. सुंदर, हें पहा, माझ्यानं किनई आतां इथं उभं रहावत नाहीं बोवा! तिनं सांगितलंन् तें भयंकर स्वप्न दिसतंय सगळं माझ्या डोळ्यांपुढं. जाऊं, जाऊं तर मी आंत?

मदन०—खुश्शाल, खुशाल जा. दिवसाची रात्र अन् रात्रीचा दिवस करून खपेन मी; पण ब्रह्मवृंदांच्या अभिषेकाला ह्मणून कोणत्याही तऱ्हेचा व्यत्यय नाहीं येऊं द्यायचा. मग तर झालं कीं नाहीं?

रमणक—(पुन्हां डावा डोळा लवतो व वामबाहू स्फुरण पावतो) त्थुः, हीं चिन्हं कांहीं चांगलीं नाहीं दिसत एकूण! (मदनसुंदरास) सुंदर, मी येतों तर; पण तुला मात्र माझ्याकरितां त्रास पडणार आहे एवढं खरं.

मदन०—तुमच्यासंबंधानं, अन् त्रास?

रमण०—त्रास नाहीं तर काय? पण मी तरी काय करूं? याला

माझा कांहींएक इलाज नाहीं. हें पहा या वेळीं मी तुझ्याशीं इथं बोलत उभा आहेंना; पण वास्तविक स्थिति अशी आहे:—

पद. (चाल—प्रधानाच्या घरीं जातां)

देह माझा इथे आहे । प्राण परि ते प्रियेपाशीं ॥ गुंतुनीया राहताती । भ्रमवि चित्ता स्वप्न ाहे ॥ १ ॥ सुचत नाहीं मजशीं कांहीं । मार्ग पुढचा दिसत नाहीं ॥ शून्य गमती दिशा दाही । प्रियेशी सोडितां पाही ॥ २ ॥

(डोळे भरून येतात) अन् ह्मणून मी ह्मणतों कीं, माझ्याकरितां हा एवढा त्रास सोसलाच पाहिजे तुह्मांला.

मदन०—त्तास! असं मात्र ह्मणूं नका. नका नका असं डोळ्यानं पाणी नका काढूं. जा कसे तुह्मी आंत. हा पहा मी चाललों आतां. (रमणक त्याच्याकडे त्याला कांहीं विचारीत आहे अशा दृष्टीनें पाहतो. त्यास) छे:, त्यावद्दल सांगितलंना तुम्हांला कीं, तुह्मी अगदीं निर्धास्त आणि निश्चित असा ह्मणून.

रमणक—नाहीं. पण ह्मटलं आणखी एकदां नुसतं.

मदन०—नाहीं, त्याचं कांहीं कारण नाहीं. तें आतां पुरं माझ्या लक्षांत राह्यलं ह्मणून समजा. त्याशिवाय मला आतां दुसरं तिसरं कांहीं दिसायचं नाहीं कां सुचायचं नाहीं. तर जा कसे पाहूं तुह्मी आंत. नाहीं, पण मीच जातों ह्मणजे तुह्मी आपल्या आपण जाल.

[जाऊं लागतो.

रमणक—हा पहा मी चाललोंच. (लगबगीनें जात असतां शेला त्याचे पायांत अडखळल्यामुळें थबकून) अरेरे! हा शेला देखील कां बरं मला असा अडवितो ?

पद. (चाल—प्रिया मीनाक्षी)

असा रोधोनी । धरिशि कां मला स्वकीय अंच-

लांनीं? ॥ ध्रु० ॥ अपशकुनचि मज करिशी, वसना ! ॥ चरण मम बांधानी ॥ १ ॥ मद्दयिताकर-चित्रित तुज त्या । युक्त न हें, घे ध्यानीं ॥ २ ॥ दुःखभार अति असह्य मज हा । टाकि यास बांधोनी ॥ ३ ॥

[जातो.

मदन०—(पडद्याबाहेर येऊन) या स्वारींनीं एवढंच सांगायला मला बालावणं पाठिवलं होतं वाटतं. तिकडं नरवाहन महाराजांनीं ती समाधी लावली, अन् इकडं या स्त्रीलंपटानं ही समाधी लावलीन्. हंः, आपल्याला तर या रमणकाच्या ह्या अलौकिक समाधीचा भंग करावयाचा आहे. (विचार करून) तर याला तोड? (डाव्या हाताच्या तळहातावर उजव्या हाताची मूठ मारून) याला तोड? दुसरी कसली आली आहे याला तोड! नरवाहन महाराजांच्या समाधीचा भंग करून त्यांच्याकडूनच जेव्हां या रमणकाच्या या विलाससमाधीचा भंग करतां येईल तेव्हांच खरं. महाराजांच्या समाधीचा भंग करायला युक्ति ह्मटली ह्मणजे एक मधुकराला कोणत्या तरी मिषानं त्यांच्याकडं पाठवून देऊन त्याच्याकडून तें काम उरकायचं, अन् दुसरी युक्ति माझ्या हातांत आहे; कारण, अभिषेकाला बसलेल्या साऱ्या ब्राह्मणवृंदांची व्यवस्था पहायचं आतां सर्वस्वीं माझ्याकडे आहे तेव्हां त्यांची कांहीं व्यवस्था ठेवली नाहीं ह्मणजे अनायासेंच ही बातमी महाराजांच्या कानांपर्यंत जाऊन पोहोंचणार, अन् महाराजांच्या कानांपर्यंत का ही एकदां जाऊन पोहोंचली ह्मणजे मग याच्या समाधीचा भंग व्हायला किती उशीर? अन् हा का वार एकदां उडाला ह्मणजे मग महाराजांना जास्त कापाला पेटवून रमणकाच्या या विलाससमाधीचा तत्काल भंग करायला कितीसा वेळ लागणार! इकडं या मधुकराकडून यांचे जरा कान जास्त भारवले ह्मणजे आयतीच दुधांत साखर

पडणार. एक गोळी नाहीं लागू पडली तर दुसरी. त्याशिवाय नाहीं उपयोगी. तर आतां अगोदर त्या देवमाणसालाच जाऊन गांठावं, ह्मणजे सगळं गाडं कसं अगदीं सुयंत्रित चालूं लागेल!

[जातो.

प्रवेश ५ वा

स्थळ—उद्यानापुढील चहूतरा.

प्रवेश—(चंपा व चतुरिका कांहीं बोलत उभ्या आहेत.)

चंपा—विमानांत ह्मणे दोघंजणं जशीं कांहीं बसलेलीं, अन् तें विमान पहिल्यांदा खूप–खूप उंच गेलं, अन् असं उंच जाऊन तिथून जें एकदां भडकलं तें मग कांहीं केल्या वाई आवरेना म्हणे.

चतुरिका—अग बाई, अन् मग?

चंपा—अन् मग काय? रमणक महाराज अगदीं घाबरून गेले. बाईसाहेबही गडबडल्या. दोघांनाही धीर निघेना. इतक्यांत ह्मणे कोणसासा आपला एक पुरुष जसा कांहीं तिथं आल्यासारखा, अन् त्यानं "थांबा, मी थांबवितों हें विमान" असं ह्मणून कुठल्याशा एका दोरीला हिसडा दिलान्, त्याबरोबर कट्टकरन् एकदम आवाज झाला.

चतु०–अग बाई, अन् मग? ह्मणजे मोडलं कीं काय तें?

चंपा–अग मोडलं ह्मणून काय विचारतेस? हें बघ किनई तें ह्मणे एकदम दुभंग झालं, अन् बाईसाहेब एकीकडेन महाराज एकीकडे.

चतु०—अन् पुढ?

चंपा पुढें ग काय! दुभंग झाल्यावर ज्या अर्धभागांत महाराज होते त्यांतूनच कीं नाहीं महाराजांनीं बाईसाहेबांना आपल्या तुकड्यांत

घेण्याकरितां हात पुढें केले. अन् बाईसाहेब ह्मणे जों आपले हात पुढें करतात न करतात तोंच ज्या मनुष्यानं ती दोरी ओढल्यामुळं तं विमान दुभंग झालं होतं त्याच मनुष्यानं बाईसाहेबांच्या पायांना एकदम हिसडा दिलान्. त्याबरोबर तो विमानाचा अर्धभाग एकदमच खालीं आला. अन् बाईसाहेबांना महाराज अन् महाराजांना बाईसाहेब अशीं एकमेकांना एकमक दिसेनाशीं झालीं. तो मेला कांहीं केल्यानं ह्मणे आपल्या बाईसाहेबांचा पाय ह्मणून सोडीना. अन् त्या वेळीं त्यानं एकदम आपलं रूप बदलून भयंकर अक्राळ विक्राळ असं रूप धारण केलंन्. त्याबरोबर बाईसाहेब दचकून एकदम जाग्या झाल्या. झोंपेंतूनच त्यांनीं एक किंकाळी ठोकली. अन् मग त्यांच्या सगळ्या अंगाला अगदीं पायांपासून तों डोक्यापर्यंत जो कांहीं घाम सुटायला सुरवात झाली ती कांहीं विचारूं नकोस.

चतु०–काय बाई तरी चमत्कारिक स्वप्न ह्मणायचं हें! बरं मग पुढें?

चंपा–पुढं काय? तूं पुष्पपुरीला गेलीस तोच तो दिवस. त्याच दिवशीं पडलं बाईसाहेबांना हें भयंकर स्वप्न. अन् त्याच दिवसापासून रमणक महाराज विलासमंदिर सोडून जर कुठे एक क्षणभर बाहेर पडले असतील तर शपथ. अन् त्यानं झालय काय ह्मणशील तर–त्यांच्या हातून एक मोठा अपराध झालाय्.

चतु०–अग बाई, महाराजांच्या हातून मोठा अपराध झालाय् ह्मणतेस? अन् तो कोणता? तरी मला वाटलंच कीं हें स्वप्न कांहीं शुभदायक नाहीं ह्मणून.

चंपा–पहिल्यांदा नव्हतं वाटलं मला असं; पण आतां मलाही पण तुझ्यासारखंच वाटूं लागलय खरं. कां ह्मणशील तर, सगळ्या अलकापुरीभर आपल्या महाराजांच्या नांवानं फार गवगवा होऊन राहिला आहे.

चतु०-हो का? पण कां बरं? असा गवगवा होण्याचं काय बरं कारण?

चंपा-कारण एवढंच कीं, नरवाहन महाराज कैलासमंदिरांत अकरा दिवसपर्यंत समाधि लावून बसावं ह्मणून जों गेले तों इकडे रमणक महाराजांच्या हातून मोठी चूक झाली. क्रीडापर्वतावर शंकराचीं जितकीं जितकीं ह्मणून ज्योतिर्लिंगं आहेत त्या प्रत्येक लिंगागणिक अकरा अकरा ब्राह्मण ह्मणे अनुष्ठानाला बसविले होते. नरवाहन महाराजांनीं जातांना रमणक महाराजांवरच साऱ्या ब्राह्मणांची व्यवस्था पाहण्याचं सोंपिवलं होतं; पण बाईसाहेबांना तें स्वप्न पडल्यापासून हे जे विलासमंदिरांत गेले ते तिथून या घटकेपर्यंत बाहेरच पडले नाहींत. त्यामुळं झालंय आहे काय तर सारे ब्राह्मण भुकेनं अन् तान्हेनं अगदीं व्याकुळ होऊन—

चंपा-व्याकुळ होऊन? ह्मणजे? कांहीं भलतं सलतं झालं कीं काय?

चंपा-तितक्या थराला नाहीं गोष्ट आली ह्मणा, पण अन्नपाणी न मिळाल्यामुळें एका आठ दिवसांत सगळ्या ब्रह्मवृंदांच्या शरिरांचे कस अगदीं नुसते सांपळे होऊन राहिले आहेत. अन् त्यामुळें नरवाहन महाराज—

चतु० काय बाई-रागास पेटले कीं काय?

चंपा-रागास चढले कीं काय ह्मणून काय विचारतेस? ते नांवचे नरवाहन महाराज. ते जोंपर्यंत बरे आहेत तोंपर्यंत सारं ठीक. नाहीं तर त्यांचा राग मात्र बाई मोठा विलक्षण. असल्या भयंकर चुकीबद्दल त्यांचा कोपाग्नि कुठवर भडकेल अन् कुठवर नाहीं याचा अगदीं नेम ह्मणून सांगतां येत नाहीं. अन् त्यांतून या खेपेला तर नरवाहन महाराज उद्दाम बजावून गेले होते आणखी—

चतु०-अग बाई, मग आतां एकंदरींत हें कांहीं चांगलं नाहीं

चिन्ह पण गडे, ही ब्राह्मणांबद्दलची सगळी हकीगत तुला कोणी सांगतली ?

चंपा–कुणी ? कुणी ह्मणजे ? अग आपल्या त्या मालतीबाई नाहींत का ? त्यांची ती मंजुळा, परवां आली होती इथं. तिच्याकडून कळलं हें सगळं मला. नाहीं तर मला कुठून कळणार ? तूं गेल्या-पासून आठ दहा दिवसांत मी आपल्या या बागेच्या बाहेर पाऊल टाकलं असलं तर शपथ. तूं इथं असलीस ह्मणजे मग कुठं तरी अंमळ फावतं मला.

चतु०–हो, हें तर खरंच. पण गडे चंपावती, ही सारी बातमी महाराजांच्या कानांवर गेली आहे का ?

चंपा–छे:, अग जावी कशी ती ? दोघंयजणं विलासमंदिर सोडून बाहेर पडतील तेव्हांना साऱ्या गोष्टी ?

चतु०–होय. हें तर बाई खरंच. पण बाईसाहेबांच्या तरी कानांवर गेलंय का हें ?

चंपा–छे, त्यांना दिखील नाहीं कळलं हें.

चतु०–थांब तर. आतां आपण असं करूं, मी बाईसाहेबांना कांहीं तरी युक्ति करून एकांतीं गाठते, अन् त्यांच्या कानांवर ही सारी बातमी घालतें. म्हणजे त्याच महाराजांना या खडतर झोंपेंतून चांगल्या जागं करतील. (आपल्याशीं) खरंच, पण हिनं सांगितलेल्या त्या चमत्कारिक स्वप्नाचा तर नसेलना बाई कांहीं दाखला यायचा ? (उघड) पण खरंच गडे, तुला कुठं जायचं ह्मटलंस ?

चंपा–हें पहा, मला किनई बाईसाहेबांनीं पिंवळ्या भुईचांफ्याचीं थोडींशीं फुलं लौकर घेऊन ये ह्मणून सांगितलं आहे.

चतु०–बरं तर तूं जा, अन् मीही पण बघतें बाईसाहेबांची एकीकडे गांठ पडतेशी.

चंपा—(गेल्यासारखें करून पुनः परत येऊन) अग चतुरिके, पण हें बघ, बाईसाहेब उगीच घाबरून जातील असं मात्र सांगू नकोस हां! एवढंच काय तें.

चतु०—अन् एवढंच सांगायला, जात होतीस ती परत आलीस वाटतं?

चंपा—हो, एवढंच सांगायला. अगोदर सुचवून ठेवावं ह्मणून थबकलें मी.

चतु०—पण मी कशी अशी घाबरवीन त्यांना? त्यांना घाबरवूं नये एवढं समजतं पण मला. हें नको कांहीं शिकवायला मला.

चंपा—अगं, शिकवितंय कोण तुला? पण ह्मटलं आपलं आलंय मनांत तें आपलं सांगून ठेवावं झालं. बरं तर येतें मी या बागेतून तेवढीं तीं भुईचांफ्याचीं फुलं घेऊन.

चतु०—(आपल्याशीं) आपणय आतां जाऊन बाईसाहेबांना एकीकडे गांठण्याची संधि पहात बसावं.　　　(जाते.)

प्रवेश ६ वा.

स्थल—उद्यानाबाहेरील प्रदेश.

(प्रवेश—मदनसुंदर व मधुकर कांहीं बोलत येतात.)

मदन०—हें पहा, महाराजांना तूं तिथं घेऊन येतोस न येतोस अशा बेतानं मी आपलं सारं जाळं पसरून, फक्त काय ती तुझी वाट पहात बसलों आहें ह्मणून समज.

मधुकर—अन् महाराज येत नाहीं ह्मणाले तर?

मदन०—वेडा माणूस नाहीं तर! अरे, तुला सांगितलीना त्याला तोड? (त्याचे तोंडावरून बुरखा देऊन) हा तोंडावरून घे अन् कांहीं केल्या तोंड ह्मणून दाखवूं नकोस. ह्मणावं, "जेव्हां महाराजांची खात्री करीन तेव्हांच आपल्याला हें तोंड दाखवीन." इतकं

सांगितल्यावर मग नाहींना त्यांना तुझ्या बोलण्याचा बेभरंवसा वाटायचा ?

मधु०–हं हें मात्र खरं बुवा.

मदन०–(चुटकी वाजवून) जा, जा तर आतां. मात अगदीं मीं सांगितल्याबरहुकूम हां ?—

मधु०–तेवढं माझं काम. कारण असं पहा—

साकी.

वंद्य गुरू तूं, युक्तिहि तैशी थोर सुमंगल मंत्र ॥
योग्य शिष्य हा या चरणांचा उरकिल सर्वहि तंत्र ॥
गुंगत मी जातों। भंग समाधी आधिं करितों ॥

मदन०–ये, पण महाराजांना असं भारून टाकतोस कीं ज्याचं नांव तें.

मधु०–ठीक आहे. हें नको मला सांगायला. येतों, येतोंच तर मी.

गुंगत मी जातों। भंग समाधी आधिं करितों ॥

(जातो.)

मदन०–(कोणी नाहीं असें पाहून आपल्याशीं) जा जा. तूं गुंगत जा नाहीं तर दौडत जा. नरवाहन महाराजांच्या समाधीचा भंग केलास कीं, झालं, माझं काम आटपलं. मग ते तुला शापून तुझं भस्म करून टाकोत अथवा त्या रमणकाला शापून त्याचं भस्म करून टाकोत. रमणकाचं कांहीं बरं वाईट झालं तर ठीकच झालं. अन् त्याचं कांहीं एक न होतां यदाकदाचित् तूंच जर गळफाटलास तरी त्यांत देखील माझं ह्मणजे मोठंसं नुकसान आहे असंही नाहीं. कारण ही तुझी मालती जरी अगदीं इंदिरेइतकी खुपसुरत आणि रूपगुणसंपन्न नाहीं तरी एकंदरींत ती कांहीं टाकाऊ नाहीं. तिचा तो:—

पद (चाल—सुखोपभोगा)

वदनचंद्रमा हास्य मधुर तें मोहवि मन्मतिला ॥ सुधा अ-
धरिंची सखिच्या सुंदर, निपजवि तृष्णेला ॥ मदनबाण
जे नयनें मारी, भेदिति हृदयाला ॥ अंगलता तिचि मदन-
तरूवर युक्तचि चढण्याला ॥ १ ॥

(कांहीं विचार करून) बरं पण याच गोष्टीसंबंधानं सध्यां इतका विचार करीत बसण्यांत काय राम ? नरवाहन महाराजांना हा रमणकाच्या घराकडे घेऊन येईपर्यंत आपल्याला रमणकाच्या घरांत जाऊन अगदीं तयार राहिलं पाहिजे. ठरल्याप्रमाणं पहिला वार उडवून, मधुकरानं दरवाजावर लाथ मारलीन ह्मणजे मुकाट्यानं पुढचा बार ठासून ठेवायच्या तयारीला लागावं. अन् हा बार कां एकदा फाकडू उडाला कीं झालंच, हातीं घेतलेलं काम निम्मं शिम्मं पार पडलं ह्मणून समजावं; ठीक आहे तर, आतां उशीर करून नाहीं उपयोगी. तिकडंच आतां आपण आपला मोर्चा फिरवावा. (जातो.)

प्रवेश ७ वा

(समाधिस्थ असलेले नरवाहन महाराज व त्यांच्याजवळ मधुकर दबकत दबकत जात आहे.

मधुकर—यांच्या समाधीचा भंग करायला काय बरं योजावी तोड? बहुतेक हें असाध्यच दिसतं आहे. तरी पण पहावा, प्रयत्न करून पहावा. कारण न जाणो, मीं यांच्या समाधीचा भंग केला अन् यांनीं एकदम मला जाळून भस्म केलं ह्मणजे मग?—(कांहीं चाहूल ऐकून) हं पण महाराजच कां बरं एकदम खडबडून उठले ? समाधि विसर्जन करून ध्यानावर येताहेत वाटतं.

नरवाहन–(समाधींतून एकदम खडबडून उठून) शिव! शिव! शिव! शिव! कधीं नाहीं तो आज हा असा समाधीचा भंग कां बरं झाला? छेः छेः छेः छेः, खचित कांहीं तरी पापाचरणच झालं असलं पाहिजे. त्याशिवाय हा असला समाधिभंग होण्याला दुसरं कांहीं कारणच दिसत नाहीं.

(इतक्यांत मधुकर एकदम आरडून किंकाळी ठोकतो.)

नरवाहन–(मधुकरास) अरे कोण? कोण आहेरे?

मधु०–(नम्रपणें) मी महाराजांच्या चरणाचा दास आपला मधुकर आहें.

नरवाहन अरे, पण तूं हा असा एकदम ओरडलास कां?

मधु०–कां ओरडलों तें काय सांगूं? महाराज, आपण खडबडून उठल्याबरोबर मला धडकी भरली. महाराज, अभिषेकाला बसलेल्या ब्रह्मवृंदांची काय स्थिति होऊन गेली आहे ह्मणून सांगूं आपल्याला!

नरवा०–तरी मला वाटलंच कीं, कांहीं तरी पापाचरण घडलं असावं ह्मणून! छत् त्या मगरूर रमणकाच्या दुर्लक्षाचंच-छेः हें दुर्लक्ष कसलं! मुद्दाम जाणून बुजून केलं असलं पाहिजे त्यानं हें. तरी समाधि लावून बसण्यापूर्वीं त्याला मीं इतकं बजावलं होतं तरी देखील शेवटीं असा प्रकार झाला! तेव्हां याची ही मगरुरी आणि उद्दामपणाच हा सारा!

मधु०–(एकीकडे) सुंदरानं पढविल्याप्रमाणं वागत असल्यामुळें बरंच जमून येत आहे ह्मणायचं हें.

नरवा०–अन् या नीचाच्या पापाचरणामुळेंच—

पद. (चाल–कोण येतो पहातो मी मजाशिं ताराया.)

भंग झाला समाधीचा, हृदय संतापें ॥ ताप होतां क्रोध

पेटे अधिक वेगानें ॥ ब्रह्मवृंदा घात केला, स्वकिय दोषानें ॥ दावि चल रे सकल दुरित केलें हें ज्यानें ॥ १ ॥

मधु०–अन् या सर्वांचं कारण कोण असं आपल्याला वाटतं ?

नरवा०–अरे, आतां माझ्या तोंडानं कशाला वदिवतोस तें ? तूं मला यापूर्वींच जेव्हां सांगितलंस तेव्हां तें मला अगदीं खोटं वाटलं. चल चल तर. तो रमणक असेल तिथं या वेळीं मला तूं घेऊन चल.

मधु०–महाराजांना आपण होऊनच जर आतां असं वाटूं लागलं असेल तर मग हा तयार आहें मी न्यायला. असं इकडून यावं महाराज माझ्या मागोमाग.

(दोघेही पडद्यांत जातात व दुसऱ्या बाजूनें पुढें येतात.)

मधु०–महाराज, हेंच घर आपल्या आवडत्या रमणकाचं (स्वगत) पण मदनसुंदर अजून तिथं जाऊन बसलाय कीं नाहीं कोणास ठाऊक!

नरवाहन–(रमणकाचे दरवाजापुढें येऊन) मधुकरजी; दार उघडा ह्मणावं दार.

(मधुकर दरवाजाशीं हांका मारूं लागतो.)

नरवाहन–(आपल्याशीं)

पद. (चाल लावणीची)

मधुकर वचना आदरिलें नच, आजवरी मी फसलों ॥
अंतरिं येउनि विविध कुशंका शंकित किति तरि झालों॥
पुण्यसंचया संपादाया शिव हर मांदिरिं गेलों ॥ समाधि
भंगुनि येथें आलों निंदास्पद मग ठरलों ॥ ब्रह्मवृंद छळ
व्यर्थ घडुनियां पूर्व यशासहि मुकलों ॥ या सर्वां जो
कारण झाला तन्नाशा अजिं सजलों ॥ १ ॥

मधु०–अरे, दरवाजा उघडतां कां कोणी ?

मदन॰–(गड्याच्या सारख्या उच्चारानें आंतून उत्तर देतो) कोण आहे बाहेर? अशा अपरात्रीं काम काय आहे इथं?

नरवा॰–(साश्चर्य) काय इतकं उजाडलं तरी अपरात्र?

मधु॰–अहो, दरवाजा—दरवाजा उघडाहो जरा!

मदन॰(आंतून) काय? दरवाजा उघडा? साफ नाहीं उघडीत या वेळीं दरवाजा. ज्या वाटेनं आलांत, त्या वाटेनं चालते व्हा पाहूं मुकाट्यानं—पण असं काम तरी काय आहे आपलं इतकं निकडीचं?

मधु॰–(मुद्दाम खोटंच) अहो, ते अनुष्ठानाला ब्राह्मण बसले आहेत ते, त्यांच्यावर तरी कांहीं थोडी बहुत दया कराहो. भुकेनं अन् तान्हेनं ते अगदीं व्याकुळ होऊन गेले आहेत ह्मणून सांगा रमणकाला.

मदन॰–(आंतून) मग ह्मणतां काय? उगीच कां डोकं उठिवलं आहे? तुह्मी कां नाहीं होत त्यांच्याबरोबर व्याकुळ?

मधु॰–च्चः! काय तरी चमत्कारिक माणूस आहे पण हा! अरे भल्या माणसा, सिध्या मार्गानं दरवाजा उघडतोस कीं नाहीं? अरे, दरवाज्यांत महाराज तिष्ठत उभे आहेत.

मदन॰–(आंतून) वाः तुह्मी तरी खूप थारेबाज दिसतां बोवा. अहो भले गृहस्थ, महाराज तिष्ठत उभे आहेत काय? एकंदरींत आपण मोठे साळसूद दिसतां, पण हें तुह्मी खूप समजून असा कीं, या वेळीं महाराज नाहीं, पण त्या तुमच्या महाराजांचेही जरी कोणी एखादे महाराजाधिराज आले असले तरी त्यांना देखील या वेळेला मी बिलकुल दरवाजा उघडणार नाहीं इतकेंच नव्हे, पण या वेळीं खुद्द नरवाहन महाराज जरी जातीनं आपण होऊन आले तरी त्यांना देखील या वेळीं मी दरवाजा उघडणार नाहीं समजलास. जा, जा तर

आलांत तसे, इथून मुकाट्यानं चालते व्हा. फाजील लोक नाहीं तर. बाहेर रात्र कोण अगदीं किर्र करते आहे, अन् हे येतात दुसऱ्याचं डोकं उठवायला!

मधु०–काय विलक्षण माणूस आहे हा. अहो शहाणे, दार उघडा अगोदर, अन् मग चालूं द्या तुमचं तोंड.

मदन०–अहो सुर्ते, दरवाजांतून अगोदर चालते व्हा, अन् मग सांगा दार उघडायला.

मधु०–(दरवाजावर लाथ मारून) कायरे, उघडतोस कीं नाहींस दरवाजा बऱ्या गोष्टीनं?

मदन०–(लायेची खूण ओळखून) इतक्या बेतावर आलांत वाटतं आपण? मीं आपल्याला ओ दिली हीच अगोदर मोठी चूक केली ह्मणायची. बरं आहे तर. यापुढें मात्र आपल्याला उत्तर ह्मणून मिळायचं नाहीं समजलांत? हं चालूं द्या, चालूं द्या तुमचा नगारा, बडवा. (आंतून दुसऱ्या ठिकाणीं निघून जातो)

नरवा०–(मधुकरास) त्याला ह्मणावं, दरवाजा उघडतोस कां टाकूं फोडवून? (दरवाजास एक लाथ देतो) काय मूर्खपणा हा! बाहेर इतका दिवस आला तरी हा बेधडक रात्र आहे ह्मणून सांगतो. तेव्हां याला काय ह्मणावं तरी काय? जसे धनी तसे चाकर.

पद. (चाल–सार्थचि ते वदती)

सेवक जगिं असती। पाही। अधिपति परि ते कृति अ-
नुसरती ॥ ध्रु० ॥ असति दक्ष जरि स्वामी ते। लक्ष्य
देति निज कार्यावरि ते ॥ नातरि वरिती जड धुंदी तें।
वंचय सारे, टकावित कुमती ॥ १ ॥

मधुकरजी, बघतां काय? बोलवा कुणाला तरी अनू फोडवा दरवाजा द्या ह्मणावं ह्या चांदया भराभर काढून टाकून.

मधु०–(महाराजांस) महाराज, अजून इकडून कोणी मनुष्यें फिरकूं लागलीं नाहींत. आतां इतक्यांत कोणी तरी इथं. तोंपर्यंत आपण अमळ असे या बाजूला उभे राहूं. (बाजूला जाऊन एका खिडकीच्या बाहेरच्या बाजूस उभे रहातात.)

नरवाहन–(कांहीं ऐकलेसें करून) मधुकर, असा पुढें ये. हें ऐकलंस—आंत कोणसंस बोलत आहे.

मधु०–(कान देऊन हाताची बोटें पुढें करून) हं हं.

(पडद्याचे आंतून)

मदन०–(रमणक बोलत आहे असा आविर्भाव आणून) अन् सुंदरी, असं झालं ह्मणजे मग सगळ्या चलकापुरीची तूंच स्वामीण झालीस ह्मणून समज. मग त्या नरवाहन महाराजांची बायको तुझ्यापुढं येऊन तुला मोठ्या नम्रपणानं अन् मर्यादेनं नमस्कार करील. तुझी इच्छा असली तर तिला तुझी बटकूर सुद्धां करून ठेवीन पाहिजे तर.

नरवाहन–(त्वेषानें) अस्सं, अस्सं काय? इथपर्यंत आपली मजल पोंचली तर एकूण? (मधुकरास) मधुकर, ऐकलंस का त्या नीचाच्या तोंडून काय शब्द पडले ते. ऐक, ऐक; अजून तरी ऐक. (ऐकतात.)

मदन०–(आंतून) नरवाहन महाराज! त्याला आजपासून नुसता नरवाहन ह्मण.

मधु०–कोण भकंकर णस्तवाळपणा हा! अरे दुर्बुद्धे, कशानं कशानं आली तुला ही इतकी णस्ती? महाराज, याच्या संबंधानं मी महाराजांना पूर्वींच नव्हतों सांगत?

नरवाहन–चप्प, चप जरा. ऐक. हा दुर्बुद्धी काय बडबडतो आहे तें.

मदन०–अन् सुंदरी, तूं सांगशील तर त्याला तुझ्यापुढें आणून

हात जोडून उभा करतों पाहिजे तर, मग तर झालं कीं नाहीं ? प्रिये, या अलकेची खरोखर स्वामीण तूं. हो नरवाहन नुसता नांवाचा. खरं म्हणशील तर आपल्या नांवाप्रमाणें आमच्यासारख्या नरांचं एक वाहन आहे.

नरवा०–अरे दुर्बुद्धे !

मधु०–(तोंडावरचा बुरखा काढून) कां महाराज, मी म्हणत होतों तें आलं कीं नाहीं आतां तरी महाराजांच्या पूर्णपणें प्रत्ययाला. महाराजांच्या हें मी केव्हांच कानांवर घातलं होतं; पण त्या वेळीं रमणकावर मी हें कांहीं तरी कुभांड रचितों आहें असं वाटलं होतं महाराजांना. आतां तर झाली खात्री? आतां मला तोंड दाखवाय-ला काय हरकत आहे ?

नरवा०–एकूण एवढ्याचकरितां तूं हा बुरखा तोंडावर ठेवला होतास तर ? पहिल्यांदाच ताडलं मीं तें. बरं पण दरवाजातून कोण डोकावतं आहे तें? चल चल जाऊं तिथपर्यंत पुन्हां.

(तेथें जातात.)

चतु०–(दरवाजाची दिंडी उघडून) कोण आहे तें ? (महारा-जांस पाहून जीभ चावते.) अग बाई, इथं तर नरवाहन महाराजांचीच स्वारी आली आहे कीं, अन् ह्यांच्याबरोबर हें मधुकरराय.

मधु०–(रोषयुक्त) कायगं कुठे आहे तो रमणक? रमणकाला म्हणावं महाराज आले आहेत.

चतु०–(आपल्याशीं) अग बाई ! महाराज तर अगदीं लाल झा-ल्यासारखे दिसतात. काय आहे समजत नाहीं. (उघडपणें त्या दो-घांस उद्देशून) सांगतें; पण म्हटलं—अशा कडक थंडीचं बाहेर उभं रहाण्यापेक्षां आंतच यावं. ही मी जाऊन उठिवते त्यांना.

(जाते.)

मधु०–महाराज, इच्या ह्मणण्याप्रमाणं आपण आंतच जाऊं म्हणजे या रमणकाची कशी काय धांदल उडते तेंही पण आपल्याला नीट बघायला सांपडेल.

नरवाहन–या अधमाच्या गृहांत प्रवेश करणं म्हणजे निव्वळ पापाचरण व अधमपणाचं वाटतं. तेव्हां आंत न जावं हाच उत्तम मार्ग. (चतुरिका परत येते तिला) काग, कुठं आहे रमणक ?

चतु०–येताहेत, इकडच येताहेत महाराज.

नरवा०–महाराज म्हणजे ? तूं गेलीस तेव्हां तो काय करीत होता ?

चतु०–मला वाटतं त्यांना झोंप लागली होती. मीं हांक मारून त्यांना महाराजांची स्वारीं आल्याचं सांगितलं. त्याबरोबर ते "काय महाराज आले आहेत ?" असं म्हणून थोडे घाबरल्यासारखे झाले. अन् मी आलोंच हां असं म्हणून ते तसेच उठले. इतक्यांत येतील.

नरवा०–(संतापून) काय ! जागा असून हां आलों म्हणून इथल्या इत्थं निरोप पाठवितो ! आतां मात्र याच्या नीचपणाचा अगदीं कळस झाला म्हणायचा ! (दासीस) जा, अन् त्याला म्हणावं जस्सा असशील तस्सा ये अगोदर.

मधु०–खरंच काय मगरुरी ही ? अत्तां तिथल्या खिडकीशीं काय पण अगदीं गुलगुल बोलत होता. अन् इतक्यांतल्या इतक्यांत झोंपेंतून घाबरेपणानं उठल्याची बतावणी करतो आं ?

[इतक्यांत रमणक अस्ताव्यस्तपणें धोतर व शेला सांवरीत येतो व नरवाहन महाराजांच्या पायां पडूं लागतो तों नरवाहन महाराज त्याला झिडकारून दूर हो म्हणून झिडकारितात.]

नरवा०– पद. (झंपा–प्रबंध.)

दूर हो दूर हो काळसर्पा ॥ व्यर्थ कां दंशिशी दुष्ट दर्पा
॥ ध्रु० ॥ भ्रष्ट रे भ्रष्ट त्वत्स्पर्शही दूष्य हा आणिली

निघृता यक्षवंशा ॥ अंध रे अंध उन्मत्त तूं दुष्कृती, ब्रह्म-वृंदघ्न तूं घोर दंशा ॥ १ ॥ चित्समाधिहि त्वां भंगुनी उग्र हें, द्वंद्व कां मांडिलें सांग नीचा ॥ मत्त रे मत्त तूं भा-मिनी लंपटा, ॥ सेविला कां निघृतेचा ॥ २ ॥ दास्य तूं मत्प्रियेलागिं कां देशि रे, कोण कौटिल्य हें पापकूपा ॥ मत्पदा इच्छिशी दांभिका दंभ हा, टाकि तूं पूर्ण पापा ॥ ३ ॥ दूर हो दूर हो० ॥

रमण०—महाराज, मी तर सर्वस्वी अपराधी आहें.

मधु०—(महाराजांस एकीकडे) पाह्यलंत, ह्यानं आपण होऊन-च कसं सगळं मुकाट्यानं कबूल केलंन्!

रमण०—महाराज, पण आपण आतां जे हे माझ्यावर दोषारोप करीत आहां त्या सर्वांस मात्र मी पात्र नाहीं. पाहिजे तर मी आप-ल्या पायांची शपथ घेतों.

[इतक्यांत मदनसुंदर बाहेरून येतो.]

नरवा०—नीचा, माझ्या पायाची शपथ! खरंच, ती घ्यायला तूं कां ह्मणून आतां मागं पुढं पहाशील! ज्याच्या—मला ठार मारून माझा अधिकार बळकवावयाच्या खटपटी चालल्या आहेत, तो काय करील आणि काय करणार नाहीं!

रमण०—शिव! शिव!! काय हें कुभांड!

नरवा०—कुभांड! निर्लज्जा, सारं करून सवरून आतां वर आ-णखी त्या गांवचाच नाहींस असं दाखवूं पाहतोस? तेव्हां कोण तुझा अधमपणा हा!

रमण०—शिव! शिव!!

नरवाह०—दुर्बुद्धे, शिवनामाचा उच्चार करून तें पवित्र नांव उ-गीच दूषित करतोस!

मद०–(पुढें होऊन किंचित् विनम्रपणें) महाराज, आपण ह्मणतां इतका रमणक खचित अपराधी नाहीं. मला असं वाटतं कीं यांच्या-संबंधानं आपले कान कोणीं तरी खाचित भरले असले पाहिजेत !

नरवा०–(मदनसुंदरास) ह्मणजे, मूर्खा, तर मग मला तूं काय एक क्षुल्लक कानभरू समजतोस ? यावरून मला असं वाटतं कीं नीचा तुझंही याच्याशीं संगनमत आहे.

मद० सु०–(महाराजांचे पायांवर डोकें ठेवून) असं जर महा-राजांना वाटत असेल, तर मग उगीच उशीर नको; हें शीर महा-राजांच्या चरणारविंदीं अर्पण केलं आहे; याची वाटेल ती व्यवस्था लावायला महाराज समर्थ आहेत. खुशाल–खुशाल चालवावी समशेर. नको आतां मागं पुढं नको पहायला (उठून सविनय) महाराज, हा सर्व माझा अपराध आहे

मधु०–(घाबरून स्वगत) हा तर आपण होऊन सर्व कबूल करूं लागला ! आतां !

मदन०–यांत रमणकाची एक काडीइतकी देखील चूक नाहीं. माझ्या हयगयीमुळें छेः हयगय कसची–माझ्याच अपराधामुळें हा सगळा प्रकार घडून आला. तर याबद्दल जी काय शिक्षा होणं असेल ती मलाच होणं वाजवी आहे.

मधु०–(मदनसुंदरास हळूच थोडा ओढतो)

मदन०–(त्यास एकीकडे) शुः ! चप्, चप् रहा जरा.

रमण०–सुंदर तूंरे कां बाबा माझ्याकरितां आपले प्राण देऊं पा-हतोस ? हा पहा मी तयार आहें, वाटेल ती शिक्षा भोगायला. पण माझ्या हातून तर एका अपराधाशिवाय दुसरा अपराधच घडला नाहीं तर––

नरवा०–(दांत ओठ खाऊन) अरे अधमा, दुर्बुद्धे, करून सवरून वर आणखी ह्या मिथ्या भाषणानं नको उगीच पापाची जोड करूंस.

रमण०—महाराजांना असं वाटतं याला माझा नाइलाज आहे.

नरवाह०—अरे, काय मानभावीपणा हा! खरोखर, या तुझ्या बोलण्यांत कौटिल्य आणि कपट हीं अगदीं मूर्तिमंत तुडुंब भरून राहिलीं आहेत! अन् तीं दिसूं नयेत ह्मणून तुझी एकसारखी धडपड सुरू आहे. पण तुझ्या नीचपणासंबंधानं ज्याची प्रत्यक्ष पुरी खात्री होऊन चुकली आहे, त्याच्या हें लक्षांत आल्याशिवाय कधींच राहायचं नाहीं.

रमण०—(पायांवर पुन्हां मस्तक ठेवूं लागतो) महाराज,

नरवा०—(क्रोधानें त्यास झिडकारून व त्याचा स्पर्श न होईल असे एकीकडे सरून उभे राहून)

पद. चाल—सदर (झंपा)

निंद्य या केशपाशा नको दांभिका लोळवूं व्यर्थरे चरणिं माझ्या ॥ कोपवन्हि तुझ्या दर्शनें भडकला जाइली दग्ध ही सर्व काया ॥ १ ॥ दूर हो दूर हो० ॥ भ्रष्टरे भ्रष्ट त्वत्स्पर्शही दुष्य हा, आणिली निंद्यता यक्षवंशा ॥ अंधरे अंध उन्मत्त तूं दुष्कृती, ब्रह्म गोघ्न तूं घोर दंशा ॥ २ ॥ दास्य तूं मत्प्रियेलागि कां देशिरे ? कोण कौटिल्य हें पापकूपा ? ॥ मत्पदा वांछिशी दांभिका दंभ हा, छेदितों तत्वतां पूर्ण पापा ॥ ३ ॥ राक्षसीनें तुला मारिलें ज्या तिचा पूर्ण रे विरहहो विरह तुजला ॥ शाप घे शाप हा दुर्मती सर्वथा, दुष्ट हेतू तुझा स्पष्ट कळला ॥ ४ ॥ दूर हो दूर हो काळसर्पा० ॥

(पडदा पडतो.)

[शाप नामक द्वितीय अंक समाप्त.]

अंक ३ रा.

प्रवेश १ ला.

स्थलः—उद्यानाचे बाहेरील चौथरा.

प्रवेशः—चंपा व चतुरिका बोलत उभ्या आहेत.

चंपा—राणी साहेबांचं अन् बाई साहेबांचं हें नातं आज किती तरी उपयोगी पडलं पण !

चतु०—खरंच बाई, तूं ह्मणतेस तेंच खरं.

चंपा—गडे चतुरिके, तसं जर कांहीं नातं नसतं, तर महाराजांच्याकडून हा उश्शाप मिळून बाई साहेबांचा अन् रमणक महाराजांचा जो आज अगदीं साऱ्या जन्माचा वियोग होऊन बसला होता तो एक वर्षावर कधीं तरी आला असता का ?

चतु०—छेः हें नातं नसतं तर असं कधींच घडतंना ! संशयसुद्धां नको याच्याबद्दल ! कायगं पण चंपावती, राणी साहेबांनीं नरवाहन महाराजांच्याकडून हा असा उश्शाप देवविला तरी कसा ? कारण हें बघ, आज सकाळीं नरवाहन महाराज जेव्हां आपल्या इथं आले होते तेव्हां रागानं ते किती तरी लाल झाले होते पण ? त्या वेळचे ते लाल इंगळासारखे डोळे, अन् क्रोधानं फुरफुरलेले ते ओंठ, अजून जस्सेच्या तस्से दिसत आहेत माझ्या डोळ्यांपुढं ! अग बाई, त्यावेळीं ते किती तरी खवळून गेले होते. त्यावेळीं मला तर असं वाटलं कीं आतां हे आमच्या महाराजांना आपल्या डोळ्यांतल्याच ठिणग्यांनीं भस्म करून टाकतात कीं काय ? अन् ह्मणूनच मी ह्मणतें कीं असं असून राणी साहेबांनीं महाराजांचा हा इतका राग इतक्या लौकर शांत करून त्यांच्याकडून हा उश्शाप देवविला तरी कसा ?

चंपा—अग आपल्या बाईसाहेबांनीं राणीसाहेबांच्या जवळ आपलं सगळं स्वप्न, अन् त्यामुळं झालेला पुढचा सगळा प्रकार सांगून, ' उश्शाप न मिळाल्यास हाच माझा शेवटचा नमस्कार ' असं ह्मणून जेव्हां बाईसाहेब परत जाऊं लागल्या तेव्हां राणीसाहेबांनीं त्यांस थांबवून धरिलं आणि ' तुला उश्शाप देवविल्याशिवाय आज मी तोंडांत पाणीही घेणार नाहीं ' असं सांगून आश्वासन दिलं.

चतु०—अस्सं ! अन् मग ?

चंपा—मग नरवाहन महाराज जेव्हां वाड्यांत येऊन मंदिरांत आले तेव्हां राणी साहेबांनीं आपल्यास मोठं भयंकर दुःस्वप्न पड-ल्याचं सांगितलं. इन्दिरा बाईसाहेबांनीं राणीसाहेबांना जें आपलं स्वप्न सांगितलं होतं तेंच स्वप्न राणीसाहेबांनीं आपल्यास पडल्याचं नर-वाहन महाराजांस सांगून शेवटीं ' मी कांहीं केल्या ह्मणून आतां समाधीला जाऊं द्यायची नाहीं कीं इकडे सोडून एक घटकाभर दुसरी-कडे जायची नाहीं. ' असा हट्ट धरला. इतकं जाळं पसरल्यावर मग काय ? महाराज आपसूकच राणीसाहेबांच्या जाळ्यांत सांपडले. अन् त्यांनीं ' तुला सोडून कुठं जाणार नाहीं ' असं राणीसाहेबांना आ-श्वासन दिलं. त्यावरोबर राणीसाहेबांनीं तें स्वप्न आपल्यास पडलं नसून इन्दिरेस पडलं अन् त्यामुळंच पुढील सारा प्रकार घडून आला. यांत रमणक कांहीं सर्वस्वी अपराधी नाहीं. अतिशय प्रेमामुळं हें असं होणं साहजिक आहे तर आतां त्याला उश्शाप व्हावा असं सांगून रमणकाला शाप झाल्यामुळं रमणकाची आणि इन्दिरेची ताटातूट करा-यला आपण कारण होणं चांगलं नव्हे. तसं झालं असतां इन्दिरा जीव देण्याचा निर्धार करून बसली आहे. तर महाराजांनीं उश्शाप द्यावा, तुला उश्शाप देवविल्याशिवाय मीही पण अन्न घेणार नाहीं

कीं पाणी घेणार नाहीं ह्मणून मीही तिला वचन देऊन चुकलें आहें. असं ह्मणूत राणीसाहेब इन्दिराबाईसाहेबांची सगळी स्थिती डोळ्यापुढं आणून शोक करूं लागल्या ! तें महाराजांच्यान बघवेना. महाराजांनीं रमणकांच्या संबंधानं काय सांगितलं अन् काय नाहीं ! राणीसाहेब आपला आग्रह सोडीनात ! शेवटीं राणीसाहेबांच्या ह्मणण्याला कबूल होऊन महाराजांनीं रमणक महाराजांना उश्शाप दिला !

चतु०—हंः तर नशीबच अनुकूळ ह्मणायचं तर बाई, बाईसाहेबांना यावेळीं !

चंपा—हो नशीबच अनुकूल ह्मणायचं तर काय ? चल पण बाई घरीं जाऊं आपण लौकर; आज सूर्यास्ताच्या आंत महाराजांनीं अलकनंदा पार होऊन गेलं पाहिजे. अशी महाराजांची निक्षून आज्ञा आहे. (मदनसुंदर येतांना पाहून) अगबाई, हा कोण येतो आहे ?

चतु०—अग हा मदनसुंदर.

चंपा—उश्शाप द्यायला हासुद्धां थोडा कारणीभूत झाला. महाराजांना साफ सांगितलंन् यानं येऊन कीं, यांत रमणकाचा कांहीं एक अपराध नाहीं ! सर्वस्वी माझा अपराध आहे, तर मलाच काय ती शिक्षा व्हावी ह्मणून.

चतु०—खरंच कां हें ? खरंच बाई, असं कोण नाहीं तर आपण होऊन हा माझा अपराध, मलाच याबद्दल शिक्षा करा, ह्मणून ह्मणायला तयार होणार ? फार विरळाच हो अशीं माणसं !

चंपा—चल बाई, जाऊं तर, आपल्याला उशीर होईल नाहीं तर.

[जातात.]

(प्रवेश १ ला समाप्त.)

———

प्रवेश २ रा.

स्थळः—(रमणकाचें मंदिर.)

प्रवेश—(रमणक व इन्दिरा झोंपाळ्यावर बसलीं आहेत.)

इन्दिरा—अग बाई, हें काय केलं पण बसल्या बसल्या !

रमणक—काय ह्मणजे ?—

पद. (चाल–फुलें वेलीचीं.)

प्रिये वेणीची ॥ काढिली माळ मी साची ॥ ध्रु० ॥ गुंफिन पुनरपि कबरीवरती ॥ स्वकरें येतां मी शापांतीं ॥ तोंवरि दूराचि असुंदे सुदती ॥ सखे आवडीची ॥ माळ ही तुझ्या प्रीतीची ॥ १ ॥ प्रिये०॥

इन्दि०—खुद्द इकडच्या हातानं गुंफून माझ्या वेणीवर घातलेली ही माळ मी नाहीं बाई आपल्या डोळ्यांसमोरून एक घटकाभर देखील दूर करायची.

रमण०—मी तरी तेंच म्हणतों, इतके दिवस ही तुझ्या केशपाशीं असल्यामुळें वास्तविक पाहतां ती तुझ्या डोळ्यांच्या आडच होती ! तर आतां ही नेहमीं आपल्या डोळ्यांपुढं ठेव माझ्या प्रेमाची खूण म्हणून.

इन्दि०—हें काय बाई पण, ही काढली कां अगोदर ?

रमणक—कां म्हणजे? मी अलका सोडून गेलों म्हणजे इतर भूषणांबरोबर तूं तिला टाकूं नयेस म्हणून.

इन्दि०—(संशयानें) म्हणजे ? मला नाहीं वाटतं न्यायचं तर बरोबर ? मी नाहीं बाई राह्यची इथं एकटी. (विनम्र होऊन)—

पद. (चाल–केरवा. स्वीकारी या दासीस०)

न्यावी निजदयितेस, प्रियाहो ॥ विरह भिववितो जीस

॥ ध्रु० ॥ प्रिय विरहानल दग्ध करिल मज ॥ ठेवील न तो खास॥ नको प्राण, हे होतिल जड मग ॥ साहुं कशी विरहास ॥ प्रिया हो ॥

रम०–प्रिये, किती तरी तूं वेडी! राहून राहून तुला हा असा मोह पडतो याला काय करावं? राणीसाहेबांच्याकडून महाराजांचं मन वळवून त्यांच्याकडून वचन घेऊन तूंचना मला उश्शाप देवविलास कीं,–

साकी.

'तव कांतेचा विरह घडो तरि पूर्ण द्वादश मास ॥
उश्शापाचि हा ऐसा असतां विसरशि कैसें त्यास ॥
वदशी मोहभरें ॥ सर्वचि परि हें व्यर्थ ठरे ॥ १ ॥

अन् तुझा माझा वियोग हा तर आतां झालाच पाहिजे! त्याशिवाय आतां गत्यंतर म्हणून नाहीं! पण त्यांतल्या त्यांत आपलं हें—

इन्दि०–(शेवटचे शब्द न ऐकतां) अग बाई, हें मात्र नव्हतं माझ्या नीटसं लक्षांत आलं! मला वाटलं कीं, ही अलकापुरी सोडून एक वर्षभर बाहेर कुठं तरी दोघांनींही राह्यचं, झालं! अन् म्हणूनच मीही पण इतका वेळपर्यंत त्यांतल्या त्यांत थोडी खुशालींतच होतें.

पद. (चाल–नृपममता रामावरती)

नाहींच मनीं हें आलें ॥ परि आतां पूर्णची ठसलें ॥ प्रियकरा ॥ सीतेपरि वनिंही गेलें ॥ कइक मास विपिनीं क्रमिले ॥ स्वप्निं मी ॥ याच करां धरुनी फिरलें॥ आनंदें उठलें बसलें ॥ स्वप्निं मी ॥

(रमणकाचे पाय हातीं घेऊन)

॥ चाल ॥ कितिकदां ॥ मान्य संपदा ॥ घेउनी पदां ॥ चुरित मी बसलें ॥ परि सर्व व्यर्थचि ठरलें ॥ स्वप्निं मी ॥ १ ॥

रम०—प्रिये, तूं ह्मणत आहेस असं जर होतं तर मग आणखी काय पाहिजे होतं मला?

पद. (चाल—ओळखिलें हो मज जें वदवी)

अलकापुरि ही कानन कल्पुनी ॥ शापहि मग तो वर समजोनी ॥ गेलों असतों निबिड काननीं ॥ तुजसह आनंदें ॥ १ ॥

अन् अशा रीतीनं वनांत जाऊन, या अलकेला ओसाड व निर्जन प्रदेश समजून तुझ्या सहवासांत वाटेल तिथं अन् वाटेल तशी कालक्रमणा केली असती. पण इतकं कुठं आहे माझ्या नशिबीं ! आपला वियोग होणार या कल्पनेनंच सध्यां तुझी काय स्थिति होऊन गेली आहे पहा.

पद. (आतां शशिमुखिच्या० राग धमार)

सुदृशी ॥ विरहभयें पुलकित तव तनु सुंदरा ॥ ध्रु० ॥ दृष्टि विलोल, प्रिये, किति तरि ही मृगिपरि घाबरि ऐशी ॥ विरहवन्हि तुज विदग्ध करितां होइल स्थिति परि कैशी ! ॥ १ ॥ सुदृशी ॥

(घर्म पुसावयास लागतो, इतक्यांत मदनसुंदर आंत डोकावतो व लागलाच मागें सरतो.)

इन्दि०—अग बाई, हें कोण आलं?

रम०—हं, हा तर मदनसुंदर! गेलाच पण तो! छे, ही तुझी अशी स्थिति पाहून, अशानं मला मोह मात्र अधिकाधिक उत्पन्न होतो. तर येतों मी आतां (तिच्यापासून आपल्यास सोडवूं पहातो. ती उलट त्यास घट्ट मिठी मारते.) छेः, डोळ्यांतून हे असे अश्रु मात्र नको काढूंस! (तिला मोठमोठे हुंदके येतात.) छेः मला आतांपासूनच दिसतंय सगळं पुढचं! पण हें कांहीं चांगलं चिन्ह नव्हे!

एकूण मी परत येईपर्यंत तूं हें असंच व्रत चालविणार तर? (तिचे डोळे पुसून) प्रिये, सोड, सोड हा शोक.

इन्दि०-(स्फुंदत) त्या मेल्या स्वप्नानं पुरा पुरा दाखविला न् बाई दाखला! मी भीतच होतें पहिल्यापासून! अन् तीच माझी भीति शेवटीं खरी झाली तर मग.

रम०—वेडी नाहीं तर! आतां ' तर ' नाहीं अन् ' मग ' नाहीं. सूर्यास्त व्हावयाच्या आंत मला ही अलका सोडून अलकानंदा पार होऊन गेलं पाहिजे. नाहींतर महाराजांच्या अधिक रोषाला मात्र मी पात्र होईन.

इन्दि०-(हुंदके देऊन) खरंच, तेंही खरंच बाई.

रम०-छेः पण हें असं किती वेळ चालायचं आतां? (इन्दिरेची मान वर करून तोंडावरून हात फिरवून) येऊं तर आतां! जपून अन् फार सावधगिरीनं ऐस. तुझ्या करमणुकीला ही कमला अन् हा मुचकुंद आहेच. (मदनसुंदर पुनः डोकावतो, त्याबरोबर रमणक इंदिरेच्या आलिंगनांतून सोडवून घेऊन) मी जरी तुला सोडून जात आहें, तरी माझं हृदय आणि माझे प्राण सदोदित तुझ्या भोंवतीं घिरट्या घालीत रहाणार. (चुंबन घेऊन) येऊं तर? नाहीं सोडवत नाहीं हें; पण नको, असले विचार सुद्धां नकोत आतां मनांत! तो पहा सुंदर आला! अन् सूर्यास्तही पण बहुतेक होत आला आहे. गंगा पार होतों तों स्वच्छ चांदणं पडणार.! नाहीं पण जास्त मोहांत गुंतून रहाण्याची ही वेळ नव्हे. (इतक्यांत दासी येतात) (इंदिरेची हनुवटी धरून) येतों, येतोंच तर आतां. (तिचे अश्रु शेल्याचे पदरानें पुसून) नको आतां हें. निदान या वेळीं तरी नको! अशानं खचित तूं आपल्या जिवाला मात्र व्यर्थ त्रास करून घेणार. (चतुरिका एकदम आंत येते.)

चतु०—(रमणकास) सुंदर ह्मणताहेत कीं, अलकानंदा पार व्हायला सूर्यास्त होऊन जाईल म्हणून—

रम०(आपणास सोडवून घेऊन मग) येतों तर आतां! (कुसुममाळ पाहून) या माळेला मात्र विसरूं नकोस! ही माझी प्रेमाची खूण म्हणून सदोदित डोळ्यांपुढें ठेव. येतोंच तर! (तो मोठ्या कष्टानें तिची मिठी सोडवतो, व ती मोठ्यानें उसासा टाकते.) (मंदिराबाहेर येऊन)

पद. (राग माळकंस. त्रिताल, चाल—तेचि पुरुष दैवाचे)

मूर्तिमंत भो प्रणया ॥ मजवरि करि तूं सुदया ॥ ध्रु० ॥
त्वदीय हस्तीं निज कांतेतें॥ अर्पुनि जातों करि अवनातें॥
विरहवन्हिच्या पासुनि सखितें ॥ रक्षि रक्षि पितया॥१॥

[जातो.

प्रवेश ३ रा.

[इन्दिरा मंदिराच्या दरवाज्यांत उभी राहून ती आपलीं भूषणें त्रासानें दूर करीत असून तिच्या नेत्रांतून एकसारखे अश्रूंचे प्रवाह चालले आहेत, दासी तिच्याजवळ दुःखानें पीडित होऊन हुंदके देत आहेत]

(रमणक व मदनसुंदर येतात.)

रमणक—सुंदर, सुंदर, तुझे माझ्यावर फार फार उपकार आहेत.

मदन०—(दुःख होत आहे असें दाखवून) हंः 'उपकार' उपकार तर नाहींतच; पण उलट अपकार मात्र झाला आहे माझ्या कडून आपल्याला.

रम०—छत्, हें असं मात्र नको म्हणूस. अरे, तूं अगदीं बेशुद्ध

होऊनच पडलास त्याला तूं तरी काय करणार ? तरी पण आज महाराजांच्याकडे मध्यस्थी करून पूर्ण विरहाचं एक वर्षावर आणून ठेवायला अंशतः तूंच कारण झालास, अन् माझ्या अपराधाबद्दल महाराजांच्या पुढं आपलं शिरकमळही समर्पण करायला तयार झालास ह्याबद्दल मी किती किती म्हणून तुझे उपकार मानूं?

मद०—छेः, यांत कसले आले आहेत उपकार ? मला माझं जें कर्तव्य वाटलं तें मीं केलं, अन् जी गोष्ट खरी खरी होती तीच मीं महाराजांच्याजवळ सांगितली; पण नरवाहनमहाराज जे इतके खवळून गेले ते कां, तें कांहीं नीटसं समजत नाहीं मला. पण नको. तें आतां समजून तरी काय करायचं आहे ? तो विचारच नको आतां मुळीं. यापुढं मला जर इथं रहायचंच नाहीं, तर मग आपल्याला या गोष्टीचा विचार तरी कशाला पाहिजे ?

रम०—म्हणजे—याचा अर्थ काय ?

मद०—याचा अर्थ ? याचा अर्थ एवढाच कीं, अतःपर आपल्याला या बेबंद अलकापुरींत राह्यचं नाहीं.

रम०—तर जाणार कुठं तूं ?

मद०—कुठं म्हणजे ? आपल्याबरोबर. उघडच आहे हें ! दुसरं तिसरं कुठं जायचं मला !

रम०—छेः, हें पहा सुंदर, एवढं मात्र करूं नकोस. मी तर तुझ्यावर इथली सारी व्यवस्था सोंपविणार होतों. अरे, तूं इथं असलास म्हणजे मला नको मग इकडची काळजी करायला.

मद०—मला नाहीं इथली इतकी काळजी वाटत; पण राहून राहून हेंच मनांत येतं कीं, अलका सोडून गेल्यावर आपलं कसं होईल! असं मनांत येऊं लागलं म्हण जे असं वाटतं कीं कांहीं बोलू नये. अन् चालूं नये. मुकाट्यानं उठावं अन् आपल्याबरोबर चालूं लागावं,

अन् मी येणार आहें म्हणून जें ह्मणतों तें तरी एवढ्याचकरितां.

रम०–झालं, तूंच असं म्हटलंस म्हणजे झालं. आटपलं. सारंच आटपलं. मला जी कांहीं थोडीबहुत आशा होती ती तुझीच. अन् तूं जर—

मद०–असं म्हटल्यावर मात्र माझा नाइलाज आहे!

रम०–छेः, एरवीं नाहींस तूं ऐकायचा! हें पहा सुंदर, तुला माझ्या गळ्याची शपथ आहे. तूं इथं राहिलंच पाहिजेस.

मद०–त्सुः, ही शपथ काय म्हणून आणखी? अशानं मात्र माझा अगदींच नाइलाज करून टाकतां. (सचिंत झालासें दाखवितो)

रम०–कां? आतां कां उगीच अनमान! माझ्याकरितां तुला इथं राहिलं पाहिजेच. (मदनसुंदर कांहीं वेळ साचिंत व मुखस्तंभ होतो) कां विचार कसला चालला आहे अजून? बोल, बोल काय आहे तुझ्या मनांत? मीं जगावं का?

मद०–बस्स पुरे! अशा वेळीं कांहीं अभद्र शब्द—

रम०–नाहीं काढीत. तर तुला इथं राहिलं पाहिजे.

मद०–(नक्राश्रु गाळून स्फुंदत) इतकं निक्षून सांगितल्यावर माझा नाइलाज आहे! पण—

रम०–पण काय? अरे, मी आपला प्राण तुझ्या हवालीं करून जात असतां तूं इतके आढेवेढे घेतोस तेव्हां तुला काय म्हणावं?

मद०–महाराज, मी आपल्या आज्ञेबाहेर एक कार्डाभर देखील जायचा नाहीं! मग तर झालंना? हा पहा आपल्या आज्ञबरहुकम वागायला मी अगदीं एका पायावर तयार आहें.

रम०–हं, आतां कसं बोललास? मी परत येईतोंपर्यंत तुला इथली सारी व्यवस्था पाहिली पाहिजे? अथवा तूं इथून हालूंच नकोस कसा! म्हणजे तेंच ठीक होईल, समजलं?

मद०—(हुंदके देतो) पण—

रम०—हं, पण नको अन् बीण नको. छत, पण तूं हें अगोदर आपलं रडं आवर पाहूं. इथून जातांना मला हा असा अपशकून कां बरं करतोस उगीच? अरे, पुढच्या कार्तिकी एकादशीला मी इथं आ-हेंच ठेवलेला! येऊं तर? मात्र जपून ऐस आं? हं हें मात्र विसरूं नको. अगदीं टाक, टाक गट्ट करून.

मद०—(रडें आंवरून) नाहीं मी नाहीं रडत आतां. पण आप-ल्या प्रकृतीला मात्र—

रम०—हें पहा सुंदर, तूं पुरुषासारखा पुरुष असून जर असं करूं लागलास तर मग तिनं रे काय करावंन्? ती पहा आंतल्या बाजूला कशी अगदीं खिन्न वदन करून—खिन्न वदन कसचं हें—अरे-रे-रे! हिच्या डोळ्यांतून तर हे अश्रुप्रवाह चालले आहेत. छेः, आतां इथं असं गुंतून रहाण्यांत नाहीं अर्थ! अशानं दुःखाला मात्र जास्त ऊत यायचा. इतकंच. (हुंदका आलेला गट्ट करून) बरं, जपून असा. मीं सांगितल्याप्रमाणं रहा. येतों तर मी आतां. (त्याची व इंदिरेची दृष्टादृष्ट होते. दोघे जाऊं लागतात.) छेः, सुंदर, तूं कशाला येतोस?

मद०—नाहीं, गंगेपर्यंत येतों मी. पुढं नाहीं येत. तिथूनच परततों, मग तर झालं कीं नाहीं?

रम०—बरं तर, चल, जशी तुझी मर्जी.

[जातो.]

मद०—(पडद्याचे बाहेर येऊन) या स्वारीला तर लावलंच बहु-तेक वाटेला. याची बाजू घेऊन नरवाहन महाराजांच्यापुढं एक दोन शब्द टाकले. अन् हा सर्व अपराध माझा आहे ह्मणून सांगून म-हाराजांच्या पुढं मीं आपलं शिरकमळ अर्पण केलं त्यायोगानं माझ्या या कपट नाटकाला किती गोड रंग भरला? एकदां शाप झाल्यावर

शब्द टाकले. अन् सर्व अपराध माझा आहे ह्मणून सांगून महाराजांच्या पुढं मीं आपलं शिरकमल अर्पण केलं त्या योगानं माझ्या या कपटनाटकाला किती गोड रंग भरला! एकदां शाप झाल्यावर पुन्हां महाराजांकडे जाऊन उःशापासंबंधानं कुठं सहज एक दोन शब्द टाकले, अन् ते त्या चंपेच्या देखत. पण तेवढ्यानं काम किती झालं! मालकानं आपण होऊन आपल्या जामदारखान्याची किल्ली प्रत्यक्ष चोराच्या हातीं दिल्याचं आजपर्यंत कोणीं कधीं ऐकलं अथवा पाहिलं आहेका? पण रमणकानं आज आपल्या छातीनं तें अगदीं स्पष्ट दाखविलं आहेन्. हा बैलोबा माझ्या नक्राश्रूला भुरळून जाऊन आपल्या रत्नभांडागाराची किल्ली बेधडक माझ्या स्वाधीन करतो, तेव्हां याला काय ह्मणावं! असल्या सुंदर रत्नकोशाची किल्ली हातीं आल्यावर जो अभागी डल्ला मारायला कांकू करील तो कपाळकरंटा नव्हे तर कोण? हंः (कांहीं वेळ विचार करून) जा बरं, रमणका खुशाल जा. पुनः हवा तर इकडे ये अथवा येऊंहि नकोस! आलासच तर मग पुढं पाहतां येईल कसं काय करायचं तें! नच आलास तर सगळ्यांत उत्तम, मग कांहीं भानगडच उरली नाहीं! (पुनः विचार करून) तूं आपल्या या प्राणाला-या इन्दिरेला—यमसदन सुंदराच्या हवालीं करून जातो आहेस! जा त्या मनमोहिनीबद्दल तूं आतां एक काडीभर देखील नको काळजी करूंस समजलास? तिला आतां हा मदन सुंदर आपल्या प्राणांहूनहि जास्त जपणार? ‘ रमणक आणि इन्दिरा ’ या जोड नांवापेक्षां ‘ मदनसुंदर आणि इन्दिरा हेंच ’ नांव गोड दिसतं नाहीं.? मग आतां उशीर कां? (विचार करून) छत् पण हें असं नाहीं उपयोगी! पहिल्यांदां या सुंदरीची थोडी चांचणी पाहिल्याशिवाय एकदम अशा साहसाला प्रवृत्त होणं ह्मणजे याच्या सारखा दुसरा मूर्खपणा नाहीं. तर पहिल्यानं हिची चांचणी पाहून

मगच काय तें करावं. अन् या कामाला मधुकरासारखं सुरेख पात्र आपल्या हातीं असल्यावर आणखी अधिक तें काय पाहिजे आपल्याला? तिला पहिल्यापासून अगोदर ही स्वारी हुरळून गेलीच आहे! अन् आतां काय? आतां तर रमणकच इथून गेला आहे. आतां हे वेडे पीर निव्वळ नाचणार आणि उड्या मारणार! या मूर्ख शिरोमणीला चांगलाच नाचिवला पाहिजे! नाच ह्मणावं! नाच, हास, खिदळ फीर, बागड, उड्यामार, काय वाटेल त कर! सगळं लांबून! (विचारयुक्त हो. पण आतां अगोदर ह्या रमणकाला एकदां वाटेला लावलं पाहिजे. अन् याला वाटेला लावल्यावर मग त्या खुळोबाला जाऊन गांठलं पाहिजे. चलाच तर.

साकी.

वरकांती हें प्रेमप्रदर्शन, नक्राश्रू त्या वरती ॥ मधुरवच, तसें आत्मार्पण हें विश्वासास्पद करिती ॥ जगतीं मनुजातें ?
कपटें सर्व सुसाध्याचि तें ॥१॥

(वियोग नामक तिसरा अंक समाप्त.)

अंक ४ था.

प्रवेश १ ला

स्थळ--क्रीडोद्यानाबाहेरील प्रदेश.

प्रवेश—(मदनसुंदर प्रवेश करून)

मदनसुंदर-रमणकाला इथून हुसकून लावल्याला चार पांच महिने झाले; परंतु अजून देखील ही मैना आपल्या हातीं लवकर लागेल असा कांहीं रंग दिसत नाहीं! तर आतां याला करावी तरी काय तोड?

(सुचलेंसें करून) हं:, याला तोड हीच, या वेडेपिराकडून—(इतक्यांत मधुकर आलासें पाहून) पण हे वेडे पीर आले कीं, इकडेच आले गुंगत. (इतक्यांत आपल्याशीं कांहीं गुंगत आहे असा मधुकर प्रवेश करतो.)

मधुकर–

॥पद॥

मधुकर हृदयीं मधुकरि भरलीं ॥ रति सम सुंदरी मन्मनिं शिरली ॥ ध्रु ॥ पाणि सखीचा घ्याया मत्करीं ॥ धडपडतो परि प्राप्त नव्हे तरी ॥ फसवाया मज चेटकी सजली ॥१॥

मद०–काय, आपल्या आपल्याशीं काय गुंगतां आहां ?

मधु०–आतां आपल्या आपल्याशींच गुंगायचं. खरंच, ती सुंदरी साध्य होण्याची मला अजून तरी नाहीं बोवा कांहीं आशा दिसत.

मद०–छे:, वेडा नाहीं तर; इतक्यांतच अन् असा धीर सोडण्यांत काय अर्थ आहे ? हें पहा, आज मला एक नवीन युक्ति सुचली आहे.

मधु०–कोणती, कोणती वरं ती ?

मद०–हें पहा, तूं असं कर कीं, तिला एक प्रणय-पत्र पाठीव, म्हणजे तिच्या मनांत काय आहे अन् काय नाहीं तें सगळं स्पष्ट कळेल, आणि हें एकदां स्पष्ट कळलं म्हणजे मग तिच्या नादीं लागण्यांत कांहीं अर्थ आहे कां नाहीं हें तरी समजेल.

मधु०–हें कसं बोवा ?

मद०–अरे, कसं म्हणून काय विचारतोस ?

मधु–नाहीं विचारीत बोवा. (हासून) हं, तूं ह्मणतोस तें सगळं आलं माझ्या लक्षांत आतां.

मद०–लिही तर मग पत्र.

मधु०-(भूर्जपत्र घेऊन) पण कायरे सुंदर, पत्रांत लिहायचं तरी काय काय?

मद०-लिहायचं काय? अरे, काय लिहायचं म्हणून काय विचारतोस? वेडा नाहीं तर, अरे, दुसरं काय लिहायचं? तिच्यावर तुझं मन आसक्त झालं आहे हें एवढंच तिला कळवायचं अन् दुसरं काय? लिही तर.

मधु०-(आठवण करतोसें दाखवून) काय बोवा कांहीं सुचत नाहीं. आरंभ कसा करावा हीच पहिल्यांदां मोठी पंचाईत पडली आहे.

मद०-अरे, त्यांत कसली घेऊन बसलास इतकी पंचाईत?

मधु०-तर सांगा, आपणच सांगा पाहूं कसा आरंभ करूं तें.

मद०-लिही—" प्रिये इंदिरे, "

मधु०-कायरे, अशा अगदीं एकेरी नांवानं तूं मला लिहायला सांगतोस, मग अशानं ती मला वश कशी बरं होईल?

मद०-वेडा माणूस नाहीं तर! अरे, मग तिला तूं कां " इंदिरा बाई " " इंदिरा वहिनी, " ह्मणून लिहिणार कीं काय?

मधु०-तसं नव्हेरे-पण सूं असं पहा, एखाद्या परक्या स्त्रीच्या मनांतून आपल्याविषयीं प्रेम आहे कीं नाहीं हें आपल्याला ठाऊक नसतां आपण एकदम इतका उघळपणा करणं कसं बरं योग्य होईल? अन् त्यांतून मी तिला आवडेन कीं नाहीं हें तरी कुणाला ठाऊक?

मद०-छत्, याजबद्दल तर शंकाच नको. कारण, रूपानं ह्मणाल तर रमणकापेक्षां तुह्मी कांहीं कमी आहां असं नाहीं. आतां अधिकार ह्मणाल तर तोही कांहीं कमी नाहीं. कारण, रमणक गेल्यापासून त्याचा अधिकार महाराजांनीं आपल्यावरच सोंपविला आहे.

मधु०—(मिशांला पीळ देत) खरंच, तूं ह्मणतोस असंच आहे. तर मग मी तिच्या मनांत उतरेन कीं नाहीं याची शंका नकोच ध्यायला?

मद०—(आपल्याशीं) मूर्खा! तूं तिच्या मनांत तर नाहींच उतरायचास, पण मनांतून मात्र उतरशील. (उघडपणें) नकोच नको. याबद्दल मुळींच शंका नको.

मधु०—(भूर्जपत्र घेऊनें) बरं तर, बोला पाहूं; कसा करूं आरंभः—

मद०—"प्रिये इंदिरे,"

मधु०—तर मग असं एकेरीच लिहूं ह्मणतोस?

मद०—अरे दुसऱ्यावरलं आपलं प्रेम दाखवायचं ह्मटलं ह्मणजे हा एकेरीचाच प्रकार योग्य, सरळ आणि प्रेमळ.

मधु०—असं ह्मणतोस तर मग हें नुसतं 'प्रिये इंदिरे' च कां बरं लिहावं? मला वाटतं 'मत्प्राणसंजीवनी प्रियकरे' असं लिहून आरंभ करावा. कारण हें पहा—ती माझ्या प्राणाची संजीवनी तर आहेच. मग यांत सत्यापलाप केल्याचाहि दोष यायचा नाहीं. अन् तिचा तर गौरव केलासा होईल. कां मी ह्मणतों असंच कीं नाहीं?

मद०—हो हो असंच. पण पुढं काय काय लिहिणार आपण?

मधु०—पुढं (बोटं घालून) 'इंदिरे' छेः नुसतं इंदिरे ह्मणून नाहीं उपभोगी. (विचार करून) हं, हें पहा असं लिहूं.

॥पद॥

सुंदरे, कनकखंजिरे, हृदयमंदिरे, सगुणगंभिरे, मत्प्राणेश्वरी इंदिरे ॥ देवास, प्रिय दासास, हीच मज आस, प्रिये तव पायीं ॥ प्रिये तव पायीं। दास हा धावुनी येई ॥ध्रु॥

शोभने, मनमोहने, मंजुस्मितवदने, कुंजरगमेन, कुरंग-
नयने ॥ चाल ॥ निःशंकोनी, घे लुटुनी, तव चरणीं, मधुकर
फुलला, डुलला, खुलला, चळला, तव रूपीं भुलला, हरला,
मग बावरला ॥२ ॥

मद०—इतकं प्रीतीनं थवथवलेलं हें पत्र तिच्या हातांत पडलं ह्मणजे ती निम्मीशिम्मी तुझ्या हातीं लागली ह्मणून समज.

मधु०—बरं पण आतां हें पत्र तिच्या हातीं कसं बरं पडावं?

मद०—त्याची नकोरे तुला पंचाईत. ती सारी व्यवस्था लागली माझ्याकडे. मग तर झालं कीं नाहीं?

मधु०—तें खरंरे, पण हें तूं तिच्या हातांत पडायला काय युक्ति करणार?

मद०—अरे युक्ति अगोदर कां ठरवून ठेवावी लागते? वेळ पडेल तशी युक्ति! चल. या वेळेला ती आपल्या बागेंत गेली असेल. तर साधल्यास तिथंच तिच्या हातांत हें पत्र पडेल असं करूं. चल पल.

(दोघेहि जातात.)

प्रवेश ३ रा.

स्थल–क्रीडोद्यान.

प्रवेशः—(इंदिरा, चंपा, व चतुरिका बागेंत फिरत आहेत आणि मधुकर व मदनसुंदर तेथेंच एका कुंजांत उभे आहेत.)

इंदिराः—घरीं बसून राहिलं तर तिथंहि करमत नाहीं. अंमळ बागेंत यावं ह्मटलं तर इथं आल्यावर मागची एकेक आठवण होऊन

ती दुःखाला मात्र कारण होते. हें पाहिलंस कां चंपे, प्रियवल्लभ जवळ नाहीं असं पाहून?—

पद. (मी तप्त जरी या चालीवर.)

एकलिअशि बघुनि मदन मजसि छळित हा ॥ कुसुमचाप मदन बाण टाकितो पहा ॥ ध्रु०॥
मधु, वसंत, मार, सुहृद साह्य यास हा ॥ गति न बरी दिसत आज करील ठार हा ॥ १ ॥

खरंच, मला हा एकदां ठार मारून टाकील तर बरं! इथं आलं कीं, ज्या ज्या गोष्टी पाहून मला सुख आणि आनंद होत असे त्याच गोष्टी पाहून आतां माझी कांहीं चमत्कारिकच स्थिति होते, पूर्वीं सारखंच आतांहिः—

पद (पुष्पराग सुगंधित या चालीवर)

वृक्षतरूवर पुष्पित पाहुनि मधुगंधभरें पळताती हे ॥ मधुपयूथ किति हर्षभरानें दंगुनि गुंजति मंजहे ॥ ध्रु० ॥ रजतकुंद किति मुकुलित परिगे विषकुंतचि भासति हे ॥ रेणु-पुंजयुत सकल कुंजवर उठविति अंतरिं दाह हे ॥ मधुकंठि पिक नव पंचमरव करूनि हरूनि टाकिति हे ॥ विकल करिति हे, सकलहि कलरव श्रुति-पुटि कंटक खास हे ॥१॥

चंपाः—बाईसाहेब, किती तरी जिवाला त्रास करून घ्यायचा हा?

चतुः——होय मी तरी तेंच ह्मणते. त्या कोकिळेच्याकडं लक्षच देऊं नये मुळीं, ह्मणजे नाहीं इतका त्रास व्हावयाचा;

इंदिराः——अग तुह्मी सांगतां तें सगळं खरं, पण जी जी वस्तु मी

पाहते ती ती पाहून मला असंय होतं. मी तरी बाई काय करूं. प्राणनाथांनीं मला आपलं इतकं वेडच लाविलं होतं.

चंपा:—झाली पुनः झाली आठवणीला सुरवात!

इंदिरा:—(उद्यानांतील तरू व लता यांस पाहून) हें पाहिलंतकां सख्यांनो, अगं--

पद (आजवरि नृपति, या चालिवर)

मार्कंदिं मल्लिका चढती ॥ आलिंगूनि दंगाति अंतीं ॥ युवां या ॥ पूगांस तांबुली धरिती ॥ सप्रेमें चुंबन करिती ॥
उलट या मंदारिं कुंदि त्या रमती ॥ मदमत्त माधविस हंसती
जणु पहा ॥ चाल ॥ सुंदर जोडपि रमती येथें ॥ संगमोत्सुका द्राक्षिही पहा काशि धरिते ॥ निर्जीव काष्ठ परि यातें ॥
सरसावुनि मंजिरि-करते ॥ चाल ॥ मधुमास मदन हे येति ॥ प्रियवल्लभ-स्मृति मज देति ॥ १ ॥

मधुकर०—(एकीकडे) आणि ह्मणूनच मी तरी ह्मणतों कीं:—
हधुकरीं इंदिरा चढते ॥ तरि तुझें सत्य वच ठरतें ॥ सुंदरी ॥

मद०—(मधुकरास) काय वेडा आहेसरे तरी तूं! अन् हें तिला ऐकायला गेलं ह्मणजे ? ह्मणजे सध्यां इथंच आपली चांगली शोभा व्हावयाची.

मधु०—पण मीं ह्मटलं, हें खरं कीं खोटं?

मद०—याचं उत्तर तुला आतां नाहीं देत. तें तुझं पत्र त्या—रमणक नेहेमीं बसत असे त्या स्फटिकशीलेवर ठेवून दिलं आहे. ही पहा आलीच, आलीच तिथपर्यंत ती! आतां पाहूं कशी काय गम्मत उडते ती ?

(इंदिरा दासीसह शिलातळाजवळ जाते.)

इंदिराः—त्याचप्रमाणें तें पाहिलंस कीं शिळासन! गडे चंपे, रोज संध्याकाळीं इथं ह्यावर बसून आमचा किती तरी आनंदानं वेळ जात होताः—(दुःखानें) अन् आतां! हें बघ मी बसतें तिथं एक क्षणभर जाऊन, अन् पाहतें इथं तरी अंमळ माझ्या जिवाला बरं वाटतं कां. प्रियाच्या स्पर्शानं हें पुनीत झालं आहे; जा, तोंपर्यंत तुह्मी त्या माधवीचीं चार फुलं तोडून आणा. (दासी जातात).

मधुः—(मदनसुंदरास) अरे मला पाहूंदे रे! तूं आपलं हें डोकं जरा माग कर. हं सुंदर, गेली. (टाळी वाजवून) हेंच पाहिजे होतं मला. (इंदिरेस उद्देशून) उचल, आतां तें तेवढं पत्र उचल!

इंः–(पत्रिका पाहून स्वतःशीं) तिकडून तर ही पत्रिका पाठिवणं झालं नसेल! पण हा मधुकर कां याच्यावर बसला आहे. ? (त्यास वारते व पत्र उचलते).

मधुः—हं सुंदर, तिनें पत्र उचललं रे उचललं! हंसली. गालांतल्या गालांत हंसली!

मदः—पहा तिनं तें पत्र आपल्या ओच्यांत टाकलंन!

इंः—(पत्रिकेवरून निवारण केलेल्या भ्रमरास उद्देशून)

पद. (माडिवरी–या चालीवर)

भाग्यवान तूंच आज खचित मधुकरा ॥ काय पुण्य–उदय होत धन्य इंदिरा ॥धृ॥ मानिन ही पुण्य–शिला पावली खरी ॥ त्वद्दर्शन नित्य घडो हेंचि अंतरीं ॥ विरहदाह सह्य होय तरिच मज जरा ॥ १ ॥ भाग्य० ॥

मधुः—अरे ओळखलंनरे ओळखलंन. तिनं माझं अक्षर ओळखलंन. तिनं मला भाग्यवान देखील ह्मटलंन. आणखी रोज संध्याकाळीं इथं यायचं आमंत्रणहि पण दिलंन.

मदः—(आपल्याशीं) ती त्या पत्रावर बसलेल्या भुंग्याला हें

ह्मणते आहे; आणि हा मूर्ख तें सर्व आपल्यालाच उद्देशून आहे असें समजतो. (उघड) खरंच तिनं तुझं अक्षर ओळखलंन तर मग एकून अं!

मधुः—ह्मणजे—कां नाहीं ओळखणार ती?

मदः—तुझं अक्षर तिच्या नजरेला पडण्याचं कारण?

मधुः--कारण? अरे माझ्या प्रियेकडून.

मदः--ह्मणजे मालती वहिनीकडून कीं काय?

मधु—हो हो तिच्याचकडून.

मद--तें कसं काय?

मधुः—अरे कसं काय ह्मणजे काय, हिचा अन् तिचा चांगला स्नेह आहे. अन् मला वाटतं कीं, प्रियेनं मीं तिला लिहिलेलीं पत्रं हिला दाखविलीं असावींत. कारण त्या दोघींचं तसं रहस्यच आहे. आणखी शिवाय इंदिरा रमणकाला द्यावयाच्या पूर्वी मलाच द्यायचं ठरलं होतं.

मद--(वरकांतीं) अस्सं! मग मात्र तूं ह्मणतोस तें संभवतं खरं. (इंदिरेकडे पाहून) ही चालली, चालली तुझी इंदिरा.

इं—(सख्यांचे जवळ जाऊन) किती तरी वेळ गडे तुह्मी इथंच उभ्या? चार फुलं तोडायला इतका वेळ? चला, पुरे झालीं तीं तुमचीं फुलं; जाऊं या आपण आतां घरीं. (सख्यांसह जाते)

मधु—(त्या गेल्या असें पाहून) अरे या तर दिसेनाशा झाल्या कीं! मधुकरा, चल आपणहि जाऊं. आतां इथं उभं राहण्यांत अर्थ काय?

मधु—चल. हा बघ मी तुझ्याबरोबरच येतों.

(जातात.)

प्रवेश ३ रा.

स्थल-इंदिरेचें गृह

प्रवेशः—इंदिरा व मालती बसल्या आहेत.

इंदिराः—अन् हें बघ किनई मीं तुला बोलिवलं तें एवढ्याच-करितां! दुसऱ्याच्या बायकांना अगदीं ताळ सोडून इतक्या नीचपणानं पत्र पाठिवणं ह्मणजे काय?

पद (खचित बाई–या चालीवर)

नीच पुरुष असती ॥ अधम किती ॥ अ०॥ दृष्टी ठेवुनी पर कांतावरि ॥ पशुच खरे बनती ॥ अधम० ॥ स्मर-पत्रें हीं उद्धट ऐशीं ॥ धीटपणें लिहिती ॥ अधम० ॥ सुंदर निजवधु सोडुनि मंदिरीं ॥ धुंडिति पर-युवति ॥ अधम किती० ॥ करतलरत्ना कांच समजुनी ॥ टाकुनिया देती ॥ १ ॥ अधम०॥

मालतीः—खरंच बाई, हें असं झालं ह्मणजे त्या बायकांच्या जन्माचं पुरं मातेरं झालं ह्मणून समजावं; मग त्यांना जगांत तोंड दाखवायाला सुद्धां लाज वाटते. कारणः—

दिंडी.

निंद्य कृत्यें हे लाज आणिताती ॥ वंद्य भार्या जरि तिजशि दूषिताती ॥ प्रेम उत्कट बहु वरुनि दाविताती ॥
परी साध्वस अंतरीं शंकिताती ॥ १ ॥

अन् असं झालं ह्मणजे कसं जगांत तोंड तरी कसं दाखवावं मग? (लज्जेनें मान खालीं घालून) हें पहा, माझीच स्थिति पहा कशी झाली आहे सध्यां. तुझ्या तोंडाकडे बघायला–

पद (विठाई माउली या चालीवर)

सखे अंतरीं किती इच्छिते मंदचि परि मन्मती ॥ नुचलत दृष्टिही त्वदीय वदनीं, बद्धचि होई क्षितीं ॥ पाप एक जोडी परि तदितरीं दुःखद तें गे अती ॥ १ ॥

इं:--सखे मालती, हें असं करणं मात्र तुला योग्य नव्हे. कारण अगः—

कामदा वृत्त.

सुचविणें तुला युक्त वाटलें ॥ ह्मणुनि गुपित हें तुजशि कथियलें ॥ दोष तुजशि हा वाटला जरी ॥ तत्त्वतां गडे मज क्षमा करी ॥ १ ॥

मालतीः--छेः सखे, हें काय? मींच तुझी क्षमा मागायची तें तूंच काय उलट माझी मागतेस?

इंदिराः--हें पहा, यापुढें तूं सावध रहावंस ह्मणून तुला मी हें आपल उगीच सुचवून ठेवलं इतकंच.

मालः--आणि ह्मणूनच मी ह्मणतें कीं तुझे माझ्यावर फार उपकार झाले ह्मणून. दुसरीशी असती तर ती उलट माझा हेवा करती, आणि माझ्याशीं मोठ्या रागानं आणि ताठ्यानं वागती. इतकंच नव्हे पण तिनं माझी अगदीं हुरवावडी करून सोडली असतीन, अन् मग माझ्यावर तिनं वाटेल तसं तोंड सोडलं असतन! अग उघडं काय, वाऱ्यानं सुद्धां होईल; पण झांकण घालणारीं माणसं विरळा. (आठवण झालेसें दाखवून) बरं तर, येतें मी आतां (जाऊं लागते.)

इंदि.-(लगबगीनं तिच्याजवळ जाऊन) अग मालती, मालती, हें बघ किनई, मधुकरजीला मात्र तूं ह्याची ओळख देऊं नकोसहो. त्या मूर्खाची एकदां चांगली फजितीच केली पाहिजे. निदान माझ्याकडून तुला हें कळलं, एवढं तरी त्याला तं दर्शवूं नकोस ह्मणजे झालं.

माः—तुला काय त्याचं आतां? मला आपलं काय करायचं तें करीन मी. एवढंचना तुला सांगायचं होतं, तुझ्या सांगण्याबाहेर एक काडीभर देखील जाणार नाहीं मी, मग तर झालंना, येतें तर.

इंः—ये पण थांब जरा, कुंकू लावतें. (कुंकवाचा डबा घेऊन तिला कुंकू लावते.) तूं आतां देवदर्शन करून मग घरीं जाणारना?

माः—हो. अनायासें इथवर आलें आहे, देवदर्शन करूनच जाईन.

[जाते.]

प्रवेश ४ था.

(स्थलः—मधुकराच्या गृहापुढील बाग.)

प्रवेशः—मदनसुंदर प्रवेश करितो.

म. सुंः—(आपल्याशीं) एकून हिला मधुकरानं इंदिरेला पाठविलेल्या पत्राची हकीकत इंदिरेकडूनच कळली तर ! बरं झालं. आपल्याला या पुढची इमारत उठवायाला हा एवढा पाया बस्स झाला म्हणायचा ! मधुकाराचे हे असे गुण मालतीच्या कानावर घातले कीं तिची त्याच्यावर किती जरी प्रीती असली तरी ती थोडी तरी कमी होणारच होणार. आणि अशी कां एकदांची ती कमी होत चालली म्हणजे अखेरीस “ त्याचे तुला विष घालून ठार मारण्याचे प्रयत्न चालले आहेत, ” असं दिलं तिला एकदां सांगून म्हणजे झालं मग तर मत्सर आणि द्वेष याशिवाय तिच्या अंतःकरणांत दुसऱ्या करशाला म्हणून जागा उरायची नाहीं (नीट पाहून) अरे पण मी हा अगदीं मधुकराच्या घराशींच येऊन पोंचलों कीं. मधुकराला तर आतां त्या नादी लावून टाकलाच आहे. तेव्हां यावेळीं तो इथं असेल कीं

नसेल याविषयीं शंकाच नको. (घरांत जाऊं लागतो) तो यायच्या आंत आपण इथून पाय काढला ह्मणजे झालं (आंत जातो)

मालतीः—(त्यास पाहून) कोण तें ? सुंदर ?

म. सुंः—होय, मीच तो.

मा.—इकडं कुणीकिडं पण तुह्मी ? अन् यावेळीं ?

म. सुः—तें असूद्या अगोदर–ह्मणा. पण–तुह्मांला कांहीं सांगायचं आहे मला.

मा.—असं काय पण बाई सांगायचं आहे तें ?

म. सुंः—(मुद्दाम माहीत नाहींसें दाखवून) पण मधुकरजी किंवा आणखी दुसरं तिसरं तर कुणी नाहींना इथं ?

मा०—कुण्णी नाहीं. पण असं काय आहे तरी काय तें ? सांगा तर पाहूं ?

म सुं०—इंदिरेकडून तुह्माला त्या पत्राची सारी हकीकत कळलीच असेल नाहीं ? मधुकरजीची चांगली कानउघाडणी करण्याला मला तुह्मांला एक छानदार युक्ति सुचावयाची आहे. ह्मणजेः—

मा०—अग बाई ! तुह्मांला सुद्धां कळली तर त्या पत्राची सारी बातमी !

म० सुं०–हें पहा! त्या पत्राबद्दल मला सगळी बातमी लागली आहे

मा०—ह्मणजे ? साऱ्या अलकेभर का इतकी दाट पसरली आहे ती इतक्यांत ? असं झालं असलं तर मग मात्र माझ नशीबच. फुटलं ह्मणायचं. आतां घराच्या बाहेर मला तोंड सुद्धां कुणी काढूं देणार नाहीं.

म०सुं०–छत् माझ्याशिवाय दुसऱ्या कोणालाच ती ठाऊक नाहीं. अन् माझ्याकडून यापुढंही पण ती कुठे बाहेर ह्मणून जायची नाहीं. ही सगळी या पत्राची भानगड ऐकल्या पासून मधुकराची फजिती

करून त्याला ताळ्यावर कसा आणावा या विचारांत मी होतों तों मला अशी एक युक्ति सुचली कीः--

मा०-(उतावीळपणानें व जिज्ञासेनें) कोणची पण ती अशी युक्ति?

म०सुं०—आपण जरासें बाजूला होऊं ह्मणजे सांगतों ती तुह्मांला सगळी. (दोघे बाजूला जातात व तो तिला कानांत सांगतो) अन् वाड्यांत दरबाराला जायचं आहे, अशा बाहण्यानं त्याला इंदिरेच्या वाड्यांत लाल बागेकडे घेऊन जायला मीच येईन. मात्र अगोदर तेवढं त्या पत्राचं काम फत्ते झालं पाहिजे. (तिला पत्र देऊन) पत्र कसं लिहायचं तें हें मीं लिहून आणलंच आहे. तर याबरहुकूम अगदीं हुबेहूब तुह्मी दुसरं आपल्या हातानं लिहून तें इंदिरेच्या एका दासीच्या हातून या उल्लू रावांच्या हातीं पोंचेल असं करा. मात्र पत्राचं अक्षर तुह्मी नेहेमीं लिहितां तसंच असूंद्या. कारण शेवटीं तेंच अक्षर फार उपयोगीं पडेल. कामांध झालेल्या मनुष्याला आपण कितपत आंधळे झालों आहो, हें त्याचं त्याला दाखवायला हा आरसाच उपयोगीं पडेल. मात्र पत्र लिहून झाल्यावर हें मीं लिहिलेलं पत्र फाडून टाकाहो; नाहींतर मधल्यामधें घोटाळा व्हावयाचा एखादा. बस्स एवढीच युक्ती! येतों तर मी.

मा०--सुंदर, माझ्या संबंधानं तुह्मी किती कळकळ बाळगतां अन् तिकडून ताळ्यावर येऊन तिकडची उगीच नालस्ती होऊं नये ह्मणून तुह्मी किती काळजी घेतां ! पण मी हे तुमचे इतके उपकार कुठे फेडूं?

मद०--काय ? आपण यांत माझे उपकार समजता ?

माः—उपकार नाहींत तर काय ? आणि ते किती परीनें तरी उपकार आहेत ह्मणावं बाई !

मद०--असं मात्र तुह्मी समजूं नका. हें माझं कर्तव्य असं सम-

जून मीं केलं (कांहीं कुजबूज ऐकल्यासारखें करून) बरं, आतां येतों तर मी. मात्र मी सांगितल्याप्रमाणें हां अगदीं. (जातो)

मा०--(आपल्याशीं)अन् हें सगळं इंदिरेला सांगून तिच्याच हातून एक पत्र लिहून घेतलं आणि तिकडच्या हातांत पडेसं केलं तर फारच गंमत होईल नाहीं ? तर आतां तिच्याचकडं जावं अगोदर अन् हें सगळ तिला सांगून ती जसं सांगेल तसं करावं (जाते)

प्रवेश ५ वा.

स्थल—मधुकराच्या गृहांतील दालन.

प्रवेशः--मंदनसुदर पत्र वाचीत आहे व मधुकर जवळ उभा आहे.

मधु०--(पाठ थोपटून) कां सुंदर ! आहेकीं नाहीं ? अरे तें पत्र तिच्या हातीं गेल्यावर तिची झालेली ती आनंदित मुद्रा, तिचं तें मधुर हास्य, तिची ती चंचल दृष्टी, अन् तिनं मला उद्देशून त्या स्फटिकमय शिलातलाला ह्मटलेले " त्वद्दर्शन नित्य घडो हेंच अंतरीं " हे शब्द, या सगळ्यावरून मीं तेव्हांच ताडलं कीं ही सुंदरी मला खचित वश आहे ! काय सुंदर, बोल कीं, आतां तरी झाला कीं नाहीं माझा तर्क खरा.

मद०–(मान डोलवून) खरंच झाला बुवा, तुझाच तर्क खरा झाला. ही पहा हिनं तर तुझ्या पत्नावर देखील तान केलीन ! " प्राणवल्लभ" ह्मणें–अन् " आज रात्रीं उत्तरेच्या बाजूच्या खिडकीखालीं येऊन, आल्याची कांहीं खूण करावी, ह्मणजे मग मी एक दोरीची शिडी वरून सोडीन त्या शिडीनं वर यावं. " कोणाच्या दृष्टीस येऊं नये ह्मणून कितीतरी सावधपणा हा ? तिला काय नाहींतर इतक भ्यायचं कारण बोवा ? म्हटलं म्हणजे इथं आतां रमणक नाहींत

कोणीं नाहीं. आणखी खालीं नांव काय ? तर आपली " मनमोहना."

मधु:—तें असूंदेरे पण आतां पुढं कसं करायचं ? रात्र तर काळोखी पडली.

मद०—मग म्हणणं काय आपलं ?

मधु:—म्हणणं काय असायचं ? तुझी मदत पाहिजे बुवा. आपल्याबरोबर आलं पाहिजेस तूं ?

मद०—[डोकें खाजवीत] मी होय ! मी बरोबर आलं पाहिजे म्हणतोस ?

मधु०—हो हो. तुलाच आलं पाहिजे [त्याच्या डोक्यावरील हात काढून] डोकं खाजवून इतका विचार कसला चालला आहे ? कांहीं लोणकढी द्यायची आहे वाटतं ठेऊन.

मद०—छट् ! विचार कसला आला आहे म्हणा ! बरं पण हें सांग अगोदर मी केव्हांसा येऊं ?

मधु०—सुमार आणखी एक दोन घटकांनीं ?

मद०—बरं तर मग मी आपली संध्या वगैरे आटपून जेवणखाण घेतों उरकून सगळं.

मधु०—जाऊं तर मी ?

मद०—खुशाल ! अगदीं बिनदिक्कत जा.

मधु०—पण तूं मला भेटशील कुठेंसा ? आमच्या वाड्याच्या अशा-[थांबून] डाव्या बाजूच्या कोपऱ्यावर रहा उभा. तों त्याच बेतानें मीही आलोंच म्हणून समज.

मद०—मीं असें तिष्ठत राहण्यापेक्षां आंत यायला तरी काय हरकत आहे ? [आठवलेंसें करून] पण एक मात्र गोष्ट तुला अज्जीबात विचारायची राहिली. आपण अशा रात्रीचे जे बाहेर पडणार त्याला कारण काय दाखविणार ?

मधु०—खरंच बुवा. हें नव्हतं आलं आपल्या लक्षांत. अन् ती तर कुठं जायचं म्हणून हटकून विचारणार, बरं मग याला युक्ति ?

मद०—(विचार केल्यासारखं करून व तळहातावर मूठ मारून- आतां याला युक्ति ! हं ! कैलासभुवनांत कीर्तन आहे, त्यालानाहीं तर वाड्यांत कांहीं राजकारणासंबंधानें जायचं आहे म्हणून सांग आणि हो मोकळा झालं. अन् दुसरं काय ? याला युक्ति म्हणजे हीच ! मग या कामांत दुसऱ्या तिसऱ्या कुणाला संशय सुद्धां यायला नको. असंच असंच अगदीं.

म०–[आनंदानें] वस्स बस्स ! म्हणजे माझ्या संबंधानं तिच्या मनांत कांहीं उगीच एखादा वाकडा तिकडा संशय यायला जागा ह्मणून नाहीं उरणार. वस्स ! असंच तर मग हं. येतों तर मी विसरूं नकोहो यायला. नाहीं तर मी आपला वेड्यासारखा तुझी वाट पहात बसेन झालं उगीच.

मदः—माझ्या येण्याबद्दल नको तूं कांहीं काळजी करूंस. मी आल्यावर मात्र एक क्षणभर देखील नाहीं थांबायचा !

मधुः—अरे थांबायला कशाला हवं आहे ? मी हा आतांपासूनच तयार आहें पाहिजे तर. [गुंगत गुंगत जातो]

मद०[पत्र काढून] या पत्राचं अक्षर दिसतंय इंदिरेच्या अक्षरा सारखं. तेव्हां मला वाटतं मालतीनं त्या इंदिरेला हें सगळं सांगून तिच्याचकडून हें पत्र लिहवलं असावं (पत्रावर हात मारून] छेः मालतीचं नव्हेच हें अक्षर ! तिचं-तिचंच हें. [पत्र नीट खिशांत ठेऊन] हें अस्संच्या अस्सं जपून ठेवलं पाहिजे. पुढं मागं हेंच आपल्या फार उपयोगीं पडेल.

[जातो.]

(प्रवेश ९ वा समाप्त)

प्रवेश ६ वा

स्थलः--मधुकराचा महाल.

प्रवेश--मालती व तिची दासी बसल्या असतां मधुकर गुंगत येतो.

माः—(मधुकरास पाहून) अगबाई! बाहेरून येणं झालंच वाटतं इतक्यांत! आपल्या आपल्याशींच कांहीं चाललंय वाटतं (दासीस) अग ए मंजुळे! हे बघ तूं इंदिरेकडून आणलेले जिन्नस जा त्या पलंगाखालीं नेऊन ठेव लपवून. हो, हो चालती मुकाट्यानं (दासी जाते.)

मधु०-(आपल्याशीं)

पद (मालकंस—त्रिताल. तेचि पुरुष दैवाचे)

होत उदय भाग्याचा ॥ काल येत सौख्याचा ॥ ध्रु ॥
इच्छित युवती संगोत्सुख ही ॥ गात्रें झालीं पुलकांकितही॥
होतीं चिन्हें अपूर्व मजही ॥ धन्य मीच साचा ॥ होत॥१

(मालतीस) तूं पण ही अशी कावरी बावरी कां झाली आहेस इतकी ?

माः--छेः कांहीं नाहीं. येणं झाल्यासारखं वाटलं ह्मणून घाईनं आलें; तों इकडं वाटलं झालं आपलं कांहीं तरी!

मधुः—नाहीं, पण तिकडून कोणी गेल्याचा मला भास झाला!

माः--छेग बाई, इथून कोण जाणार? मीच आलें ती बागेंतून, अन् दरवाजा केला पुढें.

मधु०-(कांहीं वेळ विचार करून) पण हें पहा—मला आज रात्रीं ह्मणजे सुमारें आणखी एक दोन अडीच घटकांनीं कांहीं जरूरीच्या राजकारणासंबंधानें वाड्यांत जायचं आहे, तर--

मा०-ह्मणजे! इतक्या-इतक्या रात्रींच ?

मधु०–हो हो हो! इतक्या रात्रीचं! तर अगोदर माझा तेवढा तो शिरपेंच अन् ती महाराजांनीं मला त्या दिवशीं दिलेली नवी रत्न-माला असे दोन्ही जिन्नस लवकर घेऊन ये, जा. मला लवकर गेलं पाहिजे आतां! मला आज भूक बीक कांहीं नाहीं आतां, समजलीस! अन् तिथं गेल्यावर लागलीच थोडीशी तर घेईन थोडसं दूध बीध मागून झालं.

मा०–(आंत जातां जातां आपल्याशीं) समजलं, सारं समजलं ही दरबार अन् हीं राजकारस्थानं सगळीं आलीं ह्मणावं माझ्या लक्षांत. अग बाई! भूक सुद्धां नाहींना? खरंच कोठून असणार ती आतां! भूक नाहीं ह्मटलेलं मग जड जाईल ह्मणावं. (जाते)

मधु०–

पद (ही मुरली गुंगवी० या चालीवर)

पळ अब्दचि वाटते ॥ घटिका ही युगसम भासते ॥ ध्रु ॥
उत्कंठा किति होत मनाला ॥ बघण्या सुंदर मुखचंद्रा-
ला ॥ घडतां सखिच्या प्रिय संगाला ॥ कल्पाचि पळ म-
ग होय तें ॥ १ ॥

(इतक्यांत मदनसुंदर दरवाजाशीं येतो. व मालती रत्नमाला व शिरपेंच घेऊन येते) त्चुः त्चुः! किती उशीर हे एवढे दोन जिन्नस घेऊन यायला?

मा०–काय? उशीर झाला ह्मटलं? मला नाहीं बाई कांहीं वाटला इतका उशीर. हो, पण ही रत्नमाला पहायलाच जरा वेळ लागला खरा. [पावलें ऐकून आपल्याशीं] हं! हे सुंदर भावोजीच आले वाटतं. (इतक्यांत मदनसुंदर येतो)

मधु०–(कोणी आलं आहे असें पाहून आपल्याशीं) हा सुंदरच आला असला पाहिजे. किती तरी वेळेवर आला पण हा अगदीं [उ-

घड मोठ्यानें] बरं येतों तर मी आतां. मला उशीर झाला म्हणून महाराजांकडून बोलावणं आलं वाटतं हें [उठून तिचं चुंबन घ्यावयास उद्युक्त होतो] माझी वाट पहात उगीच जागत मात्र बसूं नकोस. नाहीं तर बसशील उगीच तिष्ठत आणि वाट पाहत. त्याचा काय नेम. विशेष काम असलं तर मला सकाळही होईल तिथून यायला. [मदनसुंदरास] कोण आहेरे ? कोण हरजीवन ? [मदनसुंदर पुढें येतो]

मा०–[आपल्याशीं] अगबाई, काय पण वरवर बतावणी चालली आहे ही मेली ! काय म्हणे-यायला कदाचित् सकाळहि होईल. आतां मात्र बाई शर्थ झाली म्हणायची अगदीं,

मधु०–[मदनसुंदरास] ओहो ! सुंदर ! या या ! तुम्हांलाच पाठवलंय कीं काय तर मग महाराजांनीं ?

मद०–[आपल्याशीं] इथून लवकर निघायला यानं ही छान शक्कल काढलीन म्हणायची एकूण. [उघड] तुमच्याविणं तर सगळं अडून बसलंय तिथं ! अन् म्हणून तर मी हा इतक्या जलदीनं आलों.

मद०–चला तर! आमच्याकडून कुठं आहे, उशीर ? (गुंगत जातो.)

जातात.

प्रवेश ६ वा समाप्त.

प्रवेश ७ वा.

स्थल—मधुकराचे बागेतील बंगला.

प्रवेशः—मधुकर व मदनसुंदर येतात.

मद०—(आपल्याशीं) या काळोख्या रात्रीनं आपल्याला बरंच साह्य केलंन म्हणायचं. या मूर्खाला वाकड्या तिकड्या वाटेनं नेऊन

याच्या स्वतःच्या मंदिरापाशी आणलं तरी याला त्याची कांहीं शुद्ध नाहीं. निव्वळ नंदीबैल ! (उघड) तें पाहिंलसकां--त्या समोरच्या खिडकीचं एक दार उघडं आहे तें.

मधु०--हो हो. अन् तिच्यांतून अंधुकसा दिवाहि पण मिण मिण जळत असलेला दिसतोय्. (माडीवर कोणी दिसलंसं पाहून) आंत पहा कशी लक्करून बिजली चमकली ती. (नीट पाहून) छेः बिजली नव्हे ती; खास पूर्ण चंद्रोदयच झाला इथं. बाहेर जरी हा काळा कुट्ट अंधकार पडला आहे तरी या पूर्ण चंद्राच्या कौमुदीनं माझ्या अंतर्यामीं विलक्षण प्रकाश फांकून सोडला आहे, अन् माझं हें हृत्कमल कसं अगदीं प्रसन्न होऊं पहात आहे. (शीळ घालतो) ती पहा शीळ घातल्याबरोबर कशी खिडाकिशींच आली. देतों तर आतां टाळी.(टाळी देतो व ती दोरीनें बनविलेली कृत्रिम शिडी खालीं सोडते.)

मद०—हं मधुकर, ती पहा तिनं शिडी सोडलीन् खालीं. (मधुकर उत्कंठेनें व आनंदानें टाळ्यांचा सपाटा चालवितो) काय मूर्ख आहेसरे तरी तूं ! अरे हें काय चालिवलं आहेस तूं ? टाळ्या कसल्या वाजवतो आहेस ? हा पहा, आली शिडी. हूं चढ, आटप.

मधुः—हं तूं आतां इथंच कुठं तरी उभा रहा. अन् मी परत आल्याशिपाय मात्र जाऊं नकोस हां.

मद०-वाः फार नामी कामगिरी सांगितलीस बुवा. अन् आपण जर सकाळपर्यंत नाहीं आलात तर सकाळीं माणसं बागेंत फिरायुसवरायला लागलीं तरी आपली वाट पहात मीं इथंच बसावं वाटतं ?

मधुः--तेंही खरंच-होय, समज आह्मी लौकर जागेच झालें नाहीं; मग मात्र मोठी पंचाईत. (शिडीला धरून) बरं तर मग तूं इथं कुठं तरी उभा राहतोसना ? (चुटकी वाजवून) छेः पण नको. जा आपला तूं-अथवा थोडा वेळ वाट पहात राहिलास तर ! (शिडीवर

चढूं लागतो.) मी नाहीं तुला आतां जास्त सांगत. पहा जसं तुझ्या सोईला येईल तसं कर. मात्र हें पहा-(शिडीवर चढतो) नको पण नकोच जाऊं. (वर जातो.)

मद.-संभाळून, संभाळून हां. शेल्याचा पदर बिदर नीट सांवरून घे. त्सुः खालीं खालीं नको बघूस आतां! नाहीं तर पाय चुकून वर जायचं ते खालींच याल सध्यां. (कांहीं वेळ पाहून) गेला, गेलाच हां पार गेला चढून. ती पहा, खिडकीशीं आली आहे. घेतलान् त्याला तिनं आंत. आतां ईथं खिडकीच्या अगदीं खालीं उभं रहाण्यापेक्षां जरा लांब जाऊन उभं रहावं म्हणजे या राजश्रींची कसकशी फजिती उडते ती सर्व दिसेल. शाबास शाबास मालती, हा वेळपर्यंत तरी तूं अगदीं मीं सांगितल्याबरहुकूम काम उठवून दिलंस. आतां यापुढं तुझं खरं कसब आहे! (बाजूला जाऊन उभा रहातो.)

प्रवेश ८ वा.

स्थळ--दुसऱ्या मजल्यावरील रंगमहाल.—आंत किंचित् अंधुक उजेड आहे.)

प्रवेश—(मधुकर व इंदिरेच्या आभरणांत असलेली मालती.

मालती-(आपल्याशीं) महालाच्या दरवाजाला आंतून कडी आहे कीं नाहीं हें पाहिलं पाहिजे. (जाऊं लागते.)

मधु -(तिला हात धरून उत्सुकतेनें) छेः, चाललीस कुठें आतां ?

माल.(स्वर बदलून)इश्श मेलं, हें काय बाई ? कुठं जात नाहीं मी. ही आलेंच. त्या दरवाजाला ती आंतून कडी घातली होती कीं नाहीं तें या शिडीच्या धांदलींत पहायला मी अगदींच विसरलें बाई! तेवढी बघून येतें.

मधु,-बरं तर, आपण दोघंजणंच पाहून येऊं. (मधुकर तिच्या-बरोबर दरवाजापर्यंत जातो.)

माल.–(कडी घातली नव्हती असें पाहून) अग बाई, विसरलेंच होतें कडी घालायला. (मधुकरास) कां इथपर्यंत आलें ह्मणून बरं झालं कीं नाहीं? (कडी घालून दोघें येऊन पलंगावर बसतात.)

मधु०–पण—

पद. (मदकरि वसंत या चालीवर.)

किति तरि सकंप प्रिय सखये ॥ झालिस श्रांतहि, संभ्रम त्यांतही ॥ चंचलता नेत्रीं किति ये ॥ ध्रु० ॥ वदनिं येति किति घर्म-बिंदु हे ॥ डवडवलिस अंगीं सभयें ॥ सजल वसन हें होउन गेलें ॥ कदंबसमता तनुला बघ ये॥ सुधाबिंदु जणुं अधरीं आले ॥ सुंदरि शोषिन त्या मी प्रणयें॥ सोड सोड ती लाज अतां गे ॥ मधुकर विनवित बघ हा सदये ॥ १ ॥ कितितरि संकल्प० ॥

(असें ह्मणून तिचे पाय चुरण्याकरतां हातीं घेऊं लागतो.)

माल.–हें काय बाई भलतंच! माझ्याकडून पाय चुरून घेण्याचा तिकडचा अधिकार, अन् जर तिकडूनच—

मधुकर–छे: छे:—

पद.

श्रम नच युत तुज शशिवदने ॥ शिणालिस आधिच सुखसदनें ॥ सुचविति जलयुत तव वसने ॥ रतिपद चुरणें युत मदनें ॥ १ ॥

(असें ह्मणून तिचा हात आपल्या हातांनीं धरूं लागतो.)

माल.–(हात दूर करून व हातांत त्याचा पाय घेऊन) हें काय बाई, खरोखर ह्मटलं ह्मणजे माझ्याकरितां इकडेच फार श्रम आणि त्रास पडले असतील हेंच खरं; कारण, एक तर आज बाहेर सगळीकडे गुडुप अंधेर पडलेला. त्यांतून वाट अनोळखीची. अन् वर यायचं तें देखील

त्या दोरीच्या शिडीनं चढून. इतकं असून आणखी घरून निघतांना काय त्रास झाला असेल तो ज्याचा त्यालाच ठाऊक. (पाय चुरूं लागते.) बरं पण तें माझं पत्र केव्हां पोहचलं?

मधु.–लागलींच पोहचलं. पण त्याचं काय आतां? बाहेर रात्र बरीच नाहीं झाली का? (जांभई देऊन) मला तर बुवा आतां झोंप येऊं लागली.

माल.–(त्याच्या गळ्यांत हात टाकून) अग बाई! इकडं सुद्धां हा किती घाम आला आहे पण? सगळं अंग कसं अगदीं नखशिखांत भिजून गेलं आहे. तरी म्हटलं कीं पावलं इतकीं गार कां लागलीं?

मधु.–असं झालंय खरं. मात्र तें कशानं झालं असावं हें कांहीं मला समजत नाहीं. बरं पण आतां उशीर कां? (पुनः जांभई देऊ-न) हें पहा, या जांभयांनीं तर अगदीं कहरच उसळून दिला आहे.

माल.–पण थोडंसं दूध बीध नाहीं कां घ्यायचं? मीं तर मुद्दाम आज हें फराळाचं, हें सरबत, अन् हा थोडासा दुधखवा तयार करून ठेवला आहें. उठायचं तर मग—नाहीं कां घ्यायचं त्यांतलं थोडं?

मधु.–खरं म्हणशील तर तुझा हा मुखचंद्रमा पाहिल्यापासून माझी सारी तहानभूक अगदीं नाहींशी झाली. आतां पान म्ह-टलंस तर तुझ्या या अधरामृताचं. पण तें तरी तूं तोंड वर करशील तेव्हांना? (तिची मान वर करूं लागतो.) मी आल्यापासून तुझी मान आपली खालीं. ह्याला काय करावं अगोदर?

माल.–तें असूंदे बाई, पण मीं काय म्हटलं? नाहींना तर मग माझं एवढं ऐकायचं? तर मग मीं हें इतकं केलेलं सारं व्यर्थच झालं एकून?

मधु.–व्यर्थ? वेडी नाहीं तर. व्यर्थ कां होईल तें. हा पहा मी उठलों. चल, तुझ्याच ह्मणण्याप्रमाणं होऊं दे. छेः पण हे दोन पाट न-

कोत बुवा. एकाच पाटावर बसूं आपण. (दुसरा पाट हातानें दूर करतो.) चल, ये अशी. (बसतात तोंच दरवाज्यावर कोणी धक्के देतें)

चंपा.-(बाहेरून मोठ्यानें) बाईसाहेब! बाईसाहेब! याहो या लवकर. ही तुमची आवडती कमला पहा कशी पंख फडफडून अगदीं प्राण कासावीस करूं लागली आहे. अग बाई! आजच कशी ही तुह्मांला काळझोंप लागली? अन् आंतूनय आणखी कडी घालून निजलांत? रोज तर दरवाजे सपशेल उघडे कीं हो असतात.

माल.-(घाबऱ्या घाबऱ्या) अग बाई, शेवटीं तिनं दगाच दिलान् एकून. (उठून) ही आलेंच मी. (एकदम लगबगीनें निघून जाते.)

मधु.-(आपल्याशीं) त्या दिवशीं त्या बोक्यानं जिच्यावर झडप घातली होती तीच ही कमला. या कमलाक्षीचं त्या कमलेवर किती तरी प्रेम!

चंपा-(आंतून) हो हो! (खोलींत येतां येतां) पलंगाजवळच ठेवलंय मीं तें. ही आलेंच घेऊन. (शामदान घेऊन येते.)

मधु.-(चंपा येते असें पाहून) अरे! ही तर इकडेच आली कीं. आतां आपण कसं करावं? छे: लपावं. पण लपावं तरी कुठं? पलंगाखालीं लपावं तर ही तिथलंच कायससं न्यायला येत आहे. (खुंटीवर असलेला काळा शेला पाहून) हं, ठीक आहे. हाच या वेळीं फार उपयोगीं पडेल. (पांघरतो व चंपा आली असें पाहून जवळील दिवा मालवून कोंपऱ्यांत उभा रहातो.)

चंपा-(शामदान घेऊन पलंगाकडे जाते व परत येतांना मधुकरास पाहून) भूत! भूत! (घाबरून मोठ्यानें किंकाळी फोडते व शामदान फुटून दिवा जातो.) अग चतुरिके, चतुरिके, ए चतुरिके, त्या

जीमूताला हाक मार. त्याला म्हणावं, एक भला मोठासा काकडा करून घेऊन इकडं ये. खचित महालांत कोणी तरी भूत नाहीं तर समंध येऊन बसला आहे. (दांतखिळी वाजविते.) [चतुरिका प्रवेश करते.]

चतु —काय बाई तूं भित्री तरी? परवां मला तूं हसत होतीस, आणि आज तूंच काय अशी भितेस?

मधु.–(खिडकीशीं येऊन) आतां इथं राहून शोभा करून घेण्यांत अर्थ नाहीं.

चतु.–चल, आपण दोघीजणी मिळून जाऊं तिथं.

चंपा–छेग बाई! कुणी कांहीं देऊं केलं तरी नाहींग बाई मी आतां तिकडं यायची.

चतु.–थांब तर, मी त्या जीमूतालाच हांक मारते. जीमूता, अरे जीमूता!

जीमू.–(आंतूनच) ओ ओ ओ, हा आलों.

मधु —छे:, आतां इथं रहाण्यांत अर्थच नाहीं. शिडी आहेच. मुकाट्यानं उतरून जावं आणि ती सुंदरी पुन्हां आली कीं यावं हळूच वर चढून. (उतरतो. जीमूत व चतुरिका काकडा घेऊन येतात.)

चंपा–त्या त्या खिडकींतून गेलं तें.

जीमूत–(खिडकींतून दिवा पुढें करून) तो पहा! तो पहा! (मधुकर चार पांच पायऱ्यांवरून उडी टाकितो. त्याचा काळा पोषाख पाहून) अरे, कोण आहेरे तें तिथें? (मधुकर मुकाट्यानें जावयास लागतो.) छे:, भूत नव्हे हें. चोर! चोर आहे हा कुणी तरी. थांब. आलों लेका तुझा चांगला समाचार घ्यायला. [धरा, पकडा, मारा, ठोका, असें म्हणत जातो.]

मद.–(मधुकर जात असतां एकदम मागून येऊन) धरा! धरा!

चोर! चोर! (त्याला धरतो.) चल, बोल काय आणलं आहेस आमच्याइथून चोरून?

मधु.—अरे, मी चोर नव्हे.

मद.—तर मग साव वाटतं? (हसतो.) हः हः हः हः हः हः.

मधु.—वाः, कोण सुंदर? तूं कां हा! छे वेड्या माझी अगदीं पांचावर धारण बसली होती. चल, चल आतां, इथं एक पळभर सुद्धां उभं राहून उपयोग नाहीं. नाहींतर चोर ह्मणून दोघांनाही कोणी तरी पकडून न्यायचे. (थरथर कांपतो.)

मद.—वेड्या, असा भिऊं नकोस. कांपतो आहेस कां तूं इतका? उडी टाकल्यानं तुझा पाय बीय तर नाहींना लचकला?

पद.

चौर्यकर्मा जगतिं भीती ॥ कपटपटुही मूढ होती ॥ त्यांहि अंगें कांपताती ॥ घर्म सुटुनी ॥ १ ॥

[जातात.]

प्रवेश ८ वा

स्थलः—मधुकराच्या घरापुढील बाजू.

प्रवेश—(मधुकर व मदनसुंदर बोलत बोलत येतात.)

मद.—मी जातों तर हं आतां, आतां नाहीं रहात उभा. फार रात्र झाली.

मधु.—बरं जा,—पण—आतां पुढं?

मद.—आतां पुढं? पुढचं आतां उद्यां पाहूं. ही वेळ नव्हे त्याचा विचार करण्याची. [जातो.

मधु.—(दरवाजाजवळ जाऊन) अजून गडी माणसं निजलीं नाहीं-

त हें एक बरंच झालं ह्मणायचं. नाहीं तर बाहेरच्याच दरवाज्यावर हाका मारीत बसावं लागतं. (महालापर्यंत जाऊन) दार-दार उघड लवकर दार. काय पण बुवा झोंप ही? इतक्यांत झोंप लागली अं? (ऐकलेंसें करून) बरं पण हा दरवाजा कुठला बरं वाजला? इथं दुसरं तिसरं तर कोणी नसेलना आलं? छे:, असं नाहीं होणार. पण त्याचा तरी कोणीं सांगावा नेम? (रागानें दरवाजावर लाथ मारून) कां? आंत कोणी आहे कां नाहीं?

माल.–(भीति वाटल्यासारखं करून) अं-अं-अं-अं—

मधु.–अग, दरवाजा उघड अगोदर. अन् मग ओरड.

माल.–(त्याला ऐकूं येईल असें) अग बाई, झालं वाटतं येणं इतक्यांत? माझ्या डोळ्यांतली ही झोंप देखील गेली नाहीं कीं अजूनी. (दार उघडते.)

मधु.–एक दार उघडायला इतका उशीर?

माल.–किती वेळ तरी उभं रहायला लावलं बाहेर? केवढा वेळ तरी मी जागी होतें. केव्हांन् कसा डोळा लागला तें मला कसं तें कळलं सुद्धां नाहीं मेलं.

मधु.–(आपल्याशीं) खरंच, हिला गाढ झोंपच लागली होती. अथवा हें सर्व ढोंगच तर नसेल? (उघड) बरं, पण तो दरवाजा कुणीं टाकला उघडा?

माल.–(स्वगत) अग बाई, खरंच, तो दरवाजा माझ्या हातून उघडा राहिला कीं, (उघड) अग बाई, कुठला? तो का? तो तर मी मुद्दाम उघडा ठेवून निजलें होतें, ह्मटलं मला झोंपबीप लागलीच अन् येणं झालं तर आपला असावा उघडा.

मधु.–(आपल्याशीं) ही ह्मणते असंही असेल कदाचित् (उघड) तर मग मीं तुझी झोंप उगीच मोडली ह्मणायची.

माल.–पण बाई, इतक्यांत कसा आटपला दरबार ?

मधु.–कसा ह्मणून काय विचारतेस? तिथलं काम संपल्यावर मग तर तिथं बसायचं नाहींना ? तिथलं काम आटपलं आणि निघालों तों आलोंच.

माल.–दूध तरी म्हटलं प्यायचं तेवढं. आल्यावर कदाचित् लागेल ह्मणून मीं तें मुद्दाम झांकून ठेवलं आहे.

मधु.–हें पहा, मला आतां थोडीशी भूकय पण लागल्यासारखी वाटते आहे. थोडंसं कांहीं फराळाचं असलं तर घेऊन ये पाहूं.

माल.–तरी मीं जातांना म्हटलं कीं, थोडंसं खाऊन जायचं ह्मणून. पण त्या वेळेस नाहीं मेलं ऐकायचं झालं. बरं—

मधु.–(कपाळाला आंठ्या घालून व बोट पुढें करून) आतां इथं व्यर्थ बोलत उभी राहून तूं आणखी जास्त उशीर नको करूंस. आणणार असलीस तर जा अन् लवकर घेऊन ये.

माल.–ही आलेंच. (जातां जातां) अग बाई, पण डोक्याला काय बांधलं आहे हें चमत्कारिक ?

मधु.–(रागावून) अग, जा ह्मणतोंना अगोदर. (ती बाहेर येऊन दरवाजा लावून घेत असतां आपल्या डोक्याचें वस्त्र काढून हलकेंच त्याचा चोळा बोळा करून फेंकून देतो.) हा त्या इंदिरेचा काळा शालू बांधला मीं आपल्या डोक्याला चुकून, अन् माझा मंदील अन् जरतारी पांढरा शेला मी तिथें विसरलों !

माल.–(दरवाजा ओढून घेऊन) खरंच बाई, आजचा दरबार मात्र फारच नामी झाला म्हणायचा. केवढीं हीं राजकारस्थानं अन् काय ह्या अचाट मसलती ? आतां आंत गेल्यावर डोक्याचा मंदील काय झाला ह्मणून विचारतें, म्हणजे मग पाहूं स्वारीची कशी काय धांदल उडून जाते ती. नाहीं तर—विसरल्यासारखं करून त्याची गोष्टच

काढूं नये मुळीं. पुढें एखादे वेळीं ही रत्नमाला मला इंदिरेनं पहायला पाठिवलीन् ह्मणून सांगून—पाहीन मग कशी काय गंमत उडते तीं. अग बाई, पण मला फराळाचं घेऊन यायला सांगितलंयू आहे नाहीं? तर जावंच आतां. तिकडं यथास्थित फराळ करायला सांपडेल अशा आशेवर मघांशीं फराळ सुद्धां केला नाहीं. चंपेनं तर फारच गंमत उडिवलीन ह्मणायची. मला नव्हतं वाटलं ती इतकी गमती असेल म्हणून. अन् सुंदरभावोजींनीं तर अगदीं ठरल्याप्रमाणं वांकड्या तिकड्या रस्त्यांनीं नेऊन शेवटीं आमच्याच बागेच्या बंगल्यांत आणून सोडलं. त्या मयासुराच्या नातवानं इथलीं हीं सगळीं मंदिरं अगदीं एकसारखीं बांधलीं असल्यामुळें तिकडेही पण हें आपलंच विलासमंदिर असं कांहीं ओळखायला आलं नाहीं. अन् एवढं एक बरं झालं कीं, माझा स्वर बदलल्यानं तिकडून कांहीं मला ओळखायचं झालं नाहीं. (आठवलेंसें करून) अग बाई, किती तरी वेळ झाला हा! जावंच आतां. (जातां जातां)

पद.

पश्चात्तापचि होइल चित्ता निःसंशय अंतीं ॥ उपहासें ते पापविकारहि नुरतिल मग चित्तीं ॥ हे जगदंबे तूंचि हरुनि ही पापमती कुमती ॥ सुमती द्यावी सतिच्या पतिनां॥ हेचि तुला विनती ॥ १ ॥

[जाते.

[कपटप्रबंधनामक अंक ४ था समाप्त.]

अंक ५ वा.

प्रवेश १ ला.

स्थळ—रामगिरी पर्वतावरील प्रदेश.

प्रवेश—[रमणक राजयोग्याच्या वेषांत असलेला व एका वृक्षाआड मदनिका आहे.]

रमणक—

पद. (चाल–मदना चंद्रा सुवैरि ०)

सदया रामा । सुकीर्ति बहू वरिली ॥ ध्रु०॥ असुरां ध्वंसुनि, मुनिमख रक्षुनि । जानकि परिणियली ॥ १ ॥ नृपाला ॥ कैकयि-वच हृत दशरथ उक्तिस । कृति तव अनुसरली ॥ २ ॥ उदारा ॥ जनक-वचन निज पूर्ण कराया । वाट वना धरिली ॥ ३ ॥ सुखें तूं ॥ श्रीमदहल्या उद्धरुनी जगिं । कुत्सित मति हरिली ॥ ४ ॥ यशानें ॥ कपिकुल मिळवुनि दशमुख निवटुनि । जानकि सोडविली ॥५॥ सुधीरा ॥ बंधु प्रजाजन, प्रेमें जोडुनि । सौख्य-सुधा भरिली ॥ ६ ॥ कृतीनें ॥

पण हे रामभद्रा, तुझी ही अशी स्तुति तरी काय ह्मणून करावी? अरे, ज्या अर्थीं तूं केवळ त्या नीच लोकांच्या बोलण्यावर विश्वास ठेवून त्या पवित्र साध्वीचा त्याग केलास, त्या अर्थीं तूं मनाचा खरोखर अत्यंत निर्दय आणि कठोरच असला पाहिजेस. कारण जनककन्या सीता—

पद. (चाल–तस्कराहातीं०)

निर्दया रामा । तुजसह वनीं फिरली॥ शिणलि जी तीस

काय त्यजिली ॥ अभाग्या रामा । तव विरहा भ्याली ॥
व्यर्थरे व्यर्थ वनीं आली ॥ कठोरा रामा । तव हृदयीं
निजली ॥ परि त्वां वनचरांसि दिधली ॥ निष्ठुरा रामा ॥
मान करीं दिधली ॥ ती त्वां चरचराचि चिरिली ॥

मदनिका–(कोण आहे तें न पहाता)

अनुष्टुप.

लोकानिंदा हरायाला ॥ टाकि सीतेस राम तो ॥ निष्क-
लंका रामभद्रा ॥ निंदिशी व्यर्थ कासया ॥ १ ॥

(रमणकाला पाहून चपापून एकीकडे)

अग बाई, हे तर साधूमहाराज, पण यांच्या तोंडून आज हे भलतेच उद्गार कां निघताहेत! हे सत्पुरुषा, रामस्तवनानं रोज तूं हा सारा रामगिरी आणि हें दंडकारण्य पावन करीत असून आजच रामाशी तुझं हें असं आचरण कां?

रमणक–(आकाशाकडे पाहून कांहीं ऐकलेंसें करून) काय ह्मटलंस? मी त्या रामभद्राची व्यर्थ निंदा करतो ह्मणून? छे:, माझ्या हातून आणि अशा महाभागाची तरी व्यर्थ निंदा व्हायची नाहीं. आतां एवढं मात्र खरं कीं, खरं असेल तें मला छपवून ठेवतां येत नाहीं, याला माझा नाइलाज आहे. खरंच, पण याला मी तरी काय करूं? सीतेचा त्याग केल्याबद्दल मी एकट्या रामभद्रालाच दोष देतों असं नव्हे. तर या इक्ष्वाकु कुलांतील नृपतीमणींचं हें जणूं काय कुलव्रतच होऊन बसलं आहे. कारण, रामचंद्रांनीं सीतेचा त्याग केल्याचं उदाहरण ढळढळीतच आहे; आणखी दुसरं त्याच कुलांतल्या पुण्यश्लोक नळराजाचं आचरण—

साकी.

घोर वनांतरीं निद्रित असतां अंकीं दमयंती ते ॥

कठोर, निर्दय निर्घृण नल तो जाई सोडुनि तीतें॥
वसनहि फाडोनी ॥ घे तो अर्धचि स्वकरांनीं ॥ १ ॥

तर मग अशा या सूर्यवंशीयांना मीं अशा वेळीं दूषण देऊं नये तर काय करावं?

मदानका–(एकीकडे) असल्या दोषाबद्दल आपल्यासारख्या मनुष्यांनीं देवांना का दोष द्यायचा? हें मात्र कधीं नाहीं बरोबर व्हायचं. (वीज पाहून व तिचा कडकडाट ऐकून) अग बाई, काय ही वीज लकूलकते आहे तरी?

रमणक–कारण या वेळीं—

पद. (वसंत बहार त्रिताल. चाल–मधुनि मधुनि०)

कड कड करिते ही नाभें चपला ॥ लखलखते किती ठरत न कुटिला ॥ करपुन टाकिल काय जगाला ॥ प्रलयकाल हा वाटे आला ॥ १ ॥ पद-पथ दृश्य न मुळिं दृष्टीला ॥ झंझावाताहि घों घों सुटला ॥ अंबुद-मेघाहि खवळुनि गेले ॥ गडगडाट नाभें बहुविध उठले ॥ अभ्यंतरिं तम कोंदुनि गेलें ॥ अंत जगाचा वाटे आला ॥२॥ अभ्रभरें नभ दाटुनि गेलें ॥॥ चक्रवात जणूं काळचि उठले ॥ पुंज धुळीचे हे नभिं घुसले ॥ वाटे ओढिति खालिं नभाला ॥ ३ ॥

आणि अशा या प्रसंगीं आपल्या प्रिय दयितांचे काय हाल आणि काय दुर्दशा होईल याचा एक काडीभर देखील विचार न करितां बेधडक त्यांना निर्जन आणि बिकट अशा अरण्यांत केवळ आपल्या लौकिकाकारितां एकट्या टाकून जाणाऱ्यांना निर्दय, कठोर आणि गळेकापू, म्हणूं नये, तर काय म्हणावें? मी अलकानगरीला असतांना—

मदनिका–ह्मणजे ? ही स्वारी अलकावतीची वाटतं तर एकून ? बरं पण हा पुढें काय म्हणतो आहे आणखी ?

रमणक–जेव्हां हा एकदां असा प्रकार झाला; हो असाच; असाच हा विजेचा कडकडाट; नि हें असंच मेघाचं गडगडणं; हें सगळं अंतरिक्ष अगदीं अभ्रमय होऊन गेलं होतं; दिशा अगदीं धुंद झाल्या होत्या; आणखी (वीज कडाडते) ही अशीच जेव्हां एकदां वीज कडाडली, तेव्हां माझ्या प्रियेनं—

मदनिका–प्रियेनं ? ह्मणजे ? यांना बोवाजी बनवायला कोणी स्त्रीच कारण झाली वाटतं एकून ?

रमणक–

मोठी साकी. (चाल–शूद्र विप्रवर०)

धांवत धांवत येउनि सखिनें टाकियले कर कंठीं ॥
स्कंधावरचा पदरहि गळुनी अडखळली कलकंठीं ॥
सकंप होउनि बावरली बहु चंचल वृत्तिहि झाली ॥
भीतिवशें उर धडधडतां मीं हृदयीं मग सांवरिली ॥

आणि अशा वेळीं प्रियेनं उच्चारलेले—

" गरजुनि ही चपला ॥ किति तरि घाबरवी मजला " ॥

हे शब्द तर मी कध्धीं-कध्धीं नाहीं विसरणार. मी जवळ असतांना देखील जर माझ्या प्रियेची अशी स्थिति झाली, तर मी जवळ नसतांना तिची काय बरं दशा होईल! अरे अरे अरे! ह्या कल्पना आणि हे विचार मनांत आले ह्मणजे माझी स्थिति कांहीं चमत्कारिक होऊन जाते ! तो शाप! तो निष्कारण शाप! नको, नको. त्या प्रसंगाची नुसती आठवण सुद्धां नको! प्रिये, या अशा–अशा वेळीं तुझी काय बरं स्थिति झाली असेल ? (आकाशाकडे पहात स्तब्ध बसतो.)

मद.–(किंचित् पुढें होऊन) अग बाई, ही स्वारी तर आकाशाकडे एकसारखी दृष्टी लावून बसली आहे. मीं यांना किती तरी विचारलं कीं, तुम्ही कोण कुठले ह्मणून; पण त्यांनीं मला आपल्यासंबंधानं एक काडीभर देखील मागमूस लागूं दिला नाहीं. हा कुठचा निष्कारण शाप? आणि कुठल्या चांडाळानं दिलान, आणि त्या शापाच्या आठवणीनं त्याच्या डोळ्यांतून खरकन् अश्रु कसे आले ते? खरंच आपल्या स्त्रीच्या विरहामुळं याला फार शोक झाला आहे असं दिसतं आणि ह्मणूनच तर हा त्या पुण्यश्लोक नळाला, अन् त्या दाशरथी रामाला एकसारखा दोष देत सुटला आहे. मागं जेव्हां मी एकदां यांना तुमचं घर दार कुठं आहे ह्मणून विचारलं होतं, तेव्हां यांचे जे डोळे भरून आले त्याचंही पण कारण मला आतां पूर्ण समजलं. बरं, पण यांचा सगळा वृत्तांत यांनाच विचारूं कां मी आतां? (अंगावर पावसाचे थेंब पडलेले पाहून) अथवा असं कशाला? हा आपण होऊनच काय काय सांगतो तें पाहूं. पावसाचे थेंब पडल्याबरोबर हे किंचित् शुद्धीवर आल्यासारखे दिसतात, तर आपण इथून जरा बाजूला व्हावं. (आड उभी रहाते.)

रम.–अरे, किती किती तरी दाबून धरतो आहे मी हे हुंदके? छेः पण हे आंवरतच नाहींत. (मेघाकडे पाहून व अंगावर पावसाचे थेंब पडलेसे पाहून) अरेरे, माझी ही दीन स्थिति पाहून तूंही–तूंही ज्या अर्थी डोळ्यांतून मधून मधून अश्रु टाकीत आहेस त्या अर्थी तुझं अंतःकरण फार–फारच कोमळ असलं पाहिजे. एरव्हीं ही अशी सहृदयता आणि हे असे अश्रु कोठून यायला?

साकी.

अन्य जनांचें दुःख बघुनियां दुःख जया होताहे ॥
थोर खरा तो कुलीन गुणवान् विश्वासास्पद पाहे ॥

हाच सखा माझा। योग्य दिसे कीं मत्काजा ॥ १ ॥
(विनम्र होऊन)

पद. (चाल–मित्रा मम जन्मकथा पुशि०)

मेघा! तुज वंदुनियां धन्य मानितों ॥ विरहि जनां दयित सुहृद तुजशि कल्पितों ॥ ध्रु० ॥ नीलवर्ण यदुपतिसम कांति दीसते ॥ पीतवसन चपला ही कटिस वेधते ॥ गोपवधू राधिकाच काय वाटते ॥ पूर्ण प्रेम-रंग बघुनि हृदयिं दंगतो ॥ १ ॥

पण हे नीलपयोधरा, हा इतका स्त्रीलंपटपणा नाहीं रे नाहीं उपयोगी. हाच पुढं मागं तुझ्या आणि त्या तुझ्या ह्या सुंदर चपलेच्या विरहाला मात्र कारण व्हायचा. (कांहीं वेळ विचार करून) छेः, अथवा तुझ्या संबंधानं मी आपल्या डोक्यांत ही कल्पना तरी कशी येऊं देतों अगोदर? काय तरी वेडा मी? माझ्या स्त्री-लंपटपणामुळं मला हा असा विरह भोगावा लागत आहे, ह्मणूनच तुझ्या संबंधानं सुद्धां मला असंच वाटलं, एवढंच! पण तुला हें बिलकुल लागू नाहीं; कारण—

साकी.

मंद अभागी पदवश ऐसा कुंठित-गति मी कोठें? ॥
कोठें सत्ता निरर्गला तव, स्वैर गती तव कोठें? ॥
पात्र न विरहा या। क्षम जो इतरां दंडाया ॥ १ ॥

त्या अर्थी तुला या विरहाची भीति बाळगण्याचं कारण काय? (गडगडाट व इंद्रधनुष्य पाहून) तुझ्या संबंधानं मला इतकं प्रेम कां वाटतं हें माझं मलाच समजत नाहीं. पण एवढं खरं कीं—

पद. (चाल–हिमधवलांगी०)

हे नील पयोधर, इंद्रचापधर, सौदामिनिवर! भ्रमविशि

मतितें ॥ ध्रु० ॥ अलकापुरिच्या प्रासादाचें साम्य तुझ्या-
मधिं किति तरि दिसतें ॥ चित्रित तूं ह्या इंद्रधनूनें ।
हर्म्यहि अभिनव चित्रकलेनें ॥ गंभीर ध्वनि तुझ्या गर्जि-
तीं ॥ मृदंग मुखरितें मांदिरिं घुमती ॥ अंतस्तोयें कांति
तुला ये । हर्म्य-भूमितें येत मणिमयें ॥ अंबुद! अंबर-
चुंबानं तुज रति । हर्म्यतुंगही अंबर चुंबिति ॥

अलकापुरींतल्या प्रासादाशीं तुझें हें साम्य पाहून माझं अंतःकरण उचंबळून येंत, याला मी तरी काय करूं? तूं देवेश्वर इंद्राचा प्रमुख दूत आहेस, आणि तुझं जनन पुष्करावर्तकांच्या कुळांत झालं आहे; ह्मणून तुझ्याजवळ मला एक याचना करावीसारखी वाटते. आतां ती सफल अथवा विफल करणं हें तुझ्या हातीं आहे; पण—

दिंडी.

विफल याञ्चा जरि होत गुणिजनांहीं ॥
बरवि वाटे; नाधमीं सुफलिताही ॥
ह्मणुनि तुजला प्रार्थितों सगुणवंता ॥
शरण तप्तां विख्यात वंशजाता ॥

(पावसाचे थेंब अंगावर पडलेसे पाहून) अरे अरे अरे! किती सहृदय आहेस तूं! माझी अशी दुःखद स्थिति पाहून तूंही ज्याअर्थी असा सद्गदित होतोस त्या अर्थी असं करशील कां —

पद. (चाल—लाल झाली कोपानें)

विरहभरें सखि झुरत असे मम कुशल वृत्त तिज नेशिल
कां? ॥ विरहि जनांचा खरा सखा तूं सार्थ लोकिं हें क-
रिशिल कां? ॥ ध्रु० ॥ दयितालंपट, प्रमत्त, मजला ठर-
वुनि धनदें शापियलें ॥ पूर्ण विरह तो होता; परि तें
अब्द सुदैवें मग झालें ॥ रत कांतेच्या कंठाश्लेषीं घोर

पाप हें मज घडलें ॥ अलका नामक यक्षपुरीला, सांग सख्या तूं जाशिल कां ! ॥ १ ॥

मद.–काय ? त्या कुबेरानं तूं स्वस्त्रीलंपट झालास ह्मणून तुला प्रमत्त ठरवून शाप दिलान ? अरेरे! स्वस्त्रीवर इतकं निस्सीम प्रेम ठेवणं हें जर घोर पाप असेल तर पुण्य कशाला म्हणावं हें मला समजत नाहीं, हेंच खरं. (कांहीं वेळ विचार करून) अथवा त्या एकाक्ष कुबेरानं तुला शाप दिलान, हें त्यानं आपल्या शीलाला अनुरूप असंच केलं ह्मणायचं? कां ह्मणशील तर असं पहा कीं, ज्याचं मन प्रत्यक्ष त्या आदिमाया विश्वजननी गिरिजेवर गेलं, त्याला–स्वतःला स्वस्त्रीवरचं निस्सीम प्रेम कसं असतं हें थोडंच ठाऊक असणार ? त्या अर्थी उघडच आहे कीं, तुझ्या स्वस्त्रीविषयक निस्सीम प्रेमाची त्या अधमाला कल्पना तरी कुठून होणार ? आणि त्याला तें दिसणार तरी कसं ? कारण—

पद. (चाल–राम करीं जरी)

कामभरें जइं पाही निरखुनी ॥ गिरिजा टाकी धनदा शापुनी ॥ सव्य नेत्र तो तत्क्षणिं फुटुनी ॥ अंधचि तो झाला ॥ १ ॥ त्या अधमा तव निःसिम प्रेमा ॥ केंवि कळावा असत्सकामा ॥ माता मानी रति अभिरामा ॥ अंधचि होऊनी ॥ २ ॥ शापाया तूं उलट तयाला ॥ भ्यालासी कां न कळे मजला ॥ वाटे धरिलें उगि विनयाला ॥ दंडाया अंधा ॥ ३ ॥

(त्याचेकडे पाहून) हा पहा कसा आकाशाकडे डोळे लावून तटस्थ उभा आहे. (इतक्यांत मेघगर्जना होते.) नाहीं; पण हा तोंडानं कायससं पुटपुटायला लागला आहे. काय बरं पुटपुटतो आहे हा ?

रम.–(मेघगर्जना ऐकून व आकाशाकडे पाहून) काय ? माझी

विनंति तुला मान्य आहे? (आनंदानें) असं असेल तर मग मात्र ठीक आहे. ऐक तर. तुला त्या यक्षनगरी अलकापुरीचा गुप्त मार्ग सांगतों.

मद.–(एकीकडेच) काय गुप्त मार्ग? तर मग हा मला नीट लक्ष देऊन ऐकायला पाहिजे.

रम.–प्रथमतः—

पद. अंजनीगीत. (ओवाळितों हो मज जें)

उत्तरपंथें हिमालयासी ॥ जातां बघशिल क्रौंच गिरी-
सी ॥ ज्याचीं तुंगें उंच उंचशीं ॥ चमकति रत्नांहीं ॥१॥
त्याच गिरीच्या उपतटभागीं ॥ रम्य उपवनीं पूर्ण वि-
रागी ॥ अर्ध नारिनर हर निःसंगी ॥ धरित रूप जेथें
॥ २ ॥ याच वनाशीं लागुनि आहे ॥ "शरवण"
नामक उपवन पाहे ॥ मधुर सुगंधें भरुनी वाहे ॥ उत्तर
दिग्वायू ॥ ३ ॥

आणखी इथून पुढें—

भृंगपंक्ति तुज कथितिल पंथा ॥ क्रौंच शैल वनिं गुंगत
जातां ॥ "चित्रपुष्प" तो निकुंज बघतां ॥ जाशिल तूं
रमुनी ॥ ४ ॥ याच निकुंजासंनिध आहे ॥ "स्कंद"
सरोवर तुडुंब पाहे ॥ हंस-वृंद परि टाकुनिया हें ॥ गुप्त
पथें जाती ॥ ५ ॥

मद.–तूं जो गुप्त मार्ग म्हणतोस तो कोणचा बरं?

रम.–आणि हा गुप्त मार्ग ह्मटला ह्मणजे या सरोवराच्या पश्चिमेस क्रौंच शैलवनाचा जो भाग आला आहे, त्याच्या आणि या सरोवराच्या अशा दोन्हींच्या दरम्यान कित्येक वर्षांच्या वनलतांच्या यो-

गानें जो एक अकृत्रिम व अत्यद्भुत असा वेलींचाच झोपाळा बनला आहे त्याच्या आड आहे.

साकी.

'क्रौंचरंध्र' ज्या म्हणती तें हें प्रच्छन्नचि सुलतांनीं ॥
भृगुपति-शरकृत यशोवर्त्म हा विलसत जणुं या विपिनीं ॥
पथ हा कैलासा । झाला सुलभचि त्या हंसा ॥ १ ॥

मद०—अग बाई, हा का तो गुप्त मार्ग? परशुरामानं आपल्या बाणानं केलान तो?

रम०—आणखी—

कामदा.

हंसवृंद हा इथुनि जातसे ॥

—आणि म्हणूनच—

'हंसद्वार' हें नांव त्या असे ॥
मार्ग मानसा जावयास हा ॥
शोधिला कसा खगवरें पहा ॥ १ ॥

आणि हा मार्ग इथं सकाळचा अथवा संध्याकाळचा वायू जरा जोरानं वाहूं लागला म्हणजे या निसर्गनिर्मित झोंपाळयास झोंके बसून सहजच दृश्य होतो. व याच वेळेस हंसांच्या झुंडीच्या झुंडी तिथून जातांना तुला दिसतील. हा मार्ग कैलास पर्वताच्या अगदीं थेट पायथ्याशीं जाऊन पोहोंचतो.

मद०—(आश्चर्यानं आपल्याशीं) काय यानं हा मार्ग कैलास पर्वताच्या अगदीं पायथ्याशीं जाऊन पोहोंचतो असं म्हटलंन? तर मग आतां असंच केलं पाहिजे. राममंदिरांत मीं पुराण श्रवण करीत असतांना जें ऐकलं आहे कीं, परशुरामानं कैलासाहून दक्षिणेकडे जाण्याला एक मोठं थोरलं विवर पाडलंन, तें हेंच तर एकूण?

रम०—या हंसद्वारांतून तूं एकदां पार निघून गेलास, म्हणजे मग—

पद. (चाल—वीरा भ्रमरा०)

होशी जलदा धन्य जन्मुनी ' कैलासा पाहुनी ॥ अंतरलों मी ज्यापासूनी ॥ १ ॥ अट्टहास तें शितिकंठाचें गिरिशिखरीं देखूनी ॥ क्षणैक जाशी मनिं दंगुनी ॥ २ ॥ स्फटिक भित्ति त्या दर्पण सुंदर सुरवनितांचे खरे ॥ प्रतिबिंबा पाहति आदरें ॥ ३ ॥ चंद्र, तारका, बिंबित पाहुनि भ्रांति पडे अंतरीं ॥ कल्पिती हारचि सुरसुंदरी ॥ ४ अन्य दंति निज बिंबा मानुनी ताडित दंतिं तया ॥ पशु खरे, समज न कांहीं जया ॥५॥ सर्वहि सुरवर निज वनितांसह येती शिवदर्शना ॥ रंभा करिति जिथें नर्तना ॥ ६ ॥

मद.—खरंच, आज माझ्या दैवानं उलट खाल्ल्यासारखी दिसते. नाहीं तर माझ्यासारख्या पापिणीला या महाभागाच्या तोंडांतून कैलासाला जाण्याचा हा गुप्त मार्ग कुठून कळता ? आणि माझ्यासारख्या अभागीला कैलासनाथाचं व तिथं येणाऱ्या इतर देवांचं दर्शन होण्याचा प्रसंग तरी कशानं येता ? छेः, मला एकटीला इथं टाकून देऊन तिकडून निघून जाणं झाल्यापासून हा रामगिरी, हें दंडकारण्य आणि हें सगळं जग मला कसें अगदीं निःसार आणि कष्टमय वाटत होतं, पण या घटकेपासून मला कैलासदर्शन होणार म्हणूनच जगण्यांत आतां कांहीं अर्थ आहे असं वाटायला लागलं आहे.

रम.—आणि तिथून जगत्पितरांचं दर्शन घेऊन मानस सरोवर टाकून त्याच्या दक्षिण दिशेला महानदी अलकानंदा वहात आहे, त्या दिशेनं जा म्हणजे तुला अलकापुरींतील उंच उंच प्रासादांचीं गगनचुंबित मणिमय शिखरें दिसतील त्यावरून तीच अलका असें समज.

आणि तींत बेलाशक प्रवेश कर. त्या अलकेच्या बाहेर—

पद. (चाल—वाडवडिलां सेवित०)

अंसे उमापती बाह्योद्यानीं ॥ सौध चमकती शशिकिरणांनीं ॥ मंदाकिनितटीं किन्नरकन्या ॥ खेळति रत्नें लपवुनि धन्या ॥ लीलेनें करिं कमलें घेती ॥ ठेवुनि कुरबक निज केशांतीं ॥ वदनें भरती लोध्ररजांहीं ॥ कुंदकळ्या शिरिं त्यांच्या पाहीं ॥ कदंबकुसुमें खोवुनि भांगीं ॥ कर्णीं धरिति शिरीष शुभांगी ॥ षड्ऋतु ऐसे एका कालीं ॥ नांदति नगरीं वैभवशाली ॥

आणखी—

दिंडी.

भृंग दंगुनि गुंगती पुष्प-संघीं ॥
हंस रंगति गुंतुनी नलिनिसंगीं ॥
भवनशिखि ते नाचती प्रहर्षानें ॥
फुलति रजनी त्या नित्य चंद्रिकेनें ॥ १ ॥

आणि असा तूं अलकेंत प्रवेश केलास म्हणजे ' नरवाहन ' महारजांचं मंदीर कोणतं म्हणून तुला कांहीं विचारावं लागणार नाहीं.

मद.—हो, उघडच आहे. राजमंदिरच जर तें आहे, तर कोणाला नाहीं तें ओळखणार? बरं, हे पुढं काय म्हणतात तें पाहूं.

रम०—याच धनेशमंदिराच्या उत्तरेस—

पद. (चाल—अर्धतनु वारुळीं०)

इंद्रधनूसम तोरण द्वारीं वीज फिरत अंतरीं ॥ कोंडुनी ठेविलि जणुं भीतरी ॥ शंख, पद्म, नवकुंद, मुकुंदहि नवनिधि द्वारावरी ॥ कोरिलीं चित्रें तशि किति तरी ॥

मानित सखि ज्या मंदारासुत बाहिल तो तुज करीं ॥ ह-
लवुनी कर्णफुलें नव तरी ॥ सन्निध आहे तडाग सुंदर
क्रीडाया कधिं तरी ॥ कनकमय कमलें ज्या भीतरीं ॥
चाल ॥ वृत्ती जया नामी वैडूर्याचि दीसती ॥ तें मानस
सोडुनि हंस इथें धांवती ॥ उतराया मरकत पदपंक्ती
ज्यांस ती ॥ सर्व खुणा या बघुनि शिर कसा निःसंशय
मंदिरीं ॥ पाही तेथ प्रिया सुंदरी ॥ १ ॥

मद.–खरंच, मला वाटतं, या खुणांवरून तुझं मंदीर सहज ओ-
ळखेल.

रम.–आणखी तुला एक मोठी खूण सांगतों.

साकी.

याच सराच्या तीरीं आहे क्रीडाशैल जयाची ॥
इंद्रनील-मणिमय शिखरें तीं चमकति अंतरीं ॥
कांचन-कदली ज्या । वेष्टिति स्वकरें प्रणयें त्या ॥१॥

मद.–काय? या क्रीडाशैलावर सुवर्णकदली आहेत म्हणतोस? तर
मग हें एक अपूर्वच माझ्या दृष्टीस पडेल एकूण!

रम.–दुसरं असं आहे कीं,—

पद. (चाल–यादवराया भाई०)

क्रीडाशैलीं मधुमालतिचा नव मंडप पाहे ॥ याच मंडपा-
सन्निध सुंदर बकुल तरू आहे ॥ चाल ॥ हा मत्प्रिय कांता
मुख-मदिरार्थी असे ॥ नवचंचलपल्लव रक्तअशोका
दिसे ॥ चाल ॥ वामपदाघाता जो सखिच्या वांछुनियां
राहे ॥ जा मन्मंदिरिं खुणांवरुनि या; प्रार्थितसें तुज
हें ॥ १ ॥

मद.–जातें, खच्चीत जातें; पण इतका हा अधीरपणा कां? पुढं

होऊन सांगूं कां मी यांना कीं, मी जातें तुमचा निरोप घेऊन ह्मणून? नको पण, असं केल्यानं मी यांच्या सख्यांच्या सुखांत विष कालवि-ल्यासारखं होईल. तर ह्यांचं पुढलं भाषण ऐकूं अगोदर.—

रम.–तिथं गेल्यावर तुला तुझी वहिनी ओळखायला फारसं कठीण पडणार नाहीं. कारण एक तर असं कीं, तिच्यासारखं सुंदर रत्न तुला दुसरं तिथं आढळणारच नाहीं. आणि दुसरं असं कीं, प्रियेच्या विरहामुळं माझी काय अवस्था झाली आहे, हें तूं पहातोच आहेस. तसंच माझ्या विरहामुळं झालेलं माझ्या प्रियेचं तें म्लान वदन आणि त्यावर पसरलेली पांढुरता पाहून तूं तिला सहज ओळखशील, आणि एवढ्यावरून नाहींच तुला ओळखायला आली तर—

पद. (चाल–पाहीन सिंहासनीं०)

जाउनि मन्मंदिरीं पाहि प्रिया, जी दुःखानें अति पोळ-ते ॥ ध्रु० ॥ अञ्जनविरहित स्नेहशून्यशा अश्रुपूर्ण सखि-लोचना ॥ निरखुनि अंतरिं दाटशील तूं, आर्द्रजनास्थिति व्यक्त ते ॥ १ ॥ ताल धरुनियां, नृत्य सिकविते, सखि प्रिय मयुरालागुनी ॥ अथवा बोलत मैनेशीं ती, काल कशी तरि कंठिते ॥ २ ॥ विरहव्यथा ती सखि विसरा-या अंतरिं धरि शशिशेखरा ॥ ईशार्चनरत कुसुमचयार्थी, उपवानिं अवचित हिंडते ॥ ३ ॥ किंवा अंतरीं दर्शनोत्सु-का चित्रपटीं मज रेखुनी ॥ सन्निध कल्पुनि मज , मत्कं-ठीं बाहुहार सखि टाकिते ॥ ४ ॥

अथवा—

पद. (चाल–वसन किती हे शोभवी०)

सुमलिनवसना वीणा घेउनि अंकावरि रमणी ॥ मन्ना-माचा सुनव हार सखि गुंफित नव-कवना ॥ गतविलास

स्मृतिपर कवनें ये कंठ तिचा भरुनी ॥ सुनयन सलिलें वीणातंत्री आर्द्र होति भिजुनी ॥ करधृत वसनांचलें कशी तरि घेइ तयां टिपुनी ॥

आणि मग—

भान विसरुनी तान सखी घे तीच तीच फिरुनी ॥ १ ॥

नाहीं तर तूं तिला अशीही पहाशील--

पद. (चाल–अर्जुन तर संन्यासी होउन॰)

मित-भाषी सखि दग्धचि विरहें कुमुदिनि जशि शिशिरीं ॥ चिर निश्वासें असेल आली पांडुरता अधरीं ॥ करतलिं ठेउनि मुखकलाप्रति द्वारिं उभी सुदृशी ॥ घन परुषालकजाल त्यावरी करिल साम्य अलिशीं ॥ इंदुवदनिं त्या जलदाकुल शशिमंदप्रभा बघुनी ॥ अणशिल सखिच्या अलोटरुदिता पूर तूंहि रडुनी ॥ चाल ॥ किंवा स्वप्नीं दर्शनसुख मम वांच्छुनी॥ असेल प्रार्थित निद्रेतें कर जोडुनी ॥ दुखभरें ये त्या नयनजला रोधुनी ॥ तोंच चंद्रिका बघुनि गवाक्षीं निरखिल प्रेमभरी ॥ क्षणांत फिरविल नयनचकोरां झांकुनियां स्वकरीं ॥ साभ्र दिनीं जशि उपवन-कमलिनि दुखित घन-निकरीं ॥ न मिटे नुघडे बुद्ध न सुप्तहि, पडत गाढ तिमिरीं ॥

उघडच आहे कीं--

पद. (चाल–भय मजला वाटतें. मेनका)

प्रिय-विरहें गांजितां ॥ कोण असे रक्षिता? ॥ ध्रु॰ ॥ कुसुमसदृश तें वनितामानसत्या विरहें दाहतां ॥ १ ॥ कसें टिकावें जीवित धरुनी नच येई सांगतां ॥ २ ॥ कोमल आशाबन्धचि परि तो क्षेम जगतीं जगविता ॥ ३ ॥

हा आशाबन्धच तिला केव्हां उत्साह देईल. आणि केव्हां केव्हां—

साकी.

कृशतनु मज ही कृशचि कल्पुनी रेखित चित्रिं असेल ॥
तोंच सारिका वचा परिसुनि, प्रेमें तिजसि वदेल ॥
" रसिके, काय प्रिया । स्मरशि तयाची तूंहि प्रिया " ॥१॥

अथवा:—

साकी.

म्लान सुमांच्या मालेंतिल त्या कुसुमातें सारोनी ॥
म्लानवदन सखि उत्कंठायुत पुनः पुन्हा मोजोनी ॥
करील परिगणना । विरहदिनांची शशिवदना ॥ १ ॥

अथवा

दिंडी.

रचिल हारा नव विरचुनी फुलांस ॥ एक एका गुंफुनी प्रति दिनास ॥ शापमोचनिं तो हार मदिय कंठीं ॥
धारणोत्सुक अशि विरहकाल कंठी ॥ १ ॥

पद–(चाल–किति तरि० मेनका)

कंठिल कशि तरि कृशतनु दिनास ॥ आठवुनी सखि पूर्विचें विलास ॥ ध्रु० ॥ धवळ चंद्रिकाकर पडतां निशिं सादिल कशि सखि विरहानलास ॥ १ ॥ क्षणसम यामिनि जी गमली ती युगसम विरहें गमेल मनास ॥ २ ॥ मंजुळ कोकिळ कूजित परिसुनि निश्चित करिलचि अपाय जिवास ॥ ३ ॥ वनवासी मी झालों परि तिज मंदिरींच हा घडत वनवास ॥ ४ ॥ विलास वस्तू विरहिजनांसी देतील चिरतर अपार अयास ॥ ५ ॥

साकी.

विरहि दशा ही दयिता स्थितिचें चित्र रेखवी भावें ॥
दयितालंपट वाचालापरि वदत असे न गणावें ॥ अनु-
भव घेइ सख्या । स्थिति हे भावगम्य सदया ॥ १ ॥

यापेक्षां तुला जास्त काय सांगू मी ! पण मी आतांपर्यंत तुला सांगितलेल्या गोष्टीवरून ती तुला सहज ओळखतां येईल.

मदनिकाः—(एकीकडे) खरंच, तूं म्हणतोस तसं हें सारं खरं ? एकूण तूं आपल्या स्त्रीचं ह्या वेळीं हुबेहुब चित्रच काढलंस ह्मणायचं ?

रमणक—आणि तिला तूं अशी एकदां ओळखलीस ह्मणजे तिच्या विरहामुळें माझी इकडे कशी काय अवस्था झाली आहे तें तूं तिला सांग. आणखी-पण अरे-अरे-अरे, माझ्या प्रियेचं सौंदर्य निरनिराळ्या वस्तुमात्रांत मला दृश्य होत आहे. (स्त्रीस उद्देशून) हें पहा, प्रिये—

पद. (शाखा सद्गुण, या चालीवर.)

कोमल वल्लीमध्यें दिसतें अंग तुझें गोजिरें ॥ मयूरबर्ही
दिसे कचांचें साम्यहि थोडें खरें ॥ कुरंगनयनीं दृश्य
होतसे चांचल्यचि साजिरें ॥ पूर्ण शशांकीं मिळे पहाया
वदन तुझें इंदिरे ॥ सरित्तरंगीं दिसे भृकुटिचें नर्तन तें
सुंदरे ॥ मत्त मतंगीं मंदगती तव बघतों मी आदरें ॥ मं-
दराच्या प्रसव-बंधनीं कल्पुनि बिंबाधरें ॥ अधरोष्ठा तव
पानोत्सुक मी फसतो गुणगंभिरे ॥ १ ॥

—पण हें तुझं सौंदर्य अमुक एकाच वस्तूंत आहे, असं मात्र कुठं नाहीं माझ्या नजरेला आलं. (आपल्याशींच) पण जागजागीं, अंशतः

आढळून येणारं हें तुझं सौंदर्य पाहून केव्हां केव्हां माझा धीर सुटतो, आणि ह्मणूनच मी एखादे वेळीं अशी तोड योजितो—

पद.–(व्हावा लाभ तुझा या चालीवर.)

विरहा विसर पडावा कांहीं ॥ ह्मणून चित्रपटीं तुज रे-
खुनि पाहीं ॥ कुपिता दाविली बहू रंगांहीं ॥ विसरुनि
परि मग चित्रकथाही ॥ रोष हरावा सखिचा ह्मणुनि ॥
ठेवित शिर पायीं ॥ अश्रू येऊनि परि मज नयनीं ॥ दैव
न बघुं देई ॥ १ ॥

साकी.

तुजला स्पर्शुनि पवन येतसे मधुर सुगंधें भरुनी ॥ विरह
वन्हि तो शमविल माझा अंतरिं ऐसें गणुनी ॥ अंगावरि
घेतो ॥ तापद अधिकचि परि होतो ॥ १ ॥

केव्हां केव्हां:—

पद.–(चाल स्मर यौवनमद हा तरुणा या०)

विरहि जनांप्रति निद्रा प्रिय अति या जगतीं ॥ प्रियजन
दर्शन स्वप्नीं घडवी; कल्पलता खरि ती ॥–असं समजून–
त्वदीय कंठाश्लेषोत्सुक मी होउनिया निशिथीं टाकित
अंबरिं कर सरसावुनि फसत परी सुदती ॥ पाहुनि दी-
ना स्थिति मम ऐशी वन देवी द्रवती ॥ अश्रु तयांचे मु-
क्तावलि सम नव किसलयिं पडती ॥

मदनि०—अगबाई ? दुर्दैवच्च हें नि दुसरं काय ? कोणा मेल्याला हें तुमचं सौख्य पाहवलं नाहीं. अन् त्याचे डोळे फुटले काय कीं? अतिशय प्रेम असलं ह्मणजे हें असंच व्हायंच तर एकूण अं ? बरोबर आहे, “ अती तिथं माती ” ह्मणतात तें कांहीं खोटं नाहीं तर !

रमणक—अशी माझी स्थिति होते म्हणून तिला सांग; आणि तूं तिला असं सांगितलंस म्हणजे तुझ्याशीं तिचा जरी परिचय नाहीं तरी ती तुझ्याकडे मोठ्या लोभानें आदरपूर्वक पाहूं लागेल. मग माझं कुशल विचारील आणि मी कसा आहें, काय करतों आहे, दिवसाचा नि रात्रीचा वेळ कसा घालवितों, जेवतो कुठं, निजतो कुठं म्हणून नाहीं नाहीं ते प्रश्न विचारून तुला पुरे पुरे करून सोडील. अथवा दाराच्या आड उभी राहूनच तूं सांगशील तेवढं ती स्वस्थपणें ऐकून घेईल. आणि स्त्रियांना स्वाभाविक असणाऱ्या विनयसंपन्नतेमुळें तुझ्याशीं बोलायलादेखील कदाचित् ती धजणार नाहीं. येवढ्याकरितां तुला मी एक युक्ति सांगतों; ती युक्ति ह्मटली म्हणजे आह्मी उभयतां एकांतांत असतांना, जे जे विलास केले त्यांपैकीं कांहीं ठळक ठळक गोष्टींची तूं तिला ओळख दे, हीच युक्ति. म्हणजे ती तुला माझा अत्यंत प्रिय सुहृद मानून तुझ्याशीं मोकळ्या मनानं वागूं लागेल.

मदानका—अग बाई, हा तर या निर्जीव मेघाला आपल्याला एकांतांतल्या खुणा सांगायला उद्युक्त झाला आहे ? काय ही याची दशा नि काय हा याचा मोह—

पद. पडतां वेणूरव कानीं, या चालीवर.

घन निर्जिव हे विसरोनी ॥ टाकी हृद्गत ओकोनी ॥
गर्जत घन जो मोठ्यानीं ॥ पाठवि दूत तया करुनी ॥ शक्याशक्य न तें बघुनी ॥ विरहग्रस्ता अंधपणा ये संगति कोठुनि तद्वचनीं ॥

—तर हा आपल्या एकांतांतल्या खुणा जो या मेघाला सांगायला तयार झाला आहे, त्या ऐकूं कां मी ? कां त्या ऐकल्यानं माझ्या पदरीं पाप मात्र पडेल ? अथवा मीं जर याचा निरोप याच्या स्त्रीला नेला तर मग ह्यांत पाप कसलं ? अन् तो निरोप जर न्यायचा

तर मग हा ह्मणतो आहे त्या याच्या एकांतातल्या खुणा ऐकायला तरी काय हरकत आहे ? नाहीं, पण हा त्या मेघाला कायसंसं सांगूहि लागला कीं; ऐकूं दे तर मला तें अगोदरः—

रमणक—एकदांः—पद. (शशिकुल भूषण, या चा०)

स्वप्नीं अवचित ओरडुनी ॥ टाकिलि निद्रा भंगोनी ॥
॥ ध्रु० ॥ स्वप्निंच देखुनि सवतीला ॥ ठरवियलें त्वां
शठ मजला ॥ घेउनिया चरवेषाला ॥ देउनि लटक्या
पत्राला ॥ चोरुनि चुंबन गालाला ॥ घेतां शापियलें म-
जला ॥ भ्रमरवेषें कर नीवीला ॥ नेतां दीप शांत के-
ला ॥ तुजला मन्मथ वेषाला ॥ देउनि प्रिय तव रति
झाला ॥ चाल ॥ एकांतातिल खुणा वरूनी ॥ जाइल
सखि मोहूनी ॥ वदेल तुज मग प्रेमानीं ॥ १ ॥

मद—एकांतांतल्या इतक्या खडान् खडा खुणा सांगितल्यावर तीच काय, पण कोण हवी ती अशा सांगण्यावर तेव्हांच विश्वास ठेवील ?

रमणक—आणखी हें पहाः—मी येतांना ज्या वेळेस सखीच्या वेणीवरील माला काढून तिचा बुचडा बांधला त्या प्रसंगाची तिला तूं ओळख दिलीस ह्मणजे तिच्या डोळयांत अश्रु येऊन ती तुला माझी कशी काय स्थिति आहे हें सारं आपोआप विचारूं लागेल. तिला ह्मणावंः— पद–(उद्यां बघ जाते, या चा०)

प्रिये वेणीची ॥ काढिली माळ मी साची ॥ गुंफिन पुनरपि
कबरी वरती ॥ स्वकरें येतां मी शापांतीं ॥ तोंवरि दूरचि
असुं दे सुदती ॥ सखे आवडीची ॥ माळ ही तुझ्या प्री-
तीची ॥ १ ॥

—ह्या शब्दांची आहे कां आठवण ?

मद०—ही आठवण तर अगोदर देईन.

रम०—आणि ही एवढी आठवण तूं दिला दिलीस ह्मणजे बस्स झालं. मग ती तुझ्यापासून काडी इतकं देखील कांहीं चोरून न ठेवितां मला तिला जो कांहीं निरोप परत सांगून पाठवायचा असेल, तो ती तुझ्याजवळ सांगेल. तो एकदां तिनं सांगितला ह्मणजे तिचं सांत्वन करून तिला माझा असा निरोप सांग कीं:—

॥ झंपा प्रबंध ॥

प्रिये धीर देई मना धीर कांहीं ॥ कार्तिकीं संपतो शाप पाहीं ॥ ध्रु० ॥ चक्रनेमिक्रमें येति हीं जाण गे ॥ दुःखसौख्यें जगीं प्राणिमात्रा ॥ सर्वदा सौख्य तें नाहिं कोणास गे ॥ राव, रंका, तसें भूभृताही ॥ नेत्र तूं घट्ट झांकोनिया साहि हें ॥ हीच गे हीच तुज विनति पाहीं ॥ (मुद्रिका घेऊन) वृत्त हें सांगुनी मुद्रिका देइ ही; ॥ आण तद्वृत्त ताशि मुद्रिकाही ॥ १ ॥ सख्या धीर देई असा धीर कांहीं ॥ राहती प्राण हे तरिच पाही ॥ध्रु०॥ (बदलून) (आंगठी मेघास देतो) जा, जा लवकर. माझ्यानं आतां जास्त बोलवत नाहीं; (दुःखानं) आणखी चार साडेचार महिने मला हें असंच राहवं लागणार. हाय ! हाय ! ज्या तुला माझा एका घटकेचा देखील विरह सहन करवत नव्हता त्या तूं इतके महिने कसे काढले असशील, आणि या पुढचा काळ तरी कसा घालविशील ही फक्त कल्पनाच माझ्या मनांत आली म्हणजे मला फार त्रास होतो ? नको नकोच ती कल्पना ?

(घरांत खालीं मान घालून सचिंत उभा राहतो.)

मद०—(आंगठी हुडकून घेऊन.) यानं या मेघाला आपल्या स्त्रीला देण्याकरितां म्हणून आंगठी दिलीन, तर ही उचलायला काय

हरकत आहे ? पुढं होऊन सांगून टाकूं कां या साधू महाराजांना कीं, मीं तुमचं सगळं बोलणं ऐकलं म्हणून. अथवा असं तरी करण्यांत काय अर्थ आहे ? यांचं हें भाषण ऐकल्याची यांना आपण मुळींच ओळख न देतां असं करावं (पुढं होऊन त्यांस) साधु महाराज, ढगांनीं हें आकाश कसं अगदीं भरून जाऊन पावसाचे थोडथोडे थेंबही येऊं लागले आहेत. तर अशा वेळीं इथं या अरण्यांत या पावसाच्या सपाट्यांत सांपडण्यापेक्षां मला वाटतं परत आपण आश्रमाकडे जावं.

रमणक—काय ? माझं दुःख पाहून या वनदेवतेला करुणा आली ?

मद०—(आपल्याशीं) काय मोह हा ?

रमणक—(चपापून) कोण तूं मदनिका ? वनदेवता नव्हेस तर एकूण ? अरेरे ? (मूर्च्छा येऊन पडतो.)

मद०-अगबाई, ही स्वारी तर इथंच मूर्च्छा येऊन पडली, तर यांना अगोदर आश्रमांत नेऊन पोंचवावं, आणि आपण भल्या पहाटेस उठून याचा हा शेला अन् घरांत तिकडचीं जीं वस्त्रं आहेत तीं घेऊन इथून मुकाट्यानं पाय काढावा. ज्याअर्थीं यानं आपल्याला कैलासाचा गुप्त मार्ग सांगून आपल्यावर उपकार केले आहेत त्याअर्थीं आतां आलका गांठून याचा निरोप एकदां याच्या स्त्रीला सांगावा, आणि मग कैलासनाथाजवळ जाऊन आपण आपल्या राहिलेल्या आयुष्याचे दिवस कंठावे; अन् इतका लांबचा प्रवास करणं तो या स्त्रीच्या वेषांत करण्यापेक्षां पुरुषाच्या वेषानं केलेला बरा. नाहींतर मध्यंतरीं माझ्यावर उगीचच्या उगीच शेंकडों संकटं यायचीं ! ठरलं तर. हें असंच करायचं ! अन् ज्याअर्थीं यांनीं आपला सारा निरोप मेघालाच सांगितला आहे, त्याअर्थीं हा वेष बदलल्यावर आपण विचार-

णाऱ्यांना " मेघवर्ण " हेंच नांव सांगत जावें ह्मणजे मग वाटेंत आपल्याबद्दल कोणाला संशयही येणार नाहीं, व आपल्याला कशाची अडचणही पडणार नाहीं. (रमणकास पाहून) पण, हे साधु महाराज तर–(पुन्हां आपल्याशीं) अरेरे ? यांना ही भयंकर मूर्च्छा आली कीं (तो डोळे उघडतो) महाराज, सावध व्हा. आणि पावसापाण्याचे वेळींच आश्रमांत चला. हें पाहिलंत कां:—

॥ अंजनी गीत ॥

गडगडाट घन अंबरिं करिती ॥ चंचल चपला त्यांतुनि फिरती ॥ जलबिंदू हे अंगें भिजविती ॥ आश्रमीं जाउं चला ?

" संदेशनामक " पांचवा अंक समाप्त.

अंक ६ वा.

---*---

प्रवेश १ ला.

स्थळ—अलकेंतील एक रस्ता.

प्रवेश—मदनसुंदर व मधुकर बोलत आहेत.

मदनसुंदर—हें पहा आतां तर ती निःसंशय झालीच ह्मणून समज तुझी.

मधुकर—पण समज, उद्यां रमणक आला आणि त्याच्याबद्दल ही खोडसाळ कंडी पिकविल्याचं आपल्या अंगावर आलं ह्मणजे मग ?

म० सुं०—काय ? अंगावर यायचं ? त्याबद्दल नको तुला काळजी. तूं अगदीं निर्धास्त ऐस. समजलास कीं नाहीं ?

मधु०—अरे यांत समजायचं काय ? आणि निर्धास्त तें कसं असायचं ? अरे गृहस्था, जो मेला म्हणून आपण कंडी पिकविणार तोच जर " हा मी तुझा बाप जिवंत आहे "—ह्मणून प्रत्यक्ष आपल्यापुढें उभा राहिला, ह्मणजे मग कसं ?

मद० सुं०—झालं ? संपलं आवलं बोलणं ? कां आहे अजून कांहीं शिल्लक ?

मधु०—झालं, सारं सारं संपलं——

दद० सुं०—अहो शाहणे, तुह्मी अगोदर असं पहा कीं, आपण जर ही केवळ कंडी म्हणूनच पिकविली आहे, आणि ती खरोखरच कंडी म्हणून टरली तर त्यांत आपल्याकडे दोष तो काय येणार ! अलकेंत जी बातमी उटली होती तीच तूं कळविलीस न् दुसरं काय ? यांत तूं कुणाचं घोडं मारलं नाहींस कीं हत्ती मारला नाहींस. अरे

ज्याला कर नाहीं त्याला डर कसली ? उलट रमणक परत आला म्हणजे इथं अशी कोणी दुष्टानं कंडी पिकविली होती म्हणून त्याला सांगून त्याच्याच गळा पडून वर रडायला आणखी मोकळेच. मग आपल्यासंबंधानें त्याला संशय येतो कशाला नि जातोय कशाला ?

मधु०–हं ! हें मात्र खरं !

म० सु०–नाहीं तर त्याला दुसरी एक तोड आहे.

मधु०–हं. कोणची बरं ती ?

मद० सुं०–दुसरी तोड ह्मणजे अशी. रमणक परत यायच्या सुमाराला त्याला वाटेंत गांठून जिथल्या तिथचं—

मधु०–काय–जिथल्या तिथचं–मोक्ष करावा म्हणतोस ? (कांपू लागतो) अन् अशानं काय होणार ?

म सुं०––हो. असंच. असंच म्हणतो मी. पण तो प्रसंग यायच्या अगोदरच आपण हें असे कापायलासे लागलांत ?

मधु०––कांपायला ? छत्. पण हें असलं–इतकं भयंकर साहस करायला मात्र नाहीं बोवा आपण तयार होणार.

म० सुं०—हं. असं असेल तर हा मी चाललों. आजपासून तुझ्याकरतां इंदिरेच्या संबंधानं आपण एक काडीची देखील खटपट करणार नाहीं. या भानगडींत मी अगोदर पडायचंच नव्हे; पण पडलों, झक् मारली, शेण खाल्लं, करूं नये तसला गाढवपणा केला, पण आतां काय त्याचं ! एकदां चांगली ठेंच लागली, आतां सावधगिरीनें वागलं ह्मणजे मिळविली. ज्याच्याकरितां आपण खटपटी कराव्या त्यालाच जर जरूर नाहीं, तर मग करा कशाला इतकी उठाठेव?

म०–छे; सुंदर हें असं मात्र उपयोगी नाहीं बोवा. अरे तुझ्यावर तर सारी माझी भिस्त आणि मदार. आणि तूंच जर आपल्याला असं ह्मणून घेऊं लागलास, तर काय करायचं ! त्याची माझी गांठ पडून

त्याच्याशीं हात करण्याचा प्रसंग मात्र नको यायला. अशी तोड का ढळीस कीं, तूं सांगशील तसं ऐकायला मी तयार आहें.

म० सुं०—अहो पण शहाणे, तुह्मीं ह्मणतां तें सगळं खरं, पण आतां आपल्याला मीं जी तोड सांगितली तिच्यामुळं तरी कुठें आपल्याला कोणी सुळावर द्यायला काढलं होतं? नुसतं होय ह्मणायचंन् मी सांगतों तसं वागायचं नुसती आज्ञा केली असतीस कीं बस्स्.

म०—मग त्याला कुठें माझी ना आहे? ऐवढ्यानंच जर होत असेल तर बोल, तूं सांगशील तें ऐकायला मी तयार आहें.

म० सुं०—तर मग हें पहा. हें काम उरकायला मीं दोन इमानी नोकर निवडून ठेविले आहेत. वेळ आली ह्मणजे त्यांना मीं तुझ्याकडे पाठवीन. अन् ते तुझ्याकडे आले ह्मणजे त्यांना खुद्द तुझ्या तोंडून आज्ञा झाली पाहिजे. अथवा तोंडानं सांगणं होत नसेल तर त्यांना आपल्या हातची एक बोटभर चिठ्ठी दिलीस तरी बस्स होईल. आणि एवढंहि तुझ्या हातून होत नसेल तर तसं सांग; ह्मणजे या घटकेपासून—

म०—कबूल. तूं ह्मणतोस तें सारं कबूल आहे आपल्याला. पण तूं दोन इसम ह्मणतोस त्यांनींच आपल्याला दगा दिला तर ?

म० सुं०—त्याबद्दल नको तुला काडीभर देखील काळजी बाळगायाला. बोल, मग आहे तुला हें कबूल ?

म०—हो कबूल आहें. पण काय रे, या कंडीमुळं त्या सुंदरीची काय अवस्था झाली असेल बरं ?

म० सुं०—काय होणार ? तुमच्या दोघांमधला एक कांटा नाहींसा झाला, असं वाटेल तिला.

म०—पण तिला असं वाटत असेल तर कीं नाहीं साऱ्या गोष्टी?

म० सुं०—अरे तिला असंच वाटत असलं पाहिजे. कारण असं

पहा कीं असं जर तिला वाटत नसतं, तर तुझीन् तिची जेव्हां पांच सहा वेळ गांठ पडली, तेव्हां तुझ्याकडे पाहून ती हंसलीच नसती.

म०—अरे, नुसती हंसलीच काय? हंसली, लाजली, मुरकली, डोळे मुरडून मला खूण केली. आणि तिच्या त्या दासी आल्याबरोबर तर माझ्याकडे पाहून मोठमोठ्यानंच हंसूं लागली. तिनं मला शिडीची सुद्धां ओळख दिलीन.

म० सुं०—(आपल्याशीं) ती कां हंसली, हें या ह्मसोबाला कशानं समजणार! (उघड) हें पहा, ती तुझ्यावर तशी आषकच झाली आहे. त्याबद्दल सारी वित्तंबातमी मीं तिच्या दासीकडून काढली. आणि ह्मणूनच मी ह्मणतों कीं, रमणकाचा एकदां निकाल लागला, ह्मणजे तिला सुद्धां बरं होईल; कसली भीति उरणार नाहीं मग.

मधु०—हं ! हें मात्र खरं; पण हें पहा—एक दोन वेळां तिनं मला झिडकारलं ही होतन्.

म०सुं०—छत्. तें सारं वर वर रे. लोकांत तिला तसंच दाखविलं पाहिजे. नाहीं तर—

मधू०—हो, हें मात्र अगदीं खरं बोवा. यावेळेला ती बहुतकरून आपल्या केलिवनांत गेली असेल. तर येतोस का? आपणहि तिकडेच जाऊं घटकाभर.—

म०सुं०—हो चल. आपलं काय जातं त्यांत. पण हें पहा तूं चालूं लाग, मी हा आलोंच. तिथं मी आपला गजरा विसरलों आहे, तो घेऊन येतों. (मधुकर जातो) (गजरा घेऊन) ह्याच्याकडून रमणकाला ठार करण्याचं पत्र एकदां लिहून घेतलं, कीं सुटलों. मग हा पुरा आपल्या हातांत आला. प्रसंग पडल्यास वर साक्ष द्यायला ते दोघे इसम तयार ! या खुळोबांना असंच खेळविलं पाहिजे. इंदिरा

आणि तुला वश का शंखोबा ! अरे एक आहे ती तर संभाळ अगोदर मग दुसरीकडे नजर फेक. नाहीं, पण तुझ्यासारखं पात्र जर माझ्या हातीं न येतं तर मला तरी हीं सूत्रं चालवायला कशीं येतीं ? तेव्हां आहे हें ठीकच आहे झालं अन् दुसरं काय ? (जातो.)

प्रवेश २ रा.

स्थळः-रमणकाचें घर. प्रवेशः-इंदिरा, चंपा व चतुरिका येतात.

चंपाः-नुसत्या मेल्या टवाळ लोकांनीं उठविलेल्या गोष्टीवर विश्वास ठेवून तुह्मीं हा जो शोक चालविला आहे, तो काय ह्मणून? या गोष्टीवर माझा तरी नाहीं बाई काडीभर देखील विश्वास बसत.

इंदिरा.-चतुरिके, पाहिलेंसना. ही चंपा किती कठोर हृदयाची आहे ती? अग, असली बातमी कुठं खोटी कां ठरली आहे कधीं ?

चतु०-छे: असली बातमी खोटी ठरल्यावर मग आणखी तें काय पाहिजे? हें पहा, मी गंगेवर गेलें होतें. तों तिथं सुद्धां सगळ्याजणींच्या तोंडांत आपली ही गोष्ट. अन् नरवाहन महाराजांच्या नांवानं सगळ्या जणी चरफडत होत्या; अन् तुमची आठवण करून डोळ्यानं पाणी काढलं नाहीं अशी तिथं मला एक देखील दिसली नाहीं.

चं०-हें पहा, तुह्मी कांहींहि ह्मणा पण-

इं०-पण नाहीं नि बीण नाहीं. तूं चालती हो कशी इथून. नको, माझ्या डोळ्यांपुढें सुद्धां नको उभी राहूस तूं. तोंडपूजी नाहींतर-कांग चतुरिके, तुला नाहीं वाटत ही तोंडदेखली बोलते ह्मणून ?

चं०–(जातांना आपल्याशीं) त्या मेल्या मधुकराचं तर नसेलना हें काम? कोणी तरी भरले असतील मेल्याचे कान. आणि त्यानंच उठिविलं असेल हें साऱ्या अलकेभर. हें खरं असलं तर चमत्कारच ह्मणावयाचा; मग पुरं नशीवच ओढवलं ह्मणायचं अन् दुसरं काय ? (जाते)

इं०–चतुरिके, या जगांत मला आतां माझं असं कांहींच उरलं नाहीं ना ! हं:–

पद–(चाल–सोच समज०)

प्राण, सखे हा ठेवुं कशाला ॥ अंतरिं भडकती दुर्वह ज्वाला ॥ ध्रु० ॥ सखये, मूळचि मी शापाला ॥ कारण झालें या विरहाला ॥ १ ॥ चांडाळिण खरि ये जन्माला ॥ कारण अंतीं प्रिय–निधनाला ॥ २ ॥

अग हा प्रसंग माझा मीं होऊन ओढवला अन् दुसरं काय?

पद–(चाल–अजि शेवटचा.)

अति प्रेमाचा दुःसह अंतचि ठरला ॥ वद सोसुं कशी मी त्याला ॥ धृ० ॥ त्यावेळीं गे नव्हतें भान अह्मांला ॥ किती विलास आह्मीं केला ॥ १ ॥ परि अंतीं व्यर्थचि झाला ॥ प्रिय कंठ स्वकरें चिरला ॥ २ ॥ मानि, शापांतीं जाय विरह विलयाला ॥ परि मज हा अक्षय ठरला ॥ ३ ॥

सखे, "अति तिथं माती" ह्मणतात, तें कांहीं खोटं नव्हे. अग चतुरिके, जिकडे माझ्याशिवाय एक घटकाभर देखील चैन पडत नसे तिकडून मला असं एकदम सोडून कसं बरं जाणं झालं ?

पद–(चाल–माझा राम देखिला काय?)

नाथा सोडुनियां मजला ॥ कैसें गेला हो? ॥ धृ० ॥

अधरामृत ज्या ह्मणत असा ॥ झालें विष कां तें सहसा ॥
दावुनिया बहु विश्वासा ॥ मग श्वासा हरिलें कां? ॥ १ ॥
मजला ह्मणुनी सद्गुण-खाण ॥ आला मानित अपुला
प्राण ॥ देउनि कंठाची मज आण ॥ अंतीं मान चिरली
कां ? ॥ २ ॥ अथवा कल्पुनि मज विवशी ॥ सजला
दंडाया मजशीं ॥ अंता कारण डांखिणशी ॥ शिक्षा ऐसी
योग्य तिला ॥ ३ ॥

हें-हेंच खरं. अग इंदिरे दुष्टे, तूंच कपाळकरंटी अन् चांडाळीण, असं असून दुसऱ्याला कां उगीच दोष देतेस? (हातांत पदर पिळवटून धरून)

पद-(चाल-सदर.)

अंतीं स्मरुनी तूं नाथास ॥ ज्यावरि सर्वहि तूझी आस ॥
लावुनि कंठाशीं हा फास ॥ चुकवी त्रास तूं सगळा ॥ ४ ॥ ना० ॥

च०-बाईसाहेब, असं हें घोर कृत्य काय आरंभलं आहे ! आत्महत्या करून आणखी ही पापाची धन करितां काय ? असं नका हो करूं.

इं०-काय ? पापाची धन करतें आहे ह्मटलंस ? छे या सगळ्या पापाला अन् या आत्महत्येला खरोखर कारण ह्मणशील तर आपले नरवाहन महाराजच आहेत. महाराज, याची फळं तुह्मीं कोठें भोगाल हो? तीं भोगायला लावायला तुमच्याकरितां एखादं नवंच नरककुंड तयार करावं लागेल. अथवा तुह्मांला तरी दूषण लावून काय उपयोग! या सगळ्याचं मूळ कारण मीच आहें. तर-

अंजनीगीत.

नाथ सखे मज अंतरला ॥ प्राण तरी हें ठेवुं कशाला ॥
चल ने मज तूं स्वर्गगेला ॥ गांठिन मी नाथा ॥ १ ॥

च०–(स्वगत) अग बाई, आतां कांहीं धडगत दिसत नाहीं. ह्या तर जीव द्यायला देखील तयार झाल्या कीं–

इं०–(रमणक दृष्टी पडलासें दाखवून)

चाल–सदर.

सोडुनि कां तुह्मि जातां मजला ॥ थांबा आलें भेटायाला ॥ साहूं कैशी या विरहाला ॥ वैरिण ही अपुली ॥ २ ॥

च०–बाई साहेब, काय ही तुमची दशा व्हावयाला लागली आहे? काय दिसतं आहे काय तुह्माला तिथं? अशी कावरी बावरी मुद्रा कां केली आहे? हें पहा, झाली गोष्ट आतां येत नाहीं. ही दुष्ट बातमी खोटी ठरण्याची तर आशा नाहींच–

इंदि०–दुष्टे, चांडाळणी, तूं काय बोलतें आहेस हें! प्रत्यक्ष प्राणनाथांना मी पहात असतां त्यांच्या संबंधानं तुझं हें असं अभद्र बोलणं? खचित त्यांचा माझा वियोग व्हावा हीच तुझी दुष्ट वासना.

चतु०—चंपावती, अग चंपावती, आतांच्या आतां बाई बाईसाहेबांच्या दृष्टींत पहा कसा फरक पडत चालला आहे? (धांवत चंपा येते.)

चं०—बाईसाहेब, महाराजांच्या मृत्यूची बातमी अगदीं खोटी!

इं०—खरं, अगदीं खरं बोललीस तूं. (आनंदानें) ह्मणजे तुझ्या सुद्धां दृष्टीस पडायचं झालं तर! चतुरिके,

पद–(चाल–येतें आलें थांब मी–)

बहु अदय हृदय तूं विवशि विवशी ॥ धृ० ॥ कांतालिंगनिं दृढ मज बघुनिहि भलतें सलतें कां गे वदशी ॥ १ ॥ सर्वतचि मत्प्रियकर भरला ॥ कां नच अंधे बघशि बघशीं ॥ २ ॥

अग चंपावती, कुठें कुठें ह्मटलंस दृष्टीस पडायचं तुझ्या ?

चं०—बाईसाहेब, रमणक महाराज माझ्या दृष्टीस पडले ह्मणून नाहीं मीं ह्मटलं. पण त्यांच्याकडून निरोप घेऊन कोणसा एक दूत आला आहे—

इं०—काय ? तिकडून निरोप घेऊन दूत आला आहे ह्मटलंस ! अग, पण हें कसं ? इथंच असून दूत कां बरं पाठवायचा.

चं०—ह्मणजे ?

च०—(चंपेस एकीकडे) अग, ह्मणजे काय ? बाईसाहेब मघापासून असंच करायला लागल्या आहेत. त्यांना कांहीं दिसलं कीं काय, काय कीं ? कांहीं दिसलंसं करून त्या " थांबा मी आलें. मला टाकून कां जायचं " असं ह्मणून त्या एकसारख्या त्या घों घों वाहणाऱ्या वाऱ्यालाच विचारित सुटल्या आहेत. एकन् दोन, काय करतात अन् कसं करतात, तें काय काय ह्मणून तुला सांगू ?

इं०—अग, तुह्मी दोघीजणी माझा हा असा अंत ग काय पाहतां?

चं०—बाईसाहेब, मी कांहीं खोटं नाहीं सांगत. बाहेर रमणक महाराजांच्याकडून एक दूत आला आहे; बोलावूं कां त्याला आंत ?

इं०—बोलाव पाहिजे तर–पण–

चं०—बाईसाहेब, हें कांहीं स्वप्न नव्हे. तुह्मी चांगल्या जाग्या आहांत. तो पाहिलांत का महाराजांच्याकडून दूत आला आहे. तो त्यांचा निरोप तुमच्याचजवळ सांगणार म्हणतो.

इं०—छेः छेः हें कुठलं संभवायला ? इतकं कुठं आहे माझं नशीब थोर ? माझं शांतवन करण्याकरितां ही तुझीच कांहीं तरी युक्ति दिसते आहे मला. (मेघवर्ण येऊन वंदन करतो).

चं०—इतकं कशाला ? माझ्यावर जर विश्वास नाहीं तर त्यालाच विचारा ह्मणजे झालं. तोच सांगेल सगळं आपल्याला.

इं०—(मेघवर्णास) अरे तूं कोण ? तुझं नांव काय ? तूं कोणाकडून आलास निरोप घेऊन ? सांग सांग; काय खरं आहे तें सांग. घाबरूं नकोस असा.

मे०—माझं नांव मेघवर्ण. मी दंडक अरण्यांतून रामगिरीहून आलों. आठ महिने झाले, तिथं कोणी एक मोठे राजयोगी आश्रम बांधून राहिले आहेत. त्यांच्याकडून मी निरोप घेऊन आलों आहे. त्यांचा माझ्यावर फार लोभ आणि विश्वास असे.

इं०—(स्वगत) खरंच, तिकड गेल्याला इतकेच दिवस झाले. ह्याच्या तोंडावरून हा लबाड असेलसें दिसत नाहीं. (उघड) काय ह्मटलंस, तुझ्यावर तिकडचा लोभ आणि विश्वास होता ? पण हें खरें कशावरून ?

मेघवर्णः—खरं कशावरून ? इथून जातांना तुमच्या वेणीवरची माळ त्यांनीं काढली होती का ? ते ह्मणाले कीं:-" प्रिये वेणीची काढिली माळ मीं साची " (इ० म्हणतो) याची तिला आठवण दे-ह्मणजे ती तुझ्यावर विश्वास ठेवील आणि इतकहि सांगून जर तिनं तुझ्यावर विश्वास ठेवला नाहीन तरः-" आम्हांला दोघांनाच ठाऊक असणाऱ्या " गोष्टी मी तुला सांगतों त्याची तिला आठवण दे ह्मणजे मग तर ती तुला आपल्या अगदीं जिव्हाळ्याचा समजेल.

इं०—(आनंदानें) तूं तिकडच्या इतक्या प्रेमांतला आणि विश्वासांतला असशील अशी मला कल्पना नव्हती. बोल अशा कोणच्या गोष्टी सांगितल्या आहेत तुझ्याजवळ ?

मेघ०—त्या मग एकीकडे सांगेन मी तुह्मांला.

इं०—हो गडे, इथं ह्या आहेत हें मी विसरलें होतें अगदीं बरं पण तिकडून आणखी कांहीं पत्र बित्र द्यायचं झालंय का ?

मेघ०—(स्वगत) हंः निर्जीव मेघाला निरोप सांगणारा पत्र कसच

देतों ! (उघड) पत्रवित्र कांहीं नाहीं. पण हो बरी आठवण झाली–त्यानीं आपल्या हातांतली मुद्रिका दिली आहे. आणि ही खुद्द तुमच्या हातांत द्यायला सांगितली आहे

इं०—(मुद्रिका हातांत घेऊन आनंदानें) चंपे, तुझा मीं उगाच संशय घेतला.

चतु०—तरी म्हटलं—

इं०—ही पहा प्राणनाथाची ही नीळ मण्याची मुद्रिका. शनीची बाधा होऊं नये म्हणून जातांना मी मुद्दाम तिकडच्या हातांत घातली होती. तीच नव्हे कां हीं ? तुला ओळखली नाहीं वाटतं ?

चं०—हो तीच, तीच ही. न ओळखायला काय झालं ?

इंदि०—बरं पण अरे मेघकर्ण–

चंपा०—(हंसून) मेघकर्ण ! मेघकर्ण नव्हे; मेघवर्ण तो. होय नारे ?

मेघ०—होय, मला मेघवर्ण म्हणतात.

इंदि०—अरे, पण तुला इथली वाट कशी सांपडली. अथवा हें काय मी विचारतें आहे याला. तिकडूनच सांगायची झाली असेल ती याला. बरं पण तिकडची प्रकृति कशी आहे ? आणखी कांहीं निरोप सांगितला आहे कीं नाहीं तुझ्याजवळ ?

मेघ०–प्रकृति अगदीं तुमच्याचसारखीच आहे. आणि निरोपहि पण सांगितला आहे.

इंदि०—(उत्सुकतेनें) काय–काय सांगितला आहे निरोप ?

मे०—तो इथं नाहीं मी सांगत आपल्याला, योगीराजांनीं तो आपल्याजवळ कोणी नाहींसें पाहून सांगायला सांगितलं आहे.

इं०—(दासीकडे पाहून) तुम्ही जा ग इथून आपल्या उद्योगाला.

चं०—खरंच, आतां कशाला हव्या आह्मी जवळ. चल, गडे च-

तुरिके. आपण अशा आड होऊन ऐकूं, हा काय सांगतो तें. (जातात).
(मेघवर्ण इंदिरेस निरोप सांगूं लागतो इतक्यांत मदनसुंदर एकीकडे येऊन उभा राहतो.)

मे०—हो पण—(शेला पुढें करून) खुणेकरितां म्हणून हा शेला मीं मुद्दाम आणला.

इं०—(शेला हातांत घेऊन) इतक्या खडान् खडा खुणा सांगितल्यावर मग आणखी हा शेला कशाला द्यायला पाहिजे होता ?

मद०—(पडद्याचे बाजूस येऊन स्वतःशींच) हा कोण बरं? रमणक मेल्याची बातमी साऱ्या अलकेभर अगदीं दाट पसरली जाऊन त्याबद्दल सर्व अलका हळहळत असतां हिला त्याबद्दलचं काडी इतकं देखील दुःख होऊं नये ह्मणजे मोठं नवलच ह्मणायचं ! छेः रमणक गेल्यापासून ही काय पण शोक करित होती! पण तो मेल्याची बातमी हिनं ऐकलीन् मात्र, तोंच या गुलजार तरुण पुरषाशीं हिचं हितगुज आणि गुजगुज सुरूं झालं, तेव्हां काय ह्मणावं तरी काय असल्या या स्त्रियांच्या प्रेमाला ? एकूण यांचं प्रेम सारं वर वर असतें तर? इतके दिवस ही पतिव्रता असेल, ह्मणून मी उगीच फार भिऊन वागलों तर! पण आतां यापुढें ह्याला हीच तोड.

इं०—(कांहीं ऐकलंसं करून) आणखी काय सांगितलंय ?

म०—(कांहीं पुढें होऊन) हा कोणी तरी यःकश्चित् दूत दिसतो आहे. आणि याच्याशीं ही किती बेसुमारपणानं खिदळते आहे पण ?

इं०—(कोणी आल्याची चाहूल ऐकून) मेघवर्ण, चल ये इकडे. नाहींतर आड आजूबाजूस कोणी दासी बिसी असतील.

मद०—अरे, अरे, काय नीचपणा हा ! ही भर दिवसां याला एकीकडे नेत आहे !

मे०–(मदनसुंदरास पाहून व त्याला ओळखून) हें कोण येतंय पण इकडे?

इं०–तो कां? मदनसुंदर ह्मणून आहे एक तो तिकडचा स्नेही. मूळचा तो तिकडचा रामगिरीचा कां पंचवटीचा कुठलासा आहे.

मे०–नांव काय ह्मणालांत त्याचं?

इं०–त्याचं नांव मदनसुंदर–कां बरें? तूं त्याला इतका निरखून्सा बघतो आहेस! त्याचीन् तुझी कांहीं ओळख बिळख आहे कीं काय? हाक मारूं कां त्याला इकडे?

मे०–हे ओळखीचेसे दिसतात खरे. पण इतक्यांत नाहीं मला ओळख द्यायची. आंत चला याला भेटायच्या अगोदर. यांच्याविषयीं मला कांहीं सांगायचं आहे तुह्माला. (बाजूस होऊन पटका काढून) हें पहा, आतां काय सांगू मी कर्मकथा? मी स्त्री आहें, पुरुष नव्हें. माझं नांव मदनिका. रामगिरीहून इथवर येतांना नसतीं संकटें ओढवतील ह्मणून मला हा वेष घेणं भाग पडलं. आतां यांचं माझं नातं आपल्याला मी काय सांगूं? (लाजते.)

इं०–(साश्चर्य) तर मग हे मदनसुंदर आपलें यजमान वाटतं?

मे०–होय–पण तिकडे याबद्दल इतक्यांत ओळख नाहीं द्यायची मुळीं देखील. अणखी हें पहा, आपल्या दासींना सांगून ठेवा अगोदर, कीं यांनीं विचारपुस केली तर मी रामगिरीहून आल्याचं मात्र सांगूं नका त्यांना ह्मणून. दुसरी कडून कुठून तरी आल्याचं सांगा ह्मणावं.

इं०–(जाते व दासींशीं कुजबुजते व हळूच) माझ्या माहेराहून आलाय ह्मणून सांगा म्हणजे झालं. (तावदान लावून घेते.)

म०–(आपल्याशीं) छे: हिनं हें दार सुद्धां लावलंन्. खचित इथं कांहीं पाणी मुरंतय–मला संशय आलेला अगदीं खरा. (विचार करून

हं असंच. असंच करावं. अगोदर हा कुठचा कोण हें तरी इच्या दासीकडून काढून घ्यावं. चंपावती, चंपावती:—

चं०–(प्रवेश करून) कां कुणीकडे सुंदर.

मद०–नाहीं, इकडेच आलों होतों. कोणी पाहुणे आल्या सारखें वाटलें म्हणून म्हटलं विचारावं कोण आलंय तें ?

चं०–बाईसाहेबांच्या माहेराकडचा एक परिचारक कांहीं निरोप घेऊन आला आहे.

मद०--अस्सं ! तरी म्हटलं कोण आलंय? (आपल्याशीं) मग ठीक आहे. आतां मात्र जुळतंय सारं. काय पहा, याला इच्याशीं एकीकडे बोलतांना पाहिलं मात्र; तोंच माझ्या मनांत किती शंका आणि कुशंका आल्या. (उघड) संभाळा हो वहिनींना. नाहीं तर रमणकाची बातमी ऐकून त्या जिवाला भलतंच कांहीं तरी करून घ्यायच्या. रमणकाच्या संबंधाची ही बातमी बहुश: खोटी असेल. मला वाटतं त्या मधुकराचीच ही मूर्खपणाची कांहीं तरी शक्कल असावी. येतो तर मी आतां. (जातांना आपल्याशीं)–आतां आपल्या संबंधानं यांना संशय यायला कसा तो काडीभर दे[illegible] मार्ग ठेवला नाहीं. (मेघवर्णास उद्देशून आपल्याशीं.) हें एक नवीनच पात्र आलं आहे आपल्या हातीं. याला पैशाची लालूच दाखवून घेतला आपलासा करून कीं झालं. (जातो.)

मे०–पण मी बायको आहें हें तुह्मीं आपल्या दासींना देखील कळूं देणार नाहीं म्हणून वचन द्या मला अगोदर.

इं०–अग नाहीं मदनिके. खचित नाहीं कळवणार, मग तर झालं ना?

मे०–पण हें पहा–मला हाक मारायची ती आतां मारलीत तशी

चुकून सुद्धां पुन्हां नाहीं मारायची. मला आपला मेघवर्णच म्हणा. नाहींतर घोटाळा होईल.

इं०—छे: अशी कशी पण हाक मारीन मी?

मे०—नाहीं म्हटलं आपलं चुकून व्हायचं असं. म्हणून म्हटलं आधीं सुचवून ठेवावं तें बरं.

इं०—त्या पहा चंपा आणि चतुरिका इकडंच आल्या. (दासी आल्यावर) चंपे, चतुरिके, या मेघवर्णाची नीट व्यवस्था ठेवा बरं का ? हें पहा मघाशीं जें मीं तुम्हांला सांगितलं कीं " हा माझ्या माहेरून आला" म्हणून सांगा म्हणून, याचं कारण येवढंच कीं, तिकडच्यासंबंधानं आणखी काय काय बातमी पसरते, अन् ती कोठून पसरते, हें हुडकून काढावं. तर समजलं का ? ही बातमी कोणी पसरली याचा चांगला गुप्तपणानं तपास करून पत्ता लावा.

चं०—तो सुंदर आला होता, तो असं म्हणाला कीं ही कंडी पिकविण्याच्यासंबंधानें बहुधा त्या मूर्खशिरोमणी मधुकराच्याच तोंडांतून हे तारे तुटले असले पाहिजेत. मेल्याची इतकी फजिती झाली तरी अजून लाज नाहीं वाटत !

इं०—(आश्चर्यानें) असेल. असंहि असेल कदाचित् नाहीं ग, ? मला नाहीं आतां असल्या कंड्यांचं भय वाटत. इतकंच नव्हे पण—

पद—चाल. (गुण गंभीरा तूं गुणीरे)

मूर्तिमंत निर्दयता ती आतां येऊं दे गे ॥ राक्षसीण छळिते कैशी तेंच पाहतें गे ! ॥ प्राणनाथ—निधनाची ती अवघी लोकवार्ता ॥ आज पूर्ण मिथ्या ठरली साह्य ईश तो गे ॥ शेष मास विरहाचे ते कंठण्या मला गे ॥ धीर येत सोशिन आतां घोर संकटा गे ॥ ७ ॥

चतुरिके, तूं केलिवनांत जा आणि पूजेकरितां चार फुलं वेऊन

ये. आणि चंपे, तूं मालतीकडे जाऊन तिला ह्मणावं अशी दुपारची जेवण खाण झाल्यावर घटकाभर येऊन जा. म्हणजे मधुकर ह्या आफवेसंबंधानं घरीं काय म्हणत होता काय नाहीं तें सारं समजेल.

चंपाः–(स्वगत) तिकडची हकीकत विचारायची असेल ह्मणून आम्हाला इथून घालवायची ही युक्ती! (उघड) चल, चतुरिके चल. तूं जा केलिवनांत आणि मीं जातें मालती बाईकडे—(दोघी जातात.)

इंदिराः–सखे मदनिके, या विरहामुळें तिकडची कशी काय अवस्था झाली आहे तें सांग पाहू मला आतां. आतां इथं आपण दोघी च दोघी आहोंत.

मद०–आणि येवढ्याच कारितां त्या दोघींची बोळवणूक केली वाटतं?

इंदि०–कांहीं म्हण बाई. पण गडे, तिकडं अगदीं वाळून जायचं असेल नाहीं! कारण आमचं प्रेमच तसं होतं–मला सोडून एक घटकाभर जायचं देखील जिवावर येत असे.–हं सांग–सांग तर.

मद०–(सुस्कारा टाकून)

पद–(चाल–मी तप्त जरी मदन शरें०)

मी काय वंदू विरहिजनस्थिति सखे तुला ॥ तव कांत-वदनचंद्र भक्ष्य विरह–केतुला ! ॥ ध्रु० ॥ हस्त वलय गळुनि पडुनि रिक्त जाहला ॥ मंद मंद पवनहि दे पतन त्याजला ॥ भ्रंशित मति होय असा मजशि भासला ॥ बघुनि घना आर्द्र, तया दूत कल्पुनी ॥ त्याजपाशिं तुज निरोप सांगु लागला ॥ १ ॥

इंदिराः–अगबाई, एकून नाथाची अशी स्थिति झाली आहे तर !

मद०–अग अशी स्थिति ह्मणून काय विचारतेस?

पद.

(" घन निर्जिवहें विसरोनी " इत्यादि पद ह्मणून)

पण केव्हां केव्हां चांगला शुद्धीवर असतो. एकदां शुद्धींत असतांना तर—

पद.(चालः–प्रियवर माझे॰)

स्नेहध्वंसी विरह असे तो जन जगतीं वदती ॥ असत्य परि तें! विरहें वर्धन पावतसे प्रीती ॥ ध्रु॰ ॥

असं म्हणाला तो:

इंदिराः–प्रीति वाढते आणि भेटीची उत्कंठाहि पण बळावते. पण सखे–(डोळ्यांत अश्रू येतात) माझ्यापेक्षांहे कां तिकडची प्रकृती क्षीण झाली आहे?

मद॰—सखे हें काय विचारतेस? पण तूं डोळ्यांतून पाणी नको काढूंस असं. अग—

(तेंच पद पुढें चालू.)

॥ विरहें कृश तूं झालिस तोही अधिकचि कृश सुदती ॥

इंदिराः–(मुस्कारा टाकते) सखे, हाय हाय!

मद॰–अग–**दीर्घश्वासां टाकिशि तूं, तो टाकित त्या न मिती॥**
उत्कंठित तूं, अत्युत्कंठित तो भ्रमतो चित्तीं ॥

इंदिराः–हा भ्रम मात्र फार वाईट गडे!

मद॰–**तन्नयनाचें जल न खळे सखि, नयनहि तव सुजती ॥**

इंदिराः–तर मग या विरहानं माझ्यापेक्षां तिकडचाच जास्त छळवाद मांडला आहेन म्हणायचा! हें दुर्दैव म्हणायचं अन् दुसरं काय? त्याच्यापुढें कोणाचं काय चालणार आहे!

मद॰–**दैव वैरि जरि रुद्ध मार्ग करि कोठुनि मग सुगती ॥**
प्रिया स्मरुनि मनिं विरही दयिता आलिंगन देती ॥१॥

आणि त्याची अशी स्थिती तर कितिकदां होते. तो इकडून जाणारा वारा तुझ्या अंगाला स्पर्श करून आला असेल अशा भावनेनें

मोठ्या प्रेमानें आपल्या अंगावर घेतो. चुकून रात्रीचा कोठें डोळा लागलाच तर स्वप्नांतच तुला पाहून, तुला दृढ आलिंगन देण्याकरितां तो आपले हात नुसत्या आकाशांतच तुझा कंठभाग आहेसं कल्पून टाकूं लागतो. एखाद वेळेस विरहानं तुझी कशी अवस्था झाली असेल याची कल्पना करूनच तो तुझं चित्र काढूं लागतो आणि गतविलासांच्या स्मृतीनं त्याचा कंठ दाटून येऊन त्याचे डोळे भरून येतात अन् तूं त्याला दिसेनाशी होतेस, तेव्हां तुझा चित्रांतला दर्शनलाभ सुद्धां दैव घडूं देत नाहीं म्हणून तो ढळढळा रडूं लागतो ! तुझ्या विरहामुळं त्याची ही अशी अवस्था झाली आहे !

इंदिराः—एकून माझी अन् तिकडची दोघांचीहि सारखीच अवस्था झाली आहे म्हणायची तर ! बरं पण सखे मदनिके, तूं तिकडून सांगणं झालेल्या आम्हांला दोघांनाच ठाऊक असणाऱ्या गोष्टी, मग एकीकडे सांगेन म्हणालीस, त्या कोणच्या गडे ?

मद०—सखे ऐक. ("स्वप्नीं अवचित ओरडुनी" ! इत्यादि पांचव्या अंकांतील पद्य म्हणते)

इंदि०—(साश्चर्यानें) अग, पण तूं बायको माणूस असून तुझ्याजवळ असल्या एकांतांतल्या विनोदाच्या गोष्टी इतक्या निर्भिडपणानं कसं सांगणं झालं ?

मद०—(हांसून) हो पण तूं म्हणतेस तें खरं सखे. (कोणी येत आहेसें पाहून) ही कोण चतुरिका आली वाटतं. चल, आपण आंतच जाऊन बसूं म्हणजे तुला कसं आणि काय तें सगळं सांगतें. आणि त्याचा निरोपहि पण सांगतें.

इंदि०—थांब. शापकाल संपायला अजून किती दिवस उरले ते विचारतें ह्या माळेला.

(दरवाजांत टांगलेल्या माळेस उद्देशून) गडे—

पद.

शापकाल संपाया असत किती दिवस मालिके ? ॥
माझ्या परि म्लानचि तूं दिसशि मजशि मन-विमोदिके ॥
(फुलें मोजून, व कांहीं ऐकल्यासें करून)
काय वदशि,-" मास दोन असति अजुनि, धीर दे मना." ! ॥

मेघवर्णः--(स्वगत) त्याच्याशीं मेघ बोलतो आणि हिच्याशीं ही निर्जीव माळ बोलूं लागते. तेव्हां काय म्हणावं या प्रकाराला ?

इंदिरा--

देइन, परि रक्षुं प्रिया श्रीहरि तो हीच प्रार्थना. ॥ १ ॥
[दोघी जातात.]

' दूतागमन ' नामक सहावा अंक समाप्त.

अंक ७ वा.

—※—

प्रवेश १ ला.

स्थळ—इंदिरेचें मंदिरांतील एक भाग.

प्रवेश—इंदिरा व मेघवर्ण बोलत आहेत.

इंदिरा——अगबाई, ते पहा तिकडून तुझे यजमान येताहेत.

मेघ०—(पाहून) हो खरंच कीं! तर मग तुह्मी आतां अगदीं आड उभ्या रहा, अन् काय गम्मत होते ती पहा मुकाट्यानं (आपल्याशीं) शिव शिव, काय नीचपणा हा ! (इंदिरा आड होते.) असलं मनुष्य ताळ्यावर यायचं म्हणजे जरा कठिणच. तरी पण चारचौघांत एक दोनदां जर असल्या मनुष्याची चांगली फजिती झाली तर मात्र कदाचित् आलं ताळ्यावर तर यायचं एखाद वेळेस ! नाहीं, पण आलीच कीं ही स्वारी इकडं. आजहि हातातनं कांहीं जड आणलंच आहे. पैशानं काय वाटेल तें साध्य होतं असंच वाटतंय इकडे ! तर हें सोनं पाहून आपणहि फार खुशालल्याचंच दाखवावं म्हणजे आपल्या संबंधानं तिकडे एका काडीचा देखील नको संशय यायला. (आपल्या हातांतील सुवर्णकंकणाकडे पहात वेड्यासारखी उभी राहते.) [मदनसुं० प्रवेश करतो].

(मेघवर्णाला पाहून आपल्याशीं)

मदनसुं०— **पद.**

या जगांत नंदिबैलवंशवृक्ष वाढला ॥ मंदबुद्धि पुत्रपौत्र वृंद जगतिं पसरला ॥ ध्रु० ॥ गुबु गुबु गुबु करुनि यांस नादिं लावितां ॥ तुकविति हे पुच्छविहिन मान तत्वता ॥ मोडुनिया पाद, नमिति; स्मरुनि नंदिता ॥ कार्य कुशल नादविदां प्राणि नविन लाभला ॥ १ ॥

मदनसुं०—हा बैलोबा मीं दिलेल्या त्या कड्याकडे राहून राहून-पाहून आपल्याशींच हंसतो आहे. ह्या वेळीं ह्याच्या तोंडावर हर्षविकार कसे अगदीं स्पष्ट दिसताहेत. हा या वेळीं बहुतकरून माझ्यापासून आणखी काय कायउपटावं या विचारांत असावा! त्याशिवाय हा कुठला असायला इतक्या आनंदांत! घे, घे म्हणावं वाटेल तितकं घे माझ्याकडून, मधुकराच्या घरीं आज जी जी चीजवस्त आहे ती सारी तुझीच आहे म्हणून समज. हंः घी बघितलं आहेस पण बडगा कुठं बघितला आहेस म्हणावं अजून! शेवटीं मधुकराच्या इथली चोरी केल्याचं त्याच्याकडून तुझ्यावर किटाळ आणलं म्हणजे मग समजेल म्हणावं हा आजचा आनंद कसा काय आहे तो! बस्स, हीच हीच युक्ती.! (जवळ जातो.)

मेघ०—(त्यांजकडे चोरून पाहून आपल्याशीं) स्वारी आपल्याच आनंदांत गर्क झालेली दिसते.

मदन०—कोण ते? मेघवर्ण?

मेघ०—होयं मीच आहें तो आपला सेवक.

मदन०—अरे- पण तुझ्या त्या बाईसाहेब कुठं आहेत?

मेघ०—कोण? बाईसाहेब कां? त्या क्रीडाशैलावर कैलासनाथाच्या दर्शनाला गेल्या आहेत.

मदनसुं०—अस्सं, अन् तिच्या दासी?

मेघ०—त्याहि मला वाटतं त्यांच्याच बरोबर गेल्या आहेत. नाहीं, पण मला वाटतं बाईसाहेबांनीं एकट्या चतुरिकेलाच आपल्या बरोबर नेली आहे; अन् ती चंपा गेली असेल त्या मालती बाईच्या इथं.

मदन०-एकून दुसरं तिसरं कोणी नाहीं ह्मणतोस तर इथं? बरं, पण तूं कांहीं थोडासा तरी अंदाज काढलास कां? (एक मोत्याचा हार देतो.)

मेघ०—(हंसतो) हें काय पण महाराज मला उगीच ! माझ्या हातून आपलं काम रेटेलसं नाहीं वाटत मला. अन् मग मला कशाला हें उगीच !

मदन०—अरे, हें आपलं मुकाट्यानं घे तूं. एवढ्याचकरितां हें मीं तुला दिलं असं नको समजूस तूं. पण कायरे, तिच्या जवळ तूं या संबंधानं नुसती गोष्ट तरी काढली होतीस का ?

मेघ०—छे छे ! बाईसाहेबांच्या पुढें ती गोष्ट काढायची म्हणजे आपल्याला कसंसंच होतं !

मदन०—हंः वेडा आहेस तूं वेडा ! तुझ्या या भित्रेपणामुळंच तर हें असं होतं अन् दुसरं काय ? अरे परवां तिनं मधुकराला लिहिलेलं तें पत्र दाखविलंना मीं तुला ! मग ती कशी असेल काय असेल, याच्याबद्दल शंका घ्यायचं तुला कांहीं कारण ? हंः ! इतकी खात्री झाल्यावर तूं अशी काचकूच करावीस याचं कारण नाहीं समजत आपल्याला.

मेघ०—काचकूच ! हें पहा, हें पत्र कुणी तरी दुष्ट पणानं त्याच्यावर भलतंच कुभांड घेण्याकरितां त्यांच्या अक्षरासारखं अक्षर काढून लिहिलेलं असलं, आणि असं असून त्यांच्या जवळ जर याबद्दल मीं गोष्ट काढली तर काय भयंकर प्रसंग गुजरेल ! (डोळ्यांला किंचित् पाणी आणून) अन् या गोष्टीचा खुद्द माझ्याच संबंधानं मला एकदां पक्का अनुभव येऊन चुकला आहे. आणि आतां तरी—

मदनसुं०—तो काय बुवा ?

मेघ०—तो काय ह्मणून काय सांगूं ? पण एकदां असा झालं—माझी बायको वाईट चालीची आहे असा मला कठं थोडा संशय आला. संशय घ्यायला वास्तविक कांहींच कारण नव्हतं; पण तेवढंच मला पुरलं. तेवढ्यावरून मीं तिचा छळवाद करायला आरंभ केला. तिला

वारंवार टोंचून बोलावं, ह्मणावं, मारावं, इतकंच करून नाहीं मी थांबलों. तर तिला जवळपास कोण आहे कोण नाहीं हें कांहींएक न बघतां नाहीं नाहीं त्या शिव्या देखील देऊं लागलों. शेवटीं माझ्या त्रासाला कंटाळून तिनं एक दिवस माझ्या निरर्थक संशयाबद्दल माझी पुष्कळ कानउघाडणी केलीन्. तरी देखील तिकडे कांहीं लक्ष न देतां मी तिला " जा कुठं तरी आपलं काळं तोंड घेऊन, याउपर तें मला दाखवूं सुद्धां नकोस, " असं म्हणून तिची मीं निर्भर्त्सना केली. पण ह्याचा शेवट काय झाला! तिनं जाऊन आपल्याला गंगेंत घालून घेतलन्. मग पुढें कळलं मला कीं—तो माझा संशय व्यर्थ होता म्हणून हें कळल्यावर मला झाल्या गोष्टीबद्दल इतका कांहीं—

मदनः—अरे अरे अरे! एकून अशी माउली होती ती अन् तूं तिचा असा छळ केलास! मेघवर्ण, जगांत अशीं उदाहरणं ह्मटलीं ह्मणजे अगदींच थोडीं असायचीं. अन् तूं सांगतोस अशा माउल्या तर फारच थोड्या. ह्या जगांत तुला लुच्चेगिरी आणि लबाडीच फार आढळेल. इतकं लांब कशाला? हें माझंच उदाहरण पहाना. हें तुझ्या उदाहरणाच्या अगदीं उलट आहे, माझी बायको ह्मटली ह्मणजे मोठी नतद्रष्ट, दुष्ट—

मेघवर्णः—हं एकून आपल्याला बायकोसंबंधानं घरचं कांहींच सुख नाहीं ह्मणतां! अरेरे! तर मग आपणहि माझ्यासारखेच दुर्दैवी ह्मणायचे एकून! ईश्वरानें मला चांगली सुशील बायको दिली असून ती मी होऊन आपल्या मूर्खपणानं गमावून बसलों ह्मणून मी, अन् तुमची बायको तुह्मी ह्मणतां अशी नतद्रष्ट आणि दुष्ट आहे ह्मणून तुह्मी, एकून दोघेहि सारखेच दुर्दैवी! पण आपली बायको आहे तरी कुठं?

मदनसुं०—कोण माझी बायको जिवंत? हंः ती कध्धींच आटपली. ती

सध्यां यमलोकांत असेल. अन् मला वाटतं तिला यमाजी भास्करानं भयंकर कुंडांत टाकलं असेल; अथवा तापलेल्या तव्यावर उभी करून तो तिला सर्पाच्या चाबकानं मारीत असेल; अथवा जाराच्या गळ्याला आपल्या हातानं विळखा घालणाऱ्या त्या जारिणीली तो लोखंडाच्या तप्त खांबाला विळखे घालायला लावीत असेल !

मेघवर्णः--(आपल्याशीं) शिव शिव इथं तर कळसच झाला ! (उघड) काय तर मग आपली बायको मेली ह्मणतां! अरेरे ! मला वाटतं माझ्यासारखाच हा गैर समज होऊन आपणही कर्मदशा मुद्दाम–निव्वळ संशयानं–आपल्या हातानं ओढवून आणली असावीत. आणि आपल्या बायकोवर आपण अजाणता हा खोटाच दोषारोप करीत असाल.

मदनसुंदरः–अरे,— **साकी.**

करगत रत्ना फेंकुनि करि जो आदर त्या कांचेचा ॥ सकलहि त्रिभुवनिं नसे असा कुणि पढतमूर्ख साचा ॥

मेघ०–रत्ना कांचेची पारख, अंधजना कैचीं ॥ १ ॥

मदनसुंदरः--एकून मला अंध ठरविलंस ?

मेघवर्णः--ज्यांना विचार नाहीं ते अंधच. मला वाटतं तुमची बायको माझ्या बायकोसारखीच सुशील असली पाहिजे (आपल्याशीं) पाहूं आतां काय ह्मणते आहे स्वारी.

मदनसुंदरः--छे, छे, छे, तूं ह्मणतोस त्याच्या अगदीं उलट. तुझी बायको जितकी चांगली आणि सुशील होती असं तूं ह्मणतोस तितकी माझी वाईट आणि दुःशील होती. तिच्यासारखी तोंडाळ, कजाग, भांडखोर, चहाडखोर, चोर, छिनाल, शिंदळ, आणि माणसांतून उठलेली—

मेघवर्णः—(एकीकडे) शिव शिव ! काय भयंकर शब्द ऐकते आहें मी हे !

मदनसुंदरः—अशी तीच ! आणि ह्मणूनच मला तरी इथून तिथून सारी स्त्रीजात घातकी, कपटी, मायावी, साहसी आणि दुष्ट अशी वाटते. आतां तूं ह्मणतोस अशा तुझ्या बायकोसारख्या माउल्या मात्र फारच विरळा. अशासारख्या स्त्रीला मी आपली माउली असं समजून मी तिचे पाय धरीन, तिच्यापुढें लोटांगण घालीन, तिची काय वाटेल ती सेवा करीन, पण माझी बायको आणि ह्या इंदिरेसारख्या बायका यांच्या संबंधानं मात्र माझ्या मनांत एक काडीभर देखील पूज्यबुद्धि उत्पन्न व्हायची नाहीं. आणि ह्मणूनच तर मी हिच्या हा असा नादीं लागलों आहे. तर हें पहा–(त्याच्या हातांत आणखी एक कडें चढवितो) एवढ्या कामांत कसंहि करून मला तूं आपली मदत कर; तुझे उपकार मी कधींहि विसरणार नाहीं.

मेघ०—पण–

मदनसुंदरः—आतां हें पण नको; पण उलट ही कामगिरी उरकण्याचा तूं पण कर. (इकडे तिकडे पाहून) त्या संबंधानं तुला भिण्याचं बिलकूल कारण नाहीं. हें पहा थोडा धीर, थोडी छाती, थोडं धोरण आणि थोडी अक्कलहुषारी असली कीं झालं; मग हेंच काय पण असलीं शेकडों कामं-एवढासा सुद्धां बोभाट न होऊं देतां– हवीं तशीं पार पाडतां येतील. अन् हें पहा एवढं कां काम तूं पार पाडलंस ह्मणजे तुझं अन् तुझ्या पोराबाळाचं दरिद्र–अगदीं जन्माचं दरिद्र–अज्जिबात नाहींसं झालं ह्मणून समज. अगदीं ह्या घटकेपासून ही तुझी भिकार सेवकवृत्ति जाऊन उलट तुझ्या हाताखालीं आणखी दोन चार नोकरमाणसं तूं हाक मारल्याबरोबर तुझ्या सेवेला अगदीं झुलतीं राहतील. बोल. तुला हें पत्करतं कीं आपलं तंगड्या तोडीत

निरोप ने आण करणं पत्करतं ?

मेघवर्णः--आपल्या हाताखालीं जर चार नोकरमाणसं येत आहेत तर तें सोडून उगीच तंगडया तोडीत जाणं कोणाला पत्करेल!

मदनसुंदरः--होयना, मग कां उगीच आढेवेढे ? हें एवढं काम उरकलं कीं तूं नुसता राजा बनलास ह्मणून समज ! बोल, मग आहे कीं नाहीं हें तुला कबूल ? असेल तर आजपासून—आजपासून का या घटकेपासून—लागलं पाहिजे तुला आपल्या कामाला. तरच तुला तिचं मन वळवतां येईल. तूं तिच्या माहेरचा आहेस, अन् तुझी आई तिची दाई होती, त्या अर्थीं तुला प्रसंग पाहून तिच्याशीं वाटेल तसं बोलायला कांहीं विशेष भीति बाळगण्याचं कारण नाहीं. (विचार करून) अन् समज तूं कांहीं विचारलंस आणि यदा कदाचित् ती उलटलीच तुझ्यावर, तर वेळ कशी मारून न्यायची हें कांहीं तुला सांगायला पाहिजे असं नाहीं. अशा वेळीं नुसतं आपलं तुझं मन पाहण्याकरितां बोललों, असं म्हटलंस कीं तूं मोकळा झालास ह्मणून समज. (कोणी येत आहेसें पाहून.) हें पहा इकडे कोणी येत आहे, अरे ही चंपा ! मी येतों तर आतां. मात्र सांगितलेलं नीट लक्षांत ठेव, समजलं ?

मेघवर्णः--मी माझ्याकडून होईल तेवढा प्रयत्न करीन. मग काय होईल तें होवो; त्यांत मग तुमचं नशीब अन् दुसरं काय सांगूं मी ?

मदन०—मात्र आपल्याकडून नको कांहीं तूं कसूर करूंस. ह्मणजे नव्याण्णव हिश्शानं काम पार पडलंच ह्मणून समज. आलीच ही. येतो तर मी आतां (जातांजातां आपल्याशीं.)

पद.

मूठ दाबुनि प्रथम थोडी । लावुनी जनिं अल्प गोडी ॥
काढुनीनें सकल कार्या । कार्यपटु तो सहज जोडी ॥१॥

जगिं असाध्य न कार्य एकहि। तत्व ज्या हें जुळत नाहीं ॥
दाबल्याविण पक्व फलही । देत नाहीं रस कधींही ॥ २ ॥
(इंदिरा पुढें येते.)　　　　जातो.

मेघवर्णः—बघितलीत एकदां सगळी गम्मत. असं मनुष्य निसवलं ह्मणजे तिथं काय करायचं बाई माणसानं !

इंदिराः—काय पण नीचपणा हा ! मी समजत असे कीं तो एक मधुकरच नीच असेल. पण यानं तर बाई कळसच करून सोडलान्.

मेघ०—पण आतां ज्याचे दांत त्याच्या घशांत घालायला काय युक्ति? असल्या मनुष्याची चांगली फजिती झाल्याशिवाय नाहीं तें ताळ्यावर यायचं !

इंदिराः—इतकं कशाला. पुन्हां तो आला इथं ह्मणजे त्याच्या तोंडांत मी चांगलं शेण घालतें.

मेघ०—मात्र मी अमकी आहें हें मात्र नाहीं तिकडे कळूं द्यायचं. काय बाई चमत्कार तरी माणसाचा—मी मेलें ह्मणून तर सांगितलं; मला शिव्या तर दिल्या. माझ्यावर नाहीं नाहीं ते आरोप घेतले. काय बाकी ठेविली आहे माझी ? (रडूं लागते) आई, आई जगदंबे, काय हें ? गांठ पडण्याचा सुद्धां संभव नव्हता, पण ती सुदैवानं—सुदैवानं तरी कशी ह्मणूं ! हें सुदैव कीं दुर्दैव हें माझं मलाच कळत नाहींसं झालं आहे !

इंदिराः—मदनिके, तूं अशी दुःखी होऊन रडूं नकोस उगीच. त्याचे चांगले कान उपडतें मी, हें पहा तूं आतां असं कर कीं, मालती बाईकडे जा आणि त्यांना मीं अम्मळ बोलावलं आहे ह्मणून सांग. (मदनिका जाते.) अग ए चंपे, त्या कमलेच्या पिंजऱ्यांत कांहीं आहे कां नाहीं—कांहीं पाहिलंस का ? ती कां बरं आज अशी आरडते आहे मघापासून ? मुक्या प्राण्याच्या पोटाकडे आपण स्वतः

पाहिल्याशिवाय कांहीं नाहीं. (जाते.)

मेघ०—(जातां जातां) हो बरं सुचलं हें. असंच करावं. तिकडे इंदिराबाई तुम्हांला वश आहेत म्हणून कळवावं, अन् त्या आपल्या विलासमंदिरांत एकट्याच आहेत असं पाहून तिकड आंत जायला सांगावं. म्हणजे बाईसाहेब तिकडच्या नीचपणाबद्दल मग यथास्थित समाचार घेतील! अन् मागोमाग इकडून चंपेला अन् चतुरिकेला बाईसाहेबांच्या खोलींत–कोणी चोर शिरला म्हणून, नाहींतर दुसऱ्या कसल्यातरी निमित्तानं द्यावं पाठवून म्हणजे तिकडची चांगलीच फजिती उडेल. असंच, असंच करायचं तर. (जाते.)

प्रवेश २ रा.

स्थल–उपवनाचा बाह्य प्रदेश.

प्रवेश–चंपा निरखून पहात आहे.

चंपा:—ही कोण बरं येते आहे इकडून? चतुरिका! बरं आहे तर! हिची आतां चांगलीच फजिती करावी. हा मेघवर्ण त्या मदनसुंदराची बायको आहे, हें कांहीं हिला माहित नाहीं! तर हिला चांगलीच फशिवतें एकदां! म्हणजे होस हो करण्याची हिची खोड तरी मोडेल थोडीशी. (चतुरिकेला) कोण तें? चतुरिकाच कां! मीं म्हटलं दुसरंच कोणी आहे. पण चतुरिके, कुठून आलीस तूं? बाईसाहेबांच्याकडूनच कीं काय?

चतु०—हो तिकडूनच.

चं०—चतुरिके, काय करावं बाई, किती म्हणून समजूत करावी माणसानं त्यांची? काय तो त्यांचा शोक! डोळ्यानं पाहवत नाहीं कीं कानानं ऐकवत नाहीं!

चतु०—खरंच बाई राहून राहून रमणक महाराजांची आठवण काढतात आणि एक सारखं डोळ्यानं पाणी गाळतात!

चंपा०—पण तूंच बघ कीं महाराज जर आतां लौकर परत यायचे आहेत तर आतां काय बरं झालं इतकं दुःख करायला ?

चतु०—मी तरी तेंच ह्मणतें.

चंपाः—अग माणसानं थोडा तरी मनाला आळा घालावा कीं नाहीं ?

चतु०—हो, घातला पाहिजे तर !

चंपा०—अन् जें घालणार नाहीं तें मग माणूस कसलं ?

चतु०—नव्हेच माणूस तें ! कोण म्हणेल माणूस त्याला !

चंपाः—पण (इकडे तिकडे कोणी नाहींसें पाहून) गडे चतुरिके, बाईसाहेबांच्या वृत्तींत अलीकडे तो मेघवर्ण आल्यापासून कांहीं फरक वाटतो कां तुला ?

चतु०—हो तर. वाटतो म्हणून काय विचारतेस ? आहेच फरकनी !

चंपाः—तर मग तुझ्या सुद्धां लक्षांत आलाना तो फरक एकुन ?

चतु०—हो आला म्हणजे ? मी माणूसच आहें ना पण ! तो आल्यापासून त्यांना अंमळ बरं वाटतं.

चंपाः—हो न वाटायला काय झालं, तसाच आहे तो.

चतु०—हें तर खरेंच.

चंपा—काय त्याची बरदास्त नि काय त्याची बडेजाव !

चतु०—हो नको कां ठेवायला तर !

चंपा—पण हें काय बाई, सगळी रातची रात्र त्याच्याशीं हंसायचं नि खिदळायचं ?

चतु०—खरंच बाई, हें मात्र मला अगदीं चमत्कारिक दिसतं !

चंपा—(कोणी नाहीं असं पाहून) कोणी नाहींना पण इथं?

चतु०–छे: इथं कोण असणार आणखी !

चंपा—हें बघ चतुरिके, खरंच म्हणशील तर मला त्या मेघवर्णा-बद्दल शंका येते थोडीशी. अन् मी म्हणतें ज्याला म्हणून थोडीशी अक्कल आहे त्याला देखील मेघवर्णाचं बाइसाहेबांशीं वर्तन पाहून थोडीबहुत आलीच पाहिजे ती. (आपल्याशीं) आतां ही काय म्हणते तें पाहूं. आपल्याला अक्कल नाहीं असं तर ही खचित म्हणवून घेणार नाहीं.

चतु०–माझ्या तर हें केव्हांच लक्षांत येऊन चुकलं आहे. पण म्हटलं बोला कशाला आपण! अळीमिळी गुपचिळी, जो करील तो भरील!

चंपा—करील तो भरील म्हणजे! करायचं काय अन् भरायचं काय. यांत त्याचा कसचा अपराध ?

चतु०–मी तरी कुठं म्हणतें त्याचा अपराध म्हणून!

चंपा—तर मग कुणाचा बरं ?

चतु०–कुणाचा म्हणजे ? अर्थात् बाईसाहेबांचा.

चंपा—तो कसा बाई ?

चतु०–कसा म्हणजे ? बाईसाहेब जर त्याच्याशीं उठतां बसतां एकसारख्या हंसत खिदळत असतात तर यांत त्याचा तरी काय अन्याय ? तो तर बोलून चालून पुरुषासारखा पुरूष ?

चंपा—(हंसून) म्हणजे बाईसाहेबांच्याच विषयीं कां तुला संशय आला !

चतु०–संशय तो कसचा आणखी यायचा ! धडधडीत हें जर सारं उघड उघड दिसतं तर मग शंका तरी कसली आणखी ह्याबद्दल हंसते आहेस कां पण तूं अशी उगीच !

चंपा०–नाहीं, ह्मटलं आपलं पहावं, तुझी अक्कल तरी कितपत धां-

वते तीं. तर मग मेघवर्णाला कांहीं ओळखलं नाहींस तूं एकून ? अग वेडे, तो कांहीं पुरूष नाहीं.

चतु०-(आश्चर्यानें) काय, तो पुरुष नाहीं ? तरी तसं कांहीं असेलसं वाटलंच मला एकदां !

चं०-(हंसून) अस्सं! शहाणीच आहेस तशी तूं. (एकीकडे) जें जें मी हिला सांगतें तें तें हिला वाटलेलंच असतं अगोदर ! (उघड) हः हः हः हः अग वेडे, तर मग तूं चांगलीच फसलीस ह्मणायची ? अग तो मेघवर्ण नव्हे. ते रमणक महाराजच आहेत. त्यांना विरह सोसेना म्हणून मुद्दाम आपला वेष पालटून ते आले आहेत इथं ! मात्र हें अगदीं गुप्त ठेवायचं बरं कां उद्यांच्या महाएकादशीपर्यंत.

चतु०-खरंच कां महाराज ते ! अगबाई त्यांचं रूप तरी किती तरी पालटून गेलं आहे पण ! तरी ह्मटलं बाईसाहेब अन् हा मेघवर्ण सबंध रात्रची रात्र एकमेकांशीं गुजगुज बोलून कशी काढतात ! जुळलं आतां जुळलं सारं !

चंपा०-(खो खो हंसते) वेडी नाहीं तर ? तूं इतकी दुधखुळी असशीलसं नाहीं बाई मला वाटलं ! अग हें काय ! तुला आपलं सांगावं तें तें सारं खरंच वाटतं.

चतु०-म्हणजे ! तर मग हे आपले महाराज नव्हत कीं काय ? तरी ह्मटलं इतकं रूप देखील कसं पालटेल !

चंपा०-(मोठ्यानें हंसून) अग वेडे, मनुष्याला थोडं धोरण हवं. उगीच होला हो ठेवून दिल्यानं दुसरं तिसरं तर कांहीं नाहीं, पण अशीच एकाद वेळीं फजिती मात्र होते. हो पण बरी आठवण झाली. तुला त्या मदनसुंदरानं विचारलं होतंन् कां एकाद वेळेस कीं मेघवर्णाचं अन बाईसाहेबांचं कितपत रहस्य चालतं म्हणून ?

चतु०-होय, मग ? त्यांनीं विचारलं होतं. पण त्याचं काय ?

चंपा०–मग त्याचं काय तें सांगतें सगळं ? पण अगोदर हें सांग मला कीं त्यांनीं तुला असं विचारल्यावर तूं काय सांगितलंस त्याला ?

चतु०–मीं म्हटलं होय पुष्कळ आहे त्यांचं रहस्य. बहीण भावंडंच आहेत तीं.

चंपा०–मग त्यानं नाहीं कां तुला विचारलं. बहीण भावंडं कशीं तीं म्हणून.

चतु०–हो विचारलन् तर.

चंपा०–पण असं विचारल्यावर मग तूं काय सांगितलंस त्याला.

चतु०–आणखी काय सांगणार मीं. मी म्हटलं त्याची आई तिची दाई होते म्हणून.

चंपा०–हां मग हरकत नाहीं. एवढंच ना झालं काय तें त्या मेघवर्णासंबंधानं तुझं अन् त्याचं बोलणं ?

चतु०–हो एवढंच, दुसरं तिसरं आणखी कांहीं सुद्धां नाहीं. पण हें काय म्हणून तूं मला विचारलंस ?

चंपा०–(कोणी नाहीं असं नीट न्याहाळून पाहून) हें पहा आतां तुला सगळं सांगतें. अग या मदनसुंदराच्या मनांत आपल्या बाई. साहेबांविषयीं कांहीं काळं बेरं आलं आहे.

चतु०–म्हणजे ?

चंपा०–म्हणजे काय ? ऐकून तर घे खरं अगोदर. (तिच्या कानांत कांहीं कुजबुजते.)

चतु०–खरंच का. मदनसुंदराची बायको कां तर ही ? (हंसून) काय बाई तरी एक एक चमत्कार !

चंपा०–अग, हळु अंमळ ! अन् त्या मदनसुंदरानं मेघवर्णाला त्यानं बाईसाहेबांचं मन वळवावं म्हणून आजपर्यंत काय काय दिलं आहेन् म्हणून सांगूं !

चतु०—अन् आपल्या बायकोलाच ! काय तिचं नांव काय ह्मटलं-स, मदनिका ?

चंपा०—होय तेंच. मग गम्मत तर काय ? अन् हें पहा तिच्या मनांत आपल्या नवऱ्याची एकदां चांगलीच फजिती उडवायची आहे. आणि म्हणूनच तिनं आज बाईसाहेबांच्या महालाचा दरवाजा उघडा-च टाकायला सांगितलं आहे मला. अन् मदनिकेनं मदनसुंदराला चांग-ली थाप दिली आहेन्.

चतु०—ती काय ?

चंपा०—ती अशी कीं बाईसाहेब तुझ्या म्हणण्याला कबूल आहेत. आज असा दोन घटका रात्रीं ये. अन् तो येऊन बाईसाहेबांच्या मंदि-रांत गेला म्हणजे बाईसाहेब त्याची चांगलीच फटफजिती करतील. आणखी त्याची पुरी फजिती करण्याकरितां मदनिकेनं तूं अन् मीं त्या-च्या मागोमागच कांहीं तरी मीष करून आंत जावं म्हणून ठरिवलं आहेन्; तर मीं तुला खूण केल्याबरोबर तूं घाबऱ्या घाबऱ्या एकदम बाईसाहेबांच्या महालांत शीर. तुझ्या मागोमाग मीहि शिरेन. म्हणजे त्याची चांगलीच फजिती होईल.

चतु०—काय बाई तरी एक एक गम्मत ! तिकडे तो मधुकर अन् इकडे हा. त्याला हसतां हसतां ही स्वारी देखील लागली तर असे गुण उधळायला ! बर बाई, मी चार फुलं घेऊन येतें बागेंतून.

चंपा०—बरं जा. पण लौकर ये हो. मदनिकेनं सांगितल्याप्रमाणं बाईसाहेबांच्या रंगमहालाचा दरवाजा मी उघडाच ठेवतें आज. जा लवकर ये जाऊन तूं.

चतु०—तर मग आज गम्मतच आहे म्हणायची एकून !

चंपा०—अग गम्मत म्हणून काय विचारतेस आणखी ? बरं, मी

जातें तर. तूं मात्र लौकर ये हो. नाहीं तर रमशील गेलीस तिकडच,

चतु०-ही आल्येंच म्हणून समज. [दोघी जातात.

प्रवेश ३ रा.

स्थल-इंदिरेचें मंदिर

प्रवेशः—(मेघवर्ण व इंदिरा बोलत आहेत.)

मेघ०—(इंदिरेस) बाईसाहेब, अशी आठवण करकरून व्यर्थ दुःख करण्यांत अर्थ काय ? त्यांचा निरोप सांगितलाना मीं तुम्हांला-कीं पुढच्या आशेवर सगळं दुःख गट्ट करून टाकायचं म्हणून ? मग कां बरं हें असं ?

इंदिरा०—मदनिके, तूं म्हणतेस तें सगळं खरं, पण गडे तूंच सांग कीं—

(पद ॥ अभिनव मधुलोलुप या चा०)

॥ विरह विकल हृदय-दाह सहन करूं किती ॥ दयित,
रमण, नाथ, म्हणुनि बाहुं तरि किती ॥ ध्रु० ॥

अगं, हा—

॥ मलयानिल अनल गमत ॥ सुमणि-भवन वनचि दि-
सत ॥ कालागरु द्रवहि होत ॥ हालाहाल पूर्ण व्यक्त ॥
शशिकर हे रविकरेस मजशि पोळिती ॥ १ ॥

मेघ०—मी आलेल्या वेळेला तिकडे महाराजांचीहि पण अगदीं अशीच स्थिति झाली होती !

इंदिरा—हे बघ सखे, तुला ज्या अर्थी तिकडून आपल्या एकांतांतील सगळ्या खडान्खडा खुणा सांगायचं झालं त्या अर्थीं मलाहि पण तुझ्यापासून कांहीं चोरून ठेवावंसं नाहीं वाटलं. अन् म्हणूनच हा वेळपर्यंत तुझ्याजवळ मीं सगळं ओकून टाकलं ! सखे हें पहा, इथंच एकदां मी कायससं करीत होतें अन् बाहेरून यायचं झालं; आणि

जसं कांहीं माझ्या कानांतच कांहीं सांगायचं असं मीष करून—

॥ पद ॥ (चाल मज मदनें फसविलें)

चुंबियलें हंसुनिया ॥ ''वेडि;'' गडे ह्मणुनिया ॥ध्रु०॥ सर्व सख्या मत्सन्निध असतां ॥ मम वदना धरुनिया ॥ १ ॥ प्रियकांता अशि स्वप्नीं बघते ॥ जात परी फसुनिया ॥२॥ प्रिय नाथाविण सांग कशी ये ॥झोंप तरी शयनिं या॥३

मी इथं आले म्हणजे मला त्या प्रसंगाची आठवण झाल्याशिवाय रहातच नाहीं कशी ती. (मदनिका जांभई देते व चुटकी वाजविते.)

इंदिरा—जा गडे, नीज जा जाऊन आतां, तुला झोंपेनं घेरलंय अगदीं.

मेघ०—नाहीं, झोंप नाहीं आली कांहीं, आपली उगीच जांभई आली झालं.

इंदिरा०—मदनिके, उगीच खोटं कां सांगतेस. तुझे डोळे अन् तुझं तोंडच सांगतंय तुला झोंपेनं घेरल्याचं. खरंच, जा नीज जा जाऊन; उद्यां आणखी भल्या पाहटेस उठायचं आहे.

मेघ०—तें कां ?

इंदिरा०—तें का ! अग उद्यां सोमवार नव्हे का ? आपलं सूर्योदयाला सगळं आंगधुणं वगैरे आटपून कैलासनाथाचं दर्शन घेऊन येऊं एकदां, ह्मणजे मग दाटींतून नको उगीच जायला यायला.

मेघ०—हो गडे, हें सोमवारचं नव्हतं आलं माझ्या लक्षांत. तर मग जातें निजतेंच मी जाऊन आतां. (जाते.)

इंदिरा०—(फुलाचे हार व कमळें पाहून)

॥ पद ॥　(चाल—सकल कळाभिराम कांत)
प्रियवल्लभ-संस्मृति मज झोंप न दे काय करूं ॥ दयित-
विरहसिंधु महा न कळे मज केविं तरूं ॥ ध्रु० ॥

(बाहेरच्या बाजूला मदनसुंदर येतो व तेथें त्याला मेघवर्ण भेटतो)

मेघ०—जा अगदीं गुपचिप जा तिथं. तुमची वाट बघत बसल्या आहेत बाईसाहेब तिथं.

मदन०—तूं असा दरवाजाच्या बाहेरल्या बाजूस उभा रहा. अन् कुणाला इकडे फिरकूं देऊं नकोस, समजलास ? (कांहीं देऊन) हें घे सध्यां ! अन् आतांच्या या कामगिरीबद्दल तुला काय द्यायचं तें मग देईन. (दालनांत शिरतो.)

मेघ०—(हलक्या स्वरानें) अग ए चंपावती, चतुरिके, तुह्मी आहांना तयार ?

चंपा०—(स्मित करून दोघीजणी तयार असल्याचे खुणेनें कळवितात व बाजूस उभ्या राहतात आणि मंदिराच्या खिडकीचा पडदा किंचित् बाजूला करितात.)

मद०—(इंदिरेस पाहून) ही आपल्या या शयनमंदिरांत आपल्या आपल्याशींच कांहीं गुणगुणते आहे. तर हळूच मागून जाऊन इचं चुंबन घेऊं का ?

इंदिरा०—(आपल्याशींच)

(पद. वरचेंच पुढें चालू)
कुसुमहार येथ कसे असति गुंफियेले ॥ अभिनव हे पूर्ण
दिसति सजले या कोण करूं ॥ कमल संघ येथ असा
कोणि मांडियेला ॥ मंडित मद्भवन दिसे सजलें या कोण
करूं ॥ १ ॥ प्रियवल्लभ-संस्मृति मज० ॥

मद०—*हिची जरी अशी दशा झाली आहे तरी हिच्यांत काय विलक्षण मोहनी भरली आहे ही. मत्त गजासारखं हिचं हें चालणं. सिंहासारखी हिची ही कृश कटी. हिचं हें शुभ्र पण किंचित् मलिन वस्त्र. हीं सर्व ह्या कृशांगीला फार शोभा देतात. तसाच हा हिचा केशपाश; तैलादि उपचार नसल्यामुळें जरी हे कुरलालक जागच्या जागीं चापून चोपून बसले नाहींत तरी देखील हे किती तकतकीत अन् मोहक दिसताहेत. हिनं नुसता अंबाडा बांधला आहे तरी सुद्धां पण ही किती सुरेख दिसते आहे ? या कुसुममालांकडे पाहून ही कायसंसं पुटपुटते आहे तोंडानं ! पाह्यलंन पाह्यलंन, हिनं इकडे ! हिची ही हरिणासारखी चंचल दृष्टी, कुंदकळ्याप्रमाणें चमकत असलेले हिचे हे दांत, पिकलेल्या तोंडल्यासारखे ओंठ, विरहामुळं गालावर पसरलेली ही पांडुरता, अन् थेट सोनचांफ्याच्या फुलांसारखी हिची ही गौर अंगयष्टी, हें इतकं एकवटलेलं सौंदर्य पाहून मोहून जाणार नाहीं इतक्या निग्रहाचा पुरुष कोण असेल बरं ?

इंदिरा०--(स्वतःच काढलेल्या रमणकाच्या चित्रपटाजवळ उ-

---

* (वरील भाषणाबद्दल खालील पद वाचावें.)

पद (चाल-भिऊं नको जिवलग सुं०)

मंदनसुं०—

किती तरि मोहनि सुंदर आहे, पंचशरा नयनिं धरे ही ॥ घेऊनि स्मर-धनु आकर्णचि ही ओढी; अचुक बाण काय मारी ॥ सखि ही मनसिजमंत्रातें पुटपुटते, आयुधें व्यर्थ सारी ! ॥ मग कां माडूं उगी संगरा सखीसह, जी रणिं घोरकर्मकारी ॥ जिंकितसे मनही ॥ १ ॥

भी असलेली) प्रिया, माझ्या डोळ्यांत अगदीं झोंप आली आहे. हें पाहत असतांना आतां कां बरें उगीच उशीर करता असा ?

पद. (चाल—वृक्षवेल या दोहींची)

प्राणनाथ कां दासीचा अंत पाहतां ॥ कितितरी ॥ रुचिर मदनसुंदर मूर्ती नयनही सुखवी किती ॥ मंदिरीं रतिसम शोभे सुरस रसी आपुली कांता ॥ १ ॥ प्राण-नाथ० ॥

मेघ०—चंपे, सावध आहेसना ?

चंपा०—(एकीकडे) चतुरिके, नीट सावध ऐस हां! मीं चुटकी वाजिवल्याबरोबर एकदम आंत शिरायचं, समजलीस ?

मदन०—(स्वगत) हिनं हें मलाच अनुलक्षून ह्मटलंन. मग आतां संशय का उगीच ? (पुढें जाऊन) सुंदरी, आतां कां बरं उशीर ? तुझ्या मनांतला सारा भाव जो तूं मोठ्या चातुर्यानं प्रकट केलास तो सर्व मीं आडून ऐकला.

इंदिरा०—(त्याला न ओळखतां) अगबाई, येणं झालं वाटतं इतक्यांत ? काय पण इतका वेळ मोहनी पडली होती ह्मणून सांगूं! मी हा वेळपर्यंत समजत होतें कीं शाप संपायला आणखी एक दिवसाची अवधी आहे. (आनंदानं) आतांच सरला तर मग एकून तो! तर मग मोठंच भाग्य म्हणायचं माझं. एकून मीच माळेंतलीं फुलं मोजायला चुकलें तर.

मदन०—कर कर तूं मला एकदां अलिंगन देऊन धन्य कर.

(तो तिला आलिंगन देण्यास सरसावतो)

इंदिरा—(त्याला ओळखून किंचित् मागं जाऊन रागानें) अरे नीचा, अधमा, यावेळीं इथं यायला तुला लाज कशी नाहीं वाटली ?

मदन—प्रिये, आतां उगीच हें ओढून चंद्रबळ आणण्यांत काय

अर्थ आहे ? (तिचा हात धरावयास उद्युक्त होतो) हा तुझा दास तूं सांगशील तें ऐकायला तयार आहे.

इंदिराः—नीचा, काय हा तुझा उद्धटपणा ! आणि काय हें तुझें धारिष्ट, (आवेशानें मागें सरते.)

मद०—वहिनी-(जीभ चावून) काय भलतंच येत आहे हें माझ्या तोंडून यावेळीं ! (उघड) सुंदरे, मोहने, कां आतां कितीवेळ हा माझा असा तूं अंत पाहणार ! छे. आपल्याच्यानं तर नाहीं आतां धीर धरवत (तो पुढें जातो ती मागें जाते; त्याला एकट्याला दासी दिसतात त्यांना पाहून आपल्याशीं.) हो, मला वाटतं ह्या दोघींना हिनं पाहिलं असावं अन् ह्मणूनच ही अशी रागावल्याचा हा सारा अविर्भाव करीत आहे. (जवळ जाऊन) सुंदरी,—

इंदिरा—अरे काळतोंड्या—

पद. (चाल-सफलेच्छा०)

अधमाधम तूं असुर खरारे ॥ उद्धटपण हें कोण तुझें रे॥ कृष्णवदन हें येथुनि नेरे ॥ हात नको लावूं ॥ अध०१॥ तव दुर्मति ती पूर्णचि कळली ॥ पुढति नको येऊं ॥ अध० ॥ कपट सर्व तव ध्यानीं आलें ॥ पहिल्याने परि होते फसलें ॥ कुटिल शठा म्यां सावचि गणिलें ॥ वदन नको दावूं ॥ नीचा॥

मद०—(आपल्याशीं) छेः पण ही संधी व्यर्थ दवडून उपयोग नाहीं. ह्या बटकुऱ्या माझं काय करणार आहेत ? (पुढें सरसावून) सुंदरी, कां आतां हा खोटा कोप ?

इंदिरा—चांडाळा, दूर हो, दूर हो.

पद. (चाल-सदर,)

कामांधा तव डोळे फुटुनी ॥ हस्त, चरण हे पडति न तु-

दुनी ॥ कैसें नकळे हें मज अजुनी! ॥ पळहि नको राहूं॥ अधमा ॥

मद०(आपल्याशीं) हिनं ह्यांना पाह्यलंन् हेंच खचित. अन् ह्मणूनच तर नसेल ही हें असं मिष करीत! (पुढें जाऊन) सुंदरी,—

इंदिरा—(रागानें) अग चंपावती, चतुरिके, ए चंपे! अग तुह्मी आतां इतक्यांत होताना इथं? अन् अशा एकदम कुठें गेलांत दोघीहि जणी? अग ए चंपे, चतुरिके! थांबा, तुमचा दोघींचाहि चांगला समाचार घेतें.

(इतक्यांत चंपा व चतुरिका 'बाईसाहेब' ह्मणून दुरून ओकार देतात.)

मद०—(त्यांस पाहून भीतीनं थरथर कांपतो.) अरे, हें काय लचांड! आतां यापुढें इथं राहून आपली शोभा करून घेण्यांत कांहीं अर्थ नाहीं. तर आतां इथून झटपट निसटलं पाहिजे. या शिंच्या दासींच्या प्रत्यक्ष दृष्टीला पडून नाहीं उपयोगी. (बाजूस होऊन) मेघवर्णाचाच तर नसेलना हा सारा खेळ! अरे दुष्टा हरामखोरा, छे: तुझंच काम हें! तूंच केलास हा सगळा घोटाळा! छत् (ओठ चावून) चोरा, भेट म्हणावं आतां पुन्हां—ह्मणजे सांगतों तुला कसं काय तें (गडबडीनें दरवज्याकडे जातो तोंच चंपा आलीसें पाहून) अरे ही इकडूनच आली. (दुसऱ्या दरवाज्याकडे जाऊं लागतो) अरे लुच्चा हरामखोरा! तुझाच सारा मात्रागमनीपणा हा! (दुसऱ्या दरवाज्याकडे जातो तों तिकडून चतुरिका येते) अरे हें काय? इकडूनही अन् तिकडून ती! आतां काय करावें (इकडे तिकडे फिरतां त्याची फार तारंबळ उडते) हा इकडचा दरवाजा दिसतोय उघडा. तर इकडून जावं कसं तरी निसटून (धडपडत जातांना आपल्याशीं) छे. आतां ह्या वेळेला नाहीं त्या चोराच्या शोधाला लागून उपयोग. (जातो.)

मेघ०—(अगदीं दरवाज्याच्या बाहेर उभा असलेला स्वगत)

अगबाई, गम्मत पण गम्मत उडाली. त्या चंपेनं तर फारच तिरपीड उडवून दिलीन तिकडची! अशा माणसाला एकेकदां अशीच अद्दल घडली पाहिजे! (मदनसुंदर जवळ आलासें पाहून) अगबाई, पण इकडच येणं झालं कीं! किती पण रागावलेली दिसते आहे मुद्रा! (मदनसुंदर येतो, त्यास पाहून उघड) ह्या अवदसा कशा आल्या हरी जाणे!

मद०—(क्रोधानें) कोण ते? मेघवर्ण! हरामखोरा, फार नामी कामगिरी बजावलीस! थांब. याचं आतां तुला चांगलंच बक्षीस मिळेल समजलं? बोल तूं इथं कां उभा चोरा?

मेघ०—शु:! आतां तुह्मी एक अक्षर देखील बोलूं नका इथं! बाहेरून कोणी आंत येईल ह्मणून मी इथं उभा होतों; पण ह्या अवदसा माझा डोळा चुकवून केव्हां अन् कशा आल्या तें मला कळलं देखील नाहीं. अन् त्यामुळंच हा सारा घोटाळा उडाला. आतां उद्यां मीच येऊन भेटेन आपल्याला या संबंधानं.

मद०—चुकूं नकोस तर उद्यां यायला.

चंपा०—(मदनसुंदरास ऐकूं जावं ह्या हेतूनें) मला वाटतं त्या मेल्या मेघवर्णाच्या हलगर्जीपणामुळंच झाला असावा हा सगळा घोटाळा.

चतु०—मला सुद्धां बाई तसंच वाटतं!

चंपा—नाहींतर तोच मेला नसेलना त्याला सामील?

चतु०—तसंच असेल.

मेघ०—(घाबरल्यासारखं करून मदनसुंदरास) छे: यांना माझाच संशय आला वाटतं? हें पहा ह्या अगोदर काय ह्मणतात तें.— (दोघे कान देतात.)

चतु०—त्याचा तरी कुणी नेम सांगावा बाई!

चंपा०—दिसण्यांत काय पण दिसतो मेला अगदीं साळसूद.

चतु०--हो दिसायला काय झालं? बावळी मुद्रा अन् देवळीं निद्रा ह्मणतातना, त्यांतली गत अन् दुसरं काय?

मेघ०--पाहिलंत. यांना माझाच सारा संशय आला आहे तर. आतां आपला तर धीर सुटला अगदीं!

मद०--हं! असा धीर मात्र सोडूं नकोस अगदीं. (त्याचे हातीं कांहीं देऊन) तुझी कामगिरी मी कधीं विसरणार नाहीं.

चंपा०—(आंतून) हाक तरी मार पाहूं त्या मेल्याला.

चतु०—अरे ए मेघवर्ण?

चंपा०—(दुसरीकडे जाऊन) मेघवर्ण, मेघवर्ण, अरे मेघवर्ण—

मेघ०—(झोंपेंतून उठल्यासारखें करून) आं आं आं का-काय झालं? आलों! आलों! (हलकेच सुंदरास) जातों तर मी आतां. तुह्मी जा आतां. [आंत जातो.]

मदनसुं०—(आपल्याशीं) तर मग या मेघवर्णाचा मीं उगीच संशय घेतला. त्या दासी आल्यामुळं ही आजची शिकार चुकली ह्मणायची! त्या अवदसा जर न येत्या तर आज काम कसं अगदीं फत्ते होतं! (कांहीं विचार करून) हो असंच तर, आतां असंच करावं. आतां या वेळेला तो नंदिबैल गेला असेल राजभुवनांत मसलतीला, तर आतां जाऊन त्या मालतीला गांठावी. तिथं अशा भलत्या वेळीं मी कां आलों याबद्दल तिला मुळीं देखील शंका येणार नाहीं. आलीच तर मधुकरासंबंधानं कांहीं गम्मत सांगायची आहे ह्मणून सांगून तिला हळकेच एका बाजूला काढावी ह्मणजे झालं. बस्स हीच, हीच, तोड. आपल्याला काय? एक शिकार चुकली तर दुसरी! (जातो)

चंपा०-हंः हंः हंः हंः! मदनिके, फारच गम्मत उडविलीस बाई.

चतु०--कसं काय मेघवर्ण ?

इंदिरा०—ह्मणजे! हें सगळं हिचंच काम कीं काय तर मग ? होय काग मदनिके ?

मेघ०—होय बाईसाहेब. तुह्मांला अगोदर कांहींएक कळूं न देतां मुद्दामच केलं हें मीं सारं. चंपावतीला अन् चतुरिकेला दिखील मींच सांगून ठेवलं होतं एकदम आंत शिरायला. अन् तुह्माला मीं अगोदर सांगितलं नाहीं हें एवढ्याचकरितां कीं मग तुह्मी त्यांच्यावर इतकं खरं रागावलां नसता. आणि मग तिकडची आतांच्या इतकी फजीतीहि पण झाली नसती.

इंदिरा०—खरंच बाई, मदनिके, तुझी युक्ति पाहून माणसानं अगदीं तोंडांत बोट घालावं.

चतु०--हो असं तर खरंच बाईसाहेब. माझी युक्ति पाहिलीत का पण ही ! ही पहा मी या मेघवर्णाची मेघवर्णी करितें. आजपर्यंत पाहिला होता का कुणी असला चमत्कार ! पुरुषाची बायको अन् बायकोचा पुरुष. (तिच्या डोकीचा मंदील काढते व सर्व हंसतात.)

चंपा०—(हंसून) अग सोड तिचा तो मंदील. वेडी नाहीं तर.

इंदिरा०--अग चतुरिके, हें काय हें. आचरट मेली नाहीं तर.

चंपा०--होय. मी तरी तेंच ह्मणतें ! पुरुषाची बायको अन् बायकोचा पुरुष ! (असें म्हणून मदनिकेच्या डोक्यावर मंदील घालते.)

चतु०--(मदनिकेस सोडून देते) कर बाई कर तूं करूं नयेस तर काय तुझ्या पोराबाळांनीं का करायची आहे माझी थट्टा!

चंपा०—होय, मी तरी तेंच म्हणतें !

चतु०—(मंदील काढून टाकते व चंपेचा हात आपल्या हातांत धरून तिची करांगुळी दाबते.) काय ? तूं तरी तेंच म्हणतेसना ?

चंपा:--होय मी तरी तेंच ह्मणतें. दाब, घट्ट दाब अगदीं माझी किरंगळी. मी तरी तेंच ह्मणतें!

इंदिरा:--चंपे. पुरे पुरे आतां ही तुझी थट्टा. अशानं चिरडीवर मात्र जाईल हो उगीच प्रकरण.

मेघ०—मी तरी तेंच ह्मणतें.

इंदिरा:—मदनिके, हेंग काय? तूं सुद्धां कां लागलीस तिची थट्टा करायला?

चं०—तर मग काय तिचीं पोरंबाळं करतील!

मेघ०--मी तरी तेंच ह्मणतें! (इंदिरेस) पण माझी काय कमी कां केलीन् तिनं? पुरुषाची बायको नि बायकोचा पुरुष, असं ह्मणून म्हणून तिनं माझी तर अगदीं हुरबावडी करून सोडलीन्.

इंदिरा:—बरं तें असूं दे. हें बघ. चतुरिके, उद्यां कीं नाहीं मालतीबाईच्या घरीं जाऊन त्यांना बोलावून घेऊन ये. त्यांच्या कानावर हें मदनसुंदराचं नीच वर्तन घालून ठेवलं पाहिजे. विसरूं नकोस हो.

चतु०—ज्याला वाटेल त्यानं जावं. मी कांहीं साफ जायची नाहीं. ही चाललें मी. मी आतां जाऊन उद्यां संध्याकाळपर्यंत निजणार ही अशी. [जाते.]

चंपा०—मी तरी तेंच ह्मणतें! उद्यां संध्याकाळपर्यंत घुमणार ही अशी! (गाल फुगवून) ही युक्ति बरीक छान आहे. गुरवळ्या फुगवल्या कीं आपलं अनायासें काम चुकतं!

मेघ०--(हंसून) मी आणीन बोलावून त्यांना; मग तर झालं ना?

इंदिरा—तसंच तसंच. (चंपावतीला दटावून) जाऊं दे, निजूं दे तिला जाऊन. आणि तुह्मीहि निजा जाऊन दोघीजणी. मात्र सगळ्या दरवाज्यांना नीट कड्याबिड्या पहा हां.

(सर्व जातात व इंदिरा आपल्याशीं.)

ही मदनिका त्याची फजिती करून त्याला ताळ्यावर आणूं पाहते; पण मला वाटतं हें सगळं व्यर्थ आहे. कारणः—

पद. (चाल–तिलक कपाळीं)

कपट पटू, शठ, अधमाधम हे जगिं कपटानें वंचिती ॥ ध्रु०
सद्गुण, दुर्गुण, पुण्य, पाप हें, मनिं नच मुळिंही शंकिती ॥
तमापरी त्या रविकांतीतें कृष्णचि करुं हे पाहती ॥ १ ॥
अशा खलांना दंडायाला काला संकट निश्चिती ॥
उपहासाचा क्षुद्र दण्ड तो निष्फल वाटे संप्रती ॥ २ ॥
चंड शिलातल काय कधीं ते सूच्याघातें भंगती ! ॥
विद्युत्पातचि चूर्ण करिल त्यां; देहदण्ड युत दुष्कृतीं ॥ ३ ॥

[जाते.

प्रवेश ४ था.

स्थलः–मधुकराच्या वाड्याला लागलेली बाग.

प्रवेशः–मेघवर्ण व मदनसुंदर बोलत आहेत.

मेघ०—हें पहा, एवढं कां विसरलात ह्मणजे सगळा घोंटाळा झाला म्हणून समजा. (विचार करून) आज तरी कालच्यासारखं होण्याचा संभव नाहीं म्हणा, कारण आज आहे सोमवार. ती चंपा आणि ती चतुरिका ह्या आज कोणी न सांगतां न सवरतां अगदीं सांगितल्यासारख्या जाणार आहेत क्रीडाशैलावर. तरी पण आपण बाईसाहेबांनीं सांगितल्याप्रमाणं आलांत ह्मणजे बरं. मग चुकून माकून आपलं आलं जरी कुणी तरी मग तुह्मांला आणि त्यांनाहि पण भीति नको कसली बाळगायला.

मद०—(त्यास कांहीं देऊन) नाहीं, पण हें घेतलंच पाहिजे तुला. बरं तर येतों मी आतां. (जाऊन पुनः परत येऊन) हें पहा

मेघवर्ण, तुला एक सांगायचं राह्यलं आहे. आज मात्र तुला तिथं फार सावधपणानं वागळं पाहिजे.

मेघवर्णः—तें माझ्याकडे लागलं; त्याबद्दल नको तुह्मांला काळजी. मनुष्य एकेकदां फसत असतं. एवढंच सांगावयाचं होतं ना! मीं ह्मटलं काय सांगायचं आहे आणखी?

मद०—आणखी नाहीं कांहीं, एवढंच. बरं पण हें पहा, कोणच्या वेळेला येऊं? कालच्याच कीं त्याच्याहून जरा उशीरा!

मेघ०-कालच्याच. अगदीं कालच्या वेळेवर.

मद०—जातों तर मी आतां.

मेघ०—तेवढं मात्र विसरायचं नाहीं हो.

मद०—(जातां जातां) छेः तें कसचं मी विसरतों. [जातो.

मेघ०—(आपल्याशीं) एकंदरींत एकदां मनुष्य चकलं ह्मणजे तें काय करील अन् काय नाहीं ह्याचा कांहीं नेमच नाहीं.

पद. (चाल—मज बोध करी०)

वनितांस जगीं प्रणयि-पती क्वचित लाभती ॥ पर युवती देखुनि जे मुळिं न मोहती ॥ ध्रु० ॥ चलितचित्त पुरुषजात सकल ही दिसे ॥ एकपत्नि राम काय सहज लाभती! ॥ १ ॥ पूर्व सुकृत असत तरी प्राप्त होति हे ॥ पापिकरीं काय कधीं परिस लाभती? ॥ २ ॥

श्रीरामचंद्रासारखे आणि या रमणकासारखे एकपत्नी आणि प्रणयी पति मिळण्याइतक्या भाग्यवान सीता व इंदिरा अशा जगांत थोड्याच असायच्या! (विचार करून) असो. त्याचा विचार करून काय उपयोग. पुढें आहे तें अगोदर निभावळं पाहिजे. आतां काय बरं राहिलं आणखी करायचं? एक त्या मालतीबाईंना तर बाईसाहेबांचा निरोप पोंचिवलाच. अन् वाटेंत येतां येतां हेंहि पण एक मोठंच काम झालं ह्मणायचं!

ती मालतीबाई ह्मटली ह्मणजे किती सुशील आणि साध्वी बायको! पण तिच्याबद्दल देखील त्या कुटिल मधुकरजींना संशय. मालतीबाईजवळ निरोप सांगत असतां त्यानं मला बाहेरूनच पाहिलंन आणि तिच्याजवळ मी कायसंसं बोलत आहें, एवढ्यावरूनच माझ्याविषयीं त्याला संशय आला. बरं तर बरं, त्यांतल्यात्यांत जलदी करून पुढें होऊन त्याला एका बाजूला बोलावून तो निरोप सांगितला ह्मणून बरं! नाहीं तर भलतंच व्हायचं! तुला बाईसाहेबानीं असं असं यायला सांगितलं आहे ह्मणून सांगितल्याबरोबर काय पण त्या हुरळून गेली स्वारी अगदीं! बाईसाहेब सकाळीं देवाहून परत येतांना त्याच्याकडे बघून कुठं हंसल्या तेवढंच याला पुरे झालं! पण त्या कां हंसल्या हें कुठें समजलं या नंदीबैलाला! त्या हंसल्या याच्या मूर्खपणाला आणि हा समजतो आहे कीं तिचं प्रेम आपल्यावर आहे ह्मणून! याचा सगळा उलगडा आज रात्रीं छान होईल. राजेश्रीनीं तिकडं आपल्या स्नेह्याला द्यायला ह्मणून माझ्याजवळ हें पत्र दिलं आहे. ह्या पत्रांत ह्यानीं काय बरं लिहिलं असेल! आतां गांठ पडली तेव्हां देणारच होतें मी अगदीं! पण ह्मटलं पाहूं आणखी काय काय मसलती, खलबतं आणि कारस्थानं चाललीं आहेत तीं. (उघडून वाचूं लागते) काय? "तीन चार दिवस झाले आपण इकडे फिरकलां सुद्धां नाहीं यामुळें माझा धीर अगदीं सुटत चालला आहे. इंदिरेच्या नादीं मी आधीं लागायचा नव्हें, पण केवळ तूं होऊन माझी उचल केलीस. आणि तिचें मन वळवायचें आपल्याकडे घेतलेंस, ह्मणून मी त्यांत पडलों; तूं सांगितलेस तसतसे नरवाहन महाराजांचे कान भरवून पहिल्यानें रमणकाची उचलबांगडी केली. पुढें तुझ्या सांगण्याप्रमाणें तो मेल्याची कंडी पिकवली, तिच्या प्राप्तीकरितां तुला जें जें लागत गेलें तें तें केवळ माझ्या घरांतूनच नव्हे तर महाराजांच्या रत्नभांडारांतून सुद्धां

पुरवीत गेलों. आणि असें असूनही आज सबंध चार दिवसांत तूं मला भेटूं नयेस, अथवा तिच्या संबंधानें आणखी नवी खटपट काय केलीस तेंहि कळवूं नयेस, हें नवलच ह्मणावयाचें ! " उघडच आहे. स्वारीला तोंड कुठं आहे आतां तिकडे जायला ! त्या मालतीबाईनं त्या दिवशीं रात्रीं जर चांगली फटफजिती उडविली आहे, तर मग तिथं आतां जायचं तरी कोणच्या तोंडानं ! बरं पण, आतां पुढं काय ह्मणते आहे स्वारी ! (पत्र मनाशींच पुढें वाचून) काय नीचपणा हा ! अगबाई, रमणक महाराज मेल्याची बातमी इकडून उठवायची तर ! (कांहीं वेळ विचार करून) हंः इतक्या थराला गोष्ट पोंचली असेलशी कल्पना देखील नव्हती मला. यावरून यापुढं निवळण्याचं नाहीं कांहीं लक्षण दिसत. पण हें तरी कुणीं सांगावं. इतकी फजीती झाल्यावर दिखील माणसं निवळणार नाहींत ह्मणून ! आणि इतकंय करून नाहींच निवळीं तर माझं नशीब, अन् दुसरं काय ! (इतक्यांत चंपा येते) अग बाई, ही कोण आली इकडून ? चंपाच चंपाच ही. चंपे, कुठे गेली होतीस तूं ?

चंपा०—मी का ? मी गेलें होतें राजभुवनांत नरवाहन महाराजांकडे. बाईसाहेबांच्या सांगण्याप्रमाणं महाराजांना आणि बाईसाहेबांना मीं आमंत्रण दिलं. आणि त्यांनींहि बाईसाहेबांचे म्हणण्याला मान देऊन येतों ह्मणून सांगितलं.

मेघ०—(आनंदानं) होय का ? तर मग आज एकून चांगलीच गम्मत उडेल ह्मणायची.

चंपा०—अग हो, गम्मत ह्मणून काय विचारतेस ?

मेघ०—पण कायग, तुला त्यांनीं काय काय विचारलं ?

चंपा०—त्यांनीं काय विचारलं अन् काय नाहीं ! मी त्या दोघांनाहि आजपर्यंत झालेला प्रकार थोडक्यांत पण बहुतेक सगळा

सांगितला ! अन् त्या सगळ्या झालेल्या गोष्टीबद्दलची खात्री करून दाखविण्याकरितांच बाईसाहेबांनीं महाराजांना अन् राणीसाहेबांना बोलावण्याकरितां मला धाडलं आहे ह्मणून सांगितलं; त्यावर राणीसाहेबांकडून तर येण्याचं अभिवचन मिळालंच ताबडतोब, परंतु राणीसाहेबांकडून महाराजांना विचारिवलं तेव्हां महाराजांच्याकडूनहि पण त्यांच्या म्हणण्याला रुकारच पडला. झालं, इथपर्यंत तरी सगळं सुरेख जुळून आलं. आतां रात्रीची मात्र कशी काय गम्मत उडते पाहूं.

मेघवर्णः--ह्या अशा फजीतीनं तरी डोळे उघडोत म्हणजे देव पावला म्हणून समजेन मी. बरं तें असो. पण ती " मी तरी तेंच म्हणतें " म्हणणारी होय वा कुठं आहे ?

चंपा०--(हंसून) कोण चतुरिका ना ? तिला बशिवली आहे आज हार आणि गजरे करीत.

मेघ०--म्हणजे! फुगलेलीच का आहे ती अजून? छे बाई काल तर तूं तिची अगदीं पाठच पुरवलीस. आणि म्हणूनच तर ती चिडली इतकी.

चंपा०—आणि तूंहि पण त्यांत थोडीशी भर घातलीस. त्यानं तें प्रकरण जास्त विकोपाला गेलं.

मेघ०—खरं जर म्हणशील तर मी कांहीं तिला चिडवावं म्हणून नांहीं बोललें मुळीं दिखील. माझ्या तोंडांतून सहज आलं आपलं तें. अन् तिला वाटलं, मुद्दाम चिडविण्याकरितां मी बोललें म्हणून.

चंपा०--जाऊंदे कीं तें. पण तूं गेली होतीस त्याचं काय झालं ! तें तर सांग अगोदर.

मेघ०--पण इथंच किती वेळ उभं राह्यचं ? तुला आतां कुठं मंदिराकडेच जायचंयना ? चल तर, जातां जातांच सांगतें तुला सगळं. (जातात.)

प्रवेश ५ वा.

स्थल चैत्ररथोद्यान.

प्रवेशः—रमणक राजयोग्याच्या वेषांत असून हातांत त्रिशूल घेतला आहे असा प्रवेश करितो.)

रमणक०—(आपल्याशीं) अलका सोडून जाते वेळीं जेव्हां मी याच स्थळीं आलों होतों तेव्हां हें स्थळ मला किती संतापकारक वाटत होतं ? आणि तेंच आतां किती मनोहर, किती शांत, किती रमणीय आणि किती आल्हादकारक वाटत आहे! त्यावेळीं इथली जी जी वस्तु मी पहात होतों ती ती माझ्या दुःखाला आणि शोकाला कारण होत होती आणि या प्रसंगीं प्रत्येक वस्तूंत मूर्तिमंत आनंद असल्याचं माझ्या अनुभवाला अगदीं स्पष्टपणें येत आहे. तर वस्तुतः पाहतां आनंद व दुःख हीं दोन्हींहि या वस्तूंत नसून त्यांचं जनन मनुष्याच्या चित्तवृत्तींतच आहे.

साकी

आनंदाचें स्यंदन तैसे पाझरही दुःखाचे ॥ निसर्गनिर्मित वस्तूंमध्यें दृश्य होति हे साचे ॥ जनमनवृत्तीचा ॥ निसर्ग आदर्शचि साचा ॥ १ ॥

(कोकिलांचा शब्द होतो तो ऐकून.)

पद. (चाल–ही वनशोभा रमणीया)

हें स्थल नेत्रां सुख देतें ॥ उत्सव किति तरि होत मनातें ॥ कुसुदिनि विकसति ॥ वेलीं फुलती ॥ उपवन-चकोरि सुधार्थ पळती ॥ सुंदर तारा नभीं उगवती ॥ नटत निशा जणुं बघुनि शशीतें ॥ १ ॥ दयितांसह हे कोकिल कूजति ॥ मोर, मयूरी, तरुवरि लपती ॥ अरविंदीं हे मिलिंद भ्रमती ॥ मद्दयितास्मृति मन्मानिं होते ॥ २ ॥

छेः मी जागा आहें का पण चांगला ? कीं हें सारं स्वप्नांतच बघत आहें ? (कांहीं विचार करून) छेः मी खास जागा आहें प्रियजनाच्या दर्शनाची उत्कंठा आणि त्या पूर्वीं घडणारें हें पूर्वपरिचित वस्तूंचें दर्शन, या योगानंच हा मला असा मोह उत्पन्न होत आहे, अन् दुसरं काय ? हंः काय चमत्कार आहे हा ? तें दंडकारण्य आणि तो रामगिरी सोडल्यापासून आजपर्यंत मी आम्रकूट, अवंती, उज्जयिनी, ती चर्मण्वती, मिथिला, दत्तपूर, कुरुक्षेत्र, कनखल, अशा किती ठिकाणीं फिरलों आणि किती म्हणून पुण्यस्थलें पाहिलीं, पण हें " चित्रोद्यान " पाहून आज जो आनंद होत आहे तसा आनंद त्यांपैकीं एकहि स्थल पाहून मला आजपर्यंत झाला नाहीं. इथं या वेली फुलल्या आहेत, आणि चंद्रकमलिनी मधुर हास्य करीत आहेत, पण या तडागाच्या सभोंवतीं असणाऱ्या या सर्यविकासी कमलिनी अशा मुग्ध कां बरं ? अथवा उघडच आहेः—

पद.

चंद्राविण नच नलिनी विहसति ॥ मलिन नभीं नच तारा चमकति ॥ रवि उदयाविण कमलिनि तैशा ॥ वरिति न कधिंही सुरुचिर हास्या ॥ निज कांताविण पतिरत युवती ॥ त्यजिती यांपरि हास्यहि सुदती ॥ १ ॥

अहाहा ! इकडे—

साकी.

सुंदर कृत्रिम तडागांत या चमकति मीन अनेक ॥ रजतकांतिमयि उदरें त्यांचीं पाडिति मोह क्षणैक ॥ कामरूपि त्या नील घनांच्या आकृति विविध बघूनी ॥ कल्पुनि त्यातें मरुद्गण असें जलदेवी त्या फसुनी ॥ नयनकटाक्षातें । वाटे टाकिति मन्मतितें ॥ १ ॥

तसंच या तडागांतील ही क्रीडा नौका कशी आपोआप वाहत जात आहे. आपोआप कसची ?

पद

निःसारचि केलितरणि बघुनि पवन हा ॥ लोटुनिया मंदगती दावि निज महा ॥ धु० ॥ जगतिं रिक्त होतां ये सहज लघुपणा ॥ सारपूर्ण असतां परि पूर्ण गुरुपणा ॥ बलहीना प्रबल सहज दूर लोटती ॥ काय घना जल-पूर्णा तुलिल अनल हा ॥ १ ॥

पण मीं मारुतासारख्या या अशा महाभागांना असा दोष कां द्यावा ? कारण हेः—

पद. (चाल—हा बालदिवाकर)

वेंचुनिया निज संपदा । आर्तजन आपदा ॥ वारिती जे सदा । थोर तेची ॥ धु० ॥ गिरि आर्त दावानलें । बघुनि घन कोसळे ॥ शमवि वर्षाजलें । करुणमूर्ती ॥ १ ॥ हो शुष्क तरु, वल्लरी । भानुचीया करीं ॥ इंदु—ज्योत्स्ना परी । जिववि त्यांतें ॥ २ ॥

सज्जनांचें हें शीलच आहेः—

पद

न याचितांही दाना देती ॥ तेचि सुकृति, ते कुलीन, मजगतीं ॥ धु० ॥ कुसुमें जरि तीं उपवनिं फुलती ॥ मधुर सुगंधा सकलां देती ॥ न याचितां जल, अंबुद वर्षे ॥ वितरत कौमुदि चंद्र प्रहर्षे ॥ दिनमणि उजळे जग निज दीप्तीं ॥ पवनहि तेंवी जिववी जगती ॥

आणि असंच कांहीं तरी सुहृत्जनाचं कार्य यानं स्वीकारिलं असावं—एखाद्या मदनाला त्याच्यावर अनुरक्त असणाऱ्या रतीकडे घे

जाण्याकरितां तर हा ह्या नौकेला वाहून नेत नसेल ! आतां तर हा जास्तच वेगानें नेऊं लागला हिला, उघडच आहेः—

दिंडी

अंगिकारुनि सुहृदीय कार्यभाग । कधिं न त्यजती ज्यास महाभाग ॥ मंदगति ही [illegible]च कधीं शिवे त्यां ती । कें-
वि विन्मुखता—भीति मग उरे ती ॥ १ ॥

हे बक ह्या विलास नौकेच्या मार्गांत येऊन, मारुताची गती रोधून तिला आडवूं पहाताहेत, पण तो तिला आपल्या वेगानें पुढें पुढें वाहून नेत आहे.

आर्या

अंगीकृत कार्याच्या यत्नां निष्फल करूं जईं [illegible]ती ॥
दुष्कृति तिरस्कृतींतें सुजनांच्या पात्र कां न ते होती ॥ १ ॥

अरे दुर्मती बकांनो, त्या महाभागानें अंगिकारलेल्या कार्याच्या व्यर्थ आड येऊन आपल्यासच तिरस्कार्य कां करून घेतां ? हे [illegible]भाग्या मदना, ह्या बकांच्या प्रतिरोधाला न जुमानतां हा मारुत तुला तुझ्या वल्लभेकडे घेऊन जाण्याकरितां वेगानें येत आहे. तर आतां तूं अधीर होऊं नकोस. (वायुस्पर्शानें पूर्वस्मृति होऊन) हाच वायू मी शापदग्ध होऊन अलका सोडून जात असतां माझी गति रोधित होता पण तोच आतां:—

पद (चाल-सज्ज करुनि चाप०)

श्रांत मजशि बधुन पवन स्वमनिं मोहतो ॥ मंदगती त्यजुनि मजशिं पुढति लोटतो ॥ ध्रु० ॥ चालुनि मत्पद सुजले । एकहि पद नच उचले ॥ परि कोठुनि बळ आ-

लें । मजला नच कांहिं कळे ॥ काय मरुत उरसउनी श्रम निवारितो ! ॥ १ ॥

अथवा याविषयीं शंका कशाला ? या महाभागाचं मलाहि पूर्ण सहाय्य दिसतं आहे. आणि अशा स्थितींत तें मला पाहिजेहि पण आहे. कारण—

साकी.

प्रातःकुंद–प्रसवापरि मम जीवित शिथिलचि झालें ॥
टिकेल जरि म्यां जोववीन या प्रियजनदर्शनसुजलें ॥
विरह पुरे आतां । सकल जगाचा जो हंता ॥ १ ॥

(कोणी येत आहेसें पाहून)

दिंडी.

केलि उपवनिं गंधर्व विलासार्थी ॥ मधुरकंठी अप्सरा दिव्यमूर्ती ॥ धरुनि हस्तीं सप्रेम, मधुर लीला ॥ करित येती वाटतें मन्मतीला ॥ १ ॥

(पडद्यांतून गायन ऐकूं येतें.)

पद (चाल–तोरा दावर दादार यार शहार०) राग काफी त्रिताल.
त्रिपुरदमना वंदुनी ॥ करुं कवन सानंद वदनीं ॥ सुररिपु त्रिपुरा । असुरवरा । गत असु करि हर ॥ ध्रु० ॥ अंबरिं रचि नव त्रिपुरपुरी ॥ मति-धरि अमरावति-पति पदाचि निशुंभ खर ॥ १ ॥

रमणक०—(कान देऊन उभा असलेला) हे तर—

'त्रिपुरविजयाचें' गीत गात येत आहेत. एकंदरींत सर्वच गोष्टी मनाला उत्साह आणि आल्हाद देणाऱ्याच घडून येत आहेत, तर आतां मीहि:—

पद (होतों द्वारकाभुवनीं या चालीवर)

जातों मंदिरीं छपुनी ॥ पाहतों प्रिया लपुनी ॥ चुंबनें तिज चकित करुनी ॥ कशी बघतों फसत मोहनि ॥ जा० प्रियरमणी त्रिशुला निरखुनि भ्रमकरिं होइल चकित हरि-णी परि, परि परिसुनि मम वच, मीन हरिखुनि कंठिं टाकिल कर शशि-वदनी ॥ जातों ॥ १ ॥

जातो.

प्रवेश ६ वा.

स्थळः---इंदिरेचें गृह.

प्रवेशः—(इंदिरा व चंपा प्रवेश करितात.)

इंदिरा---(लगबगीनें) कायग, महाराजांना आणि राणीसाहे-बांना तो मधुकर आहे त्याच दालनांत बसविलं आहेसना ?

चंपा---होय. तो मधुकर काय लाजला आहे ह्मणून सांगूं तुह्माला! तो तितक्यांत बाहेर पडायच्याच बेतांत होता, पण मी किती वस्ताद. चतुरिकेला—महाराजांना आणि राणी साहेबांना आंत बसवायला सांगून दरवाजाला बाहेरून घेतली एकदम कडी लावून; त्याबराबर काय त्या-ची तारांबळ उडून गेली ह्मणून सांगूं ? अगबाई, काय पण नटलाय तो अगदीं ! तें लुगडं, तो शालू, आणि ते गळाभर दागिने, कोणी ह्मणेल खरंच ही कोणी तरी अप्सराच आली आहे एखदी नटून !

इंदिरा—मेघवर्णाकडून मींच त्याला निरोप पाठविला होता. त्या-प्रमाणं आला आहे तो. पुरुष कीं बायको हें मुळींच ओळखायला सुद्धां येत नाहीं. सगळा मालतीबाईचा वेष केल्यामुळें दुरून तर अ-गदीं थेट मालतीबाईसारखा दिसतो (इतक्यांत मालती येते) बरं पण ही कोण आली ! ही मालतीच. बरी वेळेवर आली ह्मणायची.

(मालतीस) ये सखे, आलीस ? (दोघी गालांतल्या गालांत हंसतात) चंपे, जा आतां उशीर नको. (मालतीस) जा इच्याबरोबर जा अन् ही बसवील तिथं बैस हां. महाराज आणि राणीसाहेब नुकतींच येऊन बसलीं आहेत. जा तर आतां एक पळभर दखील नका उभ्या राहूं इथं. (चंपावतीस एकीकडे) चंपे, दरवाजा बिरवाजा मात्र नीट संभाळ हो. नाहीं तर हातच्या हातीं बसशील करून आतांच्या आतां सगळा घोंटाळा. (चंपावतीचे मागून मालती जाते; त्या गेल्यावर आपल्याशीं) इथपर्यंत तरी हें एक परीनं चांगलं निभावलं ह्मणायचं. त्याच दालनांत मधकर आहे हें मीं मालतीला सांगितलं नाहीं, हें देखील मीं एक प्रकारानं बरंच केलं ह्मणायचं; नाहीं तर तिनं तिथं जायला अमळ कांकूच केलं असतं. (कांहीं आठवल्यासारखें करून) हो पण ही कालचीच वेळ झाली ह्मणायची. याच वेळीं आला होता तो काल. बहुतेक इतक्यांत येईल. काय पण नीचाचं कारस्थान ! मदनिकेनं मधाशीं दाखविलेल्या त्या पत्रावरून तर निकालच लागला सगळा ह्मणायचा.

पद (चाल—संतापें तनु० शा. सं.)

दंडावें त्या अधमातें । मनिं ऐसें कितिदां येतें ॥ परि अंतरिं स्मृति मज होते । तद्दयिता उपकृति करि ते ॥ आणुनिया संदेशातें । जीवविलें सखिनें मातें ॥ चाल ॥
प्रियकांत प्राणविश्रांत आणि निभ्रांत । हेंचि मनिं येतें ।
काय दे पंचप्राणातें ॥ १ ॥

ही मदनिका जर तिकडचा निरोप घेऊन आली नसती तर आज माझी काय स्थिति झाली असती कुणाला ठाऊक ! (कांहीं चाहूल ऐकून) अग बाई, आलाच वाटतं तो. जावंच तर आपण आतां आंत मुकाट्यानं. (जाते.) [मेघवर्ण व मदनसुंदर बोलत येतात.]

मेघ०—पण हें काय अगोदर !

मदनसु०—काय ह्मणजे ! रस्त्यांतून तसं येणं नाहीं बोवा आपल्याला पसंत वाटलं. अन् लाजय पण वाटूं लागली तशा वेषानं यायची.

मेघ०—पण हें कांहीं चांगलं झालं नाहीं एकंदरींत.

मद०—तें कां ?

मेघ०—कां ह्मणज ? वेळ आहे, प्रसंग आहे, तसे आला असता ह्मणजे, कदाचित् प्रसंगीं कोणी आलं असतं तरी मग त्याची कोणाlaहि भीति बाळगायला नको होती.

मद०—(हंसून) हं: पण तूं मला इतका वेडा समजतोस ? (एक दासीचें लुगडें काढून) त्या मालतीच्या दासीकडून घतलंय हें, पाहिलंस–कसा कडेकोट तयारीनं आलों आहे तें ! (इकडे तिकडे पाहून) बरं. पण इथं दुसरं तिसरं तर कोणी नाहीं ना आता ?

मेघ०—कोणी देखील नाहीं दुसरं. तरी पण न जाणो. तुह्मीं आपलें अगोदर हें पांघरून उभे रहा इथं असे, ह्मणजे झालं तोंवर मी आंत जाऊन वरदी देऊन येतो बाईसाहेबांना आपली स्वारी आल्याची. (जावयास निघते.)

मद०—तुझ्या सांगण्याप्रमाणंच कां होईना. (पूर्वीच्या पोषाखावरूनच तें लुगडें दासीसारखें नेसतो.) एकदां कां इंदिरा साध्य झाली ह्मणजे मग मधुकराला एकदां स्त्रीवेषांत यायला लावून त्याची अशी फजिती करतो कीं ज्याचं नांव तें ! (नेमून) आतां कसली आली आहे आपल्याला इथं भीति ? आतां कोणी देखील ओळखणार नाहीं आपल्याला ! (कांहीं चाहूल ऐकून) कोणी आलं तर नाहीं ? कोणी कां येईना आतां, आपण आपले जरा बाजूला असं अंधारांतच राहावं तो मेघवर्ण येईपर्यंत. (बाजूस जातो.)

मेघ०—(स्वताशीं) पुरुषाची जात एकंदरींत संशयी खरी. मला वाटतं हीच वेळ ठीक आहे ठरल्याप्रमाणं करायला. (आपला पोषाख नीट पाहून.) बाईसाहेबांची तरी हीं युक्तिच आहे एक. मला आंतून बायकोसारखा पोषाख करायला सांगितला ! छेः पण लुगड्याचा एखादा पदर बिदर तर नाहींना दिसत कुठे बाहेर ? नाहींतर भलतंच व्हायचं. (सावरून उभी राहून) ' इंदिरेचं खरं प्रेम माझ्यावर आहे अन् या स्वारीची केवळ फजिती करण्याकरितां इंदिरेच्या सल्ल्यावरून यानां फशिवलं,' इतके कां शब्द कानावर पडले कीं स्वारी अगदीं खवळून जाईल. तर आतां उगीच उशीर करून ! काय उपयोग ? (किंचित् पुढें येऊन मदनसुंदरास ऐकूं येई इतक्या बेतानें) परवां इंदिरेनं ह्या स्वारीची इतकी फजिती केली पण ती पुरे नाहीं झाली. स्वारी अजून असं समजते आहे कीं इंदिरा खरोखरीच आपल्यावर अनुरक्त आहे. समजा, समजा ह्मणावं. आपल्या मनांत वाटेल तें समजा; आणि मनांतल्या मनांत हवे तितके मांडे खा !

मद०—(ऐकून एकीकडे) काय, तर मग त्या अवदसेनं माझी थट्टाच केली एकून आणि हा मेघवर्णहि तिला सामील ! थांबा ह्मणावं आतां तुमच्या दोघांवर सूड उगवितों; पण इथं जरा पंचाईत येईल. कारण ही इंदिरा दिसते आहे पक्की पतिव्रता. मीं हरप्रयत्न केले, पण ही ह्मणून बिलकूल बधत नाहीं आपल्याला. (कांहीं वेळ विचार करून) हो. अथवा असंच ! ही इंदिरा या मेघवर्णालाच लागूं आहे असंच द्यावं उठवून झालं ! (कांहीं ऐकून) बरं पण हा मेघवर्ण काय बरं पुटपुटतो आहे आणखी ?

मेघ०—(स्वगत) माझं आणि इंदिरेचं कांहीं रहस्य आहे असें इकडं भासवून जरा घोंटाळ्यांत पाडूं. जामूताला सांगून ठेवलंच आहे स्वारीला ह्याच वेषांत धरून ठेवायला. (उघड) आतां त्या चंपेला अन

चतुरिकेला हांका मारून याची चांगली फजिती उडवितो. म्हणजे ही स्वारी पुनः फिरकणार सुद्धां नाहीं इकडे. (रमणक राजयोग्याच्या वेषांत येतो.)

मद०—(एकीकडे) हा माझी फजिती करणार! मधुकराच्या इथं हा चोरी करून आल्याचें मी उठिवतों म्हणजे झालं.

रमणक०—(थबकून आपल्याशीं) छेः हा इथें कांहीं विलक्षणच प्रकार दिसतो आहे. हा इथं एक सुंदर पुरुष दिसतो आहे. हा कोण ? आणि ही नवीनच दासी कोण उभी आहे इथं ? हें काय गूढ आहे कांहीं समजत नाहीं. (ऐकलंसं करून) हा काय बरं पुटपुटतो आहे ?

पद–(चाल–हिमधवलांगी०)

मेघ०—　　मजप्रति लाभे । शशिवदना सुंदरा ॥

रम०—(स्वगत) हा कोणाला बरं अनुलक्षून म्हणत आहे हें ? ही नवीन दासी दिसते आहे हिला तर नव्हे.

मद०—(स्वगत) म्हणजे ! ती ह्याच्यावर अनुरक्त आहे कीं काय ? एकून मी समजत होतों तशी पतिव्रता नाहीं तर ?

मेघ०—　　　पद (पुढें चालू)

रुचिराधर सखि इंदिरा ॥ ध्रु० ॥ मजप्रति० ॥ सहज-
मनोहर अनुपम सुंदर वधुनि लज्जिता रति चारुतरा
॥ १ ॥ मधुरस्मित मुखि, मंजुवचा सखि, चंचल मृग-
दृशि विनय-मंदिरा ॥ २ ॥ मजप्रति० ॥

रमणक०—काय ! माझ्या कर्णेंद्रियाची शक्ति भ्रंशित तर झाली नाहीं !

मद०—आतां तर संशयच नको.

रमणक०—संशयच नको ! कोण बोललं हें !

मेघ०--अशी ही फजिती झाली ह्मणजे ही स्वारी यापुढं इथं पाऊलहि ठेवायची नाहीं.

रमणक०--ह्मणजे ? याचा अर्थ काय !

मेघ०--आतां येऊन जाऊन रमणक उरला. पण तो परत यायची तर आतां आशाच नको. कारण मधुकरानं तो मेल्याची बातमी उठविल्याला--

रमणक--ह्मणजे ! काय भयंकर शब्द ऐकतों आहे मी इथं हे !

मेघ०--सबंध चार महिने झाले. इतक्या दिवसांत तो जिवंत असल्याचं ज्याअर्थी कांहींच समजत नाहीं त्याअर्थी मधुकराची बातमी बहुशा खरी असावी. आमचं दोघांचं रहस्य तिसऱ्याला काय ठाऊक ! स्वारीची फजीती करून एकदां हा कांटा उपटून टाकला म्हणजे मग मला भीति नाहीं उरणार कसली. माझी सखी--

पद (पुढें चालू)

मम वक्षस्थल, नयनाश्रुजलें, भिजवित सहसा विद्रुमाधरा ॥ ३ ॥ मजप्रति० ॥

रमणक--(एकदम पुढें होऊन मेघवर्णास धरून क्रोधानें) अरे नीचा, अधमा ! बोल, कोण आहेस तूं ?

मदन०--(आपल्याशीं) याचा शाप संपतो उद्यां, अन् हा आजच कसा आला ? कसाहि येवो. या मेघवर्णावर सूड उगवून घ्यायला ही संधी छान आहे. (पुढें येऊन उघड) मित्रा, बरा वेळेवर आलास.

रमणक--ह्मणजे तूं कोण ?

मद०--मी आपला--मदनसुंदर.

रमणक--ओहो ! मदनसुंदर ! अन् हा असा वेष काय ह्मणून ? आणि हा मनुष्य कोण ?

मद०—ह्या मनुष्याचें नांव मेघवर्ण. चार महिने झाले याचा अन् इंदिरेचा कांहीं संबंध असल्याची बातमी माझ्या कानावर आली. आणि तेव्हांपासून त्यांत तथ्यांश किती आहे तें काढण्याकरितां मला हात्र वेष काय पण आजपर्यंत किती प्रकारचे वेष, काय काय क्लृप्ति आणि कारस्थानं लढवावीं लागलीं! इंदिरेनें हा आपल्या माहेरून एक दूत आला आहे असं म्हणून ह्याला आज तीन चार महिने आपल्या इथं ठेवून घ-तला आहे. शिवशिव! काय नीचपणा, साहस, आणि साऱ्या स्त्रीजा-तीला कलंक लावणारं अघोर कृत्य हें! हें एक; आणि दु-सरा व्यवहार मधुकराशीं. जिला तुह्मी प्राणाहून प्रिय समजत होतां, जिच्या पातिव्रत्याविषयीं सगळ्या अलकेभर एकसारखे स्तुतिपाठ चाल-त होते, त्या तुमच्या गुणवतीनं—

रमणक—बस्स, पुरे. अशा शब्दांनीं आणखी जास्त खवळून टाकू नकोस मला! (चंपा येते तिला पाहून) अन् ही बटकूर म्हणजे वारा वाहील तशी लुडबुडणारी!

चंपा—(रमणकास पाहून) अग बाई, हा साधुपुरुष कोण दिस-तो आहे इथं? यावेळीं आणि यांनीं मदनिकेला कां धरिली आहे अशी! (ओळखून) अथवा संशय कशाला? अगदीं मदनिकेनं सां-गितल्याप्रमाणें वेष दिसतोय याचा. छेः रमणक महाराजच हे. संशयच नको.

मद०—अन् त्या तुमच्या मनमोहिनीनं—होहो, मनमोहिनीच. का-रण मधुकराला पत्र पाठवितांना पत्राच्या खालीं "आपली मनमोहिनी" असं लिहित असे ती. फार कशाला हें एवढं एकच पत्र वाचून पहा, ह्मणजे तुमची खात्री होईल (पत्र त्यास देतो).

चंपा—हंः याच्या बोलण्याच्या झोंकावरून मधुकराची फजिती करण्याकरितां बाईसाहेबानीं लिहिलेलंच पत्र दिसतंय हें!

म० सुं०-हें अक्षर आहे कां तुमच्या ओळखीचं ? याला सोडा तुम्ही ! याचा चांगला समाचार घेतों मी !

रमणक--(मेघवर्णास सोडतो) (पत्राकडे नीट रोखून पाहून) तिचंच, तिचंच अक्षर हें. (पत्र वाचन ओठ चावून) ' आपली मन-मोहिनी ! '

इंदिरा०—[जवळ जाऊन एकदम कमरेस मिठी मारण्यास धांवते] अगबाई, केव्हां येणं झालं ?

रमणक--(तिला झिडकारून)

पद (चाल-अधम किति पालका)

दूर हो दूर हो दुष्कृत्ये ! ॥ स्वैरिणी, जारिणी, पाप-मूर्ते ! ॥ ध्रु० ॥ भ्रष्ट कर्मे तुझीं स्पष्टतर दीसती । दुष्टतर वासना राक्षसी ह्या ॥ अखिलही स्त्रीचिया जातिला निंद्यता । आणिलिस आचरुनि पापकृत्या ॥ १ ॥
जा भुजंगासि त्या घट्ट कवटाळुनी । चुंबुनी देइ त्या गरलदर्पा ॥ कालकूटाहुनी जहर विष हें असे । सर्पिणी ! पाज जा काळसर्पा ॥ २ ॥ दूर हो० ॥

चंपा०—(पुढं होऊन) महाराज, तुम्ही ह्मणतां यातलं बाईसाहेबांच्याकडे कांहीं नाहीं. हा कर्दनकाळ—हा मदनसुंदर त्यांच्यावर नुसती आग पाखडतो आहे ही.

रमणक—आग ! आग पाखडतो आहे ? अग कुट्टिनी !

इंदिराः—(विनम्र होऊन) अगबाई, काय माझ्या हातून काय असा अपराध तरी काय घडला ? [पायां पडून] माझा कांहीं अ-पराध असल्यास-

रमणक--[तिला लाथ मारून]

पद (पुढें चालू.)

दूर हो दूर हो दुष्टकृत्ये । स्वैरिणी ! जारिणी ! पापमूर्ते ! ॥
अधम चांडाळिणी, विमलकुलवैरिणी । यक्ष-सद्वंशयश
दूषवीलें ॥ नरक लोकीं उडी घेउनी या क्षणीं । भूषवी
जा तया भ्रष्टशीले ! ॥ २ ॥ दूर हो० ॥

अपराध काय घडला ! (तिचे अंगावर पत्र फेकून) बघ, बघ, आतां तरी बघ काय तुझा अपराध आहे तो ! मनमोहिनी ! नव्हे जग-मोहिनी ! (आपल्या हातांतील त्रिशूळ उगारून इंदिरेला मारण्यास सरसावतो)

मेघ०--(सोडवून घेऊन आपल्या अंगावरील पुरुषाचा सगळा वेष टाकून) साधु महाराज, मला ओळखलत कां आपण अगोदर ?

रमण०--(साश्चर्य) ह्मणजे ! तूं पुरुष नव्हेस तर एकून ! (आठवण करीत आहेसें दाखवून) हो, तुला कुठं तरी पाहिल्यासारखं वाटतं खरं. पण कुठं तें नाहीं आठवत !

मेघ०--तें सगळं कळेल. हा त्रिशूल सोडा अगोदर. इंदिराबाई-साहेबांचा कांहीं एक अपराध नाहीं. कसा तें सांगतें मी सर्व. पण हा त्रिशूल द्या अगोदर माझ्या जवळ (रमणक त्रिशुल खालीं टाकतो) साधु महाराजांची स्वारी रामगिरीवर असतांना मदनिका म्हणून होती कां तिथं कुणी आपल्या सेवेला ?

रमणक--(ओळखून) होय. ओळखलं, आतां पकं ओळखलं मी तुला ! पण मदनिके, तूं इथं कशी ? आणखी रामगिरी कां सोड-लास तूं एकाएकीं ?

मद०—महाराज. गेला जेष्ठ सरतां सरतां आषाढाच्या आरंभीं एक दिवस मेघानं आकाश अगदीं भरून गेलं होतं, अन् अशा वेळीं

आपण रामगिरीवर अरण्यांत भटकत असतां जेव्हां मेघाला पाहून आपल्या प्रियेची आठवण करून शोक केलात, आणि त्या निर्जीव मेघाला जेव्हां आपण निरोप सांगितलात तेव्हां तो आपला निरोप इथं येण्याचा तो गुप्त मार्ग व कैलासाचं आपण केलेलं तें वर्णन ऐकून मी आपणाला न समजूं देतां जी तिथून निघालें तीं आपला निरोप घेऊन इथंच आलें ! तों इथं—(मदनसुंदराकडे पाहून लाजते).

रमणक—का त्याच्याकडे पाहून अशी लाजतेसशी ?

चंपाः—तिचा अन् ह्याचा तसाच संबंध आहे लाजायाचा.

मद०—(घाबरून) अरे, हें काय मध्येंच लचांड ? ही कशी आली इथं ! आतां तर आपल्या फजितीला पारावारच नाहीं. आतां इथं एक क्षणभरहि राहून आपला निभाव लागणार नाहीं. (सर्वांची दृष्टी चुकवून जाऊं लागतो. चंपा जीमूतास खुणावते व तो त्यास धरून ठेवतो.)

चंपा०—हं हं मदनसुंदर, आतां पळतां कां असे ? उभे रहा जरा. पण काय हो सुंदर, तुमची बायको मेली होतीना ? आणि ती मोठी कजाग, भांडखोर, चहाडखोर, चोर, माणसांतून उठलेली, अशी होती नाहीं ? कां बोलत कां नाहीं आतां ? आपण हें असं वेषांतर कां केलंत ? बोला, बोला ! (मदनसुंदर शरमतो)

रमणक—ह्मणजे ! मदनसुंदर हिचा पती कीं काय एकून ? मदनसुंदर ही काय आहे भानगड ?

मदनिका—महाराज, अगोदर हें एवढं पत्र वाचून पहा. ह्मणजे या सर्व गोष्टींचा निकाल लागेल. (पत्र देते) आणि आपण बाईसाहेबांच्या हातीं दिलेलें पत्र केवळ त्या मधुकराची फजिती करण्याकरितां लिहिलं होतं.

रमणक—[पत्र वाचून त्वेषानें] अरे शठा, तूं इतका नीच असशील अशी कल्पनाच नव्हती मला. नीचा, नराधमा, बोल बोल. तो तुझा साथीदार मधुकर कुठे आहे ? त्याचा अन् तुझा दोघांचा आतांच्या आतां एकदम कपालमोक्ष करतों. (पश्चातापानें) अरेरे ! मी ह्या निष्कलंक साध्वीच्या आचरणाविषयीं व्यर्थ संशय घेतला. (इंदिरेजवळ जाऊन)

पद (ममिजल तेज या चा०)

नीचगे नीच मी संशया घेउनी ॥ निंद्यता आणिली व्यर्थ तुज ही ॥ त्रिशुल करिं घेउनी, सहज उद्युक्त मी जाहलों क्रूर कर्मास पाही ॥ १ ॥ प्रिये, व्यर्थ गे व्यर्थ मी तुजशि छळिलें ॥ नत पदीं, पाहिजे आज क्षमिलें ॥ ध्रु० ॥ (वांकतो).

इंदिरा०—पण हें काय ? यांत क्षमा ती कसली मागायची ?
रमण०—क्षमाच काय पण—

पद (चाल—अंकित पदांबुजाची०)

सुंदरि, करी मला दंडासी ॥ नच युक्त क्षमा अधमासी ॥ ध्रु० ॥ पुण्य सुतीर्थी म्यां मळवियलें, लोटुनि अघ शैलासि ॥ सुं० ॥ आनंदप्रद इंदुकलेवरि ओणियली तमराशि ॥ सुंदरि० ॥ कोमल वल्लरि वरि कीं अधमें टाकियलें वन्हीसि ॥ सुंदरि० ॥ निःसंशय तव संशय घेउनि, हाय ! दिले डागासि ॥ सुंदरी० ॥

इंदिरा०—

पद (चाल सदर)

नाथा, नका त्यजूं न्यायासी ॥ वदुं नका अशा वचना-

सी ॥ ध्रु० ॥ पति चरणांबुजरज शिरिं धरणें युक्त असे साध्वीसि ॥ ना० ॥ कठिण वचें हीं शल्याग्रापरि भेदिति मम हृदयासि ॥ ना० ॥

रमण०--आणि ह्या सर्वांला कारण हा नराधम ! (त्याला ओढून) दुरात्म्या, बोल, आतां तरी बोलं खरं. हें लुगडं नेसून कशाला आला होतास तूं इथं ?

(मदनसुंदर खालीं मान घालून उभा राहतो.)

इंदिराः—(रमणकाचे कानांत कांहीं सांगून) याची अन् त्या मधुकराची दोघांची एकदां चांगली फजिती करावी ह्मणून मीच त्यांना बायकांच्या वेषांत या ह्मणून सांगून पाठिवलं होतं. मधुकर देखील इथंच आहे. अन् ही सगळी फजिती राणीसाहेबांच्या अन् नरवाहन महाराजांच्या देखत व्हावी ह्मणून त्याना सुद्धां मी इथं आणून लपून बशिवलं आहे. जाग चंपे, आंतून जा, अन् उघड त्या दालनाचा दरवाजा, अन् त्या मधुकराला हाताला धरून घेऊन ये इकडे. (चंपा जाऊन दरवाजा उघडते.)

रमणक--काय तर ह्याचा साथीदारहि इथंच आहे ! (आश्चर्यानें) आणि महाराज आणि राणीसाहेबसुद्धां इथच आहेत म्हटलंस ? (मदनसुंदरास) नीचा, तुझ्या ह्या अधमपणाबद्दल हें घे तुला बक्षीस. (मारण्याला धांवतो).

इंदिरा०—छे बाई, हें काय ? ह्या मदनिकेकडे पाहून तरी त्याला क्षमा केली पाहिजे.

रमणक—या नराधमाला क्षमा ! (त्रिशूळाचा दांडा त्याचे कपाळास लावून रेटतो.)

इंदिरा०—छेः बाई हें काय पण ?

रमणक०— दुर्जनाना अशीच शिक्षा पाहिजे.

इंदिरा०—हो पण झाली ही थोडीका झाली ? छे बाई, सोडावं त्याला. निदान मदनिकेकडे पाहून तरी सोडावं.

रमणक०—मदनिकेकडे पाहून नाहीं, पण तूं म्हणतेस म्हणून सोडतों.

इंदिरा—तसं कां होईना. पण याला एकवेळ क्षमा करावी.

रमणक०—(त्यास सोडून) जा, जा मूर्खा इथून ! यापुढें मला तोंड नको दाखवूस. (मदनसुंदर जातो व त्याच्या मागोमाग मदनिकाहि जाते.)

इंदिरा—(रमणकाला आलिंगन देऊन) अगबाई, माझ्या पायांत किती तरी त्रास सोसावा लागला पण इकडे; काय झाली आहे ही दशा !

रमणक०—छेः ! उलट माझ्या पायांतच या अधमांनीं तुझ्यावर हीं नाना प्रकारचीं संकटं आणलीं ! (तिच्या हातांत माळ पाहून) प्रिये, हें काय ?

इंदिरा—ही माळ.

रमणक०—जपमाळ कीं काय ?

इंदिरा—हो जपमाळच.

रम०—कसला घेतला आहेस जप ?

इंदिरा—दुसरा कसला घेणार !

रमणक०—(आनंदानं) अस्सं, मग ही अशी हातांत घेऊन काय करितेस ?

इंदिरा—इथून जातांना जी माझ्या वेणींतून काढायची झाली होती तीच ही. आणि शापाचा एकेक दिवस मोजायला हीच माझ्या उपयोगीं पडली. आणि ह्मणूनच हिला मी नेहमीं आपल्या जवळ बाळगतें.

रमणक०--(माळ घेऊन) ही माळ तर मीं आपल्या हातानं गुंफली होती. ही आपल्या सखीप्रमाणंच म्लान झाली आहे. ही ज्या अर्थी तुझ्या इतकी कामीं पडली त्या अर्थी हिला आतां हेंच स्थळ योग्य. (असें ह्मणून तिचे डोक्यांत घालतो)

पद (चाल-उद्यां बघ जातें या०)

प्रिये वेणीची ॥ काढिली माळ जी साची ॥ ध्रु० ॥ मन्मनिं गुंफिन कबरी वरती ॥ स्वकरें येतां मीं शापांतीं॥ तोंवरि दूरचि केली होती ॥ सखे अवडीची ॥ माळ जी तुझ्या प्रीतीची ॥ १ ॥ विरहें त्रस्तचि होशिल ह्मणुनी ॥ मुक्त केलि जी वेणी वरुनी ॥ प्रेम-दाम ती अजि स्वकरांनीं ॥ भूषा कबरीची ॥ बांधितो कुंतलीं साची ॥ २ ॥

(इतक्यांत सर्वजण येतात.)

इंदिरा--(दूर होऊन) अगबाई, महाराज आणि राणीसाहेबच आल्या कीं इकडं.

रमणक०--पण तो मधुकर कुठं आहे ?

इंदिरा--(दाखवून) तो तो ! महाराजांनीं उजव्या हातानं धरलाहे तो !

रमणक०--अस्सं ! मला वाटलं ती त्याची स्त्री मालती असावी.

इंदिरा--आम्ही सगळ्याजणी अशाच फसलों होतों.

[नरवाहन राणीसह येतो त्यास रमणक नमस्कार करितो.]

नर०--रमणका, ऊठ ऊठ. तुझा मीं व्यर्थ छळ केला. माझ्याकडून तुला असा उग्र दंड करवायला सर्वस्वीं हा मदनसुंदरच कारण झाला आहे.

रमणक०--पण त्या नराधम मधुकराचंहि त्यांत अंग होतंच.

नरवाहन—ह्याचं जरी अंग असलं तरी हा निव्वळ नंदिबैल म्हणूनच त्या सुंदराच्या नादीं लागला. (मधुकराला पुढें करून) मूर्खा, क्षमा माग रमणकाची. रमणका, याच्या अपराधाबद्दल याला क्षमा कर. याच्या अपराधाबद्दल (त्याच्या पोषाखाकडे बोट करून) याची जी ही फजिती झाली आहे ती पुरे आहे; आणि ह्याला कृतकर्मांचा पश्चात्तापहि पण झाला आहे. ह्यानं माझ्यापाशीं आपले सर्व अपराध कबूल केले आहेत. सगळा अपराध आहे त्या मदनसुंदराकडेच! हा पाहिलास तो नीच मनुष्य पळून जात होता.

रमणकः—महाराज, मीं त्याला क्षमा केली आहे.

मदनसुं०—महाराज, मी सर्वस्वी अपराधी आहें. मला क्षमा असावी.

पद (चाल सवाई)

नरवाहनः—(मदनसुंदरास)

॥ दुर्मति, दुष्कृति, घातकि, पातकि, पूर्ण दुरात्मन्, खल अधमा ! ॥ शंकिशि अंतरिं काय न लेश हि? याचिशि संप्रति काय क्षमा ! ॥ भ्रंशुनि चित्त मदीय तुवांचि प्रकोप-कृशानुस पेटविलें ॥ लोटुनि त्यांतचि सात्विक, सन्मति, प्रेमळ दंपति दाहविलें ॥ काय क्षमा अधमाप्रति, दुर्मद ! याहुनि पातक घोर नसे ॥ दुग्ध भुजंग कुलाप्रति, प्राशनदान सुनिश्चित भयद असे ॥ उग्र प्रचंड असा तनुदंडचि युक्त असे जगिं दुष्कृतिनां ॥ खंडुनि या तनु, तुंड विचूर्णुनि, द्या नव पिंडचि गृध्रगणा ॥ १ ॥
दुर्मति, दुष्कृति, घातकि, पातकि, पूर्ण दुरात्मन् खल अधमा ॥ उग्र प्रचंड असा तनुदंडचि युक्त असे; नच युक्त क्षमा ॥ ध्रु० ॥

रमणकः--(मदनसुंदरास धरून त्याच्या छातींत त्रिशूल खुपसूं पाहतो. नीचा, ज्या त्रिशूलानं तूं आतां मला माझ्या प्रियेचा वध करायला लावणार होतास त्यानंच तुझा अंत करून टाकतों (त्रिशूल उगारतो.)

इंदिरा०--अगबाई ! प्रिया हें काय ? काय करायला उद्युक्त व्हायचं. याला क्षमा झाली आहे ना इकडून ?

नर०-इंदिरे,तूं बाजूला हो.तीच तीच शिक्षा योग्य आहे त्या अधमाला.

मदनि०—(दुःखानें मूर्छित होऊन) बाईसाहेब, माझं सौभाग्य राखणं आतां आपल्या हातांत आहे.

इंदिराः--सखे मदनिके, सावध हो,सावध हो चंपे, चतुरिके,हिला अंमळ वारा वाला ग. (रमणकास)

पद. (चाल पति मिळो तुझ्यासम रघुराया. चं.)

सुदयिता, धरा मनिं सुदयेला ॥ ध्रु० ॥ जीवनदायी अंबु--कुंभ हा । भंगुं नका याला ॥ कुशलवृत्त तव आणुनि सखिनें । जीवाविलें मजला ॥ तिजवर दुर्धर प्रसंग आणुनि । शासुं नका इजला ॥ वैधव्यानल उग्र दाह तो । भाजिल वल्लरिला ॥ अनुदारहि जन कृत उपकृतिच्या । ठेविति संस्मृतिला ॥ उदारधी मग काय न स्मरती । केल्या उपकृतिला ॥ करुणागारा, शरणा ! करुणा शोभविते सकलां ॥ १ ॥

मदनि०--(सावध होऊन रमणकाचे पाय धरून) महाराज, माझ्या मंगळसूत्राकडे पहा हो !

रमणक०—(त्यास लोटून,) मदानिके, तुझ्याकरितां ह्मणून याला क्षमा करतों.

मदनसुं०——छेः छेः छेः मी क्षमेला मुळींच पात्र नाहीं. कारणः—

पद (सकळ दोष मजपरिचा०)

घोरकर्म, खल, कृतांत, दुष्टमती, पापा ॥ प्राणदान अप्र-माण; जेवि काल-सर्पा ॥ ध्रु० ॥ मृत्युहुनी उग्र, घोर, युक्त दंड मातें ॥ मी मदांध होउनि हें करित दुरित हस्तें ॥ दुष्कृतिनां मृत्युदंड, हीच त्यां कृपा ॥ १ ॥

ह्मणून ह्मणतों, खुपसा खुपसा तो आपला त्रिशूल. आणि सोडवा मला या यातनेंतून एकदां, नाहीं नाहीं हें मला सहन होत. नको पण, थांबा थांबा जरा. मरणाच्यापूर्वी मला (मदनिका,इंदिरा व मालती यांजकडे पाहून) या तिघींची क्षमा मागितली पाहिजे. (इंदिरेच्या व मालतीच्या पायांवर डोकें ठेवून) तुमच्याकडे वर तोंड करून पाह्यालासुद्धां मला लाज वाटते. मी तुमचा सर्वस्वी अपराधी आहें. तर मला एकदां क्षमा केली असं ह्मणा ह्मणजे मग मी सुखानं मरेन. मग माझें प्राण घोटाळायाचे नाहींत.

दोघीः——ऊठ. ऊठ. क्षमा आहे तुला तुझ्या अपराधाची.

मदनसुं०——(मदनिकेचे पाय धरूं लागतो) प्रिये, छेः अशा प्रमळ आणि पवित्र नांवानं तुला हाक मारण्याचा ह्या नीचाला अधिकारच नाहीं. कारण तुझी योग्यता न ओळखतां तुला मी नाहीं नाहीं तें बोललों, अन् देऊं नयेत अशीं भलभलतीं दूषणं दिलीं. तुझ्यापुढं तोंड दाखवायला सुद्धां मला लाज वाटते. माझ्या हातून आतां जास्त नाहीं बोलवत. तर माझ्या सर्व अपराधाबद्दल यांच्याप्रमाणंच तूंहि मला क्षमा कर. मी जगावं ह्मणून नको यांच्याजवळ तूं प्रार्थना करूंस. कारण मी जर यापुढें जगलों तर आजपर्यंत केलेल्या एक एक नीच आणि राक्षसी कृत्याची वारंवार

आठवण होऊन तें जगणं मला फार दुःखदायक आणि क्लेशकारक होईल! तर बोल, आहेना तुझी क्षमा ? मी क्षमेला पात्र नाहीं हें तर उघडच दिसताहे. पण मीं सुखानं मरावं एवढ्याकरितां तरी एकदां क्षमा आहे असं म्हण! कां ? कांहींच बोलत नाहींस ?

मद०—काय बोलूं बाई मी इथं! (इंदिरेच्या तोंडाकडे पाहते.)

इंदिरा--(रमणकास) पाहिलाना आतां ह्याला कसा पुरा पश्चात्ताप झाला आहे तो!

रमणक०—सुंदर. ऊठ ऊठ. तुला कृतकर्मांचा खरा पश्चात्ताप झाल्यासारखा दिसतो. त्या अर्थी तुझ्या सगळ्या अपराधांबद्दल तुला क्षमा केली आहे, समजलास. जा महाराजांचीही क्षमा माग (महाराजांस) महाराज, याला खरा पश्चात्ताप झाल्यासारखा दिसतो. तर महाराजानीहि याला क्षमा करावी.

इंदिरा--(मदनसुंदरास) ऊठ ऊठ. आतां यापुढं तरी ह्या मदनिकेची खरी योग्यता ओळखून आपलं राहिलेलं आयुष्य तिच्याबरोबर आनंदानें घालीव.

नरवाहन—तुमच्या सगळ्यांच्याच मनांत जर याला क्षमा करायची आहे, तर माझा कांहीं आग्रह नाहीं. (सुंदराला) सुंदर, ऊठ, ऊठ, तुला क्षमा केली आहे. (रमणकास) रमणका, केवळ यांच्या सांगण्यावर विश्वास ठेवून मीं तुझा अन् या साध्वीचा व्यर्थ छल केला. आणि हा सगळा प्रकार ओढवायला मुख्यतः तुझी पराधीन वृत्तीच मूळ कारण झाली आहे. तर आजपासून तुला ह्या पराधीन वृत्तींतून मुक्त करून तुला विभावरी नगरीचा स्वामी केला आहे. बोल आणखी काय आहे तुझी इच्छा ? आणखी काय मी तुझं प्रिय करूं ?

रमणकः—महाराजांची ही इतकी कृपा असल्यावर आणखी काय मागायचं राहिलं? पण देणार तर हें द्याव–

॥ पद्य ॥

॥ दयितांस कांत–विरह कधीं मुळिं न तो घडो ॥ दुष्ट-कपट-बंध सकल सर्वथा दडो ॥ ध्रु० ॥ जलदास सदा चपलेचा संग लाधुनी ॥ तो त्रिभुवन-भर फिरुनि सौख्य टाकुं पसरुनी ॥ या रोहिणिला चंद्र-संग होऊं निशिदिनीं ॥ युवयुवति प्रणय–रंग सकलही जडो ॥ १ ॥ नृपकंठिं सदा राजनीति दयित कर धरो ॥ रणधीर-करां खड्गलता समरिं सांवरो ॥ हरिभक्तिपरां होउनि वश मुक्ति ती वरो ॥ परवशता-कर कंठीं कधिं न परि पडो! ॥२॥

दयितांस ॥ ध्रु० ॥

[“ विरहविरति ” नामक सातवा अंक समाप्त.]

समाप्त.

शुद्धिपत्रक.

पृष्ठ.	खालून ओळ.	वरून.	अशुद्ध.	शुद्ध.
१	५		हरिद्दा	हरिपदा.
२		४	सुत्रधार	सूत्रधार
,,		,,	तूमचें	तुमचें
,,		५	जन मन	जनमन
,,		७	कवीचें	कवींचें
७		६	अनुचित काय	अनुचित उचित काय
,,		१३	कशी	कशि होई ॥
८		१०	पंजाराही	पंजराही
,,		१६	तिजताप	तिज ताप
९		३	’ग्रायची नाहीं तर	ग्रायची, नाहीं तर
१३		३	मोहुनी	मोहनी.
१४	७		अशी	आशि
१९	७		समंदानं	समंधांन
२०		६	कोठुनिया ही	कोठुनियाही
२१	९		... ...	**रमणकः—**
,,	८		स्पर्शुनि यापरि	स्पर्शुनिया परि
२२	४		निद्रावश इ० बद्दल	तारापति सह क्रीडति तारा ॥ आश्लेषिति त्या दिशा अंबरा ॥ वल्लरि वेष्ठिति रुचिर तरुवरां ॥ शंकिशि कां तरि या समया- ला ? ॥ १ ॥
२८	२		कांति	कांती

पृष्ठ.	ओळ.	अशुद्ध.	शुद्ध.
३०	३	अंतरिं	अंतरीं
,,	६	कुमतिहि	कुमति ही
,,	५	निंदिशि	निंदिशी
३१	६	मधुर बोलुनी	मधुवच वदुनी
३२	१	सज्जनांची ही	सज्जनांचीही
३४	११	पतीसह	पतिसह
३५	१३	स्मरकार्य	स्मर-विषय
३७	११	निर्वाहाची	उदरपूर्तिची
,,	३	जनानि	जननी
३८	९	समरकरि	समर करि
३९	५	सुमति	सन्मति
,,	११	सन्मर्गानें	सन्मार्गानें
४०	१	करि	करी
,,	२	,,	,,
,,	३	करिशि	करिशी
,,	६	दाखवुनि	डंवचुनि
४१	३	हर्म्या	भुवना
४७	५	हेऊात	होऊत
४८	५	कंट	कंठ
४९	८	बाहेर	बाहेर.
५०	१२	किति	किती
५१	६	मजशी	मजशि
५९	९	घार	वार
६३	५	मब	मग
,,	५	अतुसरती	अनुसरती
,,	५	स्वामी ते	स्वामी तरि ते
,,	४	धुंदी तें	धुंदीतें

पृष्ठ.	ओळ.	अशुद्ध.	शुद्ध.
६३	३	वंचघ सारे टकविति	वंचक सारे ठकाविति
६४	१०	चलका	अलका
,,	११	पहा	महा
,,	१४	नरताहन	नरवाहन
,,	,,	इधपर्यंत	इथपर्यंत
,,	२०	णस्त	मस्त
,,	२१	णस्ती	मस्ती
६७	२	समाधि हि	समाधी हि
,,	४	सेविला कां	सेविला मार्ग कां
६८	३	तर	जर
६९	१२	वन्हि	वन्ही
,,	१०	ब्रम्ह गोत्रघ्न	ब्रह्म-गोत्रघ्न
७४	२	व्यर्थचि	व्यर्थची
७७	११	पितया	सखया
७८	७	खरी खरी	खरी खोटी
८०		* खालून तीन ओळी गाळून टाकणें.*	
८१	९	यमसदन	या मदनसुंदराच्या
८२	३	पहिल्या	पाहिल्या
८५	२	प्राणेश्वरी	प्राणेश्वरि
,,	,,	देवास प्रिय	दे वास प्रिये
८६	१	कुंजर गमेन	कुंजरगमने
८७	६	मार, सुहृद	मार-सुहृद
,,	७	करील	करिल
,,	१०	वृक्षतरूवर	वृक्षलतावृत
,,	,,	पळतातीं	पळताति
,,	९	मंजहे	मंजु हे
,,	७	मधुकंठि	मधुकंठी

	ओळ.	अशुद्ध.	शुद्ध.
	६.	करुानि हरुानि	करुनि हरुनि
	९	उलट या	उलट या ॥
	५	मधु—	मदनः—
		इछित	इच्छित
	६	त्यांतही	त्यांतहि
	९	त्या	त्यां
	१	संकल्प	सकंप
	९	८ वा	९ वा.
		प्र. ८	प्र. ९
	८	निदिशि	निंदिशी
	६	वधंते	वेंधते
	८	पद्वश	परवश
	९	दंति तया	दंतीं तया
	८	धरिति	धरिती
	१०	नित्य चंद्रिकेनें	नित्य–चंद्रिकेनें
	९	महारजांच	महाराजांचं
	४	वृत्ती	वृंतीं
१	११	सिकविते	शिकविते
	१	कवना	कवनीं
६	३	मानसत्या	मानस त्या
७	४	सारिका वचा	सारिका–वचा
	६	सादिल	साहिल
	१	देतील	देतिल
२८	४	मंद्राच्या	मंदाराच्या
२९	४	म्हणून	(म्हणून–)
,,	५	दाविली बहू	दाविलि बहु
,,	६	चित्रकथाही	चित्रकथा ही

पृष्ठ.	ओळ.	अशुद्ध.	शुद्ध.
१२९	६	म्हणुनि	म्हणुनी
,,	७	येऊनि	येउनि
,,	८	निशिथीं	निशिथीं ॥
,,	६	वन देवी	वनदेवी
१३१	९	वेषें	मिषें
१३२	३	घरांत	दुःखानें
१३३	७	आलका	अलका
१३५	८	आवलं	आपलं
,,	३	टरली	ठरली
,,	२	उटली	उठली
१३९	३	चालवायला	चाळवायला
१४०	८	किती	किति
१४४	६	विश्वालांतला	विश्वासांतला
,,	३	अगदीं	अगदीं.
१४९	२	॥ ७ ॥	॥ ९ ॥
१५१	१०	त्तिचीं	चित्तीं
१७१	४	घेऊनि	घेउनि
,,	२	माडूं	मांडू
१७३	९	अथ०	अध०
१८५	१२	सूर्य	सूर्य
१८७	३	बघुन	बघुनि
२०३	५	खंडुनि या	खंडुनिया